# नव्या जगांत सहा महिने



१५५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भूप्रवास
सं. क्र. ८७०
REFBK-0010190

प्र. न. जोशी

# नव्या जगांत सहा महिने

लेखक

REFBK-0010190 च. डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

किंमत रु. ४·५०

व्हीनस प्रकाशन : पुणें २

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार : पुणें २

डॉ. प्र. न. जोशी यांचीं
इतर पुस्तकें

दिनविशेष
थोरांच्या माता
विज्ञानकथा : १–३
नवविज्ञानकथा : १
ती धन्य बंदिशाला
मुन्शी प्रेमचंद
शरच्चंद्र चट्टोपाध्याय
मराठी साहित्यांतील मधुराभक्ति

आवृत्ति पहिली
फेब्रुवारी १९५८

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१९६।४६ सदाशिव : पुणें २

# माझें मनोगत

सप्टेंबर १९५६ पासून फेब्रुवारी १९५७ अखेरपर्यंत मी अमेरिकेंत तेथील शैक्षणिक पाहणीसाठीं होतों. शिक्षणसंस्था पाहतां पाहतां इतर अनेक गोष्टी दृष्टीस पडल्या. सामाजिक चालीरीति, धर्मविचार, कुटुंबपद्धति, शेतकऱ्यांची स्थिति, उत्सव-समारंभ, जीवनविषयक तत्त्वज्ञान या विविध गोष्टीशीं आमचा परिचय व्हावा अशीहि योजना आमच्या 'फुलब्राईट शिष्यवृत्ती 'मार्गें होती. जें जें नवीन वाटलें त्याचें वर्णन मी तेथूनच 'केसरी', 'साधना' आदि मराठी पत्रांसाठीं लिहून पाठविलें होतें. त्यांत पुष्कळच भर घालून या पुस्तकाची सिद्धता केली आहे. पुस्तक प्रसिद्ध होत असतांना मनांत एक विचार वारंवार आला—अमेरिकेविषयीं आपणांस भरपूर माहिती आहे. त्यांच्या प्रचारखात्यामार्फत मराठींतहि अनेक प्रकारचीं वार्तापत्रें प्रसिद्ध होत असतात. अमेरिकन साहित्याचाहि प्रसार तसें पाहिलें तर आपल्याकडे आहे; पण अमेरिकेंत भारताबद्दल मात्र फारच कमी माहिती आहे. जी आहे ती विपरीत रीतीनें आहे. त्या बाबतींत प्रयत्न व्हावयास हवेत.

अमेरिकेस निघाल्यापासून हें पुस्तक तयार होईपर्यंत अनेकांचें सहकार्य मला लाभलें आहे. माझ्या आधीं अमेरिकेंत जाऊन आलेले व आतां पुनः तिकडे गेलेले प्रचार्य ब. वें. बापट यांच्या मार्गदर्शनाचा मला फार उपयोग झाला. तसेंच मित्रवर्य डॉ. श्री. वा. काळे यांनीं प्रारंभापासूनच मला सर्व प्रकारच्या सूचना देऊन माझा मार्ग फारच सोपा करून ठेवला होता. या दोघांचा उल्लेख करणें अगत्याचें वाटतें. प्रा. वा. मा. दबडघाव यांचें हार्दिक मार्गदर्शन तर मला नित्य उपयोगाचें वाटलें आहे. पुस्तकाचें मुद्रणसौंदर्य मित्रवर्य श्री. य. गो. जोशी यांच्या प्रयत्नानें आलें आहे. मुद्रितें तपासतांना श्री. पानसे यांची मोठीच मदत झाली आहे. पुस्तकाचे प्रकाशक श्री. स. कृ. पाध्ये आहेत एवढेंच नमूद करावेंसें वाटतें. त्यांच्याविषयीं कांहीं गौरवानें लिहावें असें दूरचें नातें आतां उरलेलें नाहीं.


महाशिवरात्र, १८७९. — **प्र. न. जोशी**
१६ फेब्रुवारी, १९५८. ४३७ नारायण, पुणें २.

# अनुक्रमणिका



१. निळें आकाश निळें पाणी ... १
२. नव्या जगाची तोंडओळख ... १८
३. वॉशिंग्टनचे रंगीबेरंगी दिवस ... २४
४. कॅपिटॉलमधील अद्‌भुत चित्रकारी ... ३२
५. अमेरिकेचें तीर्थस्थान ... ... ३८
६. वॉशिंग्टनची स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूट .. ४५
७. नाना देशचे नाना शिक्षक ... ५७
८. अमेरिकेंतील माझें घर ... ६४
९. ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटी ... ७४
१०. अमेरिकन शाळा : अमेरिकन विद्यार्थी... ८१
११. तीन उल्लेखनीय शाळा ... ८९
१२. शेतकऱ्यांची गोड सोबत ... ९५
१३. रगेल आणि रंगेल नायगारा ... १०८
१४. भोपळ्यांची जत्रा ... ११४
१५. विचित्र नगरी सँटफी ... ११९
१६. बँडेलिअर नॅशनल मॉन्युमेंट ... १२८
१७. न्यू मेक्सिकोची यक्षभूमि ! ... १३३
१८. नव्या जगांतील जुने लोक ... १३८
१९. रेड इंडियन्सचें गरुडनृत्य ... १४६
२०. रुपेरी नगरींतील एक महिना ... १५२
२१. निवडुंगाचा बगीचा ... १६०
२२. टच्यूसॉनचें सजीव उद्यान ... १६७
२३. विवेकानंद येथून बोलले ... १७२
२४. शिकॅगोचें औद्योगिक प्रदर्शन ... १८१
२५. अटलांटिक सिटीचा शैक्षणिक सोहळा ... १९३
२६. ऐश्वर्यशाली न्यू यॉर्क ... २०२
२७. यांत्रिक जीवनाला धर्माची ऊब ... २१२
२८. पूर्व आणि पश्चिम ... २१९




स्वातंत्र्य देवीचा पुतळा, न्यूयॉर्क.




...... न्यूयॉर्क बंदरांतील गगनचुंबी इमारती



रॉकफेलर सेंटर, न्यूयॉर्क



जगांतील सर्वांत उंच इमारत
' एम्पायर स्टेट ' न्यूयॉर्क



संयुक्त राष्ट्रसंघ–सचिवालय, न्यूयॉर्क ......



जॉर्ज वॉशिंग्टनचें घर–माउंट व्हर्नान



डॉ. हेक्, कोलंबस



मि. लॉईड व ग्लोरिया फ्रँक




लेखक : मिसिसिपी नदीवर, न्यू ऑर्लिन्स



बर्फांतील मुलांचा खेळ



छोटा जेसी, मुई–पाळण्यांत



नॅशनल कॅश रजिस्टर कंपनी : डेटन, दुपारचें भोजन




सिल्व्हर सिटी

डॉ हंट लेखक डॉ मिलर



नॅशनल कॅश रजिस्टर कंपनी, डेटन : दुपारचें भोजन



सि
ल्व्ह
र
सि
टी

हेरॉल्ड वेल्श लेखक डॉ. मिलर




रेड इंडियन्स : नृत्यापूर्वी




झुनी इंडियन स्त्रिया : खास पोशाखांत



रेड इंडियन–एक नृत्य प्रकार



कोलंबस ( ओव्हायो ) येथील आमचा आंतरराष्ट्रीय गट




राईट वधू स्मारक – डेटन



कॅपिटॉल इमारत, वॉशिंग्टन

वॉशिंग्टनचें प्रदर्शन-हिंदी विभाग





दोन इंडियन्स



रेड इंडियन, नृत्याच्या तयारीत



रेड इंडियनचें ' टॉम् टॉम् '

कार्ल्सबाल्ड
‘ धरतीच्या उदरांत ’






रेड इंडियन्सचें
सामुदायिक गृह
... टेऑस



सोव्हॅरो निवडुंग : टयूमॉन



तांब्याची खाण : न्यू मेक्सिको



लेखक : सिल्व्हर सिटी हायस्कूलमध्ये




लेखक :
सिल्व्हर सिटी
प्राथमिक शाळेत



रेड इंडियन्स–गरुड नृत्य



स्पॅनिश वेशभूषा : न्यू मेक्सिको




रेड इंडियन स्त्रीचें मातकाम



... पांढऱ्या वाळूचा सागर : न्यू मेक्सिको

नायगारा : अमेरिकन दृश्य ...



१९२०

## १ : निळें आकाश निळें पाणी

२७ ऑगस्ट, १९५६. सांताक्रूझ विमानतळावर परदेशीं जाणाऱ्या व त्यांना निरोप देणाऱ्या लोकांची एकच गडबड उडून गेली होती. पुनः पुनः भेटणें, पुनः निरोप देणें चालू होतें. रात्रींचे साडेअकरा वाजून गेले असून एअर इंडिया इंटरनॅशनलचें सुपर कॉन्स्टिलेशन निघावयास फार थोडा अवधि उरला होता. तपासणी झालेल्या बॅगा नंबर टाकून विमानाकडे आधींच गेल्या होत्या. जाणारीं माणसें आतां घरचा लोभ सोडून विमानांत चढण्यास उत्सुक झालीं होतीं. पुनः भेटणें; हस्तान्दोलन करणें; सुखाचा प्रवास इच्छिणें; हार, तुरे, गुच्छ अर्पण करणें इत्यादि कार्यक्रम संपत आले. कॅमेऱ्यांचे शेवटचे फ्लॅश चमकले गुजराथी, मराठी, इंग्रजी, हिंदी सर्व भाषा बोलणारीं माणसें आपल्या भाषांतून एकमेकांना निरोप देत होतीं. समोर उभ्या असलेल्या ‘ राणी ऑफ् हिंद ’ची घरघर सुरू झाली. जाणाऱ्या लोकांची रांग तयार झाली. हातांत छोटी ब्रीफकेस, खांद्यावर लोंबणारी एखादी पिशवी, अथवा वरकड सामानाची पेटी, लंडनला थंडी फार म्हणून वा तेवढेंच सामानाचें वजन कमी व्हावें म्हणून डाव्या हातावर ओव्हरकोट अशा थाटांत पुरुष प्रवासी आतुरतेनें उभे होते. बायकांच्या आतुरतेस व घाईस सीमाच नव्हती. रंगीबेरंगी वस्त्रें आणि मर्यादित अलंकार एकसारख्या चाललेल्या किलबिलाटांतहि उठून दिसत. मद्रासी, राजस्थानी, पंजाबी, मराठी, ख्रिस्ती, बंगाली स्त्रियांच्या पोषाखांतील, बोलण्यांतील, वागण्यांतील फरक नजरेंत भरणारा होता. विमानांत राखून ठेवलेल्या जागेचा नंबर दाखविणारें कार्ड प्रत्येकाच्या हातांत होतें. सूचना होतांच इष्टमित्रांना, आतांना अखेरचें खुणवून तिष्ठत असणारी रांग सजीव झाली. पलीकडच्या अंगास विमानाचें प्रवेशद्वार होतें. कॅप्टन व हवाई सुंदरी ( एअर होस्टेस ) यांचें स्वागत

स्वीकारून जो तो आपापल्या जागेवर जाऊन बसण्यास उत्सुक झालेला होता. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस असणाऱ्या केबिनमध्यें पहिल्या वर्गाच्या उतारूंची सोय केलेली होती. पांच-दहा मिनिटांत भराभरा कसलीहि गडबड न होतां साठपर्यंत असलेले उतारू आपापल्या जागेवर येऊन बसले. विमानाचें प्रवेशद्वार बंद झालें. इंजिनची घरघर वाढत होती. प्रत्येकजण आपल्या जागेची व सुखसोयीची पाहणी करीत होता. खुर्च्या किती मऊ आहेत, खिडकीच्या कांचा किती स्वच्छ आहेत, माहितीपत्रकें किती व कोणतीं आहेत यांचा विचार करावयास फारशी सवडच नव्हती. इंजिनचा आवाज कर्कश होऊं लागला. धूम्रपान न करण्याविषयीं व खुर्चीतील पट्टे स्वतःभोंवतीं आवळण्याबद्दल सूचना मिळाल्या. हवाई सुंदरीनें सर्वांना सावधान राहण्याविषयीं विनंती केली. कॅप्टनचीं, पायलटचीं नांवें सांगण्यांत आलीं. उड्डाणाची वेळ झाल्याचें दिसत होतें. घर्र घर्र असा कर्णकटु आवाज करीत विमान जमिनीवरून धांवूं लागलें. पहिली फेरी पूर्ण झाली. दुसऱ्या खेपेस पुनः मोठा राक्षसासारखा आवाज करीत विमान जोरांत रस्त्यावरून धांवत होतें आणि एकदम लक्षांत येतें न येतें तोंच तें वर हवेंत तरंगूं लागलें. कोणतीं व किती वळणें घेतलीं कोणास माहीत, पण चार-पांच मिनिटांत जवळची वाटणारी मुंबई दुरावल्यासारखी वाटली. थोड्याच वेळापूर्वीं आम्ही मुंबईत होतों. तारीख २७ ऑगस्ट होती आणि आतां हवेंत आल्याबरोबर आम्ही मुंबई सोडली होती. १२ वाजून गेल्यामुळें दिवसहि बदलला होता. खालीं लुकलुकणाऱ्या असंख्य दिव्यांकडे लक्ष द्यावें कीं, अपघाताच्या वेळीं प्राणसंरक्षण कसें करावें यासंबंधीं लाईफ जॅकेटचें प्रात्यक्षिक चाललें होतें हें पहावें, कांहीं निश्चय होत नव्हता. हवाई सुंदरीनें दिलेलें सरबत, चॉकोलेट, लवंग-वेलदोडे इत्यादि साहित्य सर्वांना रुचकर लागत होतें.

मुंबई दूर झाली. अरबी समुद्रावरून आमचा प्रवास सुरू होता. वरतीं निळेभोर आकाश, असंख्य डोळे मिचकावणाऱ्या तारका आणि खालीं अंधारांत सागराचें प्रशान्त स्वरूप. विमानाचा घरघर आवाज थोडा कमी झाला होता. कानांतील कापसाचे बोळे काढले तरी चालण्यासारखें होतें. विमानांत आल्याची नवलाई संपल्यानंतर लोक झोपण्याची तयारी करूं

लागले. बसण्याची जागा मऊ मऊ होती. मागें चांगलें रेलून बसतां येत होतें. आमचें तिकिट पहिल्या वर्गाचें असल्यानें आराम थोडा अधिक होता. खुर्चीच्या उजव्या बाजूस असलेली कळ दाबतांच खुर्चीची पाठ आणखी मागें जाई व आरामखुर्चीत बसल्याप्रमाणें सर्वांना झोपण्याची सोय होणार होती. हवाई सुंदरीनें कोणास उबदार रग, कोणास उशा पुरविण्याची खबरदारी घेतली; आणि लोक हातपाय पसरून झोपण्याच्या तयारीस लागले. मला आधींच झोप कमी. रेल्वेच्या पहिल्या वर्गांत सर्व सुखसोयी असल्या तरी मला झोप कशी ती येत नसे, आणि आतां तर मी मध्यरात्रींच्या सुमारास सागरावरून उड्डाण करीत होतों. मला जागा खिडकीशीं मिळाली होती; लहान पोराप्रमाणें मी एकसारखी टक लावून बाहेर पाहत होतों. बाहेर पाहण्यासारखें काय होतें? डोंगर नव्हते, नद्या नव्हत्या, सरोवरें नव्हतीं, फुलांचे ताटवे नव्हते, कीं लहान लहान घरांची रांग नव्हती. निळ्याभोर आकाशाचें अवगुंठन आमच्या विमानाभोंवतीं पसरलेलें होतें. विमानाच्या दोन्ही पंखांवर असणारे रंगीत दिवे शांत गंभीर अंधाऱ्या निळ्या वर्णांत किती शोभिवंत दिसत होते! दूर कोठें तरी दिव्यांचा असाच एखादा पुंज दिसे. मानवाच्या वस्तीची ती तुटक अशी निशाणी एवढ्या उंचावरून पाहतांना गंमत वाटे. भूपृष्ठाचा मधलाच भाग थोडा उंचावलेला असे. डोंगर टेकडी दिसे. वर झालेल्या झाडांच्या गर्दीमुळें बनलेला काळसर भाग अंधारांतहि स्पष्ट दिसे. पण थोड्याच वेळांत हेंहि सर्व संपलें आणि उरलें तें निळें आकाश आणि निळा सागर. इराणच्या भूमीखेरीज आतां भूभाग दिसणार नव्हता. क्षितिज कोठें संपतें याचा अंदाज लागत नव्हता. सागराची मर्यादा कोणती आणि आकाशाचें साम्राज्य कोठें सुरू झालें याचा निर्णय लागण्यासारखा नव्हता. मधूनच घरच्या लोकांची आठवण होई. सांताक्रूझवरून घरीं लोक गेले असतील. माझ्या विमानप्रवासाची न अनुभवतांच कल्पना सुरू असेल. छोट्या प्रतिभाराणीनें विमानाबद्दल केवढ्या मोठ्या कल्पना स्वतःशीं केल्या होत्या. तिकिट न काढतां आप्पांच्या आधीं विमानांत लपून घुसावयाचें, खुर्चीखालीं दडून राहावयाचें आणि मग विमान आकाशांत गेल्यावर बाहेर यावयाचें, मग कसा ड्रायव्हर बाहेर काढणार? या मनोराज्यांत ती चार-पांच दिवस दंग

होती. पण विमानतळावर आल्याबरोबर आणि अवाढव्य अशी ' राणी ऑफ् हिंद ' पाहिल्याबरोबर नको तो विचार असा पोक्त विचार प्रतिभाराणीनें केला असावा. विमानाची राक्षसाप्रमाणें घरघर सुरू झाल्यावर आप्पानें सुद्धां जाऊं नये असें त्या चार वर्षांच्या मुलीला क्षणभर वाटलें. पण एवढी तयारी केली, टॉकीवॉकी आणण्याचें वचन मिळालें, खेळांनीं घर भरून जाणार होतें, आप्पा गेले तरी हरकत नाहीं असा विचार दुसऱ्याच क्षणीं करून तिनें मला अखेरचा ' टाटा ' थोड्या बावरलेल्या मुद्रेनें केला होता. आतां विमान सुरू होऊन अर्धा तास होत आला होता. या वेळीं घरच्या लोकांचे विचार काय काय चालले असावेत, याची केवळ कल्पनाच करणें शक्य होतें.

मला झोप येण्याचें चिन्ह येथेंहि दिसेना. डोक्यावर असलेल्या छोट्या दिव्याचा प्रकाश मी बंद करून टाकला. वारें थोडें जास्त वाटत होतें म्हणून मी दिव्याशेजारींच असणारें सॉकेट फिरवून वाऱ्याचा झोत मंद केला. आमचें विमान सुपर कॉन्स्टिलेशन होतें. सर्व प्रकारच्या सुखसोयी त्यांत होत्या. एकूण अठ्ठावन उतारू त्यांत सहजासहजीं आरामांत बसूं शकत होते. अगदीं मागच्या बाजूस बारीकसारीक सामान ठेवण्याची छोटी खोली होती. प्रवेशद्वाराच्या दोन्हीहि बाजूंस 'सी' व 'डी' केबिन्स होत्या. या ठिकाणीं विशेष सुखसोयी असणाऱ्या पहिल्या वर्गाच्या जागा होत्या. पुढल्या 'ए' व 'बी' केबिन्समध्यें टूरिस्ट वर्गाचे प्रवासी होते. दोन्ही वर्गांत सोयींच्या दृष्टीनें फारसा फरक नव्हता. हातपाय पसरावयास अधिक जागा पहिल्या वर्गांत होती एवढेंच. अगदीं पुढल्या भागांत पायलट व त्याचे सहकारी यांची जागा होती. एअर इंडियानें नुकतींच खरेदी केलेलीं हीं विमानें बादशाही थाटाचीं होतीं. उंची जातीच्या लांकडाचें गुळगुळीत पॉलिश केलेलें फर्निचर, डोळ्यांत भरणारा त्याचा रंगदार घाट, प्रसन्न वातावरण निर्माण करणारे मंद मंद दिवे, मऊ मऊ खुर्च्या, प्रत्येक खिडकीशीं असणारा नाजुकसा पडदा आणि सेवकलोकांची मनमोकळी वर्तणूक, विमानाचा प्रवास संपूंच नये असें कोणासहि वाटावें. विमानाचीं इंजिन्स अतिशय शक्तिमान असल्यामुळें वेग तासास सरासरी तीनशें मैलांचा तरी असावा. संथ सागरावरून विमान जात असल्यामुळें कसल्याहि प्रकारचे

हेलकावे नव्हते. बंदिस्त घरांत आपण जेवढ्या आरामांत पहुडलेलों असतों तेवढा आराम एवढ्या उंचावरहि माणसानें निर्माण केलेला होता. घरीं आपण या खोलींतून त्या खोलीत जेवढ्या निर्भयतेनें जातों तीच निर्भयता येथेंहि होती. स्वच्छता, टापटीप, सौंदर्यदृष्टि यांचा एक आदर्शच समोर उभा होता.

सुपर कॉन्स्टिलेशनची कीर्ति सर्व जगास आतां माहीत झालेली होती. या प्रकारच्या विमानांतील सुखसोयी सर्वांना लोभ वाटावा अशाच होत्या. शिवाय आतांपर्यंत या जातीच्या विमानांनीं चाळीस हजारांपर्यंत अटलांटिक उड्डाणें केलीं असल्यामुळें प्रवासी लोकांच्या मनांत भीतीचा लवलेशहि नसे. लॉकहेड आणि हेन्री ड्रेइफस या तज्ज्ञांच्या दीर्घ अनुभवांतून व सततच्या चिंतनांतून सुपर कॉन्स्टिलेशनची निर्मिति झाली होती. पहिला आराखडा तयार झाला तो दोन वर्षें आकृत्या, मॉडेल्स तयार करकरून. १,५००,००० डॉलर्स येथपर्यंत खर्च झाले आणि शेवटीं २५०,००० डॉलर्सचें पहिलें सुपर कॉन्स्टिलेशन तयार झालें. लोकांना त्याचें सामर्थ्य आणि त्याचें वैभव एकदम पसंत पडलें. त्याची लोकप्रियता वाढीस लागली. हवेवरील व वातावरणावरचें स्वामित्व या विमानांत अतिशय काटेकोरपणें पाळलें जातें. उतारूंना स्वच्छ हवा हवी तेवढी, हवी तशी घेतां येते. उष्णतामान पाहिजे तेवढें ठेवतां येतें. बाहेरचें हवामान कसेंहि असलें तरी केबिनमध्यें सर्वांना आवश्यक असें ७५° पर्यंत उष्णतामान राखतां येतें. विमानांत मिळणारें अन्न सदोदित स्वच्छ, ताजें, टवटवीत राहावें म्हणून रिफ्रेजेशनची व्यवस्था फार चांगल्या प्रकारची असते. आपल्या घरचे ३४० रिफ्रेजेटर्स करतील तेवढें काम एका विमानांत होत असतें. या प्रकारच्या विमानांना कधीं दोन, कधीं चार इंजिन्स ३२५० अश्वशक्तीचीं असतात. उतरतांना वा चढतांना उतारूंना कोणताच त्रास होत नाहीं. धक्के नाहींत. हादरे नाहींत. एअर इंडिया सर्व्हिसचें सुपर कॉन्स्टिलेशन विमान हें एक भूषण १९४८ सालापासून मानलें जातें तें याच कारणांसाठीं.

सुपर कॉन्स्टिलेशनचें हें वैभव आठवतां आठवतां किती वेळ गेला कोणास माहीत? अरबी समुद्राचा बराचसा भाग मागें गेला होता.

होती. पण विमानतळावर आल्याबरोबर आणि अवाढव्य अशी ' राणी ऑफ् हिंद ' पाहिल्याबरोबर नको तो विचार असा पोक्त विचार प्रतिभाराणीनें केला असावा. विमानाची राक्षसाप्रमाणें घरघर सुरू झाल्यावर आप्पानें सुद्धां जाऊं नये असें त्या चार वर्षांच्या मुलीला क्षणभर वाटलें. पण एवढी तयारी केली, टॉकीवॉकी आणण्याचें वचन मिळालें, खेळांनीं घर भरून जाणार होतें, आप्पा गेले तरी हरकत नाहीं असा विचार दुसऱ्याच क्षणीं करून तिनें मला अखेरचा ' टाटा ' थोड्या बावरलेल्या मुद्रेनें केला होता. आतां विमान सुरू होऊन अर्धा तास होत आला होता. या वेळीं घरच्या लोकांचे विचार काय काय चालले असावेत, याची केवळ कल्पनाच करणें शक्य होतें.

मला झोप येण्याचें चिन्ह येथेंहि दिसेना. डोक्यावर असलेल्या छोट्या दिव्याचा प्रकाश मी बंद करून टाकला. वारें थोडें जास्त वाटत होतें म्हणून मी दिव्याशेजारींच असणारें सॉकेट फिरवून वाऱ्याचा झोत मंद केला. आमचें विमान सुपर कॉन्स्टिलेशन होतें. सर्व प्रकारच्या सुखसोयी त्यांत होत्या. एकूण अठावन उतारू त्यांत सहजासहजीं आरामांत बसूं शकत होते. अगदीं मागच्या बाजूस बारीकसारीक सामान ठेवण्याची छोटी खोली होती. प्रवेशद्वाराच्या दोन्हीहि बाजूंस 'सी' व 'डी' केबिन्स होत्या. या ठिकाणीं विशेष सुखसोयी असणाऱ्या पहिल्या वर्गाच्या जागा होत्या. पुढल्या 'ए' व 'बी' केबिन्समध्यें टूरिस्ट वर्गाचे प्रवासी होते. दोन्ही वर्गांत सोयीच्या दृष्टीनें फारसा फरक नव्हता. हातपाय पसरावयास अधिक जागा पहिल्या वर्गांत होती एवढेंच. अगदीं पुढल्या भागांत पायलट व त्याचे सहकारी यांची जागा होती. एअर इंडियानें नुकतींच खरेदी केलेलीं हीं विमानें बादशाही थाटाचीं होतीं. उंची जातीच्या लांकडाचें गुळगुळीत पॉलिश केलेलें फर्निचर, डोळ्यांत भरणारा त्याचा रंगदार घाट, प्रसन्न वातावरण निर्माण करणारे मंद मंद दिवे, मऊ मऊ खुर्च्या, प्रत्येक खिडकीशीं असणारा नाजुकसा पडदा आणि सेवकलोकांची मनमोकळी वर्तणूक, विमानाचा प्रवास संपूंच नये असें कोणासहि वाटावें. विमानाची इंजिन्स अतिशय शक्तिमान असल्यामुळें वेग तासास सरासरी तीनशें मैलांचा तरी असावा. संथ सागरावरून विमान जात असल्यामुळें कसल्याहि प्रकारचे

हेलकावे नव्हते. बंदिस्त घरांत आपण जेवढ्या आरामांत पहुडलेलों असतों तेवढा आराम एवढ्या उंचावरहि माणसानें निर्माण केलेला होता. घरीं आपण या खोलींतून त्या खोलींत जेवढ्या निर्भयतेनें जातों तीच निर्भयता येथेंहि होती. स्वच्छता, टापटीप, सौंदर्यदृष्टि यांचा एक आदर्शच समोर उभा होता.

सुपर कॉन्स्टिलेशनची कीर्ति सर्व जगास आतां माहीत झालेली होती. या प्रकारच्या विमानांतील सुखसोयी सर्वांना लोभ वाटावा अशाच होत्या. शिवाय आतांपर्यंत या जातीच्या विमानांनीं चाळीस हजारांपर्यंत अटलांटिक उड्डाणें केलीं असल्यामुळें प्रवासी लोकांच्या मनांत भीतीचा लवलेशहि नसे. लॉकहेड आणि हेन्री ड्रेइफस या तज्ज्ञांच्या दीर्घ अनुभवांतून व सततच्या चिंतनांतून सुपर कॉन्स्टिलेशनची निर्मिति झाली होती. पहिला आराखडा तयार झाला तो दोन वर्षें आकृत्या, मॉडेल्स तयार करकरून. १,५००,००० डॉलर्स येथपर्यंत खर्च झाले आणि शेवटीं २५०,००० डॉलर्सचें पहिलें सुपर कॉन्स्टिलेशन तयार झालें. लोकांना त्याचें सामर्थ्य आणि त्याचें वैभव एकदम पसंत पडलें. त्याची लोकप्रियता वाढीस लागली. हवेवरील व वातावरणावरचें स्वामित्व या विमानांत अतिशय काटेकोरपणें पाळलें जातें. उतारूंना स्वच्छ हवा हवी तेवढी, हवी तशी घेतां येते. उष्णतामान पाहिजे तेवढें ठेवतां येतें. बाहेरचें हवामान कसेंहि असलें तरी केबिनमध्यें सर्वांना आवश्यक असें ७५° पर्यंत उष्णता-मान राखतां येतें. विमानांत मिळणारें अन्न सदोदित स्वच्छ, ताजें, टवटवीत राहावें म्हणून रिफ्रेजेशनची व्यवस्था फार चांगल्या प्रकारची असते. आपल्या घरचे ३४० रिफ्रेजेटर्स करतील तेवढें काम एका विमानांत होत असतें. या प्रकारच्या विमानांना कधीं दोन, कधीं चार इंजिन्स ३२५० अश्वशक्तीचीं असतात. उतरतांना वा चढतांना उतारूंना कोणताच त्रास होत नाहीं. धक्के नाहींत. हादरे नाहींत. एअर इंडिया सर्व्हिसचें सुपर कॉन्स्टिलेशन विमान हें एक भूषण १९४८ सालापासून मानलें जातें तें याच कारणांसाठीं.

सुपर कॉन्स्टिलेशनचें हें वैभव आठवतां आठवतां किती वेळ गेला कोणास माहीत? अरबी समुद्राचा बराचसा भाग मागें गेला होता.

मी कोठें आहे हें मला माहीत नव्हतें. आमचा पहिला मुक्काम भूमध्यसमुद्रावरील लॅबिनॉन राष्ट्राच्या बैरूट गांवीं होता. सकाळीं केव्हां तरी बैरूट येईल असें बोललें जात होतें. तोंपर्यंत एकसारखें निळें आकाश, निळा समुद्र. मुंबईपासून बैरूट २५०९ मैल दूर होतें. मध्यें कोठेंहि न थांबतां आम्ही अरबी समुद्र, इराण, इराणचें आखात, इराक आणि सौदी-अरेबियाची सीमा, जॉर्डन, सीरिया या देशांवरून रात्रींचि जाणार होतों. सागर केव्हां संपेल आणि भूभाग केव्हां लागेल हें नीट पाहिल्याखेरीज समजणारें नव्हतें. इस्लामी राष्ट्रांवरून जातांना अनेक विचार माझ्या मनांत येण्यासारखे होते. प्राचीन भारत आणि युरोप यांचें दळणवळण अरबांनीं चालू केलें तें याच भूभागांतून. पूर्व-पश्चिमची मिळणी झाली ती येथेंच.

पुणें–मुंबईकरांना परिचित असणाऱ्या 'मान्सून'चा शोध याच अरबी समुद्रावर सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं एका ग्रीक व्यापाऱ्यानें लावला. इ. स. ४ च्या सुमारास हिप्पॉलस नांवाच्या ग्रीक व्यापाऱ्यानें पहिल्यानें अरबी समुद्र ओलांडून जाण्याचें साहस केलें. वाऱ्याच्या मदतीनें सुखरूपपणें सागर ओलांडतां येईल हा विश्वास त्यानेंच निर्माण केला. पुढें कित्येक दिवस या वाऱ्यांना 'हिप्पॉलस' असेंच नांव होतें. उन्हाळ्यांत हे वारे सागरावरून किनाऱ्याकडे व हिवाळ्यांत किनाऱ्यावरून सागराकडे वाहतात. या वाऱ्यांच्या दिशांच्या ज्ञानामुळें व्यापारी लोकांची चांगलीच सोय झाली. 'सिंदबादच्या सफरी' मी लहानपणीं वाचल्या होत्या. याच अरबी समुद्रावरून त्यानें प्रवास केला होता. त्यानें मध्येंच जहाज थांबवलें व एका लहानशा बेटावर अन्न शिजवण्याची तयारी चालविली. विस्तव पेटवला, चूल तयार झाली. शेकोटीभोंवतीं त्याचे सौंगडी जमा झाले आणि काय नवल, बेटच गदगदां हलूं लागलें. भूकंप झाला कीं काय, नाहीं. तें बेट नव्हतें. एक मोठा व्हेल मासा सुस्त होऊन पडला होता. त्यास बेट समजून सिंदबादनें स्वयंपाकाची तयारी चालू केली होती. पाठीस चटके बसूं लागतांच हें बेट हलूं लागलें. त्यानें बुडी मारण्यास सुरुवात केली, पण सिंदबाद कसला वस्ताद, त्यानें सावधगिरीनें आपलें जहाज गाठलें आणि मसाल्याचीं बेटें शोधण्यास तो हिंदुस्थानच्या किनाऱ्यास निघाला. सिंदबादची ही गोष्ट मला लहानपणीं खरीच वाटे आणि आतां अरबी समुद्रावर फार उंच

वातावरणांत मी होतों, तरी मला वाटलें तो व्हेल मासा येथेंच कोठें तरी समुद्राच्या पृष्ठभागावर अजूनहि असावा. डाळिंबासाठीं प्रसिद्ध असणारें मस्कत शहर फार दूर नव्हतें. ओमानच्या व इराणच्या आखातांविषयीं मीं किती तरी ऐकलें होतें. मोतीं मिळविण्यासाठीं बुडी मारणाऱ्या पाणबुड्यांची रोमांचकारीं वर्णनें मला एका वेगळ्याच विश्वांत नेत असत. ओमानच्या आखातांत ड्यूगॉन्स ( Dugongs ) नांवाचे चमत्कारिक मासे सांपडतात. जलगाई ( Sea Cows ) असें यांना नांव मिळालें आहे. या विक्षिप्त माशांना पूर्वीं खलाशी जलकन्या वा आसराच समजत असत. पाण्यांत राहणाऱ्या या माशांचें रक्त उष्ण असतें ! यांचें अपत्यप्रेमहि मोठें विलक्षण मानलें गेलें आहे. अंगावरचें दूध पाजून हे मासे आपल्या अपत्यांचें संरक्षण करतात ! आठ-दहा फूट लांब असणाऱ्या या विक्षिप्त प्राण्याची शिकार करण्याचा उद्योग पूर्वींपासून चालू आहे. अंतराळांत असतांना खालच्या जगाची ही अशी आठवण मला एकसारखी येत होती. भोंवतींचे प्रवासी अंग वेडेंवांकडें करून घोरूं लागले होते. तेंहि दृश्य पाहण्यासारखें होतें. प्रत्येकाची तऱ्हा वेगळी होती.

अरबी समुद्र संपल्यावर मध्येंच थोडी जमीन लागली. इराणचा भूभाग असावा. पुनः समुद्र इराणचें व ओमनचें आखात सांधणारा हा जलविभाग. येथेंच हॉरम्यूझचें प्रसिद्ध बेट आहे. जुन्या प्रवाशांनीं येथील संपत्तीचें वर्णन मति गुंग करणारें केलें आहे. इब्नबत्यूता या अरबी प्रवाशानें येथेंच एक मोठा ‘ जलराक्षस ’ पाहिला. एका मोठ्या टेकडी-प्रमाणें तो होता. त्याचे दोन मोठाले डोळे म्हणजे दोन दरवाजेच. एकांतून आंत जावें व दुसऱ्यांतून बाहेर यावें. पोर्तुगीझ व्यापाऱ्यांनीं या हॉरम्यूझ बेटाचें रूपान्तर एखाद्या कुबेरनगरींत केलें होतें. इस्लामी वातावरणाच्या कथा मोठ्या रोचक व अद्‌भुत अशा वाटल्या लहानपणीं. पण आतां एका मध्यरात्रीं उंचावरून जातांना त्या अधिकच रोमांचकारी वाटत होत्या. अरेबियन नाईट्‌समधील अद्‌भुतरम्य वातावरण सुपर कॉन्स्टिलेशनमध्येंहि मला रम्य वाटलें. इराणच्या आखातांत सांपडणाऱ्या मोत्यांच्या किती कथा सांगाव्यात ! तेथील विशिष्ट प्रकारचे मोतीं एखाद्या स्त्रीनें आपल्या डोळ्यांवरून फिरवले कीं, केवढी किमया तिला साधते.

मनांत असलेला पुरुष तिच्यावर प्रीति करूं लागतो आणि तीहि मनापासून. हा समज आजहि तेथें आहे. मोत्यांचें पाणी अंगावर पडलेलें फार चांगलें असें आपणहि मानतों. इराणमधील पेट्रोलच्या खाणींनीं जगाचें लक्ष मध्यपूर्वेकडे वेधून घेतलें होतें. सुएझचा प्रश्न नुकताच निर्माण झालेला होता. मध्ययुगीन काळांत स्वस्थ असणारीं हीं मुस्लिम राष्ट्रें खडबडून जागीं झालीं आहेत. इस्लामचा दरारा आतां पूर्वीप्रमाणें नव्हता, पण त्यांची कलाकुसर, धर्मप्रीति व विलासप्रियता आजहि जगाला आश्चर्य करण्यासारखी वाटते. इस्लामनें राजकारणांत फार महत्त्वाचें स्थान मिळविलें आहे. ३००,०००,००० लोक आज या धर्माचे अनुयायी असून पृथ्वीच्या सर्व भागांत ते पसरलेले आहेत.

मध्यरात्र उलटून गेली तेव्हां मी इराकच्या भूमीवर होतों. सर्व प्रदेश ओसाड असावा. गांवेंहि दूरदूर होतीं. पहिल्या महायुद्धानंतर या नव्या इराकचा जन्म झाला. युफ्रेटिस व तैग्रिस या नद्यांमधील इतिहासप्रसिद्ध संस्कृति ती याच भूमीवरची. उंटांची भूमि म्हणूनहि या इस्लामी प्रदेशाची ख्याति आहे. लोक मागसलेले पण धर्मनिष्ठ. ‘अरब आणि त्याचा उंट’ यांच्या किती तरी कथा माझ्या वाचनांत होत्या. बसरा शहराचें ऐतिहासिक वैभव आणि एक हजार एक रात्रींतील अद्‌भुत वातावरणहि माझ्या नजरेसमोर आलें. सिंदबाद हा धाडसी प्रवासी याच गांवचा. माझ्या उजव्या अंगाला बगदाद शहर असावें. ‘बगदादच्या चोरा’चा चित्रपट मी मोठ्या आवडीनें थोडा पोरकटपणा पत्करून पाहिला होता. भारतीय भक्तिमार्गाशीं संधान बांधणारा सूफी संप्रदाय येथेंच कोठें तरी निर्माण झाला असावा. मुस्लिम संत रबिया जिचें नातें आपल्या जनाबाईशीं वा रंगनायकी अंदालशीं जमावें ती बसरा येथीलच. जगांतील सात आश्चर्यांत प्रसिद्ध असलेली बॅबिलोनची तरंगती बाग याच भूमींत होती. आणखीहि कांहीं आश्चर्यें येथून जवळपासच्या प्रदेशांत प्रसिद्धीस आलीं होतीं. किती गोष्टी, किती आठवणी मला नाना प्रकारच्या येत होत्या. रात्र संपत आली पण माझ्या मनांतील विचारांचा कल्लोळ कांहीं थांबला नाहीं. अंधाराचें, निळ्या रंगाचें साम्राज्य संपून दिशा उजळल्या होत्या. पाठीमागें पूर्वेच्या बाजूस लालीलाल झालें होतें. किती सूर्योदय मी आजवर पाहिले होते. पण

अगदीं परक्या भूमीवरून बारा हजार फूट उंचीवरून मी सूर्योदय प्रथमच बघत होतों. दमास्कस अजून जागें झालें नव्हतें. मरुभूमि संपून उघडे-बोडके डोंगर पार करून आम्ही आतां बैरूटला पोंचणार होतों. दमास्कसच्या इस्लामी थाटाच्या इमारती, मशिदी आणि थोडें वैराण वाटणारें वातावरण माझ्या मनांत चमत्कारिक संवेदना निर्माण करीत होतें. दमास्कस हें पृथ्वीवरचें अति जुनें शहर. सात-सव्वासाताच्या सुमारास बैरूट आल्याचें सांगण्यांत आलें. मी माझ्या घडाळ्यांत पाहिलें, पावणेदहा वाजले होते आणि सूर्य तर नुकताच वर आलेला. मीं घड्याळांत बदल केलेला नव्हता. घरच्या लोकांशीं तेवढाच संबंध उरला होता. त्यावरून लोक घरीं आतां काय काय करीत असतील याचा अंदाज मी करणार होतों.

बैरूटच्या प्रशस्त विमानतळावर ‘ राणी ऑफ् हिंद ’ नें आपला पाहिला मुक्काम केला. नाना सूचना देण्यांत आल्या. जवळच्याच उत्तम इमारतींत विमानसर्व्हिसतर्फेच सकाळची न्याहरी देण्याची व्यवस्था होती. आजकालच्या दिवसांत बैरूटला पूर्व-पश्चिमेचा संगम झालेला दिसला. जुनींपुराणीं घरें आणि नवीन धर्तीच्या इमारती, पडदा घेतलेल्या स्त्रिया आणि इंग्रजी पद्धतीचे केस कापून पोशाख करणाऱ्या तरूण मुली, गोंडेदार उंच टोपी घालून मोडकें–तोडकें इंग्रजी बोलणारीं माणसें असें बैरूटचें स्वरूप वाटलें. सिरीयाची हद्द नुकतीच संपून लॅबिनॉन हें एक छोटेसें राष्ट्र लागलें होतें. येथची राजधानी म्हणजे हें बैरूट. दहा-बारा वर्षांपूर्वींच हा देश पूर्णपणें स्वतंत्र झालेला. या भूमीचें बायबलमधील वर्णन The Land of Milk and Honey ’ असें आहे.

सुमारें पाऊण तासानंतर आम्ही ताजेतवाने होऊन परत विमानांत येऊन बसलों. पुनः प्रारंभिक सूचना होऊन आम्हीं बैरूट सोडलें. भूमध्य समुद्रावरून आतांचें उड्डाण होतें. हवा स्वच्छ झाली होती. गर्द निळ्या आकाशांत व सागरपृष्ठावर सूर्यप्रकाश भरपूर असल्यामुळें मनास उल्हास वाटत होता. राजकारणांत गाजत राहिलेलें सायप्रस बेट हां हां म्हणतां आम्हीं ओलांडलें. डाव्या बाजूस समुद्र, उजव्या बाजूस रेताड भूमि. तुर्कस्थानची दक्षिण सीमा लागली असावी. भोंवतीं, खालीं-वर आतां पाहण्यासारखें भरपूर असल्यानें माझें विचारचक्र आतां मंदावलें होतें.

दर एक मिनिटास खालीं नवा देखावा दिसत होता. लोक पूर्ण जागे व्हायच्या आधीं मी दाढी वगैरे उरकून घेतले होते. न्याहरी भरपूर व उत्तम प्रकारें झाली असल्यानें मन मोठ्या खुषींत होतें. कमी–जास्त उंचीच्या डोंगरावरून विमान चाललें होतें. थोड्याच वेळांत आशिया खंड संपून आम्ही युरोपच्या भूमींत प्रवेश करणार होतों. इतिहासांत गाजलेलें इस्तंबूल दूर उजव्या हातास कोठें तरी असावें. थोड्याच वेळांत ग्रीस आलें. विद्या-कला-शास्त्रांचें हें माहेरघर. ग्रीकांची संस्कृति कित्येक आधुनिक विचारांची जननी म्हणून प्रसिद्ध आहे. किती युद्धें, किती लढाया आणि केवढे विचारी तत्त्वज्ञ या भूमींत होऊन गेले. डाव्या हातास अल्बेनिया, ग्रीस, उजवीकडे बल्गेरिया आणि समोर युगोस्लाव्हिया अशा मध्यभागीं असतांनाच जेवणाची तयारी हवाई सुंदरीनें केली. साठाच्यावर लोकांना संतुष्ट करणारा तिचा संसार किती टापटिपीचा म्हणून सांगावा. स्वच्छता, सुबकता तर आहेच, पण प्रत्येकाची आवडनिवड तिला बघावी लागते. लहानसा ट्रे, पेपर नॅपकिन्स, पाण्याचीं कागदी भांडीं सर्व कांहीं थाट होता. चमचे–काटे चमचम करीत होते. सर्व प्रकारच्या जेवणास प्रथमच एक चमत्कारिक दर्प आला. आधींच केव्हां तरी उकडून शिजवून मग रिफ्रेजेटरमध्यें ‘ ताजें ’ ठेवलेलें हें अन्न खाण्याचा पहिलाच प्रसंग, पण तो विशिष्ट वास मात्र बेचैन करीत राहिला. कसेंबसें जेवण आटोपलें. घरून आणलेला शेवटचा विडा तोंडांत टाकला आणि भोंवतीं पाहूं लागलों. लोक मोठ्या हौसेनें सौम्य अशा दारूचे पेले रिकामे करीत होते. आतां आपला देश सोडला. रोमला गेल्यावर रोमन लोकांप्रमाणें वागावयास पाहिजे म्हणून भरपूर जेवण झाल्यावर कित्येकांनीं भरपूर दारू घेतली. प्रकृतीस आवश्यक असेंहि पुष्कळांचें म्हणणें दिसलें. माझ्या प्रकृतीचा अंदाज मला पुरेपूर होता.

थोड्याच वेळांत आल्प्स पर्वताचीं शिखरें दिसूं लागलीं. विमान अधिक उंचावर जाऊं लागलें. पांढऱ्या स्वच्छ ढगांचा कापूस पिंजलेला होता, त्यावरून विमान संथपणें जात होतें. पण लागलीच हवेंत बदल झाला. आभाळ दाटून आलें. पावसाचे तुषार झडझडूं लागले. चोहों बाजूंस काळसर रंगाचे ढगच ढग. धुकेंच धुकें. आतां विमानास मार्ग कसा दिसणार ?

पर्वताचें शिखर तर मध्येंच नाहीं ना येणार ? अशा शंकाकुशंका प्रत्येकाच्या मनांत उभ्या राहिल्या. आतांपर्यंत झालेला आरामाचा प्रवास संपला. विमान वर-खालीं फार मोठ्या प्रमाणावर झोके घेऊं लागलें. मऊ गाद्यांच्या खुर्चीचा फारसा उपयोग नसल्याचें सर्वांना जाणवलें. आपण आल्प्स ओलांडींत आहोंत, कमरेभोंवतीं पट्टे गुंडाळा म्हणून इशारा मिळाला. ढग मधूनच दूर झाले कीं, आल्प्सचीं पांढरीं स्वच्छ शिखरें दिसूं लागत. विमान वीस हजार फूट उंचीवरून जात होतें. मध्येंच दोन–अडीचशें फूट एकदम खालीं येई, एकदम वर जात असे. धक्के मोठ्या प्रमाणावर बसूं लागले तेव्हां थोड्या वेळापूर्वी हौसेनें घेतलेली दारू बोलूं लागली. कोणास मळमळूं लागलें, कोणास कसेंकसेंच होऊं लागलें. अन्न वर आलें तर विमानांत घाण होऊं नये म्हणून सर्वांना कागदी पेले देण्यांत आले. या वेळीं बहुतेकांना विमान चांगलेंच लागलें. बायका व मुली यांची ओकून ओकून त्रेधा उडाली. लवंगा, वेलदोडे, सुपारी यांची वांटणी झाली. या आजारावरच्या गोळ्या कित्येकांच्या जवळ होत्या. विमानांतील अधिकाऱ्यांनीं कांहीं औषधें पुरवलीं. पण कशाचा म्हणून उपयोग होत नव्हता. विमान जणूं उड्या मारीतच चाललें होतें. आतां कांहीं धडपणें आपण झूरिचला जात नाहीं असें वाटून थोडी घाबरटहि निर्माण झाली. जीव मुठींत गोळा झाला होता. तसा प्रसंग भयंकर नव्हता, पण तेवढ्यांतहि मुंबईहून निघतांना पन्नास हजारांचा विमा उतरल्याचें समाधान मनास वाटलेंच. आल्प्सची शोभा पाहण्याची मनस्थिति कोणाचीच नव्हती. बहुतेक सर्वजण निपचीत होऊन परमेश्वराची प्रार्थना म्हणत खुर्चीवर पडून होते आणि एकदम कल्पना नसतांनाच झूरिच आल्याचा संदेश मिळाला !

झूरिच ! सर्वांना एकदम हायसें वाटलें. निसर्गसुंदर देशाच्या हिरव्यागार राजधानीशीं येतांच प्रत्येकाच्या मुखावर टवटवी आली. सव्वा दोन वाजतां झूरिच सरोवराकांठीं असणाऱ्या याच नांवाच्या शहरांतील विमानतळावर आमचें विमान उतरलें एकदाचें. कोणास आतां मागच्या दुःखाचें भानच नव्हतें. स्वित्झर्लंडचीं घड्याळें सर्वांना बघावयाचीं होतीं. निसर्गानें नटवलेल्या सौंदर्याचीं चित्रें खरेदी

करावयाचीं होतीं. भराभरा लोक खालीं उतरले. पावसाची भुरभूर तशीच चालू होती. शेजारीं आल्प्सचा धिप्पाड पहाड धीमेपणानें उभा होता. हवा अतिशय थंड असल्यानें प्रत्येकानें आपापले ओव्हरकोट आतां वर काढले होते. उतरल्याबरोबर सर्वांचें लक्ष गेलें तें सुंदर सुंदर वस्तु मांडलेल्या विविध प्रकारच्या दुकानांकडे. गंमतीचें इंग्रजी बोलून गिऱ्हाइकांस खूष करणाऱ्या फॅशनेबल स्त्रिया आपल्या मालाचें वर्णन करण्यांत दंग झाल्या होत्या. इस्लामी प्रदेशांतील जुनेपणा, थोडा रांगडेपणा संपून युरोपमधील अभिजात रसिकता सर्व पदार्थांतून ओसंडत असलेली दिसत होती. कलाकुसर आणि सौंदर्य या ठिकाणीं सजीवतेस आलेलें दिसलें तेथील कांहीं रंगीत चित्रें मीं घेतलीं. पत्ते लिहिले, आणि मागतील ते पैसे देऊन पोस्टाचीं तिकिटें विकत घेऊन तीं चित्रांवर चिकटवलीं. बरोबर थोडेफार डॉलर्स होते म्हणून काम ताबडतोब झालें. डॉलरचे स्वीस फ्रँक्स किती, तिकिटाची किंमत किती, परत आलेले पैसे किती, कोणत्या प्रकारचे याचा निवाडा मला एवढ्या गडबडींत होण्यासारखा नव्हता; आणि कधीं जन्मांत ज्याची फिकीर केली नाहीं त्याचा विचार आतां माझ्या मनांतहि येणें अशक्य. परत मायदेशीं येतांना स्वित्झर्लंडमध्यें थांबण्याचा निश्चय केला तो या वेळीं.

सुमारें तासाच्या आंत विमानानें झूरिच सोडलें. थोडा फार डोंगराळ भाग गेल्यानंतर मध्य युरोपची नयनरम्य अशी भूमि दिसूं लागली. निळ्या हिरव्या रंगानें हा भूमिभाग समृद्ध होता. मधूनच लहान-मोठे जलसंचय एकंदर शोभेंत भर घालीत होते. शहरांची टुमदार मांडणी मोठी ऐटदार व मोहक होती. लांब पसरणारीं हिरवीगार शेतें आणि भोंवतींचे रंगीबेरंगी फुलांचे ताटवे थोड्या वेळापूर्वीं झालेल्या त्रासाची भरपाई करीत होते. सृष्टीची ही गौर नटून थटून सिद्ध झालेली होती. मन हरखून जावें अशी ही आरास होती. प्रसिद्ध ऱ्हाईन नदीच्या खोऱ्याचा हा सबंध भूभाग लावण्यानें नटलेला होता. दिवाळींतील मुलांचे किल्ले असतात ना, त्याच्या भोंवतींचीं घरें, रेल्वेगाडी, शिपाईमाणसें—अगदीं तस्सा प्रकार वरून दिसत होता. वळणें वळणें घेत जाणारी आगगाडी पाहून मला हंसूंच आलें. असंख्य पायांची वळवळत जाणारी गोमच जणूं. बैरुटपासून झूरिच एकूण

१६९५ मैल दूर आणि आतां झूरिचहून लंडन चार-पांचशें मैलांपेक्षां अधिक नाहीं. अगदीं थोड्या वेळांत आम्ही इंग्लिश खाडी ओलांडणार होतों. मध्यें पॅरिसला मुक्काम नाहीं म्हणून मनाचा हिरमोड झाला. अर्थात् परत येतांना पाहूं ही समाधानास जागा होतीच. विमान निदान पॅरिस-वरून तरी जाईल अशी आशा होती, पण तीहि फोल ठरली. फ्रान्सचा भूभाग सोडून इंग्लिश खाडीवरून विमान जाऊं लागलें. इंग्लंड आणि फ्रान्स या दोन बलाढ्य राष्ट्रांनीं या खाडीवर अगदीं परवांपरवांपर्यंत किती लढाया केल्या. केवढे विक्रम या खाडीवर झाले. व्यापाराची ये-जा केवढी मोठी. पांढुरकें, धुरकट पाणी थोडें फेसाळलेलें दिसत होतें. किती तरी बोटी ये-जा करीत होत्या. इंग्लंडचा किनारा दिसूं लागला. या आज हिरव्या-गार दिसणाऱ्या बेटानें जगावर केवढें स्वामित्व गाजवलें! लहानपणीं भूगोल पाठ केला, इतिहास लक्षांत ठेवला तो याच ब्रिटिश बेटांचा. आमच्या प्रवासाचा पहिला टप्पा संपणार होता. जगांतील सर्वांत मोठ्या शहरावरून—लंडनवरून आमचें विमान घिरट्या घालूं लागलें. किती अफाटपणें पसरलेलें हें शहर. आजूबाजूच्या घरांची मांडणी मोठी व्यवस्थित दिसत होती. इंग्लिश साम्राज्य संपत आलें पण त्याचा दरारा मात्र कायम होता! अनेक वेळां ऐकलें होतें कीं, इंग्लंडची हवा नेहमीं कुंद. सदोदित अभ्राच्छादित वातावरण. पण लंडनच्या भव्य विमानतळावर आम्ही उतरलों तेव्हां संध्याकाळचे पावणे पांच वाजले होते. ऊन स्वच्छ, पण तिरप्या किरणांचें पडलेलें पाहून सर्वांना नवल वाटलें. सामानाची व्यवस्था लावणें, पासपोर्ट, व्हिसा, वैद्यकीय दाखला इत्यादींची धांवपळ सुरू झाली. कोणास कोणी भेटावयास आले होते. कोणास आपलीं माणसेंच सांपडेनाशीं झालीं होतीं. आम्ही लंडनला दोन दिवस थांबणार होतों. विमान-सर्व्हिसच्या गाडीनें गांवांत निघालों तोंच एकदम अंधारून आलें आणि झिमझिम पावसास प्रारंभ झाला. आपण आजवर वाचलें तें लंडनचें हवामान खरें असल्याचें एकदम पटलें.

मध्यंतरीं दोन दिवस गेले. ३० ऑगस्टला रात्रीं साडे आठच्या सुमारास पॅन अमेरिकन विमानानें आम्ही लंडन सोडलें. हें विमान आतां दुसऱ्या विदेशी कंपनीचें होतें. सुखसोयी पूर्वीप्रमाणेंच असून अमेरिकन

दृष्टीचा प्रत्यय ठिकाठिकाणीं येत होता. विमानांतील अधिकारीवर्ग, हवाई सुंदरी, कॅप्टन व त्याचे सहकारी हे सर्व लोक अधिक मोकळ्या मनाचे व खेळकर वृत्तीचे वाटले. थोड्याच वेळांत आम्ही इंग्लंड सोडून आयर्लंडवर आलों. बाहेर सर्वत्र अंधारच होता. दोन तासांनंतर आमचें विमान खालीं उतरूं लागलें; आयर्लंडमधील शेनॉन येथें तें पाऊण तास थांबणार होतें. बाहेर थंडी विलक्षण असल्यामुळें व सर्वजण गुंगींतच असल्यानें फारसे कोणी खालीं उतरले नाहींत. साडे अकराच्या सुमारास पुनः विमानानें शेनॉनची भूमि सोडली. आम्ही आतां आयर्लंड सोडणार होतों, इंग्लंड सोडणार होतों, युरोपचा संबंध संपणार होता. जुन्या जगास पाठीमागें ठेवून दूर दूर असणाऱ्या एका नव्या देशाकडे आमची झेप होती. एका झेपेंत जवळ जवळ तीन हजार मैलांचें अंतर आम्ही आठ-नऊ तासांत तोडणार होतों. मध्यें कोठेंहि थांबणें नाहीं, विश्रांति नाहीं. एकसारखें भ्रमण, आणि तेंहि अथांगपणें पसरून राहिलेल्या अमर्याद सागरावरून !

चार शतकांपूर्वीं लौकिकदृष्ट्या हा महासागर ओलांडून युरोपियन लोक या नव्या भूमीकडे वळले आणि तीन-चार शतकांत येथें त्यांनीं नव्या संस्कृतीचें केवढें भव्य स्वरूप उभें करून दाखविलें ! आयर्लंड सोडून आतां आम्ही अटलांटिक सागरावर होतों. लंडनला दोन दिवस चांगली विश्रांति मिळाली होती. पुनः आज रात्रीं विमानांत मला झोप येणें शक्य नव्हतें. सर्वजण पेंगत होते. कांहीं जणांना गाढ झोप लागली आणि मी मात्र पुनः विचारतंद्रींत गुंग झालों. हें अटलांटिकचें उड्डाण आतां साहसाचें राहिलें नाहीं. पण सन १९२७ सालीं चार्ल्स लिंडबर्गचें 'स्पिरिट ऑफ् सेंट लुई' जेव्हां एका झेपेंत अटलांटिक पार करून पॅरिसला उतरलें, तेव्हां जगाच्या इतिहासांत एक नवें साहसाचें पान उघडलें गेलें. केवढा त्याचा पराक्रम ! जवळ जवळ छत्तीस तास त्याला या प्रवासास लागले. आज फक्त एका रात्रींत हा प्रवास न कळत होतो. आरामांत झोप घ्यावयाची व अमेरिका दिसूं लागतांच जागें व्हावयाचें. कसलाहि त्रास नाहीं, दगदग नाहीं. पहाड-पर्वत नसल्यानें विमानाच्या गतींत फरक नाहीं, धक्के नाहींत, हादरे नाहींत. एकसारख्या गतीनें मार्ग कापीत पॅन अमेरिकन कंपनीचें विमान चाललें होतें. बाहेरून बघण्यासारखें काय होतें ? तेंच निळेभोर आकाश, असंख्य

लुकलुकणाऱ्या चांदण्या, आणि खालीं संथपणें पसरलेला विस्तृत जलसंचय ! केवळ शांतता.

विमानाचा आवाजहि खूप कमी झाला होता. जमीन दिसावयास खूपच अवकाश होता. मधूनच ढगाळलेली हवा लागे. पांढु-रक्या ढगांवरून विमान चाले. वरच्या आकाशाची शोभा अवर्णनीय होती. जें भारतांत दिसत होतें तेंच आकाश, त्याच चांदण्या, तींच नक्षत्रें, तेच ढग, तेंच काळेभोर पाणी, रात्रींच्या अंधारानें लपेटलेलें तेंच विश्व. आम्ही उगाच नांवें दिलीं. हा युरोप, हा आशिया, हा हिंदीमहासागर, हा अटलांटिक; पण विश्वकर्त्याच्या दृष्टीनें पाणी सर्वत्र सारखेंच, आकाश सर्वत्र तेंच, माती येथून तेथून एकच. तो निळा गहिरा रंग, गर्द निळा रंग. निळ्या रंगाचें मला पहिल्यापासून वेड. घरीं असतांना लोक या माझ्या वेडाची थट्टा करायचे. खोलीचा रंग निळा, टेबलक्लॉथ निळें, दिव्याची शेड निळी. निळ्या रंगावर माझी फार प्रीति जडली होती. 'निळिये सारणी वाहे मोतियाचें पाणी' या ज्ञानदेवांच्या ओळींतील अनुभूतीचा भाग मला कळण्यासारखा नव्हता. पण त्यांतील निळ्या रंगाच्या उल्लेखानें मी हरखून गेलों होतों. कविवर्य 'बी' नीं एके ठिकाणीं म्हटलें आहे:

' गूढत्वाचें, सुंदरतेचें, भावसघनतेचें
नीलवर्ण हें द्योतक यांच्या निःसीमत्वाचें '

निळ्या वर्णांत गूढता आहे, सौंदर्य आहे, आणि सांद्र अशी भावना आहे, याची प्रचीति या अटलांटिक महासागरावर विशेषत्वानें आली. केवळ निळ्या, गर्द निळ्या रंगाचेंच साम्राज्य. यांतच दंग होऊन गेलों. समाधि उतरली ती उजाडण्याच्या सुमारास कॅनडामधील न्यू फौंडलंडच्या गँडर या विमानतळावर विमान उतरलें तेव्हां. नव्या भूमीस आमचे पाय लागले. अमर्याद सागरास ओलांडून आम्ही नव्या जगावर प्रथमच उतरलों. चारशें वर्षांपूर्वी मोठ्या त्रासांत, हालअपेष्टांत, मित्रांचा विरोध पत्करून कोलंबस या भूमीस प्रथम आला. त्याच्या मनास केवढा आनंद झाला असावा ? कित्येक दिवसांचा शीण, नवी—अगदीं नवी भूमि पाहतांच कोठच्या कोठें गेला असावा. त्या मानानें आम्हांस शीण असा कोठलाच नव्हता. तरी देखील आम्हांस हुषारी वाटली. भराभरा आम्हीं न्यू फौंडलंडच्या भूमीवर

उतरलों. सोसाट्याचें वारें व झोंबणारी थंडी आम्हांस बोलूंहि द्यावयास तयार नव्हती. न्यू यॉर्कला जाण्यास आम्ही आतुर झालों होतों. थोड्याच वेळांत गँडर सोडून आमचें विमान दक्षिणेकडे न्यू यॉर्कच्या रोखानें निघालें. दिवस चांगला वर आला होता. विमानहि फारशा उंचीवरून जात नसल्यानें नव्या जगाचा किनारा व अटलांटिकचा कांहीं भाग स्पष्टपणें दिसत होता. कधीं पाणी, कधीं जमीन, कधीं डोंगर-दऱ्या, कधीं नद्या-खोरीं, कधीं मुलांच्या खेळांतील आगबोटी पाहून आम्हांस गंमत वाटली. संयुक्त संस्थानांची सुपीक भूमि लागली. या भूमीस समृद्ध करणाऱ्या अनेक नद्या. त्यांचें चमत्कारिक जाळें वरून मोठें आकर्षक दिसत होतें. न्यू यॉर्कला केव्हां आलों हें समजलें सुद्धां नाहीं. ऐकलेल्या उंच उंच इमारती दिसल्या नाहींत, अवाढव्यपणें पसरलेलें शहर दिसलें नाहीं. स्वातंत्र्यदेवीचा पुतळा नाहीं. कांहीं नाहीं; आणि लोक म्हणाले हें न्यू यॉर्क ! मानणें भाग होतें. विमानतळावर विमानांच्या रांगांखेरीज व येणाऱ्या जाणाऱ्या रंगीबेरंगी माणसांखेरीज बघण्यासारखें कांहींच नव्हतें. सबंध जागेची दुरुस्ती, फेररचना चालली होती. पुनः पासपोर्ट, व्हिसा, वैद्यकीय दाखला यांची तपासणी झाली. मुंबईस असतांना एक भला मोठा छातीचा एक्स रे काढावा लागला होता. त्याचें पाकीट जपून ठेवलें होतें. अधिकाऱ्यांनीं तो फोटोहि निरखून पाहिला, आणि सहा महिने राहण्याच्या परवान्यावर शिक्कामोर्तब केलें. सर्वांना या दिव्यांतून जावें लागलें, आणि तीन तासां-नंतर सुमारें दोनच्या सुमारास ' अमेरिकन एअर लाईन्स 'च्या विमानानें आम्ही वॉशिंग्टनला येण्यास निघालों. आतां विमानांत बहुधा सर्व अमेरिकन लोक होते. हंसरे, खेळकर, वृत्तीनें साधे. ३१ ऑगस्टची दुपार होती. थोड्याच वेळांत प्रवास संपणार होता. खालून समुद्राचा भाग अन् भूमिविभाग भराभर सरकत होता. मोठमोठीं शहरें मागें जात होतीं. चार-साडेचारच्या सुमारास आमचें विमान वॉशिंग्टनच्या प्रख्यात आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरलें. भव्यतेनें प्रथमच डोळे दिपून गेले. विमान उतरत असतांनाच पहिल्यानें डोळ्यांत भरल्या त्या मोटारींच्या रांगा. नाना रंगांच्या, नाना आकारांच्या मोटारी.

आम्हांस उतरून घेण्यासाठीं ऑफिस ऑफ् एज्युकेशनमधून मिसेस् चॅन

म्हणून एक बाई आली होती. हंसतमुखानें तिनें सर्वांचें स्वागत केलें. ' मि. देसाई प्रवास सुखाचा झाला ना ? मि. जोशी आमचा देश आवडला ना ? ' असें प्रत्येकाच्या नांवानें ओळखून तिनें सर्वांचें कुशल विचारलें. सर्वांच्या सामानाची व्यवस्था केली. आम्हा बहुतेकांची व्यवस्था कैरो हॉटेलमध्यें केली होती. स्वतःच्या मोटारींत घालून मिसेस् चॅन वॉशिंग्टन विमानतळावरून कैरो हॉटेलकडे निघाली. तोंडांतल्या तोंडांत बोलून, हंसून ती सर्वांना वॉशिंग्टनच्या रस्त्यांची, रहदारीच्या नियंत्रणाची व नाण्यांची माहिती देत होती. ही पोटॅमॅक नदी, हें जेफर्सन मेमोरियल अशी माहिती ती देत होती. माझें लक्ष त्या माहितीकडे फारसें नव्हतें. आमच्या सर्वांचे चेहरे मिसेस् चॅननें पूर्वी कधीं पाहिले नव्हते, तर सर्वांना नांवानें तिनें कसें ओळखलें ? हाच प्रश्न माझ्या मनांत प्रामुख्यानें उभा होता. पुढें कांहीं दिवसांनीं तिनें याचा खुलासा केला तो असा, " तुमच्या अर्जावर तुमचे फोटो असतात ना ? त्यांचा अभ्यास मी दोन महिने करीत होतें. सुमारें चाळीस व्यक्तींच्या चेहऱ्यांचा व नांवांचा अभ्यास मला दर वर्षी नव्यानें करावा लागतो. ही आमची अमेरिकन मेथड आहे."

या नव्या जगांत मी सहा महिने राहणार होतों. खूप हिंडणार होतों. खूप पाहणार होतों. शिक्षणसंस्था पाहण्याचें मुख्य काम माझें. पण अमेरिकन जीवनाच्या सर्वांगाचें निरीक्षण करून मीच शिक्षण घेणार होतों. किती मोठा आहे हा देश ? येथील पर्वत कोणते ? नद्या कोणत्या ? सरोवरें कोणतीं ? कोणते लोक येथें राहतात ? त्यांचे मुख्य उद्योगधंदे कोणते ? सामाजिक, सांस्कृतिक चळवळी कोणत्या ? करमणुकीचे प्रकार कोणते ? निसर्गसौंदर्यानें नटलेलीं स्थळें कोणतीं ? किती तरी प्रश्न माझ्या मनासमोर होते !

अटलांटिक महासागराच्या पश्चिमेस पसरलेली ही अवाढव्य भूमि. उत्तर व दक्षिण अमेरिका असे दोन मोठे विभाग या भूपृष्ठाचे. उत्तर अमेरिकेच्या उत्तर भागांतील कॅनडा सोडला तर उरलेल भाग संयुक्त संस्थानांचा. याच भागास आपण अमेरिका म्हणतों. हाहि प्रदेश अस्ताव्यस्तपणें पसरलेला आहे. पूर्व-पश्चिम अशी लांबी सुमारें तीन हजार मैल ( २८०७ मैल ) आणि दक्षिण-उत्तर असा विस्तार सुमारें दीड हजार मैलांचा आहे. आपला भारत दक्षिणोत्तर असा दोन हजार मैलांपर्यंत पसरलेला आहे. त्याचा पूर्व-पश्चिम विस्तार १४०० मैल आहे. सबंध भारताचें क्षेत्रफळ धरलें तर तें १,२६९,६४० चौरस मैल होतें. अमेरिकेचें क्षेत्रफळ सुमारें ३,०२२,३८७ चौरस मैल आहे. म्हणजे भूविस्तार भारताच्यापेक्षां दुपटीहून अधिक आहे. ब्राझील, चीन, कॅनडा आणि रशिया हे जगांतील देश अमेरिकेहून मोठे आहेत. आपल्या देशाहून आकारानें दुप्पट असणाऱ्या या देशाची लोकसंख्या आहे १५०,६९७,३६१. ही १९५० सालची आहे; आणि ती झपाट्यानें वाढते आहे. अमेरिकेहून आकारानें निम्म्या असणाऱ्या आपल्या देशाची लोकसंख्या आहे

३५६,८२९,४८५. म्हणजे अमेरिकेच्यापेक्षां दुपटीहून अधिक ! अमेरिकेच्या उत्तरेस ग्रेट लेक्स आणि सेंट लॉरेन्स नदी आहे व दक्षिण सीमेवर मेक्सिकोचें आखात येतें. पूर्वेस अटलांटिक महासागर तर पश्चिमेस प्रशान्त महासागर. अमेरिकेच्या पश्चिमेस उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पसरलेली अशी रॉकी पर्वताची प्रचंड रांग आहे. नवीन राज्यव्यवस्थेप्रमाणें अमेरिकेंत घटकराज्यें एकूण अठ्ठेचाळीस आहेत. आकारानें सर्वांत मोठें राज्य टेक्सेस असून क्षेत्रफळ २६७३३९ चौरस मैलांचें आहे. सर्वांत लहान राज्य ऱ्होड-आयलंड असून त्याचें क्षेत्रफळ १२१४ चौरस मैलांचें आहे. प्रत्येक राज्यास लोकप्रिय झालेलीं किंवा रूढीनें आलेलीं गमतीचीं नांवें आहेत. प्रत्येक राज्याची खूण म्हणून एखादें फूल, एखादा वृक्ष, एखादा पक्षी, एखादें ध्येयवाक्य, एखादें गीत स्वतंत्रपणें या गोष्टी मान्य झालेल्या असतात.

या अठ्ठेचाळीस राज्यांखेरीज अलास्का, हवाई बेटें, मिडवे बेटें, पोर्टोरिको, सॅमॉ इत्यादि भूविभागावर अमेरिकेचें स्वामित्व आहे. अमेरिकेंत लहान-मोठ्या अशा शेकडों नद्या आहेत. मिसुरी-मिसिसिपी ही जगांतील सर्वांत लांब असणारी नदी व्यापारी मार्गाच्या दृष्टीनें फारच उपयोगी म्हणून गणली गेली आहे. या नदीस मिळणाऱ्या अनेक लहानसहान नद्या आहेतच. हडसन, डेलवेअर, पोटॅमॅक, केपफिअर या पूर्वेकडील नद्याहि वाहतुकीस उपयोगी पडतात. रिओग्रँड, कोलंबिया, स्नेक, कोलोरॅडो, टेनेसी ॲर्कॅन्सस, ओव्हायो इत्यादि किती तरी नद्यांनीं अमेरिकेचा भूभाग सुपीक करून सोडला आहे. या भाग्यवान देशांत सरोवरांची संख्या मोठी आहे. याखेरीज लहान–मोठे उपसागर व्यापाराच्या दृष्टीनें महत्त्वाचे मानतात. बार्ली, मका, कापूस, फळफळावळ, दूधदुभतें, बटाटे, रताळीं, सोयाबीन, तंबाखू, गहूं, लोंकर, कोंबड्यांची व डुकरांची पैदास, या शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी आहेत. कोळसा, तांबें, सोनें, पोलाद, लोखंड, रुपें, झिंक, पेट्रोल हीं मुख्य खानिजें अमेरिकेच्या संपत्तींत भर घालतात. खाद्यपदार्थ, लोखंडी सामान, शेतीचीं यंत्रसामग्री, मोटारी, रेल्वे इंजिन्स, विमानें, नानाप्रकारचें कापड, खेळणीं, विजेचीं उपकरणें, चामड्याच्या वस्तू इत्यादि विविध प्रकारचे

प्रचंड कारखाने या देशांत उभारले गेले आहेत. अशा या निसर्गतःच संपन्न भूमीचा योग्य तो उपयोग करून घेणारे हे लोकहि मोठे धाडसी आणि गुणवान होत.

पंधराव्या शतकाच्या अखेरीस कोलंबसास या संपन्न भूमीचा शोध लागला. पण त्याच्याहि आधीं किती तरी लोकांनीं या भूमीचें दर्शन घेतलें असावें. मोठमोठ्या इमारती, प्रचंड कारखाने, लांब पल्ल्याचे लोहमार्ग आणि सर्वत्र विद्युत्संचार या नव्या संस्कृतीच्या गोष्टी गेल्या शतकांत झाल्या. आणि या आधुनिक दृष्टीनें अमेरिकेची वसाहत गोऱ्या युरोपियन लोकांनीं केली ही गोष्ट खरीच. पण यांच्याहि आधीं हजार दोन हजार वर्षांपूर्वींपासून येथें अनेक जातींचे लोक राहत होते आणि त्यांचीहि एक विशिष्ट प्रकारची संस्कृति होती. हे लोक मंगोलियन वंशाचे असून अलास्कामार्गें फार पूर्वीं केव्हां तरी टोळीटोळीनें अमेरिकेंत आशियांतून आले असावेत. कॅनडा, संयुक्त संस्थानें, मेक्सिको, दक्षिण अमेरिका अशा मार्गानें ते पसरले. त्यांच्यांतहि नाना गट होते. प्रत्येकाची धार्मिक श्रद्धा, भाषा, चालीरीति इत्यादींची परंपरा वेगळी होती. पण या लोकांनीं प्रथम या ‘ नव्या ’ देशांत वस्ती केली. सन १४९२ मध्यें इटालियन खलाशी स्पेनच्या राजाराणीच्या मदतीनें अनेक संकटांना तोंड देत अमेरिकेस आला तेव्हां त्यास वाटलें आपण हिंदुस्थानच गांठलें. त्यानें चुकून येथील आदि-वासीयांना ‘रेड इंडियन्स’ असें नांव दिलें. यानंतर युरोपमधून लोकांच्या झुंडीच्या झुंडी अमेरिकेंत येऊं लागल्या. रेड इंडियन्सशीं कधीं मित्रत्वाचे व बहुधा शत्रुत्वाचे संबंध गोऱ्या लोकांनीं ठेवले. आज यांची संख्या मोठी असून पश्चिमेस त्यांची वस्ती राखीव भागांतून आहे. या रेड इंडियन्स-विषयीं पुढें स्वतंत्रपणें आपण माहिती मिळविणार आहोंत.

स्पॅनिश, फ्रेंच आणि इंग्रज प्रवाशांनीं या देशाचे निरनिराळे भूभाग शोधून काढले. १५६५ च्या सुमारास आजच्या दक्षिणेकडील फ्लॉरिडा राज्यांत स्पॅनिशांनीं आपली वसाहत चालू केली. १६०७ च्या सुमारास आजच्या व्हर्जिनियामध्यें आणखी एक वसाहत स्थापन झाली. यानंतर अटलांटिक किनाऱ्यानें एकामागून एक अशा निरनिराळ्या वसाहती सुरू झाल्या. अमेरिकेचा पूर्व किनारा गोऱ्या लोकांनीं गजबजून गेला. १७७६ च्या

सुमारास इंग्लिश लोकांच्या एकूण तेरा वसाहती पूर्व किनाऱ्यावर चालू होत्या. या वेळीं या वसाहतींनीं आपल्या मायभूमीविरुद्ध बंड पुकारलें आणि मोठा झगडा करून इंग्लंडचें स्वामित्व झुगारून दिलें. ४ जुलै १७७६ रोजीं अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचें स्वातंत्र्य घोषित झालें. प्रारंभीं फक्त तेराच राज्यें होतीं. यानंतर या नव्या राष्ट्रास एकापेक्षां एक असे पराक्रमी नेते लाभले. जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफर्सन, अब्राहम लिंकन, हेन्‍री क्ले, डॅनिअल वेब्स्टर, विड्रो विल्सन, फ्रँकलिन रूझवेल्ट या थोर पुरुषांनीं या देशाचें वैभव वाढविलें. पश्चिमेकडे सरकतां सरकतां पॅसिफिकच्या किनाऱ्यापर्यंत मानवी संस्कृतीचा प्रसार होत राहिला. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अर्जेंटिना, दक्षिण आफ्रिका, इटली, स्पेन, फ्रान्स, ब्रिटिश बेटें, जर्मनी, डेन्मार्क, स्वीडन, पोलंड इत्यादि विविध देशांतील लोकांच्या मिश्रणानें आजच्या अमेरिकेचा लोकसमाज बनलेला आहे. गोऱ्या लोकांबरोबर आफ्रिकेंतून आलेले निग्रो आज अमेरिकेंत बरेच आहेत. त्यांचीहि परिस्थिति इतर देशांतील बांधवांच्या मानानें खूपच पुढारलेली आहे. अंतर्गत यादवीहि या राष्ट्रांत कांहीं प्रसंगीं माजण्याचा प्रसंग आला. पण दरवेळेस कर्तबगार पुढारी लाभल्यामुळें ऐक्याची भावना वाढत गेली. जॉर्ज वॉशिंग्टन आणि अब्राहम लिंकन हीं आजच्या अमेरिकेचीं दोन दैवतें आहेत. अमेरिका आज सर्वांत श्रीमंत राष्ट्र आहे. उद्योगधंदे, कलाकौशल्य, शिक्षण, शास्त्रसंशोधन या बाबतींत अमेरिकेनें गेल्या पन्नास वर्षांत विलक्षण प्रगति केली आहे. वॉल्ट व्हिटमन, एड्गर एलन पो, थॉमस पेन, हेन्‍री वर्ड्स्वर्थ, लॉँगफेलो, मार्क ट्वेन, हेन्‍री जेम्स, पर्ल बक, अर्नेस्ट हेमिंग्वे यांसारखे जागतिक कीर्तीचे लेखक अमेरिकेनें जगास दिले आहेत. हेन्‍री फोर्ड, रॉकफेलर, वेस्टिंगहाऊस यांच्यासारखे उद्योगपती अमेरिकेच्या वैभवाच्या साक्षी आहेत. नाना मंडळें, नाना संघ, अनेक संस्था यांच्यामार्फत येथील सामाजिक जीवन गुंफलें जात आहे. गर्दी, धांवपळ हें येथल्या जीवनाचें सार मानलें जातें.

चित्रपट, संगीत, टेलिव्हिजन, रेडिओ, वाङ्मय इत्यादि साधनांच्या साह्यानें फुरसतीचा वेळ नीटपणें घालविण्यास तेथील लोकांना शक्य झालें आहे. सबंध देशांत मिळून वीस हजारांपर्यंत चित्रपटगृहें असून सुमारें

१२,०००,००० लोक सर्वत्र मिळून एका वेळेस चित्रपट पाहूं शकतात. १०५,०००,००० च्यावर एकूण रेडिओ सेट्स अमेरिकेंत लोकांची करमणूक करण्यास तत्पर आहेत. सार्वजनिक जागा, मोटारी, रेल्वे स्टेशन्स, विमानें, आगगाड्या इत्यादि ठिकाणीं रेडिओ असतातच. प्रत्येकाच्या घरीं एक तरी टेलिव्हिजन सेट असतोच. अमेरिका हा मोटारींचा देश म्हणतां येईल. दर दोन माणसांमागें मोटार असते. चांगल्या घरीं आईवडिलांची एक व वयांत आलेल्या मुलांची एक अशा दोन तरी मोटारी असतातच. प्रत्येक शहरांतील पदार्थसंग्रहालयें तर अमेरिकेच्या ज्ञानोपासनेचीं मूर्तिमंत प्रतीकें आहेत. अमेरिकेंतील प्रत्येक मनुष्य वृत्तपत्र वाचतोच. दोन हजार-पर्यंत एकूण मोठीं वृत्तपत्रें आहेत. मोठमोठ्या शहरीं रोज वृत्तपत्राचीं चाळीस—पन्नास पृष्ठें प्रसिद्ध होत असतात. फूटबॉल, टेनिस, बास्केटबॉल, गोल्फ हे अमेरिकन लोकांचे आवडते खेळ. सुटीच्या दिवशीं सहल काढण्याची अतोनात हौस. रेल्वेनें प्रवास करण्यासाठीं अमेरिकेंतच जावें. विमानांनीं प्रवास ही सर्वसामान्य माणसास नित्याची गोष्ट वाटते. मोठमोठीं ग्रंथालयें अमेरिकेच्या बौद्धिक करामतीची साक्ष देतात. हें सर्व प्रकारचें वैभव अमेरिकन लोकांनीं आपल्या अचाट कर्तृत्वानें व बुद्धिमत्तेनें अवघ्या शतका—दीड शतकांत उभें केलें आहे. या सामर्थ्यानें नवखा मनुष्य दिपून जातो; आणि मग या ऐश्वर्यापाठीमागें असणाऱ्या तपश्चर्येची ओळख करून घेण्यास प्रवृत्त होतो.

## अमेरिकेंतील कांहीं राज्यांच्या संस्मरणीय गोष्टी

| राज्य | राजधानी | लोकप्रिय नांव | राज्यवृक्ष | राज्यपुष्प | राज्यपक्षी | ध्येयवाक्य |
|---|---|---|---|---|---|---|
| नेवेदा | कार्सनसिटी | सिल्व्हर स्टेट | पिनॉन | सेजबर्ड | ब्लू बर्ड | होम मीन्स नेव्हेदा |
| न्यूजर्सी | ट्रेंटॉन | गार्डन स्टेट | रेड ओक | गोल्डफिश | व्हायलेट | लिबर्टी अँड प्रॉस्पारिटी |
| न्यू मेक्सिको | सँटाफी | लँड ऑफ एंचांटमेंट | नटपाईन | युका | रोडरनर | ओ फेअर न्यू मेक्सिको |
| न्यू यॉर्क | अल्बनी | एम्पायर स्टेट | शुगर मॅपल | रोझ | ब्लू बर्ड | न्यू यॉर्क, आवर एंपायर स्टेट |
| ऑरेगॉन | सॅलम | बीव्हर स्टेट | डग्लसफर | अरेगॉन ग्रेप | मेडोलार्क | दि युनियन |
| फ्लॉरिडा | तॅलहॅसी | सनशाईन स्टेट | कॅबेज | ऑरेंज ब्लॉसम | मॉकिंगबर्ड | इन गॉड वुइ ट्रस्ट |
| कॅन्सस | टोपेका | सन्फ्लॉवर स्टेट | कॉटनवूड | सन्फ्लॉवर | मॅडोलार्क | होम ऑन दि रेंज |
| जॉर्जिया | अटलांटा | एंपायर स्टेट ऑफ् दि साऊथ | लिव्हआक | रोझ | ब्राऊन थ्रेशर | विस्डम, जस्टिस, मॉडरेशन |
| कॅलिफोर्निया | सॅक्रमेंटो | गोल्डन स्टेट | रेडवूड | गोल्डन पॉपी | व्हॅलीक्विल् | युरेका-आय् हॅव् फाउंड इट |
| ॲरिझोना | फोनिक्स | ग्रॅंड कॅनन स्टेट | — | सोहॅरो (कॅक्टस) | कॅक्टसरेन | गॉड इन् रिचेस |
| ओव्हायो | कोलंबस | फ्रिकरटेल स्टेट | — | स्कारलेट कार्नेशन | कार्डिनल | — |
| युटाह | सॉल्टलेक सिटी | बीहीव्ह स्टेट | ब्लू स्प्रूस | सेगोलिली | कॅलिफोर्नियागल | इंडस्ट्री |

## ३ : वॉशिंग्टनचे रंगीबेरंगी दिवस !

वॉशिंग्टनला आम्ही बहुतेकजण कैरो हॉटेलमध्यें उतरलों होतों. हें हॉटेल फार स्वस्त नाहीं, फार महाग नाहीं. स्वतंत्र खोलीस दिवसास तीन डॉलर्स द्यावे लागत होते. शिक्षणखात्यानें वॉशिंग्टनचा एक भला मोठा नकाशा आम्हांस दिलेला होता. त्यांत पाहण्यासारखीं महत्त्वाचीं ठिकाणें होतीं. ट्रामचे, बसचे मार्ग होते. दोन-तीन दिवस लागून सुटी असल्यामुळें वॉशिंग्टनचा परिचय करून घेण्यास चांगलीच सवड मिळाली होती. शनिवारींच ध्यानांत आलें कीं, वॉशिंग्टनच्या डाऊनटाऊन विभागांतच पाहण्यासारखीं प्रसिद्ध ठिकाणें आहेत. ऑफिस ऑफ् एज्युकेशनच्या नजीकच्या पांच मिनिटांच्या रस्त्यावर प्रसिद्ध अशी कॅपिटॉलची भव्य इमारत आहे. वॉशिंग्टनला डोळे दिपवणारी अशी हीच एक प्रमुख इमारत. बाकी सबंध शहरांत अमेरिकेंत गाजून राहिलेल्या उंचउंची इमारती येथें नाहींत. फार तर सात-आठ मजल्यांपर्यंत किंवा त्याहून कांहीं थोड्या उंच इमारती दिसतात. राष्ट्राची राजधानी म्हणून या शहराचें महत्त्व नजरेंत भरण्याजोगें आहे. पोटॅमॅक नदीच्या उत्तर तीरावर वसलेल्या या शहराचें सौंदर्य अनेक ठिकाणीं प्रकट होतें. स्वच्छता, टापटीप व विशिष्ट भागांतील कामाची घाई-गर्दी विशेष ध्यानांत येते. आम्ही राहत होतों त्या भागांत माणसांची गर्दी विशेष नसली तरी सकाळ—संध्याकाळीं द्रुत गतीच्या जीवनाची जाणीव होण्यासारखी परिस्थिति असते. सप्टेंबरची सुरुवात असल्यानें हवेंत चांगलाच उकाडा होता. अनेक राष्ट्रांचीं, अनेक प्रकारांचीं माणसें या नाहीं त्या कारणांनीं आपणांस ठिकठिकाणीं आढळतात. या दृष्टीनें येथील संस्कृति संमिश्रच म्हणावी लागेल. निग्रो लोकांची वस्तीहि बरीच असून ते चांगले सुखवस्तु दिसले. प्रमुख रस्त्यावरून मोटारींची एकसारखी धांवपळ चाललेली असते. फुटपाथवरून पायीं चालणारीं माणसें फार कमी.

कांहीं निमित्तानें थोड्या मुदतीसाठीं येणारे तेच कधीं कधीं पायीं चालतांना दिसतात. मधून मधून दिसणाऱ्या हॉटेल्सची व ड्रग स्टोअरची संख्या नाहीं म्हटलें तरी फार आहे. अमेरिकेंत ड्रग स्टोअर हें एक विलक्षण प्रकरण आहे. तुम्हांस हवें असेल तें सर्व कांहीं येथें मिळतें. सकाळची ब्रेकफास्ट, दाढीचें सामान, नवीं वृत्तपत्रें, मासिकें, खेळणीं, फोटोची सामग्री, प्रसाधनाचीं साधनें, लेखनसाहित्य, नाना औषधें सर्व कांहीं या ड्रग स्टोअर्स-मधून आपणांस मिळूं शकतें; आणि दर पांच-दहा मिनिटांच्या अंतरावर अशीं दुकानें असतातच. मध्येंच एखादें कपडे धुणाऱ्याचें दुकान, भाजी-पाला व फळें विकणाऱ्याचें दुकान, विशिष्ट प्रकारची तांबड्या रंगाची खूण असणारें न्हाव्याचें दुकान या चीजा शहराच्या मुख्य विभागाबाहेर दिसतातच. मुख्य व्यापारी विभाग मात्र सदोदित गजबजलेला. अवाढव्य-पणें पसरलेलीं मोठमोठीं दुकानें प्रथम नजरेंत भरतात. सर्व प्रकारचे उत्तें कपडे, कातडीसामान, नाना प्रकारचीं नवीं पुस्तकें, यांचीं मोठीं दुकानें व त्यांतून एकसारखी माणसांची होणारी ये-जा आपल्या करमणुकीचा विषय बनून राहते. अमेरिकन माणसाच्या पोषाखांतील हौस व टापटीप वाखाणण्यासारखी आहे. स्त्रियांचे विविध प्रकारचे पोषाख त्यांच्या जात्याच नटण्यामुरडण्याच्या हक्कास संरक्षण देणारे दिसतात. या उन्हाळ्याच्या दिवसांत मांड्या उघड्या टाकून अर्ध्या चड्डया घालून हिंडणाऱ्या अमेरिकन मुली पूर्वेकडील स्त्रियांच्या कुतूहलास कारणीभूत झाल्या होत्या.

सुमारें दीडशें वर्षें वॉशिंग्टन ही अमेरिकेची राजधानी आहे. सन १८०० सालीं राष्ट्रीय सरकारच्या कचेऱ्या या शहरांत आल्या. यापूर्वीं येथें जवळ जवळ अरण्यच पसरलेलें होतें. Pierre Charles L Emfant या लष्करी इंजिनिअरनें जगांतील या प्रसिद्ध राजधानीच्या शहराची आंखणी केली. जॉर्ज वॉशिंग्टनच्या प्रेरणेनें त्यानें हें काम हातीं घेतलें व आज जेथें थोड्या उंचवट्यावर नॅशनल कॅपिटॉलची भव्य इमारत आहे; तो मध्यबिंदु कल्पून निरनिराळ्या रस्त्यांची भोंवतींच्या विभागांत आंखणी झाली. उद्यानांची रचना सिद्ध झाली. सरकारी इमारतीची उभारणी झाली. कोर्टकचेऱ्यांच्या भव्य इमारती उभ्या राहिल्या. प्रेसिडेंट राहतो ती व्हाईट हाऊसची इमारत पूर्ण झाली आणि वॉशिंग्टनचें वैभव वाढीस

लागलें. पोटॅमॅक नदीच्या उत्तरेस मेरीलँड विभाग मानण्यांत आला. दक्षिणेस व्हर्जिनियाचा भाग आला. पुढें कालान्तरानें दोन्ही मिळून आजचा लहानसा कोलंबिया जिल्हा बनलेला आहे. वॉशिंग्टन कोणत्याहि एका अंतर्गत राज्याची राजधानी नसल्यानें तें खऱ्या अर्थानें राष्ट्राच्या राजधानीचें नगर आहे. १९०० सालीं या नव्या राजधानीचा पहिला शतसांवत्सरिक उत्सव साजरा झाला. घोड्यांच्या गाड्यांऐवजीं आतां स्वयंचलित मोटारी रस्त्यावरून धांवूं लागल्या होत्या. ग्रीक व रोमन पद्धतीच्या इमारती एकामागून एक अशा आकारास येत होत्या. राष्ट्राच्या उभारणीस ज्यांचें कर्तृत्व कारणास आलें त्यांचीं स्मारकें पुढल्या पिढीस संदेश देण्यासाठीं तत्पर होऊन उभीं राहिलीं. चित्रपटगृहें, वाद्यवृंदगृहें, उद्यानें, खेळण्याचीं मैदानें, पदार्थसंग्रहालयें, चित्रसंग्रहालयें यांची निर्मिति होऊन वॉशिंग्टनचें ऐश्वर्य वाढत राहिलें.

वॉशिंग्टन येथील मुख्य रस्ता कॅपिटॉल बिल्डिंगकडे जाणारा पेन्सॅल्व्हेनिया पथ असून तो सदोदित गजबजलेला दिसतो. बायकांमुलांनीं फुललेला. बसेस्नीं, ट्रामनीं, खाजगी मोटारींनीं धांदलींत, गर्दींत असणारा. पहिल्या तेरा वसाहतींपैकीं पेन्सॅल्व्हेनिया ही मुख्य वसाहत. पहिली राजधानी फिलाडेल्फिया ही करण्याचा विचार होता; पण वॉशिंग्टन शहराचें नशीब उदयास आलें आणि मुख्य रस्त्यास नांव मिळालें तें पेन्सॅल्व्हेनिया स्टेटचें. या रस्त्यावरून पूर्वेकडे चालूं लागलों कीं, निळ्या गर्द आकाशांत कॅपिटॉल इमारतीचा भव्य घुमट शोभून दिसतो. अमेरिकन वैभवाची व ऐश्वर्याची ती एक पताकाच आहे. या इमारतीचा परिचय पुढें विस्तारानें आपण करून घेणार आहोंत. याच भागांत सात–आठ दिवस घालवून प्रत्येक इमारतींतील ऐश्वर्य निरखून पाहण्यासारखें आहे. उत्तरेच्या बाजूस असणाऱ्या युनियन स्टेशनमध्यें देशांतील बहुतेक सर्व भागांतून येणाऱ्या लोहमार्गांचें जाळें पसरलें आहे. रोमन वास्तुशास्त्रावर आधारलेली ही भव्य इमारत १९०७ सालीं पूर्ण झाली. अमेरिकेंतील रेल्वेपद्धतीची प्रथम थोडी माहिती झाली ती येथेंच.

कॅपिटॉलच्या पाठीमागें असणारी लायब्ररी ऑफ् कॉंग्रेस हें जगत्प्रसिद्ध ग्रंथालय मन थक्क करून सोडणारें आहे. जगांतील सर्व

भागांतील पुस्तकें, मासिकें, वृत्तपत्रें, हस्तलिखितें या विख्यात ग्रंथालयांत आहेत. सर्व राष्ट्रांतील विद्यार्थी येथें अभ्यासास आलेले दिसतात. दररोज तीनशें वृत्तपत्रें व पंधराशें मासिकें अभ्यासिकेंतील टेबलांवर पडलेलीं असतात. शेजारींच फॉल्गर लायब्ररींत शेक्स्पीअरच्या वाङ्मयाचा नाणावलेला संग्रह आहे. जवळच सुप्रीम कोर्टाची देखणी इमारत उभी आहे. पांढऱ्या स्वच्छ संगमरवरी दगडाची ही इमारत पाहणाऱ्याच्या मनांत एक प्रकारचा धाक निर्माण करते. स्वातंत्र्य, न्याय, समता हीं तत्त्वें अमेरिकन लोकशाहीचीं मानलीं जातात. त्यांचें योग्य तें पालन केलें जातें तें याच इमारतींत. इतिहासप्रसिद्ध कित्येक खटले या इमारतींत उभे राहिले असतील.

पेन्सॅल्व्हॅनिया पथावरच वॉशिंग्टनची प्रसिद्ध अशी पुराणवस्तु-संग्रहालयाची इमारत आहे. नॅशनल अरकाइव्ह्जची ही इमारत म्हणजे नित्य नव्याच्या पाठीमागें लागलेल्या अमेरिकन लोकांच्या इतिहास-प्रेमाची ही मूर्तिमंत साक्ष आहे. सरकारचीं जुनीं जुनीं दप्तरें, महत्त्वाचे जाहीरनामे आणि स्वातंत्र्याची सनद, युनायटेड स्टेटची राज्यघटना, बिल ऑफ् राईट्स इत्यादि महत्त्वाचे कागदपत्र या ठिकाणीं मोठ्या तत्परतेनें हजारों डॉलर्स खर्च करून जतन करून ठेविले आहेत. कॅपिटॉल बिल्डिंगच्या समोर वॉशिंग्टन–स्मारकापर्यंत जो एक लांबलचक मोकळा भूविभाग आहे त्याच्या दोन्हीहि बाजूंस अनेक महत्त्वाच्या सरकारी कचेऱ्या आहेत. जगत्प्रसिद्ध स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूट याच भागांत आहे. १८४६ सालीं स्थापन झालेल्या संस्थेनें विज्ञानक्षेत्रांत केवढी मोलाची कामगिरी केली आहे हें आपण पुढें विस्तारानें पाहणार आहोंत. आज दहा–बारा स्वतंत्र विभागांतून या संस्थेचें कार्य विभागलेलें आपणांस दिसेल.

ऐतिहासिक श्रेष्ठ पुरुषांच्या स्मारकांपैकीं पाहण्यासारखें पहिलें स्मारक म्हणजे थॉमस् जेफरसन यांचें. हीहि संगमरवरी दगडांची इमारत आपल्या लावण्यानें मनांत सुखाच्या समाधानाच्या लहरी निर्माण करणारी आहे. आंत जेफरसनचा एक भव्य पुतळा असून त्याच्याभोंवतीं त्याचीं प्रसिद्ध अशीं वचनें कोरलेलीं दिसतात. हा काळाकभिन्न पुतळा एकोणीस फूट उंचीचा असून पांढऱ्या संगमरवरी इमारतीच्या पार्श्वभूमीवर मोठा खुलून

दिसतो. दुसरें प्रसिद्ध स्मारक म्हणजे अब्राहम लिंकनचें. येथील लिंकनचा भव्य पुतळा सर्वांच्या मनांत दरारा उत्पन्न करील असाच आहे. किती तरी लोकांची रीघ या इतिहासप्रसिद्ध श्रेष्ठ पुरुषाचें दर्शन घेण्यास लागलेली असते. दरवर्षी सरासरी मानानें २०,००,००० लोक तरी लिंकन–स्मारकास भेट देतात. या भव्य संगमरवरी पुतळ्याची उंची एकोणीस फूट आहे! वॉशिंग्टन मॉन्यूमेंट म्हणून ५५५ फूट उंच असणारा एक मनोरा हें वॉशिंग्टनचें एक प्रमुख आकर्षण मानलें जातें. जॉर्ज वॉशिंग्टनचें राहण्याचें ठिकाण माउंट व्हर्नान. अमेरिकेच्या या प्रसिद्ध पुरुषाचें स्मारक वॉशिंग्टनला असावें अशी कल्पना प्रथम १८४८ सालीं निघाली व हो–ना करतां करतां अनेक अडचणींतून ती पूर्णत्वास आली १८८४ मध्यें. अगदीं शेवटच्या टोकापर्यंत विजेच्या पाळण्यानें जातां येतें. पुष्कळसे यात्रेकरू हा स्मारकस्तंभ पाहण्यासाठीं जमलेले असतात. दूरध्वनीवरून माहिती सांगण्याचें काम एकसारखें चालू असतें. सत्तर सेकंदांत शेवटच्या मजल्यावर गेल्यावर चारहि दिशांना वॉशिंग्टन शहर पाहण्यासाठीं झरोके ठेवलेले आहेत. येथून वॉशिंग्टनची शोभा अवर्णनीय दिसते. विशेषतः पुढल्या बाजूस दिसणारी कॅपिटॉलची इमारत व तिच्या भोंवतींच्या व पुढें पेन्सॅल्व्हॅनिया रस्त्याच्या कडेनें असणाऱ्या मोठमोठ्या इमारती वॉशिंग्टन स्तंभावरून फारच आकर्षक दिसतात. मागच्या बाजूस असणारें जेफरसन–स्मारक खुलून दिसतें. या मॉन्युमेंट-भोंवतीं व जेफरसन स्मारकाभोंवतीं चेरी वृक्षांना बहर आला कीं, सृष्टीचें सारें सौंदर्य उतास जात आहे कीं काय असें वाटतें. तळापासून या स्मारकस्तंभास एकूण ८९८ पायऱ्या आहेत. वॉशिंग्टनचें हें संगमरवरी स्मारक अनेक वर्षें मनांत रेंगाळणारें आहे.

पेन्सॅल्व्हॅनिया रस्त्याच्या मध्येंच अमेरिकेच्या अध्यक्षाचें श्वेतगृह–व्हाईट हाऊस–आहे. वॉशिंग्टनखेरीज अमेरिकेचे सर्व अध्यक्ष येथें राहत असत. सध्याचे अध्यक्ष आयसेनहोअरहि येथेंच राहतात. १७९२ सालीं इमारतीच्या बांधकामास प्रारंभ झाला. १८०० च्या सुमारास काम पूर्ण झालें, पण १८१२ मध्यें युद्धकाळांत ब्रिटिशांकडून या इमारतीची जाळपोळ झाली. वॉशिंग्टनमधील फार जुनी अशी ही सरकारी इमारत. प्रेक्षकांना हें श्वेत-

गृह पाहण्यासठीं कांहीं वेळा ठरलेल्या असतात तेव्हां मैल मैल लांबीच्या स्त्री-पुरुषांच्या रांगांनीं हें प्रसिद्ध ठिकाण वेष्टिलेलें असतें. पांच-सात वर्षांपूर्वीं याची पुनर्रचना झाली असून यांतील १०७ खोल्या सर्व आधुनिक सुख-सोयींनीं सुसज्ज अशा आहेत. १८०० सालीं पहिल्या अध्यक्षानें येथें रहावयास सुरुवात केली तेव्हां अवघ्या सहा खोल्या होत्या ! वॉशिंग्टनला आल्यावरोबर पहिल्यानें माझ्या मनांत विचार आला तो नॅशनल ज्युऑग्रॅफिक सोसायटीची इमारत पाहण्याचा. लहानपणापासून या संस्थेचीं पिवळ्या मुखपृष्ठाचीं व आंत रंगीबेरंगी चित्रें असलेलीं मासिकें मी पाहत आलों होतों. भूगोल विज्ञानांत फार मोठें कार्य या संस्थेनें केलें असल्याचें मीं ऐकलें होतें. भूमिसंशोधनाच्या, वातावरणसंशोधनाच्या, सागर-संशोधनाच्या निरनिराळ्या मोहिमा या संस्थेनें हातीं घेऊन तडीस नेल्या होत्या. वॉशिंग्टनला मी ज्या भागांत राहत होतों तेथून जवळच नॅशनल ज्युऑग्रॅफिक सोसायटीची इमारत होती. इतर इमारतींच्या मानानें ही भव्य वाटली नाहीं; पण आंत फिरून आल्यानंतर मात्र या जगत्प्रसिद्ध इमारतीची व संस्थेची महती ध्यानांत येते. १८८८ सालीं या संस्थेची स्थापना झाली. आज सभासदांची संख्या २,१५०,००० च्यावर आहे.

वॉशिंग्टनला मी पंधरा दिवस होतों. बहुतेक वेळ शिक्षणखात्यानें आंखलेल्या कार्यक्रमांत निघून जाई. मध्यंतरीं जवळच चाळीस मैलांवर असलेल्या फ्रेडरिक गांवीं आमच्यापैकीं कांहीं लोक गेले होते. भारतांत बरींच वर्षें राहिलेल्या ऑलिव्ह रेडिक या बाईंनीं आम्हांस आमंत्रण दिलें होतें. तेथील एका महिला महाविद्यालच्या या बाई प्रमुख आहेत. त्यांनीं आपल्या सहकारी मैत्रिणींच्या मदतीनें आमची उत्तम व्यवस्था ठेवली होती. याच बाई तूर्त भारतांतील युनायटेड स्टेट्स एज्युकेशन फाउंडेशनच्या चिटणीस म्हणून पुनः आपल्या देशांत या वर्षीं आल्या आहेत असें कळतें.

वॉशिंग्टन येथील मुक्कामांत नव्या जगाची थोडी-फार ओळख होऊं लागली होती. लोक फार मोकळ्या मनाचे, सर्वतोंपरी मदत करणारे आणि आपुलकी दाखविणारे वाटले. अमेरिकेंत खाद्यपदार्थांची विपुलता आहे, पण निवड करून सकाळच्या न्याहरीचे, दुपारच्या व रात्रींच्या जेवणांचे पदार्थ ठरविण्यांत पहिले चार-पांच दिवस गेले. शेवटचा एक आठवडा मी कैरो

हॉटेलमधून जॉन किल्पिन हॉटेलमध्यें राहत होतों. याच हॉटेलच्या पाठी-मागील एक नदीच्या काठानें वॉशिंग्टनचें प्रसिद्ध प्राणिसंग्रहालय आहे. याचें वर्णन पुढें स्मिथ्सोनिय इन्स्टिट्यूटच्या वर्णनांत केलें आहे. या भागांत किर्रर झाडी आहे. माणसांची वर्दळहि फार नाहीं. पुष्कळशीं घरें मोठ-मोठीं आहेत, पण बहुतेकांच्यावर भाड्यानें देण्यासाठीं पाट्या आहेत. कांहीं निग्रो लोकांनीं विकत घेतलीं आहेत. सरकारी कामाच्या निमित्तानें राहणारेच लोक वॉशिंग्टनमध्यें फार. निरनिराळ्या राष्ट्रांच्या वकिलाती व तेथील काम करणारीं माणसें यांनींच वॉशिंग्टनचा बराचसा भाग व्यापलेला आहे. दुपारच्या वेळीं या नैर्ऋत्येच्या भागांत शुकशुकाट असतो. सकाळीं मात्र सातापासून मोटारींची रहदारी सुरू होते. बससाठीं माणसांची लहानशी रांग प्रत्येक ठिकाणीं उभी असते. बस येते. आपण आपल्या क्रमांकाप्रमाणें बसमध्यें चढावें, ठरलेलें नाणें टाकावें, त्याच रस्त्यावरून पुढें ट्रॅमनें जावयाचें असल्यास 'ट्रान्स्फर' मागून घ्यावें आणि आपल्या जागेवर बसावें, असा माझा आठ दिवसांचा येथील कार्यक्रम होता. मोठ्या ऐटीनें शीळ घालीत घालीत बस ड्रायव्हर आपल्या कामांत दंग असतो. सकाळीं बसला फार गर्दी असते. शाळा-कॉलेजमध्यें जाणारीं मुलेंमुलीं रंगीबेरंगी पोषाख करून काखोटीला पुस्तकांचा भारा घेऊन हंसत-खेळत चढतां-उतरतांना दिसतात.

वॉशिंग्टनला मराठी बोलणारीं चांगलीं पांच-सहा कुटुंबें आहेत. आपल्या भारतीय वकिलातींत श्री. मोहनराव शाहणे, श्री. तळेकर इत्यादि मंडळी आहेत. श्री. शाहणे यांचेकडील एक-दोन दिवसांचें आतिथ्य त्यांच्या सौजन्याची साक्ष देणारें वाटलें. श्री. शाहणे यांच्याशीं काव्य-शास्त्रादि विषयांवर चर्चा करण्यांत एक प्रकारचें खास आकर्षण मला वाटलें. साहित्य, कला, संस्कृति इत्यादि विषयांत रसिकपणें बोलतांना-ऐकतांना श्री. शाहणे यांच्याजवळून उठूंच नये असें वाटतें. श्री. तळेकर यांच्याहि घरीं मीं एक दिवस पाहुणचार घेतला. श्री. पिंपुरकर नांवाचे एक डॉक्टर माझ्याच वयाचे वॉशिंग्टनला आहेत. त्यांची माझी फार मैत्री जमली. महाराष्ट्रीय जेवणाची खरी लज्जत मला या परक्या देशांतहि वारंवार चाखावयास मिळाली ती या आपल्या माणसांच्या सहवासांत. पण त्यापेक्षां मन-

मोकळेपणें सर्व विषयांवर मराठींतून गप्पा मारावयास मिळाल्या, ती मेजवानी विशेष होती. अमेरिकन माणसाचे स्वभावगुणदोष, येथील कुटुंबजीवन, भारतीयांचें भवितव्य, अमेरिकेंतील भारतीय विद्यार्थी, आपली निरक्षरता, आपलें दारिद्य, मुंबईचें द्विभाषिक राज्य इत्यादि किती तरी विषयांवरील गप्पा रात्रीं बारापर्यंत रंगत असत. श्री. शाहणे यांच्या घरीं डॉ. मॉरर नांवाचे एक संस्कृत तज्ज्ञ भोजनास आले होते. श्री. मॉरर हे लायब्ररी ऑफ् कॉंग्रेसमध्यें भारतीय विभागाचे प्रमुख असून पुण्यास त्यांनीं कांहीं वर्षे संस्कृतच्या अध्ययनासाठीं वास्तव्य केलें होतें. मेघदूतांतील पहिला श्लोक त्यांनीं वृत्ताच्या चालींत म्हणून दाखविला तेव्हां मला तर संस्कृतचा तास सुरू झाल्याचा भास झाला.

## ४ : कॅपिटॉलमधील अद्‌भुत चित्रकारी !

वॉशिंग्टन येथील शिक्षणखात्यानें आंखलेल्या कार्यक्रमांत शेवटच्या दिवशीं राष्ट्राच्या कॅपिटॉल इमारतीस भेट देण्याचा महत्त्वाच्या भाग होता. आम्ही तीस–चाळीस राष्ट्रांतील दोन–अडीचशें लोक रोज दिसणाऱ्या कॅपिटॉलच्या घुमटाकडे व त्यावरील स्वातंत्र्यदेवीच्या पुतळ्याकडे पाहून समाधान मानीत होतों, पण आज त्या इतिहासप्रसिद्ध आणि अमेरिकेचा इतिहास घडविणाऱ्या इमारतींत आम्ही प्रवेश करणार होतों. आठ–दहा लोकांचे एकएक असे आमचे गट पाडून प्रत्येक गटास एकेक मार्गदर्शक मुलगी नियुक्त करण्यांत आली होती. मिस् बर्कले ही आमच्या गटाची मार्गदर्शिका असून तिच्या बोलण्यांत स्वतःच्या देशाचा व कॅपिटॉल इमारतीच्या वैभवाचा अभिमान वारंवार प्रकट होत असल्याचें चटकन ध्यानांत आलें. पांच–सहा परक्या देशांतील स्त्री–पुरुषांबरोबर कांहीं काळ आपला जाणार याचें समाधानहि तिला वाटत असावें. लायब्ररी ऑफ् काँग्रेस, सुप्रीम कोर्ट वगैरे मुख्य इमारती पाहून आमचा गट कॅपिटॉल इमारतीसमोर येऊन उभा राहिला. पहिल्यानें ध्यानांत आली ती गोष्ट ही कीं, इमारतीचा आम्ही जो दर्शनी भाग समजत होतों तो खरा म्हणजे पाठीमागील भाग होता. हें मनाला तेवढें पटेनाहि. ज्या इमारतीच्या ‘पुढें’ मोठमोठ्या इमारती; वॉशिंग्टन स्मारक, पॅन्सल्व्हेनिया पथ इत्यादि वॉशिंग्टन शहराचा प्रमुख भाग त्या इमारतीचा सहाजिकपणें दर्शनी भागहि पश्चिमेस तोंड करून असावा असेंच मला प्रथमपासून वाटत होतें. पण आतां इमारतीच्या पूर्वभागाकडून पाहत असतांना कल्पना बदलून गेली. वरच्या स्वातंत्र्यदेवीचें तोंड आणि प्रवेशद्वाराशीं फडकणारें राष्ट्रीय निशाण माझी समजूत बदलून टाकण्यास समर्थ होतें. लहानशा टेकडीवर अफाटपणें पसरून राहिलेली, पण मधल्या घुमटामुळें आटोपशीर

दिसणारी कॅपिटॉल इमारत दुरून पाहतांनाच लोक स्तिमित झाले होते. अमेरिकन राष्ट्रांतील सर्व कायदेकानू येथें बनले होते. देशाच्या प्रगतीचा इतिहास येथेंच घडविला गेला होता. एकशें एकतीस एकरपर्यंत पसरलेल्या या वास्तूंत वॉशिंग्टन, लिंकन, जेफरसन आदि श्रेष्ठ पुरुष अमेरिकेच्या वैभवार्थ झटलेले दिसतात. आमची मार्गदर्शिका इमारतीचें मुख्य स्वरूप समजावून सांगत होती.

अमेरिकेचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यानें १७९३ सालीं या प्रमुख इमारतीच्या पायाचा दगड बसविला. सात वर्षांनंतर हवी होती तेवढी इमारत पूर्ण होऊन पहिलें अधिवेशन या इमारतींत भरलें. तेरा संस्थानांच्या कारभारास एवढी लहानशी इमारत खूप मोठी होती. पण पुढें संयुक्त संस्थानांची संख्या वाढत गेली. निवडून आलेल्या सभासदांची संख्या अधिक झाली. भूमिविस्तार, उद्योगधंद्यांची वाढ, प्रचंड उत्पादन आणि भरमसाट होणारी लोकसंख्येंतील वाढ यांचाहि परिणाम या पहिल्या इमारतीवर होऊन ती दोन्हीहि बाजूंनीं वाढूं लागली. १८५७ सालीं हाऊस चेंबरची इमारत पूर्ण झाली व १८५९ सालीं सिनेट चेंबरची इमारत पूर्ण झाली. यादवी युद्धाच्या वेळीं मधल्या घुमटाची सिद्धता होऊन आजच्या कॅपिटॉल इमारतीचा मुख्य भाग तयार झाला. उजव्या बाजूस म्हणजे उत्तरेकडे सिनेट चेंबरची मुख्य इमारत आहे. याच इमारतींत राष्ट्राध्यक्ष, उपराष्ट्राध्यक्ष यांच्या अप्रतिम कलाकुसरीनें शृंगारलेल्या खोल्या आहेत.

सिनेटर लोकांची अभ्यासिका (Reading Room) वेगवेगळ्या जातीच्या संगमरवरी दगडांनीं सुशोभित झालेली आहे. अध्यक्षाच्या खोलींत जुनेंच लिंकनच्या वेळचें टेबल अजूनहि राखून ठेवलें आहे. सिनेट चालू असेल तेव्हां पांढरा स्वच्छ दिवा लागलेला असतो आणि सिनेटची बैठक बंद झाली कीं तांबडा दिवा निरोप देण्यास सिद्ध असतो. डाव्या बाजूस म्हणजे दक्षिण दिशेस हाऊस चेंबरची मोठी इमारत आहे. मधोमध स्पीकरची जागा असून सभोंवतीं आतांपर्यंतच्या बेचाळीस स्पीकर्सचीं मोठीं छायाचित्रें लावण्यांत आलीं आहेत. याच्या अलीकडे म्हणजे मध्यवर्ती इमारतीच्या बाजूस जुनें हाऊस ऑफ् रिप्रिझेंटिटिव्ह्ज असून या जुन्या इमारतींत १८०७ ते १८५७ पर्यंत सभा होत राहिल्या. यानंतर नवी इमारत

झाल्यावर या इमारतीचें रूपांतर ' सॅटर्डे हॉल ' म्हणून झालें. त्याचप्रमाणें उजव्या बाजूच्या सिनेटगृहाच्या अलीकडे म्हणजे मुख्य इमारतीस लागून सर्वांत जुनी इमारत आहे. फिलाडेल्फियाहून १८०० मध्यें राष्ट्राची राजधानी वॉशिंग्टनला आली त्या वेळपासूनच्या बहुतेक सर्व बैठका प्रथम येथेंच भरत असत. दोनहि सभागृहें, सुप्रीम कोर्ट, ग्रंथालय वगैरे सर्व विभाग या एकाच इमारतींत होता. पण पुढें देशविस्तार झाला आणि इमारतींतहि झपाट्यानें बदल होत राहिला. पण अमेरिकेचें भवितव्य घडविण्यास सुरुवात झाली ती येथूनच. १८४४ मध्यें २४ मे रोजीं जगांतील क्रांतिकारक शोधाचा पहिला प्रयोग येथून झाला. सॅम्युअल मोर्स या चित्रकार-शास्त्रज्ञानें मोठ्या प्रयासानें आपल्या पहिल्या तारायंत्राची सिद्धता करून आपल्या एका शिष्यातर्फें येथूनच ' What hath God Wrought ' ( कर्ताकरविता परमेश्वर आहे ) हा संदेश तारायंत्राच्या साह्यानें चाळीस मैलांवर असणाऱ्या बाल्टिमोर गांवीं धाडला.

मध्यावर असणारी प्रमुख इमारत वर्तुळाकार असून फारच प्रेक्षणीय आहे. १८० फूट उंचीच्या या इमारतींत नाना पुढाऱ्यांचे पुतळे आणि विविध प्रकारचीं चित्रें आहेत. या वर्तुळाकार इमारतीवर सर्वांत चर्चेचा विषय झालेला प्रेक्षणीय घुमट आहे. १८५६ पासून १८६५ पर्यंत या घुमटाचें बांधकाम चालू होतें. दर चार वर्षांनीं याला रंग देऊन सौंदर्य कायम राखण्यांत येतें. सुमारें एक हजार गॅलन्स रंगाचे लागतात. या घुमटावर पुनः जवळ जवळ वीस फूट म्हणजे तीन पुरुषांच्यावर उंच असलेला स्वातंत्र्यदेवीचा पुतळा उभा केला आहे. या विख्यात पुतळ्याचें वजन १५००० पौंड आहे. अशा प्रकारें या जगत्प्रसिद्ध कॅपिटॉल इमारतींत हळूहळू जरूरीप्रमाणें भर पडून आजची ही भव्य इमारत उभारली गेली आहे.

डॉ. विल्यम थॉर्टन नांवाच्या एका उमद्या डॉक्टरानें (!) या इमारतीची योजना सादर केली ती अमेरिकन सरकारला एकदम पसंत पडली. वॉशिंग्टन आणि जेफरसन यांनीं मनापासून या कामीं लक्ष घातलें होतें. पुढेंहि अनेक सुधारणा होत राहिल्या. दोन्हीहि सभागृहांच्या कचेऱ्यांच्या इमारती झाल्या. कॅपिटॉलच्या मुख्य इमारतीपासून सिनेटच्या कचेरीपर्यंत

जाणारी एका रुळावरील गाडी आम्हांपैकीं प्रत्येकास नवलाईचा खेळ वाटला. ५५ सेकंदांतील हा प्रवास सर्वांना लहानपणीची जाणीव करून देणारा वाटला. सर्व इमारतींचें काम बहुतेक करून निरनिराळ्या प्रकारच्या संगमरवरी दगडांचें आहे. चौदा एकरांचा हा सर्व विस्तार असून अकरा विजेचे पाळणे एकसारखी ये–जा करीत असतात. एकूण खोल्या ४३५ असून खिडक्यांची संख्या ६७९ पर्यंत आहे. दोन्ही सभागृहांची आजची बांधणी मजबूत असून स्टेनलेस स्टील व प्लॅस्टरचा मुख्यत्वेंकरून उपयोग करण्यांत आला आहे. सिनेटच्या रंग तांबडा व पिवळा असून हाऊसचा निळा आहे. प्रत्येक ठिकाणीं रेडिओ-टेलिव्हिजनची सोय आहे.

कॅपिटॉल इमारतींतील चित्रकारी अव्वल दर्जाची गणली जाते. आजहि त्यांतील कला व सजीवता पाहणाऱ्याच्या डोळ्यांत भरणारी आहे. ज्या दिवशीं कॅपिटॉल इमारतीच्या पायाभरणीचा समारंभ झाला त्याच तारखेस १८५२ सालीं इटालीहून राजकीय बंधनास कंटाळून Constantino Brumidi–कॉन्स्टॅंटिनो ब्रुमिदी–नांवाचा एक तरुण चित्रकार न्यू यॉर्कला येऊन उतरला. थोड्याच वर्षांत या उमद्या कलावंताकडे कॅपिटॉल इमारतींतील चित्रकारी सोपवण्यांत आली. त्यास अतिशय आनंद होऊन सर्व जगांतील सुंदर अशा या इमारतींत उत्तमपैकीं चित्रें काढण्यास आपणांस भरपूर आयुष्य मिळावें म्हणून तो परमेश्वरास प्रार्थना करूं लागला. भिंतींवर, छतावर ब्रुमिदीनें सारा अमेरिकन इतिहास सजीव करून सोडला. गुळगुळीत असणाऱ्या भिंती सखोलता दर्शवूं लागल्या. निर्जीव भिंती बोलूं लागल्या. हातांत फुलें आणि फळें घेऊन ब्रॉंझचा कामदेव नृत्य करूं लागला. वीस–पंचवीस वर्षें चित्रकाराचें हेंच कार्य चाललें होतें. रोम येथील व्हॅटिकन सिटींतील सिस्टीन चॅपलमध्यें प्रसिद्ध चित्रकार मायकेल अँजेलोनें जें अद्‌भुत लावण्य उभें केलें आहे त्याच्याशीं ब्रुमिदीच्या या चित्रकारीची तुलना केली जाते. अमेरिकेचा हा मायकेल अँजेलोच मानतात. मुख्य घुमटाच्या छतावरील चित्रकारी पाहतां पाहतां भान हरपून जातें. ४६६४ चौरस फुटांची ही जागा चित्रकाराच्या नाजुक हातानें सौंदर्यवान बनली होती. याच कामांत तो दंग झालेला असतांना ५८ फुटांवरील त्याची शिडी सरकली आणि ब्रुमिदी चित्रकार खालीं

कोसळला ! कॅपिटॉल बिल्डिंगमधील आपल्या अतुल चित्रकौशल्यानें स्वर्गीय कला निर्माण करून अमेरिकेचें वैभव वर उंच करणारा हा चित्रकार खालीं कोसळला. त्यास जबर दुखापत झाली आणि याच दुखण्यांत या महान् चित्रकाराचा अंत झाला. याची स्मृति उरली ती आतां त्याच्या अद्‌भुत् चित्रकलेंत !

सतत अकरा महिने रात्रंदिवस खपून या कलावंतानें मध्यभागीं असलेल्या घुमटाच्या छतावर अप्रतिम चित्रकारी केली आहे. १८० फूट खालीं असणाऱ्या प्रेक्षकांना ठळकपणें दिसतील अशीं हीं चित्रें आहेत. कांहीं चित्रांचीं उंची तर पंधरा फुटांपेक्षां जास्त आहे. साठ वर्षांचा हा चित्रकार या वेळीं मनानें तरुण होता. अविश्रांतपणें एकाग्र चित्तानें त्याचें काम चालू होतें. मधल्या वर्तुळांत बरोबर मध्यें जॉर्ज वॉशिंग्टन हा स्वातंत्र्य-देवता आणि विजयदेवता यांच्यांत बसलेला आपणांस दिसतो. या मधल्या वर्तुळावर तेरा स्त्रियांचीं अर्थपूर्ण चित्रें म्हणजे प्रारंभींचीं तेरा राज्यें ! दुसऱ्या बाहेरच्या वर्तुळावर मोठ्या आकाराचीं सहा प्रतीकात्मक चित्रें उठावदार पद्धतीनें रंगविण्यांत आलीं आहेत. मिनर्व्हा ही विद्येची, शास्त्राची देवता, ती बेंजामिन फ्रँकलीन् व सॅम्युअल मोर्स इत्यादींना कांहीं संदेश देत आहे. स्वातंत्र्यदेवता हातांत तरवार उपसून दुष्ट शक्तींचें निर्दाळण करण्यास सिद्ध झाली आहे. शेतीची देवता हंगामाचें नवें वैभव उभें करून संदेश देत आहे. व्हल्कन हा यंत्रविद्येचा देव अमेरिकेंतील जीवनाचें तात्पर्य सांगण्यासाठीं आपल्या सहकाऱ्यांसहित कार्यांत दंग आहे. मर्क्युरी हा व्यापारविद्येचा देव सोन्यानें भरलेली पिशवी अमेरिकन लोकांच्या हातीं देत आहे. नेपच्युन हा सागराचा देव आपणांस अमेरिकेचें तें सामर्थ्य पटवून देत असल्याचा देखावा आहे. अशा थोर चित्रांचें किती वर्णन करावें ! अमेरिकन इतिहासांतील प्रमुख दृश्यें या ठिकाणीं फार मोठ्या प्रमाणावर चित्रित झालीं आहेत.

कॅपिटॉल इमारतीस भेट देणारे सर्वच या रंगीबेरंगी चित्रकलेवर एकदम खूष होऊन जातात. बरोबरची मार्गदर्शिका मधून मधून चित्रांचें मर्म समजावून सांगत असते. मार्गदर्शनाची ही पद्धति पाऊणशें वर्षांपासूनची आहे. उभ्या अमेरिकेंतील व साऱ्या जगांतील किती तरी

लोक दररोज इमारत पाहावयास येत असतात. आज अशा मार्गदर्शकांची संख्या पंचवीसपर्यंत असून त्यांतील निम्या स्त्रिया आहेत. दोन्हीहि सभागृहांकडून त्यांच्या नेमणुका झालेल्या असतात. अशा नेमणुका वारंवार कराव्या लागतात. कारण एकदां नेमलेली मार्गदर्शिका तेथें कायमची राहत नाहीं. कोणी स्वदेशाचा वा परदेशाचा एखादा खट्याळ मुसाफीर येतो आणि मार्गदर्शिकेसच मार्गदर्शन करूं लागतो. चित्रकारीचें सौंदर्य पाहण्याऐवजी एखादा मार्गदर्शिकेवरच लुब्ध होऊन जातो आणि मग व्यवस्थापकास दुसरी मार्गदर्शिका शोधावी लागते. आमची मार्गदर्शिका अशा गंमती आम्हांस किती तरी सांगत होती !

## ५ : अमेरिकेचें तीर्थस्थान– माउंट व्हरनॉन

वॉशिंग्टनच्या पहिल्या मुक्कामांतील शेवटचे दोन–तीनच दिवस आतां उरले होते. शिक्षणखात्यानें ठरविलेला कार्यक्रम पूर्ण होऊन आतां उरलेले दिवस वॉशिंग्टनच्या भोंवतीं कांहीं पाहण्यासारखें असल्यास पाहतां यावें म्हणून ठेवले होते. जॉर्ज वॉशिंग्टन हा अमेरिकेचा राष्ट्रपिता मानला जातो. अमेरिकन लोकांच्या मनांत या प्रसिद्ध पुरुषाबद्दल कमालीची प्रीति आहे. वॉशिंग्टन येथें त्याच्या नांवानें एक भव्य संगमरवरी स्मारकस्तंभ तर आहेच; शिवाय वॉशिंग्टनचें खरें स्मारक म्हणजे त्याचें राहतें घर असलेलें माउंट व्हरनॉन हें होय. वॉशिंग्टनपासून अवघ्या पंधरा मैलांवर असणाऱ्या या प्रसिद्ध ठिकाणीं जावें असें फार मनांत होतें. 'थोरांच्या माता' हें पुस्तक लिहून चार-पांच वर्षें झालीं होतीं, तरी त्यांतील जॉर्ज वॉशिंग्टनच्या आईचें चारित्र माझ्या चांगलेंच स्मरणांत होतें. युद्धकाळानंतर माउंट व्हरनॉन येथें राहणाऱ्या जॉर्जची कथा त्याच्या आईच्या चारित्राशीं संबंधित होतीच. वॉशिंग्टननें लहानपणीं केलेल्या कुऱ्हाडीच्या प्रयोगाची गोष्टहि फार पूर्वीं मी लहान असतांना वाचल्याचें स्मरतें. एवढें मोठें संपन्न व ऐश्वर्यशाली राष्ट्र वॉशिंग्टनच्या पराक्रमांतून उदयास आलें. तेव्हां या महापुरुषाच्या घरास भेट देण्याचा माझा निश्चय कायम झाला. इंटरनॅशनल सेंटरतर्फे रोज सकाळीं बसेस सुटतात हें मला माहीत असल्यानें मी माझें तिकीट राखून ठेवण्यास कळविलें. इतरांना फारशी उत्सुकता हें स्थळ पाहण्याविषयीं नव्हती; पण मी दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेव्हां केंद्रस्थानीं हजर झालों तेव्हां ध्यानांत आलें कीं, माझ्याप्रमाणेंच इतर अनेक राष्ट्रांतील स्त्री-पुरुष तेथें माउंट व्हरनॉनला जाण्यासाठीं उत्सुक असलेले दिसले. आमच्या योजनेखालीं आलेलींहि कांहीं थोडीं माणसें दिसत होतीं.

सुमारें नऊच्या सुमारास आमची बस निघाली. ड्रायव्हर नेहमींप्रमाणें

आनंदित होता. शीळ घालीत घालीतच त्यानें प्रवास चालू केला. वॉशिंग्टनच्या आजूबाजूचीं कांहीं प्रमुख स्थळें दाखविण्याचें कामहि त्याच्या नियोजित कार्यक्रमांत होतें. पुनः एकदां वॉशिंग्टन-स्मारक, लिंकन-स्मारक, जेफरसन-स्मारक हीं नामांकित स्थळें आम्हीं पाहिलीं. तोंडाशीं ध्वनिक्षेपक लावून ड्रायव्हर प्रत्येक स्थळाची उत्तम प्रकारें माहिती सांगत होता. या खेपेस नवीन गोष्ट पाहिली ती पंचकोनी इमारत ! जवळच वॉशिंग्टनच्या सीमेवर आर्लिंग्टन म्हणून विभाग आहे. तेथील प्रसिद्ध अशी ही इमारत पाहण्यासारखी आहे. अमेरिकेच्या संरक्षण-खात्याची ही कचेरी सर्व दृष्टींनीं जगांतील मोठी मानली जाते. ३५,००० लोक एकाच वेळेस या इमारतींत काम करीत आहेत. मोठमोठीं अन्नपूर्णागृहें, जेवण्यासाठीं विस्तृतपणें पसरलेले दिवाणखाने, विश्रांतिगृहें, इत्यादि सर्व ठिकाणांचें हें एक छोटें शहरच आहे म्हणानात. सर्व तऱ्हांच्या वस्तु मिळणारीं फार मोठीं दुकानें येथें आहेत. जीवितास लागणारें सर्व कांहीं येथें एकाच इमारतींत मिळत असल्यानें महिना महिना माणसानें इमारत सोडली नाहीं तरी चालू शकतें.

या पंचकोनी इमारतीच्या भोंवतीं विस्तृत अशीं मैदानें मोटारतळांसाठीं म्हणून राखून ठेवलेलीं आहेत. या जागांवर १०,००० मोटारी एका वेळेस उभ्या राहूं शकतात. आर्लिंग्टन येथील स्मशानभूमीहि पाहण्यासारखी आहे. अमेरिकन माणसाची सौंदर्यदृष्टि स्मशानभूमींतहि दृष्टीस पडते. एका रांगेनें लांब लांब पसरत गेलेलीं थडगीं भोंवतींच्या रंगीबेरंगी फुलांमुळें सुशोभित दिसतात. माणूस ज्या मानानें लहान-मोठा त्या मानानें थडग्याचें स्वरूप लहान-मोठें होतें. अमेरिकेंतील राजधानीस वैभव प्राप्त करून देणारे अनेक थोर स्त्री-पुरुष या ठिकाणीं शांतपणें निद्रा घेत आहेत. सन १८६४ पासून सुमारें दोनशें एकरांची ही डोंगराळ जागा राष्ट्रीय स्मशानभूमि म्हणून राखून ठेवण्यांत आली आहे. येथें पहिल्या महायुद्धांत कामीं आलेल्या अज्ञात वीराचें प्रेक्षणीय थडगें आहे. फ्रान्समधून आणलेला त्याचा मृत देह रोज गौरवानें सरकारकडून मानवंदना घेत आहे. संगमरवरी थडग्यावर लिहिलें आहे, “ हिअर रेस्ट्स इन् ऑनर्ड ग्लोरी ॲन् अमेरिकन सोल्जर, नोन् बट् टु गॉड—केवळ एका परमेश्वरासच माहीत असणारा अमेरिकेचा देशवीर येथें गौरवपूर्ण अवस्थेंत विश्रांति घेत आहे.”

पोटॅमॅक नदीच्या कांठाकांठानें होणारा हा प्रवास फारच आल्हाद-दायक आहे. मध्येंच इतिहासप्रसिद्ध असें अलेक्झांड्रिया शहर असून तेथून पुढचा मार्ग सृष्टिसौंदर्यानें बहरलेला आहे. हिरवींगार झाडें दोन्हीहि बाजूंनीं असून कित्येक ठिकाणीं रंगीबेरंगी फुलांचे ताटवे डोळ्यांना संतुष्ट करतात. डाव्या बाजूनें पोटॅमॅक नदी वाहते व पलीकडच्या कांठावर वॉशिंग्टन शहर उभें असलेलें दिसतें. वळणावळणानें चढ-उतार करीत बस चाललेली असते. आंतील उतारू वेगवेगळ्या देशांचे असल्यानें बहुतेक प्रसंगीं भाषे-प्रमाणें त्यांचे गट पडतात आणि ते आपापल्या भाषेंतून बोलूं लागतात, तेव्हां तोहि एक करमणुकीचा भाग होऊन राहतो. सौंदर्यराजींतून जातां जातांच एकदम माउंट व्हरनॉन येथें येऊन बस थांबते. वॉशिंग्टनच्या वास्तव्यानें पावन झालेल्या या भूमीचें दर्शन घेण्यासाठीं किती तरी अमेरिकन लोकांची येथें गर्दी उडालेली असते. मेरी लँड टेकडीवरील ही सौंदर्यभूमि सर्वांना आकर्षून घेते. हिरवीगर्द झाडी सर्वांना विसांवा देत असते. जॉर्ज वॉशिंग्टनच्या दोन-तीन पिढ्यांचा संबंध येथें असून १६६० पासून येथील इस्टेट हळूहळू वाढत गेली. १७३५ सालीं जॉर्ज तीन वर्षांचा असतांना येथें आपल्या वडिलांच्याबरोबर राहावयास आला. वडिलांच्या मृत्यूनंतरहि जॉर्ज वॉशिंग्टन कांहीं वर्षें माउंट व्हरनॉन येथें राहत असे. पुढें वॉशिंग्टनच्या खांद्यावर अमेरिका देशाचें सर्व प्रकारचें ओझें आलें, स्वातंत्र्ययुद्धास प्रारंभ झाला, लष्करी हालचाली सुरू झाल्या आणि वॉशिंग्टनचें माउंट व्हरनॉनवरचें वास्तव्य संपत आलें. लष्करी दगदग संपल्यानंतर १७५९ मध्यें जॉर्जचें लग्न झालें व मार्था वॉशिंग्टनबरोबर कांहीं दिवस तो येथें राहिला होता. देशाच्या कार्यासाठीं त्याला वारंवार फिरतीवर जावें लागे. १७८३ पासून सहा वर्षांपर्यंत पुनः जॉर्ज वॉशिंग्टनचें राहणें या निसर्गरम्य ठिकाणीं झालें. पुढें या नव्या राष्ट्राचा पहिला अध्यक्ष होण्याचा मान या श्रेष्ठ पुरुषास मिळाला. तेव्हांहि आपल्या घरीं राहणें त्यास जमणें कठिण असलें तरी मधून मधून विश्रांतीसाठीं तो येथें येत असे. राष्ट्राध्यक्षाच्या जागेवरून निवृत्त झाल्यानंतरचीं त्याचीं अखेरचीं दोन-अडीच वर्षें पुनः माउंट व्हरनॉन येथें गेलीं. १४ डिसेंबर १७९९ रोजीं त्याचें निधन याच राहत्या घरीं झालें. त्याची बायको मार्था

वॉशिंग्टन दोन-तीन वर्षांनंतर येथूनच आपल्या धैर्यवान पतीच्या मार्गानें निघून गेली. असें आहे महत्त्व या माउंट व्हरनॉनचें.

जॉर्ज वॉशिंग्टनच्या वेळच्या किती तरी इमारती या लहानशा पण रमणीय टेकडीवर आहेत. मुख्य गृहाचें दर्शनी स्वरूप पोटॅमॅक नदीकडे तोंड करून असणारें अत्यंत देखणें आहे. जॉर्ज वॉशिंग्टनच्या सावत्र भावानें हें घर १७४३ मध्यें बांधून पूर्ण केलें. या स्थानाचें मूळचें नांव हंटिंग क्रीक—शिकारी दरी—असें असून व्हरनॉन नांवाच्या एका लष्करी अधिकाऱ्याच्या स्मरणार्थ टेकडीस माउंट व्हरनॉन असें नांव प्राप्त झालें. वॉशिंग्टनच्या वास्तव्यानें व त्याच्या समाधिस्थानानें या स्थानास एखाद्या तीर्थक्षेत्राचें स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. दक्षिण कॅरोलिना राज्यांतील मिस् ॲन पॅमीला नांवाच्या स्त्रीच्या प्रयत्नामुळें ‘ माउंट व्हरनॉन लेडीज असोसिएशन ’ स्थापन होऊन या संस्थेकडे या तीर्थक्षेत्राची व्यवस्था आज आली आहे. भेट देणाऱ्या प्रवाशी लोकांकडून जें फीचें उत्पन्न येतें त्यांतून नित्य खर्च भागविला जातो. येथील बागबगीचे अतिशय प्रसिद्ध असून नाना रंगांच्या व आकारांच्या फुलांनीं सदोदित टवटवीत झालेले दिसतात. हिरव्यागार मैदानांच्या सर्व बाजूंनीं असणारी फुलांची झालर नयनरम्य आहे. स्वतः जॉर्ज वॉशिंग्टनला फुलांची हौस मनस्वी होती. वॉशिंग्टनच्या ग्रंथालयांत बागकामावर किती तरी चांगलीं पुस्तकें आहेत. जॉर्ज वॉशिंग्टनची ही अभ्यासिका आजहि मोठी पाहण्यासारखी आहे. वॉशिंग्टनच्या हातून महत्त्वाचा पत्रव्यवहार याच जागेतून झाला. मध्यवर्ती सरकारची स्थापना होण्याच्या वेळीं जनरल वॉशिंग्टननें येथूनच महत्त्वाचे निर्णय घेतले. नव्या जगांतील राजकीय मुत्सुद्देगिरीचा आरंभ याच ठिकाणीं झाला. वॉशिंग्टनचें टेबल, त्याची खुर्ची व त्याच्या चिटणिसाची टेबल-खुर्ची इत्यादि वस्तु या अभ्यासिकेंत आज पाहावयास सांपडतात. वॉशिंग्टनच्या टेबलाजवळची खुर्ची थोडी सरकलेली आहे, टेबलावर कांहीं कागदपत्र व लेखनसाहित्य आहे. जणुं आतांच वॉशिंग्टन थोडें—फार लिहिणें करून बागेंत फेरफटका मारावयास गेला आहे असा भास होतो. शेजारींच एका टेबलावर एक दुर्बिण आहे. पुस्तकांनीं भरलेलीं कपाटें टेबलाशीं बसल्यानंतर डाव्या अंगाला आहेत. जमिनीवरचा गालिचा आणि खिडक्यांचे पडदे आजहि

वॉशिंग्टनच्या अस्तित्वाची साक्ष देतात. कोपऱ्यांत असणारा पृथ्वीचा गोल जॉर्ज वॉशिंग्टनच्या भूगोलविषयक प्रीतीची साक्ष आहे. वॉशिंग्टनच्या अभ्यासिकेंत सुमारें नऊशें ग्रंथ आहेत. अनेक पुस्तिका व कागदपत्रें हीं महत्त्वाचीं ऐतिहासिक निर्णयपत्रें म्हणून संग्रहणीय असल्याचें पटतें. शेतकी व लष्करी सैन्यसंचलन या विषयांवरील पुस्तकें बरींच आहेत. काव्य, कथा, इतिहास, भूगोल, राजकीय अर्थशास्त्र, धर्म इत्यादि विषयांवरीलहि पुस्तकांचा संग्रह अमेरिकेच्या या पहिल्या राष्ट्राध्यक्षाच्या ज्ञानलालसेचें प्रतीक म्हणून समजावयास हरकत नाहीं. बहुतेक पुस्तकांच्या पहिल्या पानावर जॉर्ज वॉशिंग्टनची सही आहे. या सहींतील अक्षरांवर अमेरिकन लोक किती खूष होऊन जातात !

मुख्य इमारतींतील मध्यवर्ती दिवाणखाना ऐतिहासिक महत्त्वाचा म्हणून प्रेक्षकांना आज फार प्रिय वाटतो. उन्हाळ्यांत या हॉलमध्यें जॉर्ज वॉशिंग्टनचे बरेच दिवस या ठिकाणीं गेले असावेत. समोरच पोटॅमॅक नदी व भोंवतीं गर्द झाडी यांमुळें येथें खूप गारवा आला आहे. खोलींत प्रथम आल्यावर डोळ्यांत भरतो तो प्रशस्त असा जिना. जुन्या पद्धतीचें कोपऱ्यांतील घड्याळ, मोठमोठ्या तसबिरी, टेबलें, दिवे, बॅरॉमीटर इत्यादि वस्तु पाहणाऱ्याची नजर वेधून घेतात. या विभागांत जॉर्ज वॉशिंग्टनची एक बेडरूम (शय्यागृह) आहे. याहि खोलींतील टेबल-खुर्च्या, खिडक्यांचे पडदे, जुन्या पद्धतीचा पलंग, त्यावरील गाद्या, उशा, भोंवतींचे पडदे, जमिनीवरचा गालिचा, पलंगाशेजारचा दिवा या सर्व वस्तू जुन्या वैभवाची साक्ष आजहि देतात. अशा प्रकारच्या चार-पांच बेडरूम्स याच मुख्य इमारतींत आहेत. पैकीं फार प्रसिद्ध असलेली ब्लू बेडरूम मोठी पाहण्यासारखी आहे. येथील सर्व लांकूडकाम निळ्या रंगाचें आहे. येथील पलंगाच्या पायथ्याशीं एक मोठी ट्रंक आहे. मिसेस् वॉशिंग्टनची ही ट्रंक. या ट्रंकेच्या झाकणास चिकटवलेलें एक पत्र मिसेस् वॉशिंग्टनच्या नातीनें लिहिलेलें आहे. आपली आजी गांवाला जातांना कपडे कोणते व कसे करी आणि परत आल्यानंतर आपणांस कोणकोणतीं खेळणीं घेऊन येई याचें वर्णन मोठ्या दुःखद अंतःकरणानें तिनें केलें आहे. शेजारींच जॉर्ज वॉशिंग्टनची आणखी एक बेडरूम आहे. या खोलींतून त्यानें आपले महत्त्वाचे निर्णय देशहितार्थ

घेतले असल्याचें सांगतात. येथें पलंगाच्या पायथ्याशीं जॉर्ज वॉशिंग्टनची ट्रंक आहे. येथील पलंग मोठा प्रशस्त असून उजव्या बाजूस दाढी करण्यासाठीं एक छोटेसें टेबल आहे. जॉर्ज वॉशिंग्टनचा अखेरचा आजार याच खोलींतला असल्यामुळें एक प्रकारचें गांभीर्य येथें निर्माण झालें आहे.

मुख्य इमारतींतील स्वयंपाकगृह पाहण्यासारखें आहे. त्या वेळची स्वयंपाकपद्धति व सामग्री आणि टेबलावरची मांडणी आज मोठ्या कुतूहलतेनें लोक पाहतात. वॉशिंग्टनच्या कुटुंबांतील बहुतेकांचें जेवण येथें होत असे. या भोजनगृहाच्या छतावरील नक्षीकाम वाखाणण्यासारखें आहे. भिंतीवरील चित्रें अमेरिकन इतिहासांतील प्रमुख प्रसंग बोलके करणारीं आहेत. रोजचीं ताटें, बशा, काटे-चमचे ठेवण्यासाठीं आणखी एक लहानशी खोली आहे. या खोलींत एक महत्त्वाची ऐतिहासिक वस्तु म्हणजे छोटेसें टेबल. या टेबलावर जॉर्ज वॉशिंग्टन व मार्था वॉशिंग्टन यांनीं आपल्या विवाहानंतरची पहिली मेजवानी घेतली होती. माउंट व्हरनॉन येथें वॉशिंग्टनचा मुक्काम असतांना अनेक लहान-थोर लोक त्यास भेटावयास येत. त्यांच्या जेवणाची व्यवस्था व्हावी म्हणून एक मोठें भोजनगृह बांधण्यांत आलें. या मोठ्या स्वयंपाकाची तयारी शेजारींच असणाऱ्या स्वयंपाकगृहांत होत असे. आचाऱ्याला राहण्यासाठीं व सामानाचा संग्रह करण्यासाठीं पुनः एक-दोन लहान-मोठ्या खोल्या जवळच आहेत. दोनशें वर्षांपूर्वीं स्वयंपाकाची पद्धत कशी होती, कोणतीं उपकरणीं मांडावीं लागत, शेगडी किंवा चूल कशा प्रकारची असे ही सर्व माहिती आज आपणांस येथें मिळते.

याखेरीज आणखी किती तरी विभाग माउंट व्हरनॉन येथें पाहण्यासारखे आहेत. घोड्यांचा तबेला, वॉशिंग्टनची गाडी, नाना प्रकारच्या बागा, विद्यार्थी-वॉशिंग्टनची खोली, कपडे धुण्याची जागा अशा किती तरी महत्त्वाच्या जागा आहेत. सर्वांपेक्षां मन स्थिरावतें तें वॉशिंग्टनच्या समाधीपाशीं. एका मोठ्या लोखंडी दरवाजामागें जॉर्ज वॉशिंग्टन व मार्था वॉशिंग्टन यांच्या अस्थि आज येथें पडून आहेत. अमेरिकन स्त्री-पुरुषांचा भक्तिभाव येथें उफाळून येतो. आपल्या पहिल्या राष्ट्राध्यक्षाचें हें अमूर्त स्वरूप पाहून अमेरिकन स्त्रियांचे डोळे येथें

पाणावतात. स्तब्ध होऊन त्या येथें कित्येक वेळपर्यंत उभ्या राहतात. भोंवतीं किर्र झाडी आहे. मुख्य इमारतीपासून ही जागा थोडी दूर असल्यामुळें एक प्रकारची शांतता येथें नांदत असते. गर्दीच्या, धांवपळीच्या जीवनास कंटाळलेल्या अमेरिकन माणसास येथें समाधान वाटतें, पण त्यासच खिन्नतेचें एक आवरण बिलगून राहिलेलें असतें. वॉशिंग्टनचा मृत देह राजधानींत आणण्याचा—वॉशिंग्टन येथील स्मारकांत आणण्याचा—प्रयत्न अनेक वेळा झाला. त्यास यश न येतां याच ठिकाणीं आज हा अद्वितीय पुरुष सुखनिद्रा घेत आहे. आपल्या निधनानंतर कोणत्याहि डामडौलाचें प्रदर्शन होऊं नये, मिरवणूक निघूं नये असें मृत्युपत्रांत त्यानें लिहिलें होतें. त्यास अनुसरून हें साधेंसुधें स्मारक या थोर पुरुषाचें सारें कर्तृत्व उभें करण्यास समर्थ आहे. प्रवेशद्वाराशीं एकच वाक्य आहे—
'आंतील बाजूस जॉर्ज वॉशिंग्टन चिरनिद्रा घेत आहे.' बस. एका नव्या राष्ट्राची उभारणी करणाऱ्या एका थोर देशभक्ताचें एवढेंच स्मारक! येथूनच कदाचित् अनेकांनीं स्फूर्ति घेतली असेल. माउंट व्हरनॉनवर पाहण्यासारखें, मनन करण्यासारखें, एकमेव ठिकाण हेंच होय.

## ६ : वॉशिंग्टनची स्मिथसोनियन इन्स्टिट्यूट

ज्ञानासारखी पवित्र वस्तु दुसरी नाहीं असें आपण मानतों. विद्येवांचून बळ नाहीं असें आपण समजतों. ज्ञानाच्या सर्व शाखा आणि विद्येचीं सर्व अंगें आत्मसात् करण्याची हिंमत अंगीं बाळगणारे काळाच्याहि पुढें चाललेले दिसतात. तीव्र जिज्ञासा, सतत परिश्रम आणि प्राप्त परिस्थितींत निर्भयपणें संकटास तोंड देण्याची तयारी यांमुळें लोकांनीं जगाचें स्वरूप बदलून टाकलेलें दिसतें; आणि या सर्वांच्या बुडाशीं असणारें विज्ञानबळ परमेश्वराप्रमाणें साह्य करीत असलेलें दिसून येतें. इतिहासांत फार काळ मागें परतावयास नको. दोन-तीन शतकांपूर्वीचें चित्र कल्पनेनेंहि डोळ्यांसमोर येईल. नव्या भूमीचा शोध लागून दोन-अडीचशें वर्षें झालीं होतीं. ऐसपैस पसरलेली सुपीक जमीन, नद्या-नाले, लहान-मोठे डोंगर, नाना वनस्पति व नाना प्राणी यांचा गजबजाट, आणि वसुंधरेच्या पोटांतील संपत्तीचे मूकपणें येणारे संदेश, असें स्वरूप होतें या जगाचें. पण वाऱ्याचा झोत एकदम फिरावा तशी संस्कृति नव्यानें या अभिनव भूमींत आकारास येऊं लागली. इंग्लिश लोक आले, स्कॉच आले, आयरिश आले, जर्मन आले, स्पॅनिश आले, पोर्तुगीज आले, जगाच्या सर्व कानाकोपऱ्यांतून या नाहीं त्या कारणानें लोक येत राहिले. आणि या सर्वांची मिळून एक संमिश्र संस्कृति बनत राहिली. नवी विटी नवें राज्य, नवीं घरें, नव्या सडका, नवे उद्योग, नवें तत्त्वज्ञान, नवा संसार. केवळ दोनशें वर्षांत आकारास आलेलें अमेरिकेचें हें असें स्वरूप आहे. ज्ञान-विज्ञान हा अमेरिकेचा परमेश्वर आहे. चर्चमध्यें जाऊन परमेश्वराची प्रार्थना करणाऱ्यांची संख्या अलीकडे फारच वाढली असली तरी त्या सर्वांच्या हातांत ज्ञानविज्ञानाचा प्रखर प्रदीप आहे. याची साक्ष अमेरिकन लोकांनीं अनेक ठिकाणीं प्रचंड परिश्रमानें उभारलेलीं ठिकठिकाणचीं विज्ञानमंदिरें. नमुना

म्हणून पाहावयाचें असेल तर वॉशिंग्टन येथील स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूट पाहा.

वॉशिंग्टन हें राजधानीचें शहर. दहा लाखांपर्यंत वस्ती असणाऱ्या या नामांकित राजधानीत किती तरी स्थानें पाहण्यासारखीं आहेत. डोळे दिपविणारे युनायटेड् स्टेट्स कॅपिटॉल. सुप्रीम कोर्ट, लिंकन–स्मारक, व्हाइट हाऊस, जेफरसन–स्मारक, वॉशिंग्टन मॉन्युमेंट एक ना दोन शेंकडों गोष्टी पाहण्यासाठीं लोकांची धांवपळ सतत चाललेली असते. पण हीं सर्व ठिकाणें केवळ पाहण्यासारखींच आहेत. पाहतां पाहतां स्वतःस विसरून जाण्याचें, वेगळीच तंद्री लागण्याचें आणि आदरानें चकित होऊन जाण्याचें ठिकाण म्हणजे स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूट. मीं नुसतें नांव ऐकलें होतें, कीर्ति ऐकली होती, चित्रेंहि पाहिलीं होतीं. वैज्ञानिकांचीं चरित्रें वाचतांना आणि लिहितांना या संस्थेचें नांव अनेक वेळां डोळ्यांपुढें आलें होतें. पण चित्रें फसवीं असतात आणि वर्णन कित्येक वेळां अतिशयोक्तीचें असतें म्हणून प्रथम स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूट पाहण्याचें मीं ठरविलें. वॉशिंग्टनमध्यें फक्त पंधरा दिवसांचा मुक्काम आणि रोज शिक्षण-खात्यातर्फे होणारे गर्दीचे कार्यक्रम ध्यानांत घेऊन संस्था पाहण्याचा विचार केला. संपूर्ण एक दिवस ही संस्था पाहण्यांत घालवावा असा निश्चय झाला आणि त्याप्रमाणें स्मिथ्सोनियनच्या एका इमारतींत प्रवेश केला. नॅशनल म्युझियम–आर्टस् अँड इंडस्ट्रीज–असें या इमारतीचें नांव असल्यामुळें केवळ नांवावरून कांहीं बोध होण्यासारखा नव्हता.

दारांतून आंत शिरल्याबरोबर लक्ष वेधून राहतें तें केवळ दोन वस्तूंवर. १९०३ सालीं राइट बंधूंनीं परिश्रमपूर्वक तयार केलेलें जगांतील पहिलें विमान 'किटीहॉक' मधोमध टांगलेलें दिसलें. अंतरिक्षावर माणसानें मिळविलेला तो पहिला विजय होता. मी ज्या ओव्हायो स्टेटमध्यें तीन महिने होतों त्याच स्टेटमध्यें 'डेटन' नांवाचें गांव आहे. येथेंहि चार-पांच दिवस मी राहिलों होतों. त्या गांवीं राइट बंधु सायकली दुरुस्त करण्याचा धंदा करीत असत. १९०० च्या सुमारास त्यांना विमान-विद्येचा छंद लागला. उत्तर कॅरॉलिनाच्या निवान्त समुद्रकिनाऱ्यावर जाऊन त्यांनीं आपल्या नव्या उद्योगास प्रारंभ केला; आणि १९०३ च्या

१७ डिसेंबर रोजीं हवेपेक्षां जड असणाऱ्या विमानानें माणसासहित हवेंत उड्डाण केलें. आधुनिक काळांतील एका मोठ्या रोमांचकारी वृत्तान्ताची साक्ष राइट बंधूंचें तें मूळचें विमान देत होतें. अंतराळांत अधांतरीं टांगलेल्या त्या 'किटीहॉक'नें आपल्या जन्मदात्याची संपूर्ण कथा सहस्रमुखानें मला निवेदन केली. या विमानाच्या पाठीमागेंच आणखी एका अशाच पराक्रमाची खूण होती. चार्ल्स लिंडबर्गचें 'स्पिरिट ऑफ् सेंट लुई' आपल्या वैमानिकाची चित्तथरारक कथा सांगण्यासाठीं तत्पर झालेलें होतें. येथून जवळच असणाऱ्या डेट्राइट गांवीं जन्मास आलेल्या या उमद्या वैमानिकाची साहसकथा मीं वाचलेली होती. आतां जणु ती हकीकत पुनः घडत होती. न्यू यॉर्कपासून पॅरिसपर्यंत न थांबतां एका झेपेंत उड्डाण करण्यास २५००० डॉलर्सचें बक्षिस जाहीर झालेलें होतें. तरुण व बेडर लिंडबर्गनें तें आव्हान स्वीकारलें, आणि १९२७ च्या २० मे रोजीं त्यानें भरारी मारली. न्यू फॉऊंडलंड, आयर्लंड, इंग्लंड आणि पॅरिस अशा मार्गानें मध्यें कोठेंहि न थांबतां लिंडबर्ग दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं मुक्कामास येऊन पोंचला. ३६०० मैलांचा प्रवास लिंडबर्गनें ३३॥ तासांत केला होता! कोलंबसाला या प्रवासास ६९ दिवस लागले! पण लिंडबर्गनें दोन जगांतील अंतर कमी केलें. मानवाच्या इतिहासांतील या रोमहर्षक वृत्तान्ताची कथा स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूटमध्यें 'स्पिरिट ऑफ् सेंट लुई' सर्वांना सांगत राहतें.

म्युझियमच्या उजव्या बाजूस कांहीं ऐतिहासिक वस्तु जतन करून ठेवल्या आहेत. मोठे मुत्सद्दी, योद्धे, शास्त्रज्ञ, ग्रंथकार यांच्या कांहीं वैयक्तिक वस्तु व त्यांनीं मिळविलेलीं पदकें येथें एकत्र पाहावयास मिळतात. स्वातंत्र्याचा जाहीरनामा थॉमस जेफरसननें ज्या डेस्कवर लिहिला तेंहि येथेंच आहे. येथील भोंवतालच्या भिंतींत कपाटांतून जुन्या काळचे लांकडी सामानाचे नमुने आहेत. जॉर्ज वॉशिंग्टनच्या लांकडी पेटीपासून आयसेन-होअरच्या डेस्कपर्यंतचे सर्व नमुने येथें आपापलें महत्त्व सांगण्यास तत्पर असलेले दिसून येतात. शेजारींच असणाऱ्या एका हॉलमध्यें प्रेसिडेंटच्या 'घर'चा पोशाख कसा असे, याचें दर्शन घडतें. अमेरिकेच्या अध्यक्षाची बायको कोणता पोशाख करी याचें उत्तर या हॉलमध्यें सर्वांना मिळतें.

मार्था वॉशिंग्टनपासून मिसेस् ट्रूमनपर्यंत सर्व स्त्रियांचे पोशाख या ठिकाणीं आहेत. फॅशनच्या सर्व तऱ्हा येथें आहेत. हा झाला बड्या लोकांचा पोशाख; पण सर्वसामान्य माणसें व त्यांच्या बायका यांचा पोशाख कसा होता? त्यांत कोणकोणते बदल झाले? याचेंहि उत्तम दर्शन जवळच असलेल्या हॉलमध्यें आहे. अमेरिकेच्या इतिहासांतील कांहीं प्रसंगचित्रांनंतर 'नाण्यांचा संग्रह' ( Coin Hall ) आहे. लहान मुलें छंद म्हणून नाणीं जमा करतात. पण स्मिथ्सोनियनमध्यें लहान-थोरांच्या माहितीसाठीं जगांतील बहुतेक सर्व देशांच्या नाण्यांचा संग्रह केला आहे. चामड्याच्या नाण्यांपासून सोन्याच्या नाण्यापर्यंतचा इतिहास एका क्षणांत डोळ्यांसमोरून जातो. मोठमोठ्या कांचेच्या कपाटांत जपून ठेवलेला हा संग्रह फार महत्त्वाचा आहे. प्रत्येक नाण्याखालीं त्याचें त्याचें थोडक्यांत वर्णन आहे. जवळच आणखी एक संग्रह आहे. तो म्हणजे पोस्टाच्या तिकिटांचा!

नॅशनल म्युझियममध्यें किती तरी स्वतंत्र दालनें आहेत. कलाकुसर, फर्निचर, भांडींकुंडीं, सोन्याचे–रुप्याचे दागिने, नाना प्रकारच्या व आकारांच्या बाहुल्या आणि कपडे अमेरिकेचा सांस्कृतिक इतिहास समजावून सांगण्यासाठीं सज्ज असतात. बरोबर मध्यभागीं 'स्वातंत्र्यदेवीचा पुतळा' आपल्या भव्यतेनें लक्ष वेधून घेणारा आहे. स्वातंत्र्याची हौस अमेरिकन माणसाच्या रक्तांत भरलेली आहे. याच म्युझियममध्यें आणखी एका विमानानें माझें लक्ष वेधून घेतलें. १९११ सालीं अमेरिकेचा पूर्व व पश्चिम किनारा गांठणारें हें विमान राइट बंधूंनींच तयार केलें होतें. काल्डब्रेथ पेरी हा वैमानिक होता. न्यू यॉर्कपासून कॅलिफोर्नियापर्यंत ६३ ठिकाणीं थांबत थांबत ८४ दिवसांत या विमानानें प्रवास केला! आज या प्रवासास फक्त २५३ मिनिटें लागतात! म्युझियममध्यें असलेले उद्योग-धंद्यांचें प्रदर्शन तर अवर्णनीय आहे. कापूस, लोंकर, रेशीम यांपासून नाना प्रकारचें व रंगांचें कापड कसें तयार करतात याचा धडाच जणूं येथें प्रत्येकास मिळतो. हातचरख्यापासून काल-परवांच्या यंत्रापर्यंत विणकामाचा इतिहास या ठिकाणीं प्रत्यक्ष घडलेला दिसतो. शिवण्याचें यंत्र कसें तयार झालें, त्याचें मूळ स्वरूप कसें होतें, त्यांत सुधारणा कोणत्या झाल्या; इलिअस हो, ॲलन विल्सन, आयझॅक सिंगर यांनी या महत्त्वाच्या

यंत्रांत कशी प्रगति केली याचें दर्शन त्या त्या यंत्राच्या प्रत्यक्ष मांडणीमुळें सहज होतें. जवळच लांकडाचे विविध उपयोग, कापण्याचीं हत्यारें यांचाहि संग्रह आहे. अमेरिकेचें वर्णन एक शब्दांत करावयाचें झाल्यास 'मोटारींचा देश' असें करतां येईल. बिनघोड्याच्या गाडीपासून आजच्या मोटारीपर्यंत सर्व नमुने या ठिकाणीं आपला इतिहास निवेदन करतात. अमेरिकन वाहतुकीच्या साधनांत कसकसा फरक पडला याचें यथार्थ दर्शन या ठिकाणीं थोडक्यांत होतें. अमेरिकेच्या हत्यारांचें प्रदर्शन एका निराळ्याच अंगाचें महत्त्व पटवून देतें. नाना प्रकारचीं शस्त्रें, तलवारी, भाले, पिस्तुलें, बंदुका, तोफा यांनीं सबंध हॉल भरून गेलेला आहे. अमेरिकेच्या नौकाविजयाची ध्वजा येथेंच फडकतांना दिसते. साध्या शिडाच्या जहाजापासून मोठमोठ्या बोटींपर्यंत कसकसा त्यांत फरक होत गेला हें या ठिकाणीं लहान लहान नमुने मांडून दाखविण्यांत आलें आहे.

स्मिथ्सोनियनचें नॅशनल म्युझियम हें असें आहे थोडक्यांत ! एका दिवसांत मी सबंध इन्स्टिट्यूट पाहणार होतों. पण पाहून झालें फक्त म्युझियम. नाहीं, हा फक्त एक भाग आहे म्युझियमचा. याच इमारतीसमोर आणखी एक भव्य इमारत आहे. तीहि याच म्युझियमचा 'प्राणिशास्त्र-विभाग' ( नॅचरल हिस्ट्री ) म्हणून आहे. हे दोन्हीहि विभाग मिळून स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूटचा एक प्रमुख विभाग होतो. असे एकूण दहा विभाग म्हणजे संपूर्ण स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूट ! एवढा पसारा, एवढा व्याप आणि तोहि इतक्या व्यवस्थित रीतीनें जतन करून ठेवलेला इतरत्र कोठें असेल वा नसेल ! ज्ञानाचें संवर्धन व जतन म्हणजे काय हें या संस्थेंत प्रत्ययास येतें. नव्याची आवड व अभिमानानें जुन्याचें जतन हे दोन चमत्कारिक गुण अमेरिकेंत पुष्कळ ठिकाणीं एकत्र सांपडतात.

म्युझियमचा प्राणिशास्त्राचा विभाग असाच महत्त्वाचा भाग आहे. इमारत फारच मोठी, एका विशिष्ट हेतूनें बांधलेली. ५६१ फूट लांब, ३६५ फूट रुंद आणि ८२ फूट उंच असणाऱ्या या चार मजली इमारतींत जगांतील सर्व प्रकारच्या प्राण्यांचे नमुने आपणांस दिसतात. मानववंशशास्त्र भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, समाजशास्त्र यांचा बोलका इतिहास येथें फार, मोठ्या प्रमाणावर उभा आहे. अमेरिकन कलाकुसरीचे नमुने येथेंहि आहेत.

पण मुख्य भर सृष्टींतील विविध प्राणी व त्यांचें जीवन यांवर आहे. या ठिकाणीं जिवंत असा एकहि प्राणी—बघणारा आणि दाखविणारा यांखेरीज नाहीं. सर्वांचीं मोटमोठीं चित्रें, पेंढा भरून ठेवलेलीं शरीरें, माणसाच्या उंचीएवढे हुबेहूब साम्य दाखविणारे पुतळे, सांगाडे असा सारा पसारा आहे. रेड इंडियन्स्, एस्किमोज् इत्यादि जमातींची राहणी, त्यांची संस्कृति, त्यांचे पोशाख, त्यांचीं घरें, त्यांचीं नृत्यें, त्यांच्या चालीरीति, त्यांचीं हत्यारें, त्यांचा संसार, त्यांचे देव, त्यांचा धर्म, त्यांचे घरगुती पदार्थ या सर्वांच्या प्रतिकृति आपणांस येथें दिसतात. पाहणाराहि त्यांच्याशीं एकरूप होतो. कदाचित् हे पुतळे बोलूं लागतील, नाचूं-बागडूं लागतील, त्यांचें जीवन सुरू होईल असा भास वारंवार होतो. कोठल्या तरी वन्य जमातींत आपण आहोंत, त्यांच्यांत आपण मिसळून गेलों आहोंत असें वाटतें. म्युझियमच्याबाहेर धांवणाऱ्या मोटारी व कमालीचा यांत्रिकपणा आपण विसरून जातों. मानवी जीवनाच्या अभ्यासाची ही तऱ्हा जितकी अजब तितकीच उद्बोधक आहे.

शेजारींच आणखी एक गमतीचा विभाग आहे. ज्या देहावर आपण प्रेम करतों, लोभ करतों, त्या देहाचें वास्तविक स्वरूप आपणांस येथें दिसतें. किती तरी हाडांचे सांगाडे, किती कवट्या, किती भकास-उदास दिसणारे हाडांचे चेहरे! जुन्यापुराण्या काळांतील हीं 'माणसें' मेल्या-नंतरहि कित्येक शतकें आपल्या वंशजांना ज्ञानदान करीत आहेत. प्रत्येकाची थोडक्यांत माहितीहि तेथें आहे. कोणाची कवटी मोठी, कोणाची लहान, कोणाची हनुवटी पुढें आलेली तर कोणाचीं गालफाडें—गालहाडें—बसलेलीं. स्मशानांत विखुरलेलीं हाडें दिसतात, पण येथें सर्व हाडें एकत्र सांधलेलीं; नाना आकारांचीं, नाना वर्णांचीं. लहानांचीं—मोठ्यांचीं, पुरुषांचीं—स्त्रियांचीं. प्रथमच पाहत असतांना मनास बसणारा भीतीचा धक्का दूर होऊन हीं सर्व 'माणसें' परिचयाचीं वाटतात. आपल्यावर रक्तामांसाचा लगदा चढविला आहे व आपण थोडी हालचाल करूं शकतों इतकेंच. बाकी आपलीं गत कधीं तरी याहिपेक्षां भयानक कशावरून नाहीं होणार? असाहि विचार मनास चाटून गेला.

शेजारींच असणारें पक्षि-गृह मनास आल्हाद देणारें आहे. पेंढा भरून

ठेवलेले हे पक्षी दिसावयास फारच सुंदर व देखणे आहेत. हालत नाहींत, आवाज करीत नाहींत, पण आपला रुबाब तर सांभाळून आहेत. कोठेंहि फरक नाहीं. चोंची, पायांचीं बोटें, पंखांचा रंग, डोळ्यांची ठेवण अगदीं जशीच्या तशी. फक्त प्राणाचें वारें फुंकलें कीं, लागतील उडायला ! मोठमोठ्या कांचेच्या कपाटांत हे पक्षी आहेत. त्यांच्या त्यांच्या नैसर्गिक पार्श्वभूमीसहित आहेत. त्याच ठिकाणीं लहानसा डोंगर, त्यावर झाडेंझुडपें, एखादी नदी, निळें निळें आकाश हा सारा देखावा हुबेहूब आपण पाहत असतों. जगांतील हजारों पक्ष्यांचे नमुने येथें आहेत. चिमण्या किती प्रकारच्या ? त्यांच्या आकारांत आणि रंगांत फरक कोणता ? त्यांचें भक्ष्य कोणतें ? या सर्वांचा येथें येऊन अभ्यास करावा. दक्षिण अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, युरोप येथील पक्ष्यांचा भरणा या ठिकाणीं विशेष आहे.

त्यानंतर चतुष्पाद प्राण्यांचा विभाग. अमेरिकेंत प्रथम लोकांची वस्ती झाली ती पूर्व किनाऱ्यावर. पण नंतरच्या काळांत हळूहळू पश्चिमेकडे जाण्याचा प्रवात पडला. मोठमोठे पर्वत आणि मैल मैल पसरलेलीं अरण्यें पायाखालीं तुडवीत असतांना जे जे विलक्षण अजस्र प्राणी त्यांना भेटले त्या सर्वांची नोंद येथें झालेली आहे; नुसती नोंद नाहीं—ते प्राणी प्रत्यक्ष येथें उभे आहेत आपल्या पार्श्वभूमीसहित. केवळ प्राण्यांच्या शोधासाठींहि कांहीं हौशी मंडळी गेली. त्यांनीं आपल्या शिकारी येथें वर्णनासहित उभ्या केल्या आहेत. रॉकी पर्वतांतील अजस्र प्राणी आपला ताठा अजूनहि दाखवीत उभे आहेत. हरिणें आहेत, अस्वलें आहेत, सिंह आहेत, गेंडे आहेत, झेब्रे आहेत, जिराफ आहेत आणि तेहि आपापल्या सर्व अंगोपांगासहित; तोच रंग, तीच उंची, तेच भेदक डोळे. क्षणांत अंगावर येतील असें वाटावें. गोरिला, चिंपाझी आणि इतर शेंकडों माकडें अनेक बाबतींत पाहणारास नात्याचीं वाटतात !

माणसांचे सांगाडे जसे, तसे सर्व प्राण्यांचे सांगाडेहि आहेत. एकेक सांगाडा केवढा मोठा ! बघणारा खुजाच वाटतो. प्रचंड प्राण्याचा सांगाडा पाहतांच सृष्टीच्या नवलाईचें मनांत कौतुक वाटतें. किती हजार वर्षांपूर्वीचे प्राणी हे ! प्रत्येकाची नोंद जेथें तेथें केलेली आहे. ४००,०००,००० वर्षांपूर्वीं अस्तित्वांत असणाऱ्या कांहीं प्राण्यांचे अवाढव्य अवशेष पाहतांना

विस्मयाच्या सुखद धक्क्याबरोबर हें सर्व जुनें ज्ञान जतन करणाऱ्याची मातब्बरी पटूं लागते. जुन्या काळचे हे 'राक्षस' आतां शांत झाले आहेत. केवळ हाडांचा सांगाडा उरला आहे. पण लांबी-रुंदी पाहिली कीं, अजूनहि दरारा वाटावा. ७० फूट लांब, १२ फूट उंच असणाऱ्या diplodocus चा सांगाडा आजहि भीति दाखविणारा आहे. Stegosaurus, dimetrodun, pleranodon इत्यादि अजस्र प्राण्यांची स्मृति त्यांच्या सांगाड्यांवरूनच आज होण्यासारखी आहे. शेजारच्या हॉलमध्यें पक्ष्यांचेहि विविध सांगाडे आहेत.

म्युझियमच्या या प्राणिजीवन विभागांत आणखीहि किती तरी प्रकार आहेत. उल्कांचे विविध नमुने आहेत, दगडांच्या विविध जाति आहेत, मोत्यांचे नाना प्रकार आहेत, चिनी मातीच्या भांड्यांचे वेगवेगळ्या नक्षीसहित नमुने आहेत. कपड्यांचे विविध प्रकार नाना देशांच्या रीति वर्णन करून सांगतात. नाना देशचे कपडे, हत्यारें, देवांच्या मूर्ति यांची एकच गर्दी उडालेली दिसते. जीवशास्त्राचा बोलका इतिहास या ठिकाणीं आहे. अनेक व्याख्यानें आणि चित्रें यांच्या मदतीनें प्राण्यांची माहिती देण्यापेक्षां या म्युझियमची एखादी भेट विद्यार्थ्यांना किती तरी उपयोगी पडेल. जीवनाच्या कोणत्या अंगाचें या ठिकाणीं दर्शन नाहीं असें नाहींच ! याच इमारतीच्या एका भागांत कांहीं चित्रांचा संग्रह आहे. ब्रॉंझ, संगमरवर, चांदी, प्लॅस्टर, कांच यांच्या उत्कृष्ट शिल्पकृति या ठिकाणीं मांडून ठेवल्या आहेत. अमेरिकन पेंटिंगचे विविध नमुने याच ठिकाणीं आहेत. ग्रीस, इटली, ईजिप्त इत्यादि जुन्या संस्कृतींचे अवशेषहि या प्रदर्शनांत पाहावयास मिळतात. भरतकामाचे आणि विणकामाचे नमुने, बाहुल्यांचे नाना प्रकार, लेसेस, दागिन्यांचे विविध प्रकार यांचाहि भरणा या 'नॅशनल कलेक्शन ऑफ् फाइन आर्ट्स्' विभागांत आहेत. वाद्यांचे अनेक प्रकार येथें दिसतात. रत्नांचे व खनिज पदार्थांचे विविध नमुने एके ठिकाणीं पाहावयास सांपडतात. अमेरिकेच्या इतिहासांतील अनेक प्रसंग येथें चित्रित झालेले आहेत. दृश्य स्वरूपांत आकारास आले आहेत. कित्येक नकाशे, कित्येक मॉडेल्स, कित्येक कलाकृति यांची पद्धतशीर मांडणी म्हणजे स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूटचें म्युझियम.

अशा प्रकारें स्मिथ्सोनियन इन्स्टिटय़ूटचें एक एक अंग म्हणजे एक एक स्वतंत्र शाखाच आहे. १९३७ सालीं स्थापन झालेली 'नॅशनल गॅलरी ऑफ् आर्ट' हा स्मिथ्सोनियनचाच एक भाग. या इमारतीची रचना वाखाणण्यासारखी आहे. १५,०००,००० डॉलर्स या इमारतीवर खर्च झाले असून संपूर्ण संगमरवरी इमारतीची लांबी ७५८ फूट आहे! चित्रांचे विविध नमुने, अमेरिकन पेंटिंगचा इतिहास, शिल्पकृति, शोभेच्या कलाकृति मिळून २६००० नमुने या इमारतींत पाहावयास सांपडतात. कित्येक हौशी लोकांनीं आपल्या पदरचीं कित्येक चित्रें या संग्रहालयास दिलेलीं आहेत. प्रत्येक हॉलमध्यें असलेल्या चित्रांची माहिती देणारीं पत्रकें देण्यांत येतात. त्यामुळें चित्रांचें मर्म समजण्यास जाणत्यांना अडचण पडत नाहीं. इटालियन पेंटिंगचा विभाग फार महत्त्वाचा आहे. फ्लॉरेन्स, सिएन्ना, टस्कन इत्यादि शहरांत ज्या कलाकृति जन्मास आल्या त्यांची माहिती आपणांस या ठिकाणीं मिळते. डच, स्पॅनिश, ब्रिटिश व अमेरिकन पेंटिंगचेहि विविध नमुने आपापल्या वैशिष्टयांसहित या कलासंग्रहालयांत पाहावयास मिळतात. फ्रेंच पेंटिंग व शिल्पकला यांचेहि स्वतंत्र हॉल्स आहेत. या सर्व चित्रांचें वर्णन द्यावयाचें झाल्यास एक स्वतंत्र लेख लिहावा लागेल. स्मिथ्सोनियन इन्स्टिटय़ूटच्या या विख्यात विभागाचें आकर्षण वॉशिंग्टन-मधील सर्व लोकांना आहेच; पण हौशी प्रवाशांना तर या विभागाचें मनापासून कौतुक वाटतें. स्वतंत्र कार्डांवर तयार केलेल्या या चित्रांच्या रंगीत प्रतिकृति येथें विकत मिळतात.

स्मिथ्सोनियनचाच आणखी एक कलाविभाग म्हणजे 'फ्रिअर गॅलरी ऑफ् आर्ट.' चार्ल्स् एल्. फ्रिअर नांवाच्या डेट्राइट येथील एका माणसानें आपला सर्व कलावस्तूंचा संग्रह या संस्थेच्या स्वाधीन केला आहे. या संग्रहाचें विशेष महत्त्व म्हणजे पौर्वात्य कलाकृतींचा भरणा येथें विशेष आहे. ख्रिस्त शतकाच्या पूर्वीं बाराव्या शतकापासूनचे चीनमधील कलावस्तूंचे नमुने येथें मोठ्या तत्परतेनें जपून ठेवले आहेत. चीनच्या पुराण्या धर्मांची व संस्कृतीची ध्वजा येथें प्रकट झालेली आहे. नाना शिलालेख व शिलाकृति यांच्या साह्यानें चीनमधील बौद्ध धर्माचा प्रसारहि येथें चित्रित झाला आहे. ईजिप्त, सीरिया, इराक, इराण इत्यादि देशांतील मुसलमानी कलाकृतींचा

विभागहि पाहण्यासारखा आहे. बुद्ध, जैन आणि हिंदु कलाकृतींचे विविध नमुने 'फ्रिअर आर्ट गॅलरीं'त एकत्रित करून त्यांचीं वर्णनें दिलीं आहेत. मोंगल बादशहांचीं कांहीं चित्रें व त्यांच्या संग्रहींचे नमुने या चित्रसंग्रहालयांत पाहावयास मिळतात.

स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूटचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे विमानविद्यागृह. पक्ष्यांच्या सहज उड्डाणापासून तों काल-परवाच्या रॉकेट-पर्यंत विमानविद्येंत कसकशी प्रगति झाली हें या ठिकाणीं तीं तीं विमानें प्रत्यक्ष मांडून दर्शविण्यांत आलें आहे. १९३५ सालीं वातावरणाच्या अभ्यासासाठीं 'नॅशनल जॉग्रफिक सोसायटी' तर्फे चौदा मैल उंच गेलेलें Explorer II हें प्रसिद्ध बलून येथेंच आहे. १९४७ सालीं तयार झालेलें पहिलें रॉकेटहि शेजारींच पाहावयास मिळतें. जेट विमान व हेलिकॉप्टर या आधुनिक वायुयानांची पहिली अवस्था मोठी मनोरंजक रीतीनें या ठिकाणीं मांडण्यांत आली आहे. मला या सर्व वस्तूंचा फारच लोभ वाटला. कारण हिंदुस्थान सोडण्यापूर्वींच मी 'नवविज्ञानकथा' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. त्यांत या सर्व हकीगती आहेत. थोडें अंतर चालून गेल्यानंतर पहिल्या महायुद्धांत भरीव कामगिरी केलेलीं कांहीं विमानें आतां विश्रांति घेत असलेलीं दिसतील. १९२४ सालीं जगाची पहिल्यानें पूर्णपणें सफर करणारें '**शिकॅगो**' विमान येथेंच आहे. विमानविद्येची सर्व प्रगति या ठिकाणीं एका फेरींत ध्यानांत येतें. अनेक मनोरंजक घटना या इतिहासांत घडल्या; त्यांचीहि नोंद येथें मिळते. वातावरणावर व अंतराळावर स्वामित्व मिळविण्यासाठीं अमेरिकेनें काय काय केलें याची चित्रवार्ता विस्तारानें या ठिकाणीं मिळते.

सर्वसामान्य लोकांची करमणूक करणारा आणि थोडीबहुत माहिती देणारा या संस्थेचा प्राणिसंग्रहालयाचा एक मोठा विभाग आहे. 'नॅशनल झुऑलॉजिकल पार्क' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विभागांत मोठाले असे तीन हजार प्राणी आहेत. वॉशिंग्टन येथें मी ज्या विभागांत राहत होतों तेथून लगतच असलेल्या रॉकक्रीक नांवाच्या दरींत हें प्राणिसंग्रहालय आहे. लँग्ले नांवाच्या एका चिटणिसाच्या प्रयत्नानें १८९० सालीं या प्राणिसंग्रहालयाची स्थापना झाली. एकूण जागा सुमारें एकशेंसत्तर एकर

आहे. भोंवतालीं गर्द हिरवीगार झाडी आणि मधून वाहणारी छोटीशी नदी असल्यामुळें प्राण्यांना आवश्यक असणारें जंगली वातावरण आपोआप निर्माण झालें आहे. सर्व प्राणी आपापल्या नैसर्गिक पार्श्वभूमींत असल्यामुळें बंदिस्तपणाचा फारसा परिणाम त्यांच्यावर झालेला नाहीं. निदान पाहणाऱ्या मानवप्राण्यास तरी असें वाटतें. वाघ, सिंह, हत्ती, चित्ते, जिराफ आपल्या सहज वैशिष्ट्यांसहित येथें आहेत. मर्कटगृहांत नाना रंगांचीं व आकारांचीं माकडें आपल्या लीला मनसोक्तपणें करीत असतात. सरपटणाऱ्या प्राण्यांच्या गृहांत छोटीं छोटीं डबकीं मुद्दाम केलेलीं असल्यामुळें त्यांचें जीवन न्याहाळण्यास सोयीचें होतें. नाना प्रकारचीं मांजरें, नाना जातींचीं कुत्रीं आणि वेगवेगळ्या प्रकारचे कोंबडे या प्राणिसंग्रहालयांत आहेत. पक्षिगृहांत तर हजारों पक्षी विहार करीत असतात. पेंग्विन पक्षी प्रथमच मी या ठिकाणीं पाहिले. यांत्रिक जीवनास कंटाळलेल्या अमेरिकनांची ही एक सहलीची जागा म्हणून प्रसिद्ध आहे. सालीना तीस लक्ष लोक या प्राणिसंग्रहालयास भेट देतात.

स्मिथ्सोनियन इन्स्टिटयूटचे प्रमुख भाग सांगून झाले. आणखी बारकेसारके किती तरी विभाग आहेत. ही संस्था म्हणजे विज्ञानाचें एक स्वतंत्र लोकविश्वविद्यालय म्हणानात. ब्यूरो ऑफ् अमेरिकन एन्थॉलजी, नॅशनल एअर म्युझियम, अॅस्ट्रोफिजिकल ऑब्झर्वेटरी, इंटरनॅशनल एक्स्चेंज सर्व्हिस अशा आणखी संस्था-उपसंस्था आहेतच. हा एवढा अवाढव्य कारभार कोण चालवितो ? हा स्मिथ्सोनियन कोण ? एवढें नवें विश्व उभें करण्यासाठीं पैसा कोठून आला ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. स्मिथ्सन हा इंग्लिश शास्त्रज्ञ एके काळीं लंडनच्या रॉयल सोसायटीचा प्रमुख सभासद होता. २७ जून १८२९ ला जिनीवा येथें त्याचें निधन झालें. मरतांना त्यानें आपली सर्व संपत्ति अमेरिकेच्या हवालीं केली. वॉशिंग्टन येथें आपल्या नांवानें ज्ञानसंवर्धन व ज्ञानप्रसार ( Establishment for the increase and diffusion of knowledge among men) करणारी संस्था स्थापन करावी एवढीच याची इच्छा होती. त्या निधीच्या व्याजांतून या जगत्प्रसिद्ध संस्थेची स्थापना झाली. नाना कला व नाना शास्त्रें यांची या संस्थेनें गेल्या शंभर वर्षांत बजावलेली सेवा स्पृहणीय आहे. अमेरिकेच्य

वैज्ञानिक ज्ञानाचें हें अमोल भांडार आहे. अनेक प्रकाशनें, अनेक वैज्ञानिक सफरी आणि संशोधनें या संस्थेनें हातीं घेऊन मानवी ज्ञानसंचयांत बहुमोल भर टाकलेली आहे. विज्ञानाचें महत्त्व अमेरिकेच्या रक्तांत भिनलेलें आहे. त्याची साक्ष म्हणजे स्मिथ्सोनियन इन्स्टिट्यूट. स्मिथ्सन यानें मरणापूर्वी जी इच्छा व्यक्त केली ती अमेरिकेनें शंभर पटीनें स्वतःचा पैसा भरीस घालून खरी करून दाखविली आहे. स्मिथ्सनच्या नांवानें एक प्रमुख इमारत आहेच. सर्वांत जुनी अशी ही इमारत १८५२ सालीं उभारली गेली. या इमारतीच्या मध्यभागीं स्मिथ्सोनियनच्या व्यापाचा एक नकाशाच दिलेला आहे. स्मिथ्सोनियनच्या या इमारतींत खुद्द उत्पादकाच्या संग्रहांतील वस्तु मांडलेल्या दिसतात. इतर बारीकसारीक उपशाखाहि आहेतच. या इमारतींत प्रवेश करतांनाच जेम्स स्मिथ्सनचें थडगें लागतें. १९०४ मध्यें त्याचे अवशेष येथें आणून एक छोटेंसें स्मारक उभारलें आहे. शेजारींच कपाटांतून स्मिथ्सनचीं खाजगी पुस्तकें आपल्या धन्याची आठवण काढीत मूकपणें राहिलीं आहेत.

## ७ : नाना देशाचे नाना शिक्षक

वॉशिंग्टन येथील युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ् हेल्थ, एज्युकेशन अँड वेल्फेअर या खात्याच्या ऑफिस ऑफ् एज्युकेशनतर्फे आमच्या सर्व कार्यक्रमांची आंखणी झाली होती. पूर्वेकडील देशांतील आम्हांपैकीं बहुतेक-जण वॉशिंग्टनच्या नैर्ऋत्य विभागांत राहत होते. तेथून शिक्षण-खात्याची कचेरी चांगली दोन-तीन मैल दूर होती. पण बसचे मार्ग व स्ट्रीटकार्स-ट्रॅम्स सोयीच्या असल्यामुळें कांहीं अडचण नव्हती. प्रवासाचा शीण घालविण्या-साठीं दोन-तीन दिवसांची अनायासें सुटी मिळाली होती. शुक्रवारीं ३१ ऑगस्टच्या सायंकाळीं आम्ही वॉशिंग्टनच्या कैरो हॉटेलमध्यें येऊन दाखल झालों. अमेरिकेंत शनिवारीं संपूर्ण सुटी असते हें आम्हांस प्रथमच समजलें. रविवारीं रविवार म्हणून व सोमवारीं दि. ३ सप्टेंबर रोजीं 'लेबर डे' म्हणून सार्वत्रिक सुटी होती. म्हणजे आमच्या खऱ्या कार्यक्रमास प्रारंभ झाला तो ४ सप्टेंबर रोजीं. पण कामाचा उरक व्हावा म्हणून शनिवारीं वा रविवारीं शिक्षण-खात्याचा आंतरराष्ट्रीय शिक्षण-विभाग दुपारीं कांहीं तास उघडा ठेवण्याची व्यवस्था झाली होती. डॉ. थॉमस् इ. कॉटनर हे या सर्व कार्यक्रमांचे मुख्य सूत्रधार होते. त्यांच्या मदतीस पांच-सहा कार्याधिकारी (प्रोग्रॅम ऑफिसर्स) असून पुनः प्रत्येकास मदतनीस म्हणून एक-दोन दुय्यम अधिकारी नेमण्यांत आले होते. प्रत्येक मुख्य कार्या-धिकाऱ्याकडे आठ-दहा राष्ट्रांचे निवडक लोक व त्यांची सहा महिन्यांतील सर्व व्यवस्था सोपविली होती.

या योजनेखालीं किती तरी देशांचे सुमारें तीनशेंपर्यंत शिक्षणतज्ज्ञ एकत्र झाले होते. अमेरिकन शिक्षणपद्धतीचा व एकंदर जीवनाचा अभ्यास त्यांना करावयाचा होता. त्या सर्वांना या नव्या जगाचा परिचय व्हावा म्हणून पहिले पंधरा दिवस वॉशिंग्टन येथें भरगच्च कार्यक्रम ठरविला होता.

नाना धर्मांचे, नाना पंथांचे लोक या ठिकाणीं एकत्र आले होते. कित्येकांची भाषा निराळी, चालचालणूक निराळी, पोषाख, बोलण्यांतील वैचित्र, दागदागिन्यांचा वेगळेपणा, नाकाडोळ्यांची भिन्नता, शरिराच्या रंगाच्या भिन्न भिन्न छटा, या सर्व गोष्टी सर्वांनाच कुतूहलाच्या वाटत होत्या. ऑस्ट्रेलिया, बेल्जम, जर्मनी, इटली, मेक्सिको, ग्वाटेमाला, ब्राझील, अर्जेंटिना, आईसलंड, स्पेन, फीनलंड इत्यादि देशांतील स्त्री-पुरुषांचा एक गट स्वभावतःच वेगळा दिसत होता. पोषाख, धर्म, रीतिरिवाज इत्यादि बाबतीत फारसा एकमेकांत फरक नव्हता. भाषा मात्र प्रत्येकाची वेगळी होती. इंग्लिश सर्वांनाच नीटसें येत होतें असें नाहीं. चीन, जपान, कोरिया, मलाया, बर्मा येथील लोकांचा दुसरा गट उठून दिसत होता. त्यांच्या नाकाडोळ्यांवरून त्यांना अतिपूर्वेकडील म्हणून कोणीहि ओळखूं शकत होते. तिसरा गट झाला तो भारत, पाकिस्तान, सिलोन आणि ईजिप्त या देशांचा. कित्येकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला असला तरी मध्यपूर्वेचे सारे संस्कार त्यांच्या बोलण्याचालण्यावर उमटलेले होते. भारतीय स्त्रीच्या साडीवर जगांतील सारे लोक एकदम खूष झाल्यामुळें तो एक अभिमानाचा विषय आमच्या शिक्षिकांचा झाला होता. पाकिस्तानांतील स्त्रियाहि साडी नेसत. लोक त्यांना भारतीय समजून पाकिस्तानबद्दल नाक मुरडीत तेव्हां त्यांचे चेहरे पाहण्यासारखे होत. पुरुषांचा बहुतेक-करून पोषाख इंग्रजी पद्धतीचा असला तरी थोड्या सरावावरून वरील तीन गटांचा परिचय होण्यासारखें होतें.

मी शनिवारींच दुपारीं शिक्षण खात्याच्या कचेरींत गेलों. आमचे कार्याधिकारी डॉ. रॉबर्ट क्रेन यांची मदतनीस मिसेस् चॅन हंसत मुद्रेनें कामांत व्यग्र झाली होती. तिच्याभोंवतीं मेक्सिको, पाकिस्तान, जर्मनी या देशांतील लोक जमले होते. एक ना दोन शेंकडों प्रश्न प्रत्येकास विचारावयाचे होते. ती एकटी सर्वांना किती उत्तरें देणार ? म्हणून परकीय माणसास लागेल ती सर्व माहिती बारक्या पुस्तकांतून लिहून काढली होती. अमेरिकन जीवनाविषयीं सर्व प्रकारची माहिती देणारीं लहान-मोठीं पुस्तकें एका मोठ्या पाकिटांत घालून प्रत्येकाची सोय झाली होती. अमेरिकन शिक्षणपद्धति, अमेरिकन समाज, अमेरिकन संस्कृति, राज्यपद्धति,

कलाकौशल्य वगैरे सर्व गोष्टींची माहिती अगदीं सोप्या पद्धतीनें या लहान लहान पुस्तिकांतून मिळणारी होती. व्हिजिटिंग टीचरसाठीं तयार केलेलें एक छोटें पुस्तकहि त्यांत होतें. या योजनेचा हेतु, स्वरूप, शिक्षण-खात्याची माहिती, शिष्यवृत्तीचे मिळणारे पैसे व त्याची व्यवस्था, आरोग्य-विषयक विमा, पोस्टाचे, तार-खात्याचे नियम, प्रवासाच्या सोयी, पुढील तीन महिन्यांचा कार्यक्रम, कायद्यांचीं विविध बंधनें व पाळावयाचीं पथ्यें, अमेरिकन चालीरीति, वगैरे विषय या पुस्तिकेंत होते. हरघडीं लागणाऱ्या गणिताचें कोष्टकहि पुरविण्यांत आलें. इंचाचे सेंटिमिटर किती, मैलाचे किलोमीटर किती, फॅरनहीट-सेंटिग्रेडचा संबंध काय, डॉलरची विभागणी कशी आहे, सुट्या नाण्यांचीं बोलींत रूपांतरें कोणतीं, अमेरिकेंतील मोठीं सरोवरें कोणतीं, पर्वतांचीं शिखरें किती, कोणतीं, अमेरिकेंतील प्रमुख शहरांत Y M. C. A. किंवा Y. W. C. A. व इतर प्रमुख हॉटेल्स किती आहेत, त्यांचे पत्ते कोणते, त्यांचे फोन नंबर्स कोणते, रेल्वे प्रवासांत कोणती काळजी घ्यावी, या सर्वांचा खुलासा खरें म्हणजे पत्रकांतून—पु स्तकांतून झालेला होता. पण हें सर्व लिहिलेलें वाचावयाचें कोणीं ? रोज अशा साहित्याचा वर्षाव होणार ! आणि इतर कार्यक्रमहि भरगच्च. पण ज्याला योजनेचा पुरेपूर फायदा घ्यावयाचा असेल त्याची सोय झाली होती.

मंगळवार ४ सप्टेंबरपासून जो कार्यक्रम सुरू होणार होता त्याचीहि एकेक प्रत देण्यांत आली. निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें, चर्चा, फिल्म्स असें कार्यक्रमांचें स्वरूप होतें. तांत्रिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण, अमेरिकेंतील विद्यापीठें, अमेरिकन संस्कृति, अमेरिकन चित्रकार, अमेरिकेंतील संस्थांचें जीवन, अमेरिकन राज्यघटना इत्यादि विषयांवर पुढल्या आठवड्यांत उद्बोधक व्याख्यानें झालीं. आधुनिक सोयींनीं सुसज्ज असलेल्या प्रशस्त अशा सभागृहांत हीं सर्व व्याख्यानें होत असत. जगाच्या कानाकोपऱ्यांतून आलेली स्त्री-पुरुष मंडळी तटस्थ होऊन चर्चा ऐकत. व्याख्यान बहुधा अमेरिकन पद्धतीप्रमाणें वीस मिनिटांत संपे आणि मग प्रश्नोत्तरांच्या रूपानें चर्चेस सुरुवात होत असे. कधीं वेगवेगळ्या विषयांवर चित्रपट असे. व्याख्यान किंवा चर्चा यांचे

कार्यक्रम सकाळीं नऊच्या सुमारास सुरू होऊन बारा-साडेबारापर्यंत चालत असत. त्यानंतर तीनपर्यंत मोकळा वेळ असे. दुपारची लंच त्याच इमारतीच्या तळघरांत एक फार मोठें अन्नपूर्णागृह (कॅफेटिरिया) होतें तेथेंच सर्वजण घेत असत. युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ् हेल्थ एज्युकेशन अँड वेल्फेअरच्या इमारतींत आणखी किती तरी लहान-मोठ्या कचेऱ्या आहेत. याच ठिकाणीं एक लहानसें पोस्ट ऑफिस आहे. तिसऱ्या मजल्यावर प्रसिद्ध ' व्हॉईस ऑफ् अमेरिका ' हा गाजलेला विभाग आहे. दुपारीं बारा वाजून गेले कीं, लंच घेण्यासाठीं लोकांची धांवपळ सुरू होते. स्वयंचलित जिन्यावरून स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी कॅफेटिरियाकडे वळतांना दिसतात. हजार-बाराशें लोक एकदम जेवण घेतील इतक्या टेबल-खुर्च्यांची सोय या ठिकाणीं केलेली आहे. जेवण घेण्यासाठीं मोठ्या रांगा लागलेल्या असतात. एका टोंकास प्रत्येकानें आपली थाळी घ्यावयाची आणि चमचे काटे, नॅपकिन, पाण्याचा ग्लास घेऊन पुढें सरकायचें, हवे त्या प्रकारचे पदार्थ तयार करून ठेवलेले असतात. प्रत्येकावर नांव व किंमत लिहिलेली असते. आपल्या पसंतीनें पदार्थ निवडायचे. दुसऱ्या टोंकास हिशेब करणारी बाई बसलेली असते. अर्ध्या मिनिटांत ती हिशेब करून पैसे घेते. मग आपण तो ट्रे घेऊन मोकळी टेबल खुर्ची असेल तेथें जाऊन बसावयाचें. जेवणाचा हा हॉलहि उत्तम प्रकारें शृंगारलेला आहे. भिंतीवरचीं चित्रें मोठीं मार्मिक आणि बोलकीं आहेत. नाना जातींच्या, नाना धर्मांच्या लोकांचें हें सहस्रभोजन मोठें पाहण्यासारखें असतें. प्रत्येकाच्या आवडीनिवडी वेगळ्या असल्या तरी कॅफेटिरियांत सर्वांस हवें तें मिळतें. किंमतहि फार नसते.

दुपारच्या वेळीं पुनः वेगवेगळ्या कार्यक्रमांना सुरुवात होई. दुय्यम शिक्षण, प्राथमिक शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, गृहशिक्षण अशा विषयांचा स्वतंत्र अभ्यास करणारांचे गट पाडण्यांत आले होते. व प्रत्येक गटाचा स्वतंत्र कार्यक्रम दुपारीं सुरू होई. वॉशिंग्टन येथें ' वॉशिंग्टन इंटरनॅशनल सेंटर ' म्हणून एक महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेमार्फत निरनिराळ्या देशांतील लोकांची परस्पर ओळख व्हावी, त्यांचा संबंध दृढ व्हावा म्हणून वेगवेगळे कार्यक्रम दररोज होत असतात. याहि कार्यक्रमांची

पत्रिका आम्हांस देण्यांत आली होती. लेखन-वाचन, टेलिव्हिजन, पिंग-पॉंग, नृत्य, गायन इत्यादि विविध प्रकारच्या आकर्षणांनीं नाना देशांचे लोक या आंतरराष्ट्रीय संस्थेंत ये-जा करीत असतात. वेगवेगळ्या फिल्म्सहि येथें दाखविण्यांत येत असत. अमेरिकन तरुण-तरुणी या ठिकाणीं फॅशनचे कपडे घालून एकमेकांना भेटण्यासाठीं, चर्चा करण्यासाठीं उत्सुकतेनें आलेले असतात. आम्हांपैकीं प्रत्येकास येथील गेस्टकार्ड देण्यांत आलें होतें. अमेरिकेंत कोठेंहि हिंडतांना आम्हांस कसलाहि त्रास होऊं नये म्हणून आम्ही सरकारचे पाहुणे असल्याचीं अनेक कार्डें व ओळखपत्रेंहि देण्यांत आलीं होतीं. सर्व सवलती आम्हांस मिळाव्यात असा हेतु. इंटरनॅशनल सेंटरतर्फे वॉशिंग्टनच्या आसमंतांतील प्रेक्षणीय स्थळें पाहण्याच्या वेगवेगळ्या सहली निघत असतात. जॉर्ज वॉशिंग्टनचें राहण्याचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेलें माउंट व्हर्नान मी या संस्थेच्या सहलींत सहभागी होऊन पाहिलें. अमेरिकेच्या या तीर्थस्थानाचें वर्णन मागें मीं स्वतंत्रपणें केलें आहेंच.

वॉशिंग्टन येथील आमच्या पंधरा दिवसांच्या मुक्कासांत गाजलेला कार्यक्रम आंतरराष्ट्रीय विविध गुणदर्शनाचा. सुमारें चाळीस राष्ट्रांतील शिक्षणतज्ज्ञ येथें जमले होते. पण कित्येकांच्या अंगीं विविध कला होत्या. कोणी वादनकार होते, कोणी संगीतकार होते, कोणी नृत्यविशारद होते. या ललितकलांचा आविष्कार प्रत्येक देश कसा करतो हें पाहणें मोठें मनोरंजक असल्यामुळें १३ सप्टेंबर रोजीं झालेल्या या कार्यक्रमास अमेरिकन लोकांची विशेष गर्दी झाली होती. दुपारीं चारच्या सुमारास सबंध सभागृह रंगीबेरंगी स्त्री-पुरुषांनीं भरून गेलें होतें. आम्हांपैकीं प्रत्येकानें आपापला राष्ट्रीय पोषाख धारण केल्यामुळें वैचित्र्यांत किती तरी भर पडलेली होती. वेगवेगळ्या देशांतील स्त्रियांनीं केलेल्या आपल्या खास स्वदेशीय पोषाखांचीं नाना रंगी फुलपाखरें लोकांच्या डोळ्यांना दिपवत होतीं. फीनलंड, डेन्मार्क, मलाया, बर्मा, मेक्सिको, ग्वाटेमाला, अर्जेंटिना आणि ईजिप्त या देशांतील स्त्रियांची वेषभूषा विविधता व रंगसंगती या दृष्टींनीं केवळ अवर्णनीय होती. क्वचित् दागिन्यांची हौसहि प्रकट झाली होती. चार वाजल्याबरोबर स्टेजवरील दिवे झळकले आणि ‘Guatemala Tierra Mia’ हें ग्वाटेमाला येथील गीत सुरू झालें. याच देशाचें

लोकनृत्यहि बहारीचें झालें. अर्जेंटिनाच्या मिस् मेरी दी लासचे गीतार-संगीत, जपानचें लोकनृत्य, ‘ Moon over the Ruined Castle ’, ब्रह्मदेशचें स्वागत गीत, मेक्सिकोचें लोकनृत्य, फीनलंडच्या मिस मार्था जॉन्सननें पियानोवर वाजवलेलें गाणें, मिष्किल डोळ्यांची मेक्सिकोची जोसेफिना बाल्डेरास हिचें गाणें, थायलंडचे ‘ मून डान्स ’ व ‘ माय डार्लिंग डॉल ’ जर्मनीचें किसाननृत्य इत्यादि कार्यक्रम फारच आकर्षक झाले. मेक्सिकोच्या लोकांना नटण्यामुरडण्याची फार हौस. त्यांचें लोकनृत्य त्यांतील नाट्यगुणांमुळें व रंगसौंदर्यामुळें पहिल्या क्रमांकाचें झालें. पाकिस्तानच्या रुकिया किझलबाशनें ‘ पाकिस्तान झिंदाबाद ’ म्हणून अमेरिकन लोकांना आपल्या देशाचें वैभव ऐकविलें. हिंदुस्थाननें एक लोकनृत्य सादर केलें. त्याच्या तयारीचें वर्णन काय करावें ? आपल्या देशांत किती वेगळाल्या चालीरीति, किती भिन्न परंपरा. एका पंजाबी शीखानें हें नृत्य बसविलें. तें गुजरातच्या बाईस समजेना, दक्षिणेकडील पूनमस्वामीच्या ध्यानीं येईना, ओरिसाच्या मिश्रास त्यांतील कांहीं आकलन होण्यासारखें नव्हतें. पण शेवटीं अनेक वेळां तालमी घेऊन एक संमिश्र असें नृत्य स्टेजवर आलें. अस्सल हिंदी नृत्याचा प्रकार कोणाहि प्रेक्षकास माहीत नसल्यानें जें झालें तेंच हिंदी लोकनृत्य ठरलें.

याच मुक्कामांतील दुसरा गाजलेला कार्यक्रम म्हणजे आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचा. अमेरिकेंतील लोकांना भेट देण्यासाठीं व स्वतःचें सांस्कृतिक वा कलात्मक वैभव दाखविण्यासाठीं प्रत्येकानें किती तरी वस्तु आणलेल्या होत्या. सप्टेंबरच्या आठ तारखेस दुपारीं एक वाजल्यापासून प्रत्येक देश आपापला स्टॉल शोभिवंत दिसावा म्हणून खटपट करूं लागला. नाना प्रकारचे कपडे, विणकाम, भरतकाम, कलाकुसरीच्या वस्तु, देवदैवतें, अलंकार, नकाशे, आराखडे, प्रतिकृति ( मॉडेल्स ) इत्यादि वस्तूंनीं सभागृहास मायाबाजाराचें स्वरूप प्राप्त झालें. ईजिप्तचे पिरॅमिडस्, इटलीचें चर्च व पिसाचा टॉवर, भारताचा ताजमहाल, अरबस्तानचा उंट, सीलोनचा बुद्ध, सिंगापूरची नृत्यसाधना, जपानचा फूजियामा, ग्रीस-अथेन्सचे भग्नावशेष, आफ्रिकेंतील हत्ती, मध्यअमेरिकेंतील रेड इंडियन्स या सर्व गोष्टी या नाहीं त्या स्वरूपांत त्या ठिकाणीं एकत्र झाल्या होत्या.

हस्तीदंतावरील भारतीय कलाकुसर पाहून अमेरिकन लोक संतुष्ट झाले. एका लहानशा हत्तीच्या पोटांत अनेक हत्ती झालेले पाहून अमेरिकन स्त्रिया आश्चर्यानें चकित होऊन जात. पुनः या लहान हत्तींच्या पोटांतील अगदीं लहान कणाएवढें हत्ती पाहतांच त्यांच्या नवलाईस सीमा राहत नसे. हिंदुस्थानांतील वाद्यें, विणकाम, भरतकाम पाहून लोक संतुष्ट झालेले दिसले.

वॉशिंग्टनचा मुक्काम कसा संपला हेंच समजलें नाहीं. आम्हां अडीचशें लोकांचे बारा गट पाडून. एकेक गट अमेरिकेंतील एकेका प्रसिद्ध विद्यापीठास तीन महिन्यांसाठीं वांटून दिलेला होता. त्या शहरांची विद्यापीठ i^ माहिती रोज येऊं लागली होती. आमचा बावीस जणांचा गट ओऱ्हायो स्टेटमधील कोलंबस गांवीं राहणार होता. तेथील कार्याधिकारी डॉ. आर्च हेक यांचीं रसभरित वर्णनाचीं पत्रें येऊन थडकलीं होतीं. आम्हीं प्रवासांत कोणती दक्षता घ्यावी व विद्यापीठीय कार्यक्रमांतील तीन महिने कशासाठीं आहेत यावर एक-दोन व्याख्यानें झालीं. आम्ही आमच्या सामानाची आवराआवर केली. सांठत चाललेलें वाङ्मय पोस्टानें घरीं हिंदुस्थानांत पाठवून दिलें, आणि शनिवार दि. १५ सप्टेंबर रोजीं कोलंबसला जाण्यासाठीं आम्हीं वॉशिंग्टन सोडलें. युनियन स्टेशनवर आमचीं तिकिटें घेऊन मिसेस् चॅन आम्हांस निरोप देण्यासाठीं हजर होतीच.

# अमेरिकेंतील माझें घर

नव्या जगाच्या भव्य दर्शनानें चकित होण्याचे दिवस आतां संपले होते. वॉशिंग्टन येथील दहा-पंधरा दिवसांच्या मुक्कामांत अमेरिकेंतील धांवपळ, गर्दीगर्दींचे कार्यक्रम यांचा परिचय चटकन् झाला. लोक अतिशय मनमोकळे असल्यामुळें दुसऱ्या दिवसापासूनच परकीय भाव संपला होता. अमेरिकन समाज, संस्कृति, इतिहास व शैक्षणिक कार्यक्रम यांचा आवश्यक तो परिचय, व्याख्यानें व चित्रपट यांच्या साह्यानें करून दिल्यानंतर आतां आमच्या कार्यक्रमाचा पुढला महत्त्वाचा भाग सुरू होणार होता. तीन महिन्यांसाठीं निरनिराळ्या देशांतील आमचा वीस-बावीस जणांचा एक गट 'ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटी'त निरीक्षणासाठीं व अभ्यासासाठीं जाणार होता. अमेरिकेच्या राजधानींतून निघून आतां आम्ही अमेरिकन समाजांत मिसळणार होतों. सरकारी शिक्षणखात्यामार्फत जें ऐकलें होतें, पाहिलें होतें, तें कितपत खरें आहे याचा पडताळा आम्हांस पाहावयास मिळणार होता. रात्रीं साडेआठच्या गाडीनें वॉशिंग्टनहून आम्ही कोलंबसला निघालों. पेन्सॅल्व्हॅनिया रोडचीं तिकिटें ऑफिसनें अगोदरच काढून ठेवलीं होतीं. आमचा सर्व कार्यक्रम आंखणारी मिसेस् चॅन सर्वांना निरोप देण्यासाठीं स्टेशनवर हंसतमुखानें उभी होती. ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटींत जाणाऱ्या गटाचें एक वैशिष्ट्य असें होतें कीं, त्यांतील प्रत्येकाच्या राहण्याची व्यवस्था एकेका अमेरिकन कुटुंबांत करण्यांत आली होती. त्यामुळें आमच्यापैकीं सर्वजण मोठ्या खुषींत होते. बेल्जमची मिस् कैतन, मेक्सिकोची जोसेफिना, जर्मनीचे मि. बार्ट, मि. क्रोनन, ऑस्ट्रेलियाचा मि. जोन्स, ईजिप्तची अमीता शोक्री यांनीं आपापल्या नव्या कुटुंबाचीं व घराचीं कल्पनाचित्रें रंगविण्यास सुरुवात केली होती. अमेरिकन कुटुंबांत प्रत्येकाच्या राहण्याची व्यवस्था केली गेली आहे, एवढीच माहिती सर्वांना

समजली होती. कोणत्या कुटुंबांत राहणार याचा तपशील मात्र वॉशिंग्टनला आलेला नव्हता. म्हणूनच प्रत्येकाच्या कल्पनेस चौफेर भटकून येण्यास भरपूर घाव होता.

एक रात्र उलटली कीं मीहि माझ्या नव्या घरीं जाणार होतों. माझें नवें घर कसें असेल ? तेथें कोण कोण असतील ? तीन महिने या नव्या घरीं मी राहणार होतों, ज्यांचें नांवहि मीं ऐकलें नाहीं अशा लोकांच्या संगतींत मी राहणार होतों. सर्व कांहीं नवें असणार, न पाहिलेलें, न अनुभवलेलें असणार या एका विचारानें मी खुषींत होतों. एरव्हीं माझी झोप कमीच आहे आणि आतां तर या नव्या घराच्या स्वप्नसृष्टींत मी रंगलों होतों. पुलमनकारचा आरामशीर प्रवास, मऊ मऊ गाद्या, उशा, उबदार पांघरुणें, बिछान्याजवळचा दिवा—सर्व सुखसोयी होत्या, पण मन झोंपावयास राजी होईना. कांचेच्या खिडकींतून उलट्या गतीनें धांवणारा निसर्ग अंधाऱ्या स्वरूपांत किंचित् ओळखीचा, किंचित् परका वाटत होता. शरीराला पडल्या पडल्या मजेदार असे गाडीच्या गतीचे हादरे बसत होते आणि त्यामुळें मनाची गति वाढीस लागत होती. आतांपर्यंत मीं किती घरें पाहिलीं होतीं. वयाच्या नवव्या वर्षापासून मी या नाहीं त्या कारणासाठीं निरनिराळ्या घरीं राहिलों होतों आणि आज एका अगदीं नव्या घरीं निघालों होतों. तेथील लोक माझ्या माहितीचे नव्हते, त्यांनीं मला पाहिलें नव्हतें. मीं त्यांचीं नांवेंहि ऐकलीं नव्हतीं. कोणत्या वयाचीं तीं आहेत, हें मला ठाऊक नव्हतें. कदाचित् माझीहि माहिती त्यांना नसावी. पूर्वेकडील एक पाहुणा आपली विशिष्ट राहणी, चालीरीति, संवयी घेऊन पश्चिमेकडील एका अनोळखी घरीं निघाला होता.

सकाळीं साडेसात वाजतां कोलंबसला आमची गाडी येऊन पोंचली. सत्तरीच्या घरांत आलेले एक गृहस्थ मोकळ्या मनानें हंसून आमचें स्वागत करण्यास तयार होते. तीन महिन्यांसाठीं आमचा सर्व कार्यक्रम ठरविणारे हे डॉ. हेक ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटींत शिक्षणाचे प्राध्यापक होते. त्यांच्याभोंवतींहि अनेक लोक आपापल्या पाहुण्यास अंदाजानें ओळखण्यास तत्पर झालेले होते. डॉ. हेक यांच्या हातांत एक भली

मोठी यादी होती. ज्याचा पाहुणा त्यास भेटविणें, परस्परांची ओळख करून देणें हा कार्यक्रम अगदीं सहजतेनें सुरू झाला. माझ्या नव्या मित्राचें नांव मि. लॉइड फ्रँक्. तो माझ्याच वयाचा होता. आपल्याच वयाचा पाहुणा आपणास मिळाला म्हणून त्याला खूप बरें वाटत असल्याचें दिसत होतें. डॉ. हेक यांचा निरोप घेऊन मी मि. फ्रँक् यांच्या गाडीनें माझ्या नव्या घरीं जाण्यास निघालों. लॉइड फ्रँक् माझा मित्र होता कीं नातेवाईक होता? पण वर्ष–सहा महिन्यांच्या कामानंतर सुटीस मी घरीं आलों आहें असा भाव लॉइडच्या मुखावर होता. जणूं आमची खूप दिवसांची ओळख होती. बोलतां-बोलतां, प्रवासाच्या सुखाची चर्चा करतां-करतां लॉइड गाडी चालवीत होता आणि मी माझीच गाडी आहे अशा ऐटींत हुँ हूँ ऽ करून अमेरिकन पद्धतीनें त्याला साथ देत होतों. स्टेशन-पासून घर चांगलें तीन मैल दूर होतें. कोलंबसच्या उत्तर भागांत वस्ती फार चांगली आहे. तेथें लॉइड फ्रँक् राहत होता. दहा मिनिटांत आम्ही घरीं येऊन पोंचलों. मुख्य रस्त्याच्या डाव्या अंगाला दोन-तीन फर्लांग गेल्यावर १९१ वेस्ट डनूईडन आल्याबरोबर मोटार थांबली. माझें सर्व सामान लॉइडनें भराभरा गाडीबाहेर काढून घरांत नेलें. नव्या पाहुण्यास पाहण्यासाठीं मुलें दाराशीं केव्हांपासून किलाकिले डोळे करून उभीं होतीं. मि. जोशी आमच्याकडे तीन महिने राहणार आहेत अशी वार्ता नऊ वर्षांच्या सिंथियानें आपल्या मैत्रिणींत गेल्याच आठवड्यांत प्रसृत केली होती. तिच्यापेक्षां दोन वर्षांनीं लहान डॉनी. कोणी इंडियन मनुष्य आपल्या-कडे येणार आहे याची त्याला कल्पना होती. पण पाहुण्यास पाहतांच तो थोडा नाराज झाला. या इंडियन पाहुण्याच्या डोक्यावर गरुडपिसांची विचित्र टोपी त्याला दिसली नाहीं कीं रंगीबेरंगी पोषाख दिसला नाहीं. त्याच्या डॅडीनें–लॉइडनें–जगाचा नकाशा काढून त्याला हिंदुस्थान दाखविण्याचें काम केलें होतें. मुंबईजवळच्या पुण्याहून हा पाहुणा येणार असल्याचेंहि त्याला सांगितलें होतें. पण अमेरिकन इंडियन्सपेक्षां आणखी कोणी वेगळे आणि खरे इंडियन्स असतील असें मानतांना त्या छोट्या मुलाच्या मनास कष्ट होत होते. डॉनीचा धाकटा भाऊ जेसी नुकताच वर्षाचा झाला होता. नव्या पाहुण्याकडे पाहून त्याच्या मनांत काय आलें

हें समजण्यास कठीण होतें. माझी पहिल्यानें मैत्री झाली ती या मुलांशीं.

त्यांची आई ग्लोरिया स्वयंपाकघरांत कांहीं तरी करीत होती. बाहेर येऊन हंसत हंसत ती म्हणाली, "माफ करा हं मि. जोशी, माझे हात ओले आहेत." हस्तांदोलन तिला करतां आलें नाहीं म्हणून तिची ही विनवणी होती. ग्लोरिया लॉइडपेक्षां थोडी उंच होती. चष्मा लावीत असल्यानें प्रथम मला तिच्या डोळ्यांतील भाव समजले नाहींत. ग्लोरिया आणि लॉइड यांच्याबरोबर मी तीन महिने राहणार होतों. लॉइडनें माझें सामान माझ्या खोलींत वरच्या मजल्यावर नेण्यास सुरुवात केली. हात वगैरे पुसून ग्लोरिया म्हणाली, 'चला मि. जोशी तुमची खोली मी दाखवितें.' आम्ही सर्वजण वर गेलों. दोघांनीं माझी खोली नीटपणें सजवली होती. ऐसपैस असणाऱ्या त्या खोलींत सर्व कांहीं होतें. पुस्तकांसाठीं सुबक कपाट होतें. आटोपशीर जागेंत शोभेल अशी टेबल-खुर्ची होती. वेगवेगळ्या सोयींसाठीं तीन-चार दिवे होते. नीट साफसूफ केलेला बिछाना व त्या शेजारीं एक आरामखुर्ची होती. प्रथम खोलीची सर्व माहिती त्या दोघांनीं मला दिली. ग्लोरियानें बाथरूमची व्यवस्था समजावून दिली. माझे टॉवेल साबण, टॉयलेट यांबद्दल सर्व कांहीं तिनें मोकळ्या मनानें सांगितलें. आणखी कांहीं कमी असल्यास सांगण्याची विनंती तिनें केली आणि मला मोकळा वेळ मिळावा म्हणून सर्वजण खालीं निघून गेले. दाढी-अंघोळ उरकून मी नव्या पोशाखांत तयार झालों. खालीं आलों तेव्हां दोघांनीं पुनः एकवार सर्व व्यवस्थित असल्याची चौकशी केली. माझ्या मुलींची विचारपूस मोठ्या अगत्यानें केली. माझ्या वेगवेगळ्या पदव्यांबद्दल त्यांना आश्चर्य वाटत होतें. माझ्यासंबंधीं बहुतेक सर्व माहिती वॉशिंग्टनहून अगोदरच त्यांना समजली होती. माझी जन्मतारीख त्यांना माहीत होती. माझ्या पहिल्या नांवाचा उच्चार करण्याचा प्रयत्न त्यांनीं आठ दिवस अगोदरपासून केलेला असल्यामुळें 'प्रल्हाद' हें नांव त्यांना फारसें अवघड वाटलें नाहीं. पहिल्याच दिवसापासून अमेरिकन पद्धतीप्रमाणें त्यांनीं मला याच नांवानें हांक मारण्यास प्रारंभ केला. वॉशिंग्टनला मी हॉटेलमध्यें जेवण घेत असें. आतां मला घरचें जेवण मिळणार होतें. एका प्रशस्त टेबलावर ग्लोरियानें सर्व सिद्धता केली. मला काय आवडतें हें तिला माहीत नव्हतें. हिंदुस्थानांतील

लोक शाकाहारी असले तरी पुष्कळ मांसाहारीहि आहेत हें तिला ठाऊक असल्यामुळें तिनें आपल्या पाहुण्यासाठीं चिकनचा बेत केला होता. टेबलावर पांढरें स्वच्छ आच्छादन होतें. दोन टोंकांना दोन मेणबत्त्या जळत होत्या. काटे-चमचे, कपबशा नीट व्यवस्थित रीतीनें मांडून ठेविल्या होत्या. स्वतः ग्लोरियानें सर्वांच्या बशींतून वेगवेगळे पदार्थ वाढले. मुलें अजूनहि कुतूहलानें आपल्या पाहुण्याकडे पाहत होतीं. सर्व सिद्धता झाल्यावर सर्वांनीं डोळे मिटून घेतले, माना खालीं केल्या, क्षणभर ईश्वराचें चिंतन केलें व नंतर नव्या पाहुण्याचें स्वागत केलें. एवढें झाल्यावर ग्लोरिया मला म्हणाली, " तुमच्या देशांतहि अशी कांहीं प्रार्थना आहेच. आजच म्हणाना आमच्याकरितां. " त्यांच्यासारखाच आविर्भाव करून मीहि 'वदनिं कवल घेतां... ' हा मराठी श्लोक म्हटला. म्हणण्याची पद्धत व मुख्यतः भाषा त्यांना अर्थातच अगदीं नवी होती.

त्याच दिवशीं संध्याकाळीं आम्ही सर्वजण खूप दूर १२-१५ मैलांवर एक मोठें धरण होतें तेथें फिरावयास गेलों. मुलांशीं माझी दोस्ती आतां चांगलीच जमली होती. किती तरी प्रश्न तीं विचारीत होतीं. मला माहिती देत होतीं. संवयीनें त्यांची भाषा मला दोन-चार दिवसांत समजूं लागेल अशी होती. त्या धरणाच्या ठिकाणीं किती तरी लोक आले होते. निसर्गाची, उमलत्या फुलांची, मावळत्या सूर्याची आणि लहरत्या पाण्याची शोभा लुटीत राहणें अमेरिकन माणसास फार आवडतें. पांच दिवस खूप श्रम केल्यानंतर शनिवारीं व रविवारीं बहुतेक लोक बाहेर सहलीसाठीं निघतात. या दिवशींहि पुष्कळ लोक बाहेरची हवा खाण्यासाठीं जरा मोकळ्या वातावरणांत आले होते. सर्व वयांचे, सर्व प्रकारचे लोक त्या ठिकाणीं होते. अर्धी चड्डी घालून आलेल्या एका बाईकडे अंगुलिनिर्देश करून ग्लोरियानें मला विचारलें, " असा पोषाख तुमच्या देशांतील स्त्रिया करीत नसतील, नाहीं का ? " मीं हंसून म्हटलें, ' नाहींच ! पण वॉशिंग्टनला आल्यापासून मला आतां परिचयाचें झालें आहे हें वातावरण. ' तीहि मोठ्यानें हंसली व म्हणाली, " सार्वजनिक ठिकाणीं असा पोषाख बायकांनीं करावा हें मलाहि आवडत नाहीं. पण ही अमेरिका तुम्हांस माहीत आहेच. " रात्र झाल्यावर आम्ही घरीं आलों. टेलिव्हिजनचे कार्यक्रम पाहतां पाहतां किती

तरी विषयांवर गप्पा झाल्या. जणूं आमच्या मागें अनेकदां भेटी झाल्या होत्या आणि आतां जुन्या स्मृतींना आठवून आठवून आम्ही त्यांना उजळा देत होतों. अमेरिकेची श्रीमंती, यांत्रिक जीवन, या वर्षांतील निवडणूक, करमणुकीचीं साधनें, गांधी-नेहरू, हिंदी स्त्रियांची वेषभूषा, कुटुंबांतील माणसें, त्यांचे स्वभाव, जेवणाच्या-झोपण्याच्या वेळा, देवधर्माच्या पद्धति—अशा अनेक विषयांवर आम्ही बोलत होतों. एकमेकांना समजावून घेत होतों. मला तें घर माझेंच वाटत होतें. त्यांना पाहुणा म्हणजे त्यांचा एक आप्तच वाटत होता.

असें माझें घर होतें. येथें मी सुमारें तीन महिने होतों. या घरीं मला केव्हांहि परकेपणा वाटला नाहीं. लॉइड हा तेथील टेलिफोन कंपनींत नोकरीस होता. त्याला आवडत नसल्यामुळें ग्लोरिया नोकरी करीत नसे. सर्व घर चालविण्याची जबाबदारी खरी म्हणजे ग्लोरियावर होती. मला हवें—नको तें तीच पाही. दुसऱ्याच दिवशीं तिनें मला सांगितलें, "हें पाहा, तुझा बिछाना नीट करणें, खोली स्वच्छ करणें हीं सर्व माझीं कामें आहेत. तूं कांहीं करतां कामा नये." ग्लोरिया सर्व कांहीं करी, युनिव्हर्सिटींत जातांना कांहीं सामान इथें तिथें पसरलेलें असे. टेबलावरचीं पुस्तकें माझ्या नेहमींच्या स्वभावास अनुसरून तशींच उघडीं, लिखाणाचें साहित्य इकडे तिकडे पसरलेलें, असें स्वरूप टेबलाचें असे. संध्याकाळीं घरीं येऊन पाहावें तों सर्व पुनः टापटिपीनें आवरलेलें असे. माझ्या मनांत संकोच निर्माण होई. पण कांहीं विशिष्ट कामें मीं करावींत हें ग्लोरियाला पसंत नसे. ती त्याबद्दल मला निक्षून सांगे. तीन-चार दिवसांनंतरची गोष्ट. मी युनिव्हर्सिटींतून आल्यावर ग्लोरिया माझ्या खोलींत येऊन म्हणाली, "प्रल्हाद, हे तुझे दोन शर्ट मळले होते. धुऊन ठेवले आहेत. एक दिवसाआड कपडे धुण्यासाठीं माझ्याकडे देत जा..." मीं पाहिलें. हँगरला लावलेले दोन शर्ट तिनें बरोबर आणले होते. इस्त्री केलेले पांढरे स्वच्छ शर्ट पाहून मी थक्क झालों. बाजू सावरावी म्हणून मीं तिला पुनः विचारलें, "मीं माझे कपडे स्वतः धुणार आहे. चालेल ना?" त्यावर ती म्हणाली, "हो चालेल ना ?" पण धुणार म्हणजे काय ? यंत्रासमोर उभाच राहणार की नाहीं ?" तिनें केव्हांहि मला हें काम करूं दिलें नाहीं. अमेरिकन घरांत नोकर-माणसें

कधींच दिसणार नाहींत. स्वयंपाक करणें, घर स्वच्छ करणें, भांडीं धुणें, कपडे धुणें हीं नित्याचीं कामें घरच्या मालकिणीला करावीं लागतात. हीं सर्व कामें यंत्रानें होत असलीं, तरी घरकामाचा पसारा थोडा असतो असें नाहीं. सकाळपासून रात्रीपर्यंत या नाहीं त्या कामांत ग्लोरिया एकसारखी गुंतून राहिलेली असे. लॉइड घरीं असला म्हणजे तोहि तिला प्रत्येक कामांत मदत करी. जेवणाचें टेबल सजविणें, लहान मुलांचे कपडे करणें, घर आवरणें, आणि कधीं कधीं स्वयंपाक करणें वा भांडीं विसळणें हीं कामेंहि लॉइड करीत असे. सहकारी जीवनाचा तो एक आदर्श होता. मी पुण्यास आलों तेव्हां ग्लोरिया मोलकरीण नसतांना जीं कामें करी त्याचा संपूर्ण पाढा वाचला, पण लॉइड तिला काय काय मदत करीत असे हें मात्र घरीं सांगण्याचें धैर्य मला अजून झालें नाहीं! दर शुक्रवारीं एक निग्रो बाई सर्व घर स्वच्छ करण्यासाठीं मदतीस येई, आणि सर्व काम झाल्यावर एकाच टेबलावर आमच्याबरोबर जेवून निघून जाई.

लॉइडला स्कॉउटिंगची फार आवड होती. त्याच्या नाना प्रकारच्या सभा व नाना सहली यांच्या योजना नित्य सुरू असत. दर शनिवारीं व रविवारीं ठरल्याप्रमाणें आमची लांबची सहल होत असे. मिस्टर फ्रँक् व मिसेस् फ्रँक असें म्हणणें मला केव्हांच सोडून द्यावें लागलें होतें. दुसऱ्याच दिवशीं कपडे करून मी युनिव्हर्सिटींत जातांना ग्लोरियास म्हणालों, "मिसेस् फ्रँक् मी निघालों आहें." त्यावर थोडें रागावल्यासारखें करून तिनें विचारलें, "काय म्हणालास?" मी सर्व प्रकार ओळखला व म्हटलें, 'ग्लोरिया मी निघालों हं.' त्यावर 'हं, आतां ठीक' असा आविर्भाव करून तिनें मला संमति दिली. हा मोकळेपणा कुटुंबांतील सर्व माणसें दाखवीत. मुलें तर माझ्याच खोलींत खेळत असत. शाळेस निघालों कीं, माझ्याबरोबर जाण्याचा त्यांचा हट्ट सुरू होई. जेवणाची तयारी झाली कीं, पाहुण्यांच्या दोन्ही अंगांस बसण्यासाठीं दोघांची झटापट सुरू होई.

लॉइडचे वडील तीन वर्षांपूर्वीं दिवंगत झाले. त्याची आई त्याच गांवांत एक स्वतंत्र घर घेऊन राहत असे. अमेरिकेंत आईबाप आपल्या मुलांच्या जवळ कधींहि राहत नाहींत. लॉइडची आई मोठ्या गंभीर

प्रकृतीची आहे. मेथॉडिस्ट चर्चमध्यें ती नोकरीस आहे. चर्चतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या मुखपत्राचें संपादन ती करीत असते. आठवड्यांतून दोन-चार वेळां तरी ती मुलाच्या घरीं येत असे व मुलाची, सुनेची, नातवंडांची, पाहुण्याची खुशाली पाहून जात असे. ग्लोरियाची आई थोड्या वेगळ्या स्वभावाची आहे. तीहि नोकरी करते, पण तिला कलाकुसरीची फार आवड. तिला उत्तमपैकीं फोटोग्राफी समजते. या उद्योगांतील पहिले धडे तिनेंच मला प्रथम दिले. मीं घेतलेल्या रंगीत स्लाइड्स् आल्या कीं ती प्रोजेक्टर, पडदा वगैरे साहित्य घेऊन घरीं येई. स्वतः घेतलेल्या कांहीं स्लाइड्सहि आणी आणि मग पडद्यावरचा रंगीबेरंगी कार्यक्रम सुरू होई. 'वा फार छान, किती सुंदर, नाहीं !' असे शब्दप्रयोग करण्याची फार हौस अमेरिकन लोकांना. कित्येक वेळां या शब्दांना अर्थ फार कमी असला, तरी त्यांच्या पाठीमागची भावना समजण्यासारखी असते. युनिव्हर्सिटींत निघतांना एकदां मी ग्लोरियास सांगण्यासाठीं निघालों. माझ्याकडे थोडें निरखून पाहून ती म्हणाली, "आज तूं फार सुंदर दिसतोस !" हें ऐकून मी सर्दच झालों. माझ्या रूपाची मला यथार्थ कल्पना असल्यामुळें व तेथील लोकांचा आतां परिचय झालेला असल्यामुळें तिच्या म्हणण्याचा अर्थ मी समजूं शकलों !

फ्रँक् कुटुंबांतील दिवस भराभरा संपत होते. किती मेजवान्या, किती सहली, किती गप्पा ! 'थँक्स् गिव्हिंग डे' म्हणून एक दिवस अमेरिकेंतील लोक मोठ्या मनोभावें साजरा करतात. परमेश्वरानें ही नवी भूमि—सुपीक, समृद्ध भूमि—आपणांस दिली म्हणून अमेरिकन लोक कृतज्ञता व्यक्त करतात. जी पहिली पिढी या देशांत आली ती नंतर येणाऱ्या पिढीस याची जाणीव करून देत असते. घरांतील वृद्ध आजी आपल्या मुलांना व नातवंडांना या दिवशीं मेजवानी देत असते. मी तेथें असतांना २२ नोव्हेंबरला हा दिवस आला होता. ग्लोरियाची थोरली बहीण पॅट्रिशिया कोलंबसलाच राहत होती. तिच्या घरीं ग्लोरियाच्या आईनें—मिसेस् अँडरसननें—ही मेजवानी सिद्ध केली होती. या वेळीं टर्कीची मेजवानी ही विशेष गणली जाते. किती कोंबड्यांचें बलिदान परमेश्वराचे आभार मानतांना होत असेल याची गणना करणें कठीण आहे. डिसेंबरच्या २ तारखेस आम्ही क्लीव्हलंडला

जाण्यास निघालों. ग्लोरियाची मावशी एथिल हूडॅक येथें राहत होती आणि तिचीं आमंत्रणें वारंवार येत असत. कोलंबसपासून उत्तर दिशेला असणारें हें ओव्हायो स्टेटमधील सर्वांत मोठें शहर एकशें चाळीस मैल दूर होतें. पहांटेचे सहा वाजतां आम्ही घरच्या मोटारनें निघालों. बर्फाचा वर्षाव एकसारखा होत होता. हवाहि कुंद झाली होती. घरापासून पांच दहा मिनिटें झाल्यावर आठ वर्षांच्या डॉनीला उलटी झाली. जावें कीं न जावें असा संभ्रम निर्माण झाला; पण पाणी पिऊन झाल्याबरोबर त्याला थोडी हुशारी वाटल्यामुळें लॉइडच्या मोटारीस गति प्राप्त झाली. तीस-चाळीस मैल गेल्यावर मध्येंच एका हॉटेलमध्यें आम्ही न्याहरी घेतली. पाऊस चांगलाच पडत होता. जमिनीवर सर्वत्र शुभ्र चादर अंथरलेली होती. भरधांवपणें जाणाऱ्या मोटारींतून हेंहि दृश्य लोभनीय वाटत होतें. नायगारा फॉल्सला जातांना मी क्लीव्हलंडला रेल्वेनें गेलों होतों. आतां मोटारीनें जात असल्यामुळें रस्ता नवाच होता. अकरा साडे अकराच्या सुमारास आम्ही क्लीव्हलंडला जाऊन पोंचलों. पावसाचा व बर्फाचा जोर कमी झाला नव्हता. ग्लोरियाच्या मावशीकडे भरपूर मेजवानी झाल्यावर लॉइड, मी व मि. हूडॅक असे सर्वजण मोटारमधून शहर पाहण्यास निघालों. स्टेशनची उंच उंच इमारत सर्व शहरावर स्वामित्व गाजवीत होती. सरोवर एरी शांतपणें पसरलेलें होतें. नाताळ जवळ येत चालल्यामुळें दुकानांवर रंगीबेरंगी रोषणाई सुरू झाली होती. क्लीव्हलंडचें म्यूझियम फार नांवाजलेलें आहे. शिल्पकृति व चित्रकारी याबद्दल या पदार्थसंग्रहालयाची ख्याति मोठी आहे. गप्पा मारतां मारतां कादंबरीकार पर्ल बक हिचा विषय निघाला. मी तिच्या अनेक गोष्टी ऐकल्या होत्या, वाचल्या होत्या. मि. हूडॅक यांनी मला तिचें आत्मवृत्त 'माय सेव्हरल् वर्ल्ड्स' मोठ्या प्रेमानें नजर केलें! संध्याकाळीं साडे सहा वाजतां आम्ही परत कोलंबस येथें येण्यास निघालों. गोष्टी करतां करतां, गाणीं गातां गातां कोलंबलस केव्हां आलें हें समजलेंहि नाहीं.

आणखी एक आमची सहल गाजली ती रॉक हाऊसची. कोलंबसपासून थोड्या दूर अंतरावर हें प्रसिद्ध असें निसर्गरम्य ठिकाण आहे. आमच्यापैकी बहुतेकजण या सहलींत होते. लॉइडला फूटबॉल मॅचचें काम असल्यामुळें

एकटी ग्लोरियाच मुलांना घेऊन निघाली. बरोबर जर्मनीचे मि. क्रोनन होते. ग्लोरियाची आई व तिचे वडील यांनाहि आम्ही बरोबर घेतलें. मी माझ्या कॅमेऱ्यांत रंगीत फिल्म प्रथमच वापरणार होतों. मिसेस् अँडरसननें—ग्लोरियाच्या आईनें—मला सर्व माहिती दिली. हिरव्यागार झाडांचे रंग झपाट्यानें तांबडे लाल पाहतां पाहतां झाले होते. ऑक्टोबरच्या सहा तारखेस सृष्टीचें हें मनोहर रूप न्याहाळतां न्याहाळतां रॉक हाऊसवर जाऊन पोंचलों. एका छोट्या डोंगरावर गर्द झाडींत ही जागा पिकनिक-साठीं म्हणून राखून ठेवलेली आहे. प्रत्येकानें आपापलें जेवण तयार केलें. त्याचा समाचार घेतल्यानंतर आम्ही ‘ रॉक हाऊस ’ पाहण्यास निघालों. डोंगराच्या कड्यांतून पोखरून पोखरून गुहा तयार केल्या आहेत इतकेंच. अजिंठा—वेरूळ मीं पाहिलें होतें. त्याच्याशीं तुलनाच करणें व्यर्थ वाटलें. भोंवतीं गर्द अशी रंगीबेरंगी झाडी असल्यामुळें सर्व देखावा मोठा रम्य दिसतो. दुपारच्या चारच्या सुमारास आम्ही परत निघालों. येतांना ओल्ड मॅन्स केव्ह—वृद्ध माणसाची गुहा—पाहण्यासाठीं आम्ही थोडा वेळ थांबलों. संध्याकाळीं मि. चर्च यांचे घरीं ‘ डिनर ’ चें आमंत्रण होतें. रात्रीं खूप पाऊस पडला. वादळ झालें. विजांचा, ढगांच गडगडाट झाला. आमच्या गटांत आईसलंडचा मि. जोहान्सन म्हणून एक धीमा मनुष्य होता. त्याला हा सर्व प्रकार नवाच वाटला. पृथ्वीचा प्रलयकाल येऊन ठेपला असें समजून तो भिऊन धाडधाड खालींच आला! दुसऱ्या दिवशीं आम्हांस ही वार्ता समजली! असे आमचे कोलंबसचे दिवस संपत होते. सरत होते.

* * *

# ९ : ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटी– कोलंबस

ओव्हायो स्टेटमधील कोलंबस गांवीं मी तीन महिने होतों. या स्टेटची कीर्ति आधींच माझ्या कानावर आलेली होती. ओव्हायो हें एका नदीचें नांव असून रेड इंडियन्सच्या भाषेंत 'सुंदर नदी' असा त्याचा अर्थ आहे. तीन महिन्यांच्या अवधींत या स्टेटमधील बहुतेक सर्व मोठ्या शहरीं मला या नाहीं त्या निमित्तानें जावें लागलें. कारखाने व उद्योगधंदे यांच्या दृष्टीनें या स्टेटचा लौकिक फार मोठा आहे. रबरी टायर्स आणि ट्यूब्स, मातीचे पदार्थ, शवपेटिका, किरकोळ यंत्रसामग्री, विद्युत् उपकरणीं, कांचेचे सामान, स्टोव्ह्ज, अल्युमिनमचे पदार्थ, साबण, काड्याच्या पेट्या, मायर्स पंप इत्यादि अनेक उद्योगधंद्यांबद्दल ओव्हायो राज्याचा लौकिक अमेरिकेंत फार मोठा आहे. सिनसिनाटी येथील बेसबॉलची व कोलंबस येथील फूटबॉलची टीम अमेरिकेंत फार प्रसिद्ध आहे. विजेचा प्रकाश पहिल्यानें जगांत आणणारा थॉमस एडिसन याच स्टेटमधील. आकाशांत उड्डाण करणारे राईट बंधू याच राज्यांतील होत. दंतविद्येचें पहिलें विद्यालय, बालकगृह, वाफेचीं एंजिनें, सहशिक्षणाचें महाविद्यालय, बॉय स्कॉउट चळवळ, यंत्रविद्येचीं केंद्रें, चीज फॅक्टरी, मुलांचीं वृत्तपत्रें, प्लॅस्टिक्सचे पदार्थ इत्यादि बाबतींतहि ओव्हायो स्टेट आज अमेरिकेंत पहिल्या क्रमांकाचें आहे. क्लीव्हलंड हें राज्यांतील सर्वांत मोठें शहर. येथून बायबलच्या सर्वांत अधिक प्रती छापल्या व विकल्या जातात. घरें व मोठमोठ्या इमारती स्वच्छ करण्याचीं यंत्रें (व्हॅक्यूम क्लीनर्स) या स्टेटमध्यें फार मोठ्या प्रमाणावर तयार होतात. मुंबईसारख्या शहरांत मोठ्या दुकानांत दिसणारीं गिऱ्हाइकानें घेतलेल्या मालाचा हिशेब तयार करणारीं यंत्रें प्रथम मोठ्या प्रमाणावर याच राज्यांत तयार झालीं. सिनसिनाटी येथें खेळण्याच्या पत्त्यांचा कारखाना फार मोठ्या प्रमाणावर आहे. असें हें सर्व प्रसिद्ध ओव्हायो स्टेट.

या स्टेटची राजधानी कोलंबस. पुण्याएवढेंच पांच लक्ष लोकवस्तीचें हें शहर मोठें टुमदार आहे. माझी प्रथम कल्पना कीं, ओव्हायो नदीच्या कांठींच वसलेलें हें शहर ! पण मी प्रथम ओव्हायो नदी पाहिली ती सिनसिनाटी शहरीं आमचा गट गेला तेव्हां, त्यापूर्वीं कोलंबसला येऊन पंधरा-वीस दिवस झाले होते. सायटो आणि ऑलेंटँजी नद्यांच्या संगमावर कोलंबस शहर १७९७ च्या सुमारास प्रथम वसण्यास प्रारंभ झाला. येथें यापूर्वीं मिंगोया नांवाचें एक छोटेसें रेड इंडियन्सचें खेडें होतें. १८१२ च्या सुमारास या शहराची लोकसंख्या अवघी चारशें–पांचशें होती. याच वर्षीं ओव्हायो स्टेटची कायमची राजधानी म्हणून कोलंबसची निवड करावी असा विचार सुरू झाला, आणि मग त्या दिशेनें कोलंबसची वाढ झपाट्यानें होऊं लागली. लहान लहान उद्योगधंदे सुरू झाले, नवीं दुकानें उघडलीं गेलीं, नव्या घरांची बांधणी होत राहिली. व्यापारी मार्ग होत राहिले. १८३३ मध्यें कोलंबसला रेल्वे येऊन पोंचली. १८५० पर्यंत राज्यांतील प्रमुख शहरें रेल्वेनें जोडण्यांत आलीं. शिक्षणासाठीं इमारती बांधल्या गेल्या. राज्यकारभारासाठीं नव्या भव्य इमारती तयार झाल्या आणि १८८० सालीं लोकसंख्या ५०,००० पर्यंत झाली. कॅपिटॉल युनिव्हर्सिटी, ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटी, फ्रँकलिन युनिव्हर्सिटी यांसारखीं नवीं विद्यापीठें उदयास आलीं. आजचें कोलंबस शहर फार झपाट्यानें उदयास आलेलें दिसतें. सुमारें आठशेंपर्यंत असणाऱ्या कारखान्यांत एक लक्षापर्यंत लोक आज काम करतात. आज चाळीस चौरस मैलांपर्यंत या शहराचा पसारा चोहों दिशांनीं पसरलेला आहे.

याच शहरांत अमेरिकेंतील प्रसिद्ध ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटी असून तेथील डॉ. आर्च ओ. हेक आमचे मुख्य नियोजक होते; डॉ. आर्च हेक वयानें सत्तरीच्या आसपास असलेले, पण मनानें सदैव तरुण दिसत. ते विद्यापीठांतील शिक्षणशास्त्राचे नाणावलेले प्राध्यापक आहेत. मेथॉडिस्ट चर्चवर त्यांची फार निष्ठा. आम्हां सर्वांची राहण्याची सोय त्यांनीं मेथॉडिस्ट कुटुंबांतच केलेली होती. नॉर्थ ब्रॉडवे चर्चच्या आसपास आम्ही बहुतेक सर्वजण राहत होतों. ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटी येथून एक मैल दूर होती. रोज सकाळीं शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक विषयांवर एखादें

चर्चात्मक व्याख्यान असावयाचें व दुपारीं एखाद्या शाळेला, एखाद्या कारखान्याला वा एखाद्या प्रसिद्ध संस्थेला भेट असा कार्यक्रम असावयाचा. आमचा मुक्काम या शहरांत नव्वद दिवसांचा. शनिवार-रविवारीं शेजारच्या खेड्यांना भेटी देण्याचा कार्यक्रम बहुधा ठरलेला असावयाचा. सकाळीं नऊपासून रात्रीं सात–साडेसातपर्यंत कार्यक्रम असला तरी डॉ. हेक आमच्याबरोबर असावयाचेच. त्यांना विश्रांतीची जरूरी नव्हती. त्यांना श्रमणें, दमणें माहीत नव्हतें. मोकळ्या मनाचा व दिलदार वृत्तीचा हा वृद्धयुवा हंसून ब्रह्मदेशच्या कॉकच्या पाठीवर थाप मारी, इटलीच्या मिस् लुईनीची गोड नाजुक आवाजांत नक्कल करी, जर्मनीच्या मिस् रायमन व मिस् स्ट्रेटर यांच्या फोटोग्राफीची चौकशी करी. डॉ. हेक यांचें मनमोकळें उंच हास्य तर आमच्या सर्वांच्या आवडीचा विषय बनला होता. डॉ. हेक जपानमध्यें वर्ष–दीड वर्ष होते. जपानमधील अनेक गंमती ते आम्हांला सांगत असत. मिस् योको नांवाची एक जपानी विद्यार्थिनी कॉलेज शिक्षणासाठीं त्यांच्या घरीं राहिली होती, तिचा तर त्यांना फार ळळा होता.

ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटी ऑलेंटँजी नदीच्या कांठीं विस्तीर्णपणें पसरलेली आहे. २१३१ एकरांच्या या अवाढव्य भूमीवर सुमारें बावीस-तेवीस हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. युनिव्हर्सिटीचें स्वतंत्र रेडिओ-स्टेशन व वृत्तपत्र आहे. विमानविद्येचें शिक्षण देण्यासाठीं विद्यापीठाचा स्वतंत्र विमानतळ आहे. जगांतील सर्व देशांचे व सर्व धर्मांचे विद्यार्थी या विद्यापीठांत शिक्षण घेतात. विद्यार्थ्यांना राहण्यासाठीं व विद्यादानासाठीं म्हणून या क्षेत्रांत शंभराच्यावर लहान-मोठ्या इमारती आहेत. सर्व शाखांचे मिळून १४०० प्राध्यापक आपापल्या विषयांत निष्णात असे आहेत. सर्व विद्यापीठाची एकूण मालमत्ता सुमारें ७८,०००,००० डॉलर्सची आहे. नाना कला व नाना शास्त्रें यांचें शिक्षण देणाऱ्या या विद्यापीठांत सुमारें निरनिराळे २५० अभ्यासक्रम आहेत. कलाविषयक, शेतकी, वैद्यविद्या, भौतिक विज्ञान, स्थापत्यशास्त्र, यंत्रविद्या, व्यापार, ललितकला, गृह-जीवनशास्त्र, विमानविद्या, राज्यशास्त्र, नवविज्ञान, मूर्तिविज्ञान, वृत्तपत्र-शास्त्र, गायन, नर्सिंग, राज्यकारभार इत्यादि किती तरी विषयांचीं स्वतंत्र

विद्यालयें या भूमीवर विद्यापीठाच्या नियंत्रणाखालीं आहेत. पुनः प्रत्येक विषयाचे किती तरी उपभेद पाहावयास सांपडतात. आरोग्यविज्ञान, पदार्थ-विज्ञान शेतीविज्ञान, रसायन यांसाठीं हें विद्यापीठ प्रसिद्ध आहे. शिक्षण-विषयक महाविद्यालयाची कीर्तिहि फार मोठी असल्यानेंच भारत सरकारच्या निमंत्रणावरून याच विद्यापीठांतील दोन–तीन शिक्षणतज्ज्ञ तूर्त भारतांत येऊन शिक्षणाच्या नव्या घडीचा विचार करीत आहेत.

विद्यापीठाच्या क्षेत्रांतच मुलींच्यासाठीं स्वतंत्र अशीं सहा वसतिगृहें असून एकूण पंधराशें विद्यार्थिनी येथें राहूं शकतात. सुमारें दोन हजार विद्यार्थ्यांना राहतां येईल एवढी वसतिगृहें विद्यापीठानें उभीं केलीं आहेत. पण ही सर्व व्यवस्था आज फारच अपुरी पडते. बाहेर कोठें तरी विद्यार्थ्यांना व्यवस्था करावी लागते. विद्यार्थ्यांना अंदाजें वार्षिक खर्च हजार-बाराशें डॉलर्सपर्यंत येतो. यांत मध्यम प्रतीचें जेवण व राहणें येतें. नवीन येणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती देणारें केंद्र जुन्या विद्यार्थ्यांनीं चालविलेलें असतें. सर्व विद्यापीठीय जीवनाची कल्पना यावी म्हणून पहिला आठवडा हा परिचयाचा म्हणून पाळला जातो. विद्यार्थ्यांच्या लहान-मोठ्या किती तरी संस्था असतात. अनेक सभा, अनेक समित्या, अनेक चर्चा यांमुळें युनिव्हर्सिटीचें एक प्रकारच्या नवचैतन्याचें वारें सतत खेळत असतें. रोज सकाळीं मी बसनें घरून विद्यापीठांत येत असें. मुलांचे व मुलींचे थवेच्या थवे नटून थटून कॉलेजांत जावयास निघालेले असतात. तांबड्या भडक पोषाखाची हौस मुलींना भारी. फॅन्सी कापडाचा स्कर्ट, वर तांबडें वा पांढरें जाकिट, केसांची विविध प्रकारची ठेवण, कानांत टपोरे दागिने, हातांत चमकदार छोटें घड्याळ आणि कांखेला पुस्तकांचा जुडगा अशा थाटांत या मुली कॉलेजांत जातात. हंसणें खिदळणें, थट्टामस्करी करणें हा भाग अमेरिकन रक्तांतील आहे. किती तरी मुलें-मुली आपल्या स्वतःच्या मोटारीनेंच येतात. पण विद्यापीठ-क्षेत्रांत आतां मोटारी ठेवावयास जागाच नसल्यामुळें उरलेल्यांना बसनें यावें लागतें. बारानंतर दुपारचें जेवण घेण्यासाठीं कॅफेटीरियाकडे पुनः रीघ सुरू होते. रांगेंत उभें राहणें, आपला ट्रे, पाण्याचा ग्लास, काटे-चमचे, नॅपकिन घेऊन या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जाऊन हवे असतील ते पदार्थ

या संस्थेंत सतराशें-अठराशें लोक आज काम करीत असून संशोधनाच्या विविध क्षेत्रांत संस्थेचें नांव चमकत आहे. दरवर्षी सुमारें दहा हजार उद्योगपति आपापले प्रश्न संस्थेकडे आणून सोपवतात. संस्था त्यासंबंधीं संशोधन करून उपाययोजना सुचविते. खनिजें, अणुशक्ति, दळणवळण, शेतकी, रोगविज्ञान इत्यादि हजारों क्षेत्रांतील संशोधन येथें चालू आहे.

ल्यूथरियन चर्चनें चालविलेली 'कॅपिटॉल युनिव्हर्सिटी' आपल्या विशिष्ट ध्येयासाठीं प्रसिद्ध आहे. येथें सांस्कृतिक, तांत्रिक, शास्त्रीय, धर्मनीतीविषयीं शिक्षण देण्यांत येतें. सुमारें बाराशेंपर्यंत विद्यार्थी या विद्यापीठांत शिक्षण घेत आहेत. अशाच प्रकारची दुसरी एक खासगी युनिव्हर्सिटी धर्मविद्येच्या प्रसारार्थ चालू असलेली म्हणजे 'फ्रँकलिन युनिव्हर्सिटी'. येथेंहि सुमारें चार हजारपर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. केवळ स्त्रियांसाठीं म्हणूनहि एक स्वतंत्र महाविद्यालय कोलंबस येथें 'सेंट मेरी ऑफ् दि स्प्रिंग्ज' म्हणून आहे. परमेश्वराची कृपा व त्याचा जगनिर्मितीचा हेतु समजावून घेण्यासाठींच या कॉलेजची स्थापना झालेली आहे. कॅथॉलिक धर्माची छाप असलेल्या या महाविद्यालयांत चारशेंपर्यंत मुली शिक्षण घेत आहेत. कोलंबस येथील उच्च शिक्षणाचा हा थोडक्यांत आढावा आहे. प्राथमिक व दुय्यम शिक्षणासंबंधीं मी पुढें थोड्या विस्तारानें लिहिणार आहेच.

* * *

# १० : अमेरिकन शाळा– अमेरिकन विद्यार्थी

अमेरिकेंतील शिक्षणसंस्थांचा परिचय व्याख्यानांतून व छापील पुस्तकांतून आम्हांस भरपूर झाला होता. आतां कोलंबसला आल्यानंतर शाळांना भेटी देण्याचा कार्यक्रम हा मुख्य मानला गेला होता. ओव्हायो स्टेट युनिव्हर्सिटीतर्फे डॉ. हेक यांनीं सर्व कार्यक्रमाची आंखणी अगदीं पद्धतशीरपणें केली होती. रोज सकाळीं युनिव्हर्सिटींत अमेरिकन शिक्षणावर एखादें चर्चात्मक व्याख्यान असे. कोलंबस येथील शिक्षण-पद्धतीचा अभ्यास करण्यास ही चांगली संधि होती. दुपारीं निरनिराळ्या शाळांना भेट देण्याचा कार्यक्रम असे. मागें सांगितलें आहेच कीं, कोलंबस हें साधारणतः पुण्याएवढें म्हणजे पांच लक्ष वस्तीपर्यंतचें शहर आहे. गेल्या पांच-सहा वर्षांत या शहराची लोकसंख्या झपाट्यानें वाढली आहे. १९५१ सालीं ३,७५,९०१ असलेली संख्या गेल्या वर्षीं-१९५६ सालीं ४,३०,७५५ पर्यंत वाढली. औद्योगिक केन्द्र म्हणून या शहराभोंवतीं मोठमोठे नवीन कारखाने उभे राहत आहेत. शहराच्या आसपास नवीन वस्ती वाढीस लागल्या आहेत. नवीन घरें, नवीन चर्चेस, नवीन धरणें, नवीन बाजारकेंद्रें, नवीन कारखाने अशी शहरांत रोज नव्यानें मांडणी होत असल्याचें स्पष्ट दिसून येतें. १९५० सालीं कोलंबसला ४६००० मुलें शाळेंत जाणारीं होतीं. आज ही संख्या ६४००० पर्यंत वाढली आहे. या सर्वांची व्यवस्था बोर्ड ऑफ एज्युकेशनला करणें भाग पडतें. गेल्या पांच वर्षांत बोर्डानें २३ नव्या प्राथमिक शाळा व पांच माध्यमिक शाळा उघडल्या. कांहीं नवीन शाळांच्या इमारतीचा थोडक्यांत परिचय असा—

| नांव | संख्या | बांधणीची किंमत |
|---|---|---|
| ( १ ) फेअरमूर स्कूल | ७९२ | ५३४५०६ डॉलर्स |
| ( २ ) इंडियन स्प्रिंग्ज स्कूल | ८२५ | ५४२६९३ डॉलर्स |

| नांव | संख्या | बांधणीची किंमत |
|---|---|---|
| ( ३ ) ओकलंड पार्क स्कूल | ५२८ | ३६९७३५ डॉलर्स |
| ( ४ ) हॅमिल्टन स्कूल | ७९२ | ४८०७१८ डॉलर्स |
| ( ५ ) ईस्ट गेट स्कूल | १९८ | १०८४१५ डॉलर्स |
| ( ६ ) मोहॉक ज्यूनियर हायस्कूल | १३०८ | १,४८९,९५७ डॉलर्स |
| ( ७ ) क्रिंटन ज्यूनिअर हायस्कूल | ९०० | १,१९३,४४६ डॉलर्स |
| ( ८ ) ईस्टमूर हायस्कूल | १५०० | १,५८६,९८८ डॉलर्स |

याखेरीज किती जुन्या इमारतींत दुरुस्ती झाली. किती तरी शाळांच्या इमारतींत वाढ झाली. कित्येक इमारतींत आधुनिक प्रकारची यंत्रसामग्री बसवण्यांत आली. नवीन साधनसामग्री पुरवण्यांत आली. विद्यार्थी वाढले तसे शिक्षकहि वाढले. प्राथमिक शाळांतील शिक्षकांची वाढ ४५ टक्क्यांनीं झाली. माध्यमिक शाळांतील शिक्षक १८ टक्क्यांनीं वाढले. पुनः थोडे आंकडे पाहा—

| **प्राथमिक शाळा** | १९५०–५१ | १९५५–५६ |
|---|---|---|
| स्त्री-शिक्षक | ७४१ | १०३२ |
| पुरुष शिक्षक | २३ | ७३ |
| **माध्यमिक शाळा** | | |
| स्त्री-शिक्षक | ३४९ | ३७२ |
| पुरुष शिक्षक | ३१५ | ४१६ |

याच प्रमाणांत शासनाधिकारी, कचेरींतील सेवक-वर्ग शाळांतील अन्नपूर्णागृहें चालविणारे लोक यांच्याहि संख्येंत वाढ झाली. सर्व शिक्षकांत ५२ टक्के पदवीधर आहेत. ३७ टक्के एम्. ए. व तत्सम पदव्या मिळविलेले व उरलेले पदवी घेण्याच्या मार्गांत असलेले आहेत. एकोणतीस-पूर्णांक सात दशांश टक्क्यांनीं शिक्षकांच्या पगारांतहि वाढ झालेली आहे. वार्षिक वाढ १२५ डॉलर्सची होती ती १५० डॉलर्सपर्यंत वाढविण्यांत आली. या सर्व कार्यास पैशाचें पाठबळहि तसेंच भक्कम हवें. त्याचाहि थोडा अंदाज असा : १९५५ सालचे हे आंकडे आहेत. स्थानिक कर, ११,८९१,६५३·५५ डॉलर्स, स्टेट पब्लिक स्कूल फंड, ३,४६३, ८९२·२१ डॉलर्स; युनायटेड स्टेट्सकडून ४६२,७८८·२१; हाऊसिंग

ॲथॉरिटी २५,७५९·०१; शुल्क २१२,१९३·०६; किरकोळ २३१, ४०४·०१ असे एकूण १६,२५४,६९०·१३ डॉलर्सची जमा आहे. आणि खर्चाच्या बाजूची संख्या १५,६७५,०२५·९९ डॉलर्सची आहे. अमेरिकेंतील शाळा प्रत्येक विद्यार्थ्यामागें किती खर्च करतात? आणखी थोडे आंकडे तुलनेसाठीं पाहा. ओव्हायो स्टेटमधील कांहीं प्रमुख शहरें येथें घेत आहें.

| नांव | १९५०–५१ | १९५४–५५ |
| --- | --- | --- |
| ॲक्रन | २१५ १२ डॉलर्स | २६७·६१ डॉलर्स |
| सिनासिनाटी | २४२·२२ ,, | २७४·४१ ,, |
| क्लीव्हलंड | २५२·२७ ,, | ३०४·०३ ,, |
| कोलंबस | १८२·४६ ,, | २२३·१८ ,, |
| डेटन | २३०·७४ ,, | २७२·७७ ,, |
| टोलीडो | २२०·९७ ,, | २६९·०० ,, |

असे हे सर्व आंकडे आहेत. श्रीमंत राष्ट्राचें शिक्षणखातें मुलांच्यासाठीं पाण्यासारखा पैसा खर्च करीत असतें. वयाच्या सतरा वर्षांपर्यंत सर्वांना शिक्षण सक्तीचें व मोफत पाठ्यपुस्तकेंहि सरकार पुरवणार.

कोलंबस येथील आठ-दहा शाळांना आम्ही भेटी दिल्या. इंडियन स्प्रिंग्ज प्राथमिक शाळा, क्टिंटन ज्यूनिअर हायस्कूल, नॉर्थ हायस्कूल, वर्दिंग्टन हायस्कूल, ईस्ट हायस्कूल, हिलर्ड्स हायस्कूल, मोहॉक हायस्कूल या प्रमुख शाळा ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. सर्व प्रकारच्या शाळांतून मुलें-मुली एकत्रच असतात. हंसणें-खेळणें एकमेकांत मिसळणें लहानपणापासूनचें असल्यामुळें एकंदर वातावरण निरोगी असतें. बहुतेक सर्व विद्यार्थ्यांची प्रकृति उत्तमपैकीं असून कपड्यांची विविधताहि डोळ्यांत भरण्याजोगी असते. वर्ग चांगले मोटे ऐसपैस असून स्वच्छ हवा व प्रकाश यांनीं समृद्ध असतात. वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या जास्तींत जास्त तीसपर्यंत. टॉपकोट, व इतर सामानसुमान ठेवण्यासाठीं प्रत्येकास एक स्वतंत्र छोटेसें कपाट असतें. दर तासास विद्यार्थ्यांचा घोळका या वर्गांतून त्या वर्गांत जात असतो. शिक्षक आपापल्या वर्गांत कायमचेच असतात. वर्गांतील दोन-तीनहि भिंतींवर विस्तीर्ण असे लिहिण्यासाठीं फलक असतात. नाना-

प्रकारचीं चित्रें, आलेख, नकाशे यांनीं भिंती बहुधा भरून गेलेल्या असतात. कित्येक वर्गांत जाऊन प्रत्यक्ष पाठ पाहण्याची व्यवस्था झालेली होती. पहिला फरक लक्षांत येतो तो हा कीं, वर्गांत मुख्याध्यापक, वा पाहुणे आल्यानंतर विद्यार्थी उठून उभे राहणार नाहींत. प्रश्नांचीं उत्तरें बसूनच किंचित् पाठीशीं रेलून, पाय पुढें करून देतात. त्यांची शिस्तीची कल्पनाहि थोडी वेगळी असते. परदेशचा पाहुणा वर्गांत आल्याबरोबर मुलें-मुली हजारों प्रश्न विचारतात. 'परिप्रश्नेन' ज्ञानसाधना हें अमेरिकेंत मान्य झालेलें साधन आहे. नमुन्यासाठीं कांहीं प्रश्न पुढें देत आहें. हिंदुस्थानांतील शाळांच्या वेळा कोणत्या? सुट्या किती? अभ्यासक्रम कोणता आहे? आवडते खेळ कोणते? प्रमुख करमणुकीचे प्रकार कोणते? शाळांच्या इमारती कोणत्या प्रकारच्या? भाषा कोणती? लिहिण्याची पद्धति कोणती? पोशाखाच्या तऱ्हा कोणत्या? स्त्रियांचे पोशाख व अलंकार कोणते? लग्नें कोणत्या वयांत होतात? कोणाच्या पसंतीनें होतात? पाऊस किती पडतो? हत्ती, साप, माकडें यांची माहिती, खिस्तावरून चालणाऱ्या योग्याचा पराक्रम, गांधींची अहिंसा, नेहरूंचें पंचशील तत्त्वज्ञान, एलेफंट बॉय साबू इत्यादि विषयांसंबंधीं अमेरिकन मुलांमुलींना कमालीचें कुतूहल वाटतें. हिंदुस्थानचीं तिकिटें, नाणीं, चित्रें यांचा संग्रह करणें त्यांना मनापासून आवडतें.

शाळांतील विद्यार्थ्यांना आपल्याकडीलप्रमाणेंच बहुविध विषयांचा अभ्यास करावा लागतो. इंग्रजी ही तर त्यांची मातृभाषा, दुसरी स्पॅनिश, जर्मन, फ्रेंच वा ग्रीक, लॅटिन निवडतील. बाकी इतिहास-भूगोलादि विषय, गणित, शास्त्र वगैरे विषयांचा आराखडा आपण त्यांच्यावरूनच आज आंखीत आहोंत. मोटार चालविण्याचा अभ्यास सर्वांना आवश्यक आहे. तांत्रिक शिक्षणाच्या सोयी तर प्रत्येक शहरांत भरपूर प्रमाणांत दिसून येतात. टायपिंग, व्यापार, नर्सिंग, शिवणकाम, गृहजीवनशास्त्र, कचेरींचें काम, ललितकला हेहि विषय शिक्षणक्रमांत असतात. प्रत्येक शाळेला मोठें क्रीडांगण असतें. खेळाचीं सर्व साधनें शाळा पुरविते. बहुतेक शाळांतून शाळेचें वृत्तपत्र शाळेंतील छापखान्यांतून प्रसिद्ध होतें. व्यायामाकडे व विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिलें जातें. बेसबॉल, बास्केट-

बॉल, फूटबॉल, गोल्फ, पोहणें हे विद्यार्थ्यांचे आवडते खेळ. छायाचित्रण, कलाविषयक संघ, रेडिओ क्लब, वादाविवाद–सभा, विद्यार्थ्यांची सभा. शास्त्रमंडळ, घोषविभाग, नार्णी, तिकिटें–संघ, वृंदवाद्य–विभाग, नाट्य-विभाग, रहदारीवरचें नियंत्रण वगैरे अनेक चळवळी शालेय अभ्यासास धरूनच चाललेल्या असतात.

ओव्हायो स्टेटमधील सिनसिनाटी, डेटन व टोलीडो हीं तीन मोठीं शहरें. येथेंहि आम्ही चार-पांच दिवसांसाठीं एकत्र जमलों होतों. सिनसिनाटी हें उद्योगधंद्याविषयीं व व्यापाराविषयीं प्रसिद्ध असणारें शहर ओव्हायो नदीवर वसलें असून कोलंबसपासून एकशें चौदा मैलांवर आहे. पांच-सहा टेकड्यांवर वसलेलें शहर सृष्टिसौंदर्यानें नटलेलें असें आहे. ७ ऑक्टोबर १९५६ रोजीं रात्रीं आम्ही सर्वजण या शहरांत पोंचलों. दहा-बारा देशांतील लोक बरोबर असल्यामुळें प्रवास बसचा असूनहि कंटाळवाणा झाला नाहीं. वॉलनट हिल्स हायस्कूल, पोर्टर ज्यूनिअर हायस्कूल, दि हेज एलिमेंटरी स्कूल इत्यादि शाळांना पुढील चार दिवसांत भेटी दिल्या. सिनसिनाटी बोर्ड ऑफ् एज्युकेशनच्या ऑफिसमध्येंहि एक लहानशी सभा होऊन सर्वांचा परिचयसमारंभ झाला. शहराची सिटी कौन्सिलची सभा कशी काय चालते हेंहि पाहण्यास मिळालें. बालगुन्हेगारांच्या कोर्टांतील बैठक मोठी महत्त्वाची व मनोरंजक झाली. अमेरिकेंतील बदलत्या सामाजिक जीवनांत हा प्रश्न फार महत्त्वाचा गणला गेला आहे. डब्ल्यू. एल्. डब्ल्यू. नांवाच्या टेलिव्हिजन सेंटरवरचे तीन–चार तास फारच मजेंत गेले. क्रोगर बेकिंग कंपनींत मुलांसाठी खाण्याच्या वस्तु किती प्रचंड प्रमाणांत तयार करतात हें दिसून आलें. अमेरिकेंतील व्यापारी व कारखानदार यांना शिक्षणाचें महत्त्व फारच कळतें. प्रत्येक व्यापारी संघाची एक समिति आपल्या शहराचा शैक्षणिक विचार करण्यासाठीं सतत काम करीत असते. या व्यापारी संघानें दिलेली थाटाची मेजवानी कायमची ध्यानांत राहण्याजोगीच होती. मोठमोठ्या दुकानांना भेटी देण्याचा कार्यक्रम आमच्यापैकी स्त्रियांना फारच मोलाचा नेहमींच वाटत असे. याच शहरांतील सर्वांना आवडणारा म्हणजे ‘ सेव्हन वंडर्स ऑफ दि वर्ल्ड ’ जगांतील सात आश्चर्यें हा सिनेमा. अमेरिकेंत टेलिव्हिजन सुरू झाल्यापसून सिनेमाच्या

नांव एड्गर हाऊस. त्यांनीं सर्वांचें स्वागत करून शाळेची प्राथमिक माहिती सांगितली. सर्व शाळेंत मिळून १७०० विद्यार्थी व ६७ शिक्षक आहेत. आम्हांपैकीं प्रत्येकाचा एकेक टीचर होस्ट नेमून दिलेला होता. एका वर्गांतून दुसऱ्या वर्गांत नेण्याचें काम विद्यार्थ्यांच्याकडे सोंपविलें होतें. स्यू ( Sue ) नांवाची एक चुणचुणीत मुलगी माझी मार्गदर्शिका होती. मिसेस् डी वीज नांवाच्या एका शिक्षिकेच्या वर्गांत गेलों. लॅटिन भाषेचा तास चालला होता. हा दहावीचा वर्ग. मुलांमुलींनीं अनेक प्रश्न विचारले. त्यानंतर ऑग्सवर्गर यांच्या इतिहासाच्या तासास बसलों. त्यांची मुलगी हिंदुस्थानांत अलाहाबादला शिक्षणासाठीं आहे असें समजलें. त्यानंतर जीवशास्त्र व रसायनशास्त्र या विषयांचे तास पाहिले. मिसेस् गिलन यांचा संभाषणाचा तास मोठा मनोरंजक वाटला. सार्वजनिक सभेचें शिक्षण अशा तासास विद्यार्थ्यांना सहजासहजीं मिळतें. ”

कोलंबस : १ ऑक्टोबर १९५६. ईस्ट हायस्कूलला भेट.

“ सकाळीं आठ वाजतां मेथॉडिस्ट चर्चपाशीं आमच्यासाठीं खाजगी मोटारी तयार होत्या. ईस्ट हायस्कूलमध्यें ऐशीं टक्के मुलें निग्रो जातीचीं, मागसलेलीं अशीं होतीं. सर्व शाळेंत एकूण बाराशें विद्यार्थी आहेत. बुद्धीच्या बाबतींत हीं मुलें कोणत्याहि प्रकारें मागें नाहींत. मिस् रॉय यांच्या ग्रंथालयांत वेळ चांगला गेला. बाईंनीं सर्व ग्रंथालय मनापासून दाखविलें. रेड इंडियन्सवर चांगलीं पुस्तकें येथें पाहावयास मिळालीं. ‘ अमेरिका बिफोर कोलंबस ’, हें पुस्तक मोठें उद्बोधक व रंजक वाटलें. या देशच्या या आदिवासी लोकांत राहण्याची इच्छा प्रथमपासूनची आहे. शेवटची चर्चात्मक सभा झाल्यावर शूमेकर यांच्या गाडींतून घरीं आलों. वाटेंत त्यांनीं आपल्या नव्या गाडीच्या अनेक गोष्टी समजावून सांगितल्या.–”

# ११ : तीन उल्लेखनीय शाळा

अमेरिकेंतील संस्कृति ही विज्ञानावर उभारलेली आहे. लोकांना धर्माची व देवाची आस्था फार असली तरी त्यांचेंहि त्यांनीं विज्ञान बनविलें आहे. मोठमोठे कारखाने, उद्योगधंदे प्रत्येक शहराच्या आसपास असावयाचेच. प्रत्येक शहरांत चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना झालेली असते. या संस्थेचीं माणसें बहुधा उद्योगपति वा कारखानदार, व्यापारी असतात. पण पुष्कळ ठिकाणीं कॉलेजचे प्रिन्सिपल, हायस्कूलचे प्रधानाध्यापकहि या संघाचे सभासद असलेले दिसून येतात. या श्रीमंत व्यापारीवर्गाला शिक्षणाची महती चांगलीच समजलेली असते. आपले उद्योगधंदे, कारखाने नीट चालावयाचे असतील, त्यांची प्रगति व्हावयाची असेल, तर हातीं येणारीं तरुण मुलें-मुली यांचें शिक्षण पद्धतशीर व्हावयास पाहिजे हें त्यांनीं जाणलेलें असतें. म्हणून ते आपल्या कारखान्याइतपतच शाळांकडे लक्ष देतात. त्यांची एक शिक्षणसमिति असते. तिच्याद्वारें गांवच्या शिक्षणाला ते आर्थिक मदत करतातच; आणि त्याखेरीज सर्व प्रकारचें सहकार्यहि हे उद्योगपति देत असतात. त्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून कांहीं प्रमुख शाळांचा उल्लेख मी येथें करीत आहें.

डेटन येथील ‘ जॉन एच्. पॅटरसन को-ऑपरेटिव्ह हायस्कूल ’ हें एक अमेरिकेंतील नाणावलेलें हायस्कूल आहे. दहावी, अकरावी व बारावी अशा शेवटच्या तीन इयत्ता येथें असून विद्यार्थी जेथें इतर शाळांप्रमाणें इंग्रजी, गणित, इतिहास, भूगोल, शास्त्र इत्यादि विषयांचें शिक्षण घेतातच, आणि त्याचबरोबर विविध प्रकारच्या नऊ धंद्यांचें शिक्षण त्यांना मिळतें. पहिल्या वर्षीं दोन्हीहि प्रकारचें शिक्षण शाळेंतच मिळतें. शेवटच्या दोन्हीहि वर्षें शिक्षण शाळेंत व इतर कारखान्यांतून मिळतें. डेटन गांवांतील अनेक कारखानदार, उद्योगपति यांनीं या कामीं सहकार्य केलेलें आहे. धंद्याचें

शिक्षण शाळेंत घेणें व छोट्या प्रमाणावर प्रयोग करीत राहणें यापेक्षां कांहीं वेळ प्रत्यक्ष कारखान्यांतच जाऊन शिक्षण घेणें ही कल्पना अधिक महत्त्वाची समजली पाहिजे. प्रकृति, बुद्धि, कामाची हौस वगैरे गोष्टी पाहूनच विद्यार्थ्यांची निवड केली जाते. शाळेचे मुख्याध्यापक व कारखानदार यांच्या सहकार्यांतून हीं निवड होते. या प्रकारच्या शाळेंत नुसतें बौद्धिक शिक्षण न राहतां श्रमाचें महत्त्व प्रस्थापित होऊन निरनिराळ्या धंद्यांतील कौशल्यहि विद्यार्थ्यांस प्राप्त होतें.

पहिला महत्त्वाचा विषय 'ऑटोमोटिव्ह' नांवाचा असून त्यांत निरनिराळ्या इंजीन्सची माहिती येते. निरनिराळीं यंत्रें व त्यांचे अंतर्गत विभाग यांचें पूर्ण ज्ञान विद्यार्थ्याला होत असतें. दुसरा विषय व्यापार हा असून त्यांत टायपिंग, बुक-कीपिंग, हिशेब, दफ्तरशास्त्र, यांत्रिक कार्यपद्धति इत्यादि विषय येतात. तिसरा विभाग विक्रयकलेचा असून त्यांत मुलांना किरकोळ व घाऊक विक्रीच्या शास्त्राचें व कलेचें शिक्षण देण्यांत येतें. रंग, डिझाइन्स, आगतस्वागत, गिऱ्हाइकाशीं बोलणें, माल खरेदी करणें, मालाची आकर्षक मांडणी करणें, नव्या मालाचें प्रदर्शन करणें इत्यादि अनेक विषय येतात. चौथा भाग ड्राफ्टिंगचा होय. व्यापारविषयक शास्त्राचेंच हें एक अंग मानतात. व्यापारविषयक शास्त्र, कला, यंत्रादि विषय, मांडणीचें शास्त्र, गणित इत्यादि पोटविषय या विभागांत महत्त्वाचे मानले जातात. पांचवा विभाग इलेक्ट्रिकल नांवाचा असून त्यांत विद्युच्छक्तीचे प्राथमिक गुणधर्म, लोहचुंबकीय विद्युत् हे मुख्यतः विषय विद्यार्थ्यांना अभ्यासावे लागतात. सहावा विभाग हॉस्पिटल सर्व्हिसचा. गांवांतील प्रसिद्ध हॉस्पिटलमध्यें जाऊन विद्यार्थी प्रत्यक्ष शिक्षणाचा पाठ घेतात. रोग्यांची शुश्रूषा, त्यांचें पथ्यपाणी, स्वच्छता, त्यांचें मनोरंजन इत्यादींची माहिती या शाखेंत दिली जाते व त्याप्रमाणें काम करण्याची संधि विद्यार्थ्यांना मिळते. सातव्या विभागांत लहान लहान उपकरणीं वा हत्यारें तयार करण्याची विद्या येत असून तींत डिझाइन, साचेबांधणी, ड्रॉइंग व तत्संबंधींचें गणित व शास्त्रादि विषय येतात. आठव्या विभागांत मुद्रण-कलेची सर्व माहिती देऊन प्रत्यक्ष छापखाना चालविण्यास संधि दिली जाते. खिळ्यांची जुळणी, छपाई, मुद्रितवाचन, बांधणी वगैरे संबंधित असे

सर्व विभाग येतात. शेवटच्या नवव्या विभागांत इमारत-बांधणीचे अनेक पोटविषय येऊन विद्यार्थ्यांना त्याहि विषयांचा तपशील पुरविला जातो.

शाळेंत प्रवेश देतांना प्रत्येक विद्यार्थ्यांची चांचणी परीक्षा घेऊन त्यांस उत्तम प्रकारचें व्यवसाय-मार्गदर्शन दिलें जातें. पॅटरस हायस्कूलची इमारत चांगली मोठी असून व्यायामशाळा, सभागृह, अन्नपूर्णागृह आणि ४० च्या वर वर्ग यांनी समृद्ध आहे. या नवीन इमारतीचें क्षेत्रफळ १३५,००० चौरस फूट असून किंमत सुमारें २०००,००० डॉलर्सपर्यंत आहे. शिवाय इमारतीस जोडून अनेक प्रयोगशाळा आहेतच. एकूण विद्यार्थी ५४० असून गांवांत वीस कारखान्यांनीं शाळेस आपलें सहकार्य दिलें आहे. अर्धा दिवस शाळा व अर्धा दिवस काम असें एकूण अभ्यास-क्रमाचें स्थूल मानानें स्वरूप असतें. प्रौढ शिक्षणाचा एक वर्ग शाळेंत चालतो. निरनिराळे खेळ, संगीतादि कला, सांस्कृतिक हेहि विविध कार्यक्रम असतात. तांत्रिक व औद्योगिक विषयावरील सुमारें ४००० पुस्तकांचें एक समृद्ध ग्रंथालय शाळेस लाभलें आहे. उद्योगधंदे, व्यापार व शिक्षण यांच्या मदतीनें समाजाचें जास्तींत जास्त कल्याण साधणें हें ह्या हायस्कूलचें ध्येय मानलें जातें.

‘ मॅकॉंबर व्होकेशनल हायस्कूल ’, टोलिडो ही दुसरी शाळा कायमची लक्षांत राहण्यासारखी आहे. औद्योगिक शिक्षण देणारें अमेरिकेंतील एक प्रसिद्ध विद्यालय म्हणून या संस्थेचा मोठा लौकिक आहे. आपल्या आवडीचा उद्योग निवडण्यासाठीं, त्याचें शिक्षण मिळविण्यासाठीं व त्यापासून चरितार्थ चालविण्याची सोय व्हावी म्हणून सर्व प्रकारचें लक्ष ह्या शाळेंतील विद्यार्थ्यांकडे दिलें जातें. विद्यार्थ्यांना हाताळण्यासाठीं, कामें करण्यासाठीं सर्व प्रकारची यंत्रसामग्री येथें पुरविली जाते. मोटार चालविण्याचें व इंजिन—दुरुस्तीचें शिक्षण म्हटलें म्हणजे मोडतोड करून परत जुळणी करण्यासाठीं दिलेल्या पांच-सहा वेगवेगळ्या प्रकारच्या मोटारी येथें दृष्टीस पडतातच. चांगला उद्योग वा धंदा आपणांस मिळाला असें आपण केव्हां मानावें ? त्यासाठीं पुढील दहा गमकें या शाळेनें आपल्या विद्यार्थ्यांसमोर ठेवलीं आहेत :

१. ज्यांत मला मनापासून लक्ष घालावेंसें वाटेल व जेथें माझें मन उत्कृष्टपणें रमेल तो उद्योग चांगला.

२. जेथें जास्तींत जास्त श्रम करण्याची हौस वाटेल, त्यागाची आवड निर्माण होईल; मनांत धडाडी उभी राहील, आणि जेथें हमखास यश निर्माण होईल तो उद्योग उत्तम.

३. या धंद्याच्या निमित्तानें लोकांची सेवा करण्याची संधि यावी.

४. मनाचें समाधान हें सर्वांत मोठें पारितोषिक वाटावें.

५. माझें नैतिक आचरण व शरीरप्रकृति यांना धक्का लागूं नये.

६. कोणत्याहि घातांत वा अपघातांत जीवित येऊं नये.

७. नोकरीची व धंद्याची सर्वकाळ शाश्वती वाटावी.

८. अर्थप्राप्तीहि चांगल्या प्रकारें व्हावी.

९. स्वतःच्या वैयक्तिक प्रगतीस भरपूर वाव असावा.

१०. स्वतःकडे व समाजाकडे पाहण्याची दृष्टि अधिक उदार व विशाल व्हावी.

या दहा गमकांनीं कोणत्याहि उद्योगाचें व धंद्याचें बरेंवाईटपण अजमावलें जातें. 'मॅकॉबर हायस्कूल'मध्यें विद्यार्थ्यांना या प्रकारचें शिक्षण व त्यावरील श्रद्धा यांचा लाभ होतोच होतो. येथील विद्यार्थी विमानाची बांधणी करतील, आगबोट तयार करतील आणि रेल्वेचें इंजीन नव्यानें करण्याचा प्रयोग आरंभतील. तेंच त्यांचें मुख्य शिक्षण. विमानाचीं इंजिन्स हाताळण्याची यांना पूर्ण परवानगी असते. रेडिओचे व टेलिव्हिजनचे अनेक नमुने वर्गांत असतात. त्यांच्या कार्यपद्धतीचें प्रत्यक्ष शिक्षण विद्यार्थी सहजासहजीं घेऊं शकतात. यांत्रिक जीवनास आवश्यक तें गणित व शास्त्र यांचा अभ्यास महत्त्वाचा मानला जातो. ड्रॉइंगलाहि फार महत्त्व अर्थातच दिलें जातें. घरें कशीं बांधावींत व मोटारीचें इंजीन दुरुस्त कसें करावें याचें प्रात्यक्षिकाच्या द्वारा शिक्षण मिळतें. अटॉमोटिव्ह ट्रेड्स, बिल्डिंग ट्रेड्स, इलेक्ट्रिकल ट्रेड्स, बिझिनेस एज्युकेशन यांचा एक विभाग मानला जातो. असे प्रत्येक इयत्तेंत वेगवेगळे विषय शिकवले जातात. शास्त्र, गणित ड्रॉइंग, इंग्लिश, औद्योगिक अर्थशास्त्र, शारीरिक शिक्षण, अमेरिकेचा इतिहास, भूगोल इत्यादि विषयहि असतात. खालच्या वर्गांत २५ टक्के

वेळ प्रत्यक्ष काम करण्यास व उरलेला वेळ अभ्यासास मिळतो. वरच्या इयत्तांतून निम्मा वेळ वर्गांत अभ्यास व उरलेला निम्मा वेळ प्रयोगशाळेंत कामास दिला जातो. शिक्षणाची कल्पना व त्याचें मूळ स्वरूपच येथें एकदम बदललेलें दिसून येतें. जीवनास लागलीच उपयोगी पडणारें हें शिक्षण फार महत्त्वाचें मानलें जातें. सांस्कृतिक विकासासहि अर्थातच महत्त्व दिलें जातेंच. याहि हायस्कूलमध्यें पॅटरसन हायस्कूलप्रमाणें सहकारी तत्त्वावर काम चालतें. विद्यार्थी शाळेंत काम करतां करतां कारखान्यांत दुकानांत, फॅक्टरींत काम करीत असतात. जो उद्योग आपण निवडला आहे तो प्रत्यक्ष करून पाहण्याची संधि त्यामुळें विद्यार्थ्यांना मिळते. सर्व प्रकारचे खेळ, करमणुकी, सांघिक कार्यक्रम, विद्यार्थिसभा या सर्व आनुषंगिक गोष्टींनाहि फार महत्त्व दिलें जात असल्यानें जीवनाच्या सर्व अंगांचा परिचय विद्यार्थ्यांना होतो. शारीरिक, बौद्धिक व मानसिक वाढीकडे पूर्ण लक्ष देण्यांत आल्यामुळें विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यास या शाळेंतच चांगल्या वळणास प्रारंभ होतो.

'व्हिटनेव्होकेशनल हायस्कूल', टोलिडो हें मुलींचें औद्योगिक विद्यालय अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें वाटलें. अमेरिकन शाळांतून बहुतेक ठिकाणीं मुलें आणि मुली एकत्रच शिक्षण घेत असतात. पण या विशिष्ट हायस्कूलमध्यें केवळ मुलींनाच धंद्याचें शिक्षण प्रयोगासहित दिलें जातें. याहि शाळेंत मुली शिक्षण घेतात व त्याचें प्रात्याक्षिक शिक्षण निरनिराळ्या दुकानांत, कारखान्यांत त्यांना मिळतें. या शाळेच्या माहितीपत्रकावर एक मोठें गमतीचें चित्र असून त्यांतील मुलीचा एक पाय शाळेंत व एक पाय दुकानांत असल्याचें दाखविलें आहे. शालेय कार्यक्रम चालू असतांना व संपूर्ण झाल्यानंतरहि मुलींना काम करावें लागतें. कचेरींतील टायपिंग, कारकुनी, हिशेब ठेवणें इत्यादि कामें येथें महत्त्वाचीं मानलीं जातात. शिवणें व भरणें हींहि मुलींचींच कामें म्हणून येथें मान्यता पावलेलीं दिसतात. किती तरी मुली पायमशीनवर बसून शिवणाचे नवे नवे धडे घेत असतांना एका वर्गांत दिसल्या. अमेरिकेंत रोज बदलणाऱ्या फॅशनकडेहि त्यांना लक्ष द्यावें लागतेंच. अन्न तयार करणें, त्याचें रक्षण करणें हाहि एक स्वतंत्र विषय असतो. कॉस्मेटॉलॉजी—केशरचनाशास्त्र म्हणून एक

अगदीं नवाच विषय येथें प्रथमच पाहावयास मिळाला. अनेक विद्यार्थिनी खुर्चीत बसलेल्या व दुसऱ्या त्यांचे केस अनेक साधनांनीं नीटनीटके बसविण्याचा प्रयत्न करीत असतांना दिसल्या. केसांच्या विशिष्ट प्रकारच्या ठेवणीस त्या बायका फारच महत्त्व देतात. अमेरिकेंतील म्हाताऱ्या स्त्रियाहि आपल्या केशरचनेबद्दल दक्ष असतात. आम्ही या वर्गात होतों त्या वेळीं गांवांतील किती तरी वयस्कर बायका आपले केस नीट विंचरून घेण्यासाठीं येऊन बसल्या होत्या. अमेरिकेंतील 'ब्यूटी शॉप्स'चा धंदा बहुधा स्त्रियाच चालवत असतांना दिसतात व तें शिक्षण कित्येकांना शाळेंतच मिळतें. 'व्हिटने स्कूल' मध्यें याशिवाय इंग्रजी, इतिहास, भूगोल, कला, शास्त्र, गणित इत्यादि विषय शिकविले जातातच. आमच्यापैकीं सर्वांना टोलिडोची हीहि शाळा फार पसंत पडली.

खरा हिंदुस्थान पाहावयाचा असेल, तर तुम्हांस खेड्यांत जावें लागेल. कारण आजहि शेंकडा ऐशीं लोक खेड्यांत राहून शेतकी करतात. पूर्व-परंपरेनें चालत आलेल्या साधनांनीं भावांशीं भांडून भांडून मिळविलेल्या जमिनीच्या तुकड्यावर एक-दोन बैलांच्या साह्यानें पावसानें कृपा केली तर, आपला शेतकरी धान्य तयार करीत असतो. मोटमोठ्या शहरांत आढळून येणारें वातावरण खेड्यांत केवळ ऐकूनच माहीत असतें. मुंबईच्या गिरणींत काम करणारीं माणसें जत्रेच्या निमित्तानें आपल्या खेडयांत आलीं म्हणजे तोच काय तो खेडयाचा व शहराचा दुवा. एरव्हीं दोन अगदीं स्वतंत्र विश्वें. मनाच्या या पार्श्वभूमीवर मी अमेरिकन खेडयांत जावयास निघालों होतों. तीन-चार दिवस मी एका अमेरिकन शेतकऱ्याच्या घरीं पाहुणा म्हणून राहणार होतों. ऐकून आणि वाचून मी बरीच माहिती मिळविली होती. गेल्या तीन–चार शतकांत युरोपमधून नाना निमित्तांनी लोक अमेरिकेंत गेले आणि प्रारंभीं तरी सर्वांची उपजीविका शेतीवरच होती. पण पुढें झपाट्यानें शहरांचा उदय झाला. माणसाचें कर्तृत्व व निसर्गाची साथ यांच्या संगनमतानें उद्योगधंद्यांचे पर्वत उभे राहिले. न्यूयॉर्क, शिकॅगो, लॉसएन्जल्स, सान्फ्रॉन्सिस्को, यांसारखीं शहरें गजबजून गेलीं आणि आज शेंकडा ऐशीं–नव्वद टक्के लोक शहरांत राहतात व उरलेले शेती करतात. शें. १३·५ टक्के लोक अमेरिकेंत शेतीवर मेहनत करतात व अमेरिकेंतच नव्हे तर जगांतील कित्येक देशांस अन्नधान्य पुरवतात. शेतीवरची यांत्रिक साधनांची वाढ झपाट्यानें झाल्यामुळें हें सर्व शक्य झालें. माझ्याजवळ असणारी ही सर्व माहिती वाचून–ऐकून तयार झाली होती, आणि मी आतां अमेरिकन शेतकऱ्याच्या घरींच राहावयास निघालों होतों.

१९५६ मधील ऑक्टोबरची १३ तारीख होती. ओव्हायो स्टेटमधील कोलंबस या मोठ्या शहरांतून आम्ही मोटारीनें उत्तरेस असलेल्या शेल्बी नांवाच्या लहानशा गांवीं जाणार होतों. बर्मा, जर्मनी, मलाया, इटाली, बेल्जम, ऑस्ट्रेलिया, मेक्सिको, ईजिप्त इत्यादि राष्ट्रांतील लोकांचा आमचा एक गट तीन महिन्यांसाठीं कोलंबसला विद्यापीठांत निरीक्षणासाठीं नियुक्त झालेला होता. शेल्बीच्या शेतकरी लोकांनीं आम्हांस नेण्यासाठीं आपल्या मोटारी कोलंबस येथें पाठविल्या होत्या. प्रत्येक मोटारींतून चार–पांच, चार–पांच असे लोक शेल्बीस जाण्यास निघाले. मोठमोठ्या शहरांच्या व प्रचंड कारखान्यांच्या भेटीचा सर्वांनाच वीट आला होता. साहजिकच प्रत्येकाचें मन शेतीवरच्या वास्तव्यानें उल्हसित झालें होतें. दोन-अडीच तासांत आम्ही शेल्बीस जाऊन पोंचलों. शेल्बी लहानसें गांव. सर्व शेतकऱ्यांची एक संघटना ग्रँज ( Grange,) म्हणून होती तिच्याच एका मोठ्या इमारतींत आम्हीं प्रथम जाऊन पोंचलों. आम्ही पाहुणे संख्येनें जितके होतों तितकींच शेतकऱ्यांचीं जोडपीं त्या ठिकाणीं हजर होतीं. त्यांनी केलेल्या पोशाखावरून त्यांच्या धंद्यांची कल्पना येण्यासारखी नव्हती. अमेरिकन लोकांना असणारी रंगाची आवड येथेंहि पूर्णत्वानें प्रकट झाली होती. शेल्बी येथें प्रसिद्ध होत असलेल्या एका वृत्तपत्राचे अंक आम्हांस प्रथम वांटण्यांत आले. त्यांत आम्हा सर्वांचा एकत्र असा एक फोटो छापला होता. आणि आमच्या भेटीचें स्वागत करून प्रत्येकजण कोणाच्या घरीं दोन–तीन दिवसांसाठीं राहणार याची यादीच प्रसिद्ध झाली होती, म्हणजे उभयपक्षीं उभयतांना एकमेकांचीं नांवें माहीत होतीं. आम्ही पाहुणे आमच्या यजमानाची अटकळ बांधीत होतों. आणि शेतकरी लोक आपल्या पाहुण्यांकडे पाहून कांहीं अंदाज बांधीत होते. ज्यांचे पाहुणे ब्रह्मदेश, मलाया या देशांतील होते त्यांना ओळख पटण्यास वेळ लागणार नव्हता. ओळखीचा कार्यक्रम शेवटीं ठरविला असल्यामुळें सर्वत्र एक प्रकारच्या कुतूहलाचें व रहस्याचें वातावरण होतें. याच ठिकाणीं एक छोटेसें जेवण मांडलें होतें. एका बाजूस आम्ही वीस–बावीस पाहुणे व टेबलाच्या दुसऱ्या बाजूस शेल्बीचे शेतकरी अशी व्यवस्था जेवणाच्या वेळीं होती. जेवणाच्या शेवटीं प्रत्येकानें आपआपली ओळख करून दिली. वृत्तपत्रावरून माझें नांव

मि. लिस्टर लँट्झ यांना माहीत झालें होतें व मलाहि कोणाच्या घरीं राहावयाचें हें ठाऊक होतें. आतां फक्त माणसामाणसांची भेट व्हावयाची होती. लँट्झ कुटुंबाशीं माझा परिचय झाला. पन्नाशीच्या पुढें असणाऱ्या लिस्टरनें आपल्या बायकोशीं ओळख करून दिली. आणि थोड्याच वेळांत त्यांच्या मोटारनें आम्हीं घरीं जाण्यास निघालों. त्याचें घर शेल्बीपासून बारा–तेरा मैलांवर होतें. प्रत्यक्ष शेती करणारे असेच गांवाबाहेर आपल्या विस्तीर्ण शेतीवर घर बांधून राहतात. मि. लँट्झ यांच्या छोट्या गांवाचें नांव मेन्स्फील्ड. अर्ध्या–पाऊण मैलांच्या अंतरावर तीन–चार शेतकरी आपलीं घरें बांधून भोंवतींची शेती करीत असत. आजचें अमेरिकन खेडें म्हणजे याच प्रकारचें

मि. लँट्झचें घर म्हणजे एक मोठा बंगलाच होता. मागेंपुढें असणाऱ्या ऐसपैस जागेंत शेतीचीं यांत्रिक अवजारें पसरलीं होतीं. गोठ्यांत वीस-पंचवीस गाई होत्या. पलीकडच्या कुरणांत पांढरीं डुकरें चरत होतीं. घरामागें मोठी अशी सफरचंदांची बाग फळांना आली होती. संध्याकाळची वेळ झाल्यामुळें मला बाहेर फारसें थांबतां आलें नाहीं. मिसेस् लँट्झनीं मला सर्व घर दाखविलें. माझ्या खोलींतील सोयी–गैरसोयी समजावून दिल्या. माझ्या मुलींची चौकशी करून आपल्या मुलांची हकीगत सांगितली; आणि बैठकीच्या खोलींत टेलिव्हिजन पाहतां पाहतां आमच्या गप्पांना प्रारंभ झाला. हिंदुस्थानांतील शेतकरी, पिकें, फुलें, फळें येथपासून तों पंडित नेहरूंपर्यंत सर्व विषय होते. मधून मधून मी खोलींतील कपाटांत असणाऱ्या पुस्तकांवर नजर टाकीत होतों. ‘ अमेरिकन शेतकरी काय काय वाचतो ? ’ अशी माझ्या मनांतील जिज्ञासा ओळखून मिसेस् लँट्झनें नवीन आलेलीं कांहीं पुस्तकें माझ्यासमोर टाकलीं. शेतीच्या विषयावर त्यांत एखादेंच होतें. बहुतेक सर्व धार्मिक विषयावरचीं होतीं. पुढारलेल्या यांत्रिक जीवनांत माणसानें आपल्या श्रद्धेची जोपासना कशी करावी याची दिशा दाखविणारें एक पुस्तक होतें. ‘ My Spiritual Aiary ’ ( माझें आध्यात्मिक जीवन ) नांवाच्या एका पुस्तकानें माझें लक्ष वेधून घेतलें. ‘ A Man Called Peter ’ ( पीटर मार्शलची जन्मकथा ) नांवाच्या एका पुस्तकाची कथा मिसेस् लँट्झनें मला विस्तारानें सांगितली. पीटर

मार्शल हा वॉशिंग्टन येथील फार मोठा धर्मगुरु. आयसेन होअरच्या कारकीर्दींत सिनेटच्या बैठकी याच्या प्रार्थनांनीं सुरू होत. कांहीं वर्षांपूर्वी तो दिवंगत झाला. त्याची बायको कॅथेरीन मार्शल हिनें आपल्या श्रेष्ठ पतीचें हें चरित्र लिहिलें. याच नांवाचा एक चित्रपटहि अमेरिकेंत फार लोकप्रिय झाला असल्याचें तिनें मला सांगितलें.

खोलींतल्या टेबलावर अनेक मासिकें पडलीं होतीं. दि ओव्हायो फार्मर, होर्ड्स डेअरीमॅन, अमेरिकन फ्रूट ग्रोअर, दि ॲग्रिकल्चरल स्टूडंट, सक्सेस्फुल फार्मर, पॉप्युलर मेकॅनिक्स, नेशन्स बिझिनेस, नॅशनल जिऑग्रॅफिक मॅगेझिन् अशीं त्यांचीं नांवें उदाहरणासाठीं सांगतां येतील. शिवाय बारकीं-सारकीं वार्तापत्रें किती तरी होतीं. दोघेहि चांगले शिकलेले होते. हायस्कूलपर्यंतचें शिक्षण सक्तीचें असल्यामुळें अमेरिकेंत बहुतेकांना चांगलें लिहितां–वाचतां येतें. सर्व जगाचें राजकारण व अर्थकारण ढोबळ मानानें शेतकऱ्यांस समजतें. मि. लँट्झचें घराणें चांगलें पुढारलेलेंच म्हणावें लागेल. थोरला मुलगा ग्रॅज्युएट होऊन हवाईदलांत दाखल होणार होता. दरम्यानच्या काळांत ट्रक–ड्रायव्हरचें काम करीत असे. अमेरिकेंत कोणतेंच काम खालच्या दर्जाचें मानीत नाहींत. त्याची थोरली बहीण ॲन् डेटन येथें हॉस्पिटलमध्यें नर्स होती. तिच्याच खोलींत मी दोन–तीन दिवस राहत होतों. तिचेंहि स्वतंत्र असें छोटेसें ग्रंथालय होतें. मानसशास्त्र, शरीरशास्त्र या विषयांवरील पुस्तकांबरोबरच पर्ल बक, हेमिंग्वे यांच्या कादंबऱ्याहि तेथें होत्या. डेटन हें राईट बंधूंचें मूळ गांव. येथेंहि मी त्यानंतर पंधरा दिवसांनीं गेलों होतों. ॲनची मीं मुद्दाम भेट घेतली. तिनें मला सांगितलें, "तुमची सर्व हकीगत मला आईनें विस्तारानें पत्रांतून लिहिली." हिंदुस्थानांतील माणसाविषयीं अमेरिकेंतील सर्वसाधारण माणसास कमालीचें कुतूहल असतें. आपल्या मोटारींत घेऊन तिनें मला सबंध डेटन शहर दाखविलें. हिंदुस्थानची राहणी, धर्म, संस्कृति, भाषा, पाकिस्तानचे संबंध, शेती, साक्षरता, कुटुंबव्यवस्था, जातीयता इत्यादि अनेक प्रश्नांवर अमेरिकन लोक चर्चा करण्यास उत्सुक असतात.

दुसऱ्या दिवशीं मि. लँट्झ यांच्याबरोबर मी सर्व शेतवाडी हिंडून आलों. हा एकटा मनुष्य सुमारें तीनशें एकरांची जमीन करीत असे.

बायको मदतीला असे. हंगामाच्या वेळेस एखादा गडी मदत करी. सकाळीं उठल्याबरोबर न्याहरीनंतर लँट्झनें कामाचा पोशाख घातला. आतां ते खरोखरी अमेरिकन शेतकरी दिसूं लागले. त्यांनीं शेतीचीं सर्व अवजारें मला दाखविलीं. ट्रॅक्टरला निरनिराळीं अवजारें जोडून नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी हीं शेतीचीं सर्व कामें यांत्रिक पद्धतीनें केलीं जातात. मका, गहू व बटाटे हीं मुख्य पिकें. रविवारचा दिवस असल्यामुळें शेतीवर फारसें काम नव्हतें, तरी त्यांनीं मला सफरचंदांच्या बागेंत हिंडवून आणलें. पुढें चर्चमध्यें जाण्याची गडबड सुरू झाली. पुनः पोषाखांत बदल झाला. अमेरिकन शेतकऱ्यास धर्माबद्दल फार आस्था आहे. संध्याकाळच्या वेळीं गाईच्या धारा यंत्रानें काढतात. गोठा साफ करणें आणि पेंढ्या कापून त्या जनावरांना चारा घालणें हींहि कामें यंत्रानेंच होतात. मि. लँट्झ यांच्या गोठ्यांत धारा काढण्याचें काम चालू असतांना मला थोडें संगीत ऐकूं आलें. मीं निरखून पाहिलें तों गोठ्याच्या एका कोपऱ्यांत रेडिओचें जुनें मॉडेल दिसलें. त्यांतून संगीताचें सूर बाहेर पडत होते. मी चमकून विचारलें, “ का हो ? हा रेडिओ येथें कशासाठीं ? ” त्यावर लँट्झनीं हंसून उत्तर दिलें, “ येथें अमेरिकेंत धारा काढतांना आम्ही हा असा रेडिओ सुरू करतों. ” मला विस्मय वाटला. मीं पुनः विचारलें, “ यासाठीं कांहीं वेगळा कार्यक्रम असतो काय ? ” मि. लँट्झ यांनीं केवळ हंसून उत्तर दिलें. अमेरिकन शेतकऱ्याच्या घरचें हें ऐश्वर्य सार्वत्रिक आहे.

पण एवढें वैभव असतांना सतत परिश्रम करणें हा त्यांचा फार मोठा गुण आहे. आळसांत कधीं तो राहणार नाहीं. भाजीपाला तयार करणें, कोंबड्यांची शास्त्रशुद्ध पैदास करणें, फुलांफळांची जपणूक करणें, मधाचा सांठा करणें हें त्यांचे उद्योग नेहमींच सुरू असतात. “ American farmer is a man who works like a labourer and lives like a millionaire. ” ( अमेरिकन शेतकरी मजुरासारखा राबतो व लक्षाधीशाप्रमाणें जगतो. ) अशी व्याख्या एका शेतकऱ्यानेंच मला दिली होती. प्रयत्नांची पराकाष्ठा व यांत्रिक पद्धतीची सोय यांवर अमेरिकन शेतकऱ्यांनीं धनाची व धान्याची रास उभी केली आहे. मि. लँट्झ यांच्या घरीं सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयी होत्या. त्यांच्या स्वयंपाकघरांत

भांडीं विसळण्याचें, कपडें धुण्याचें यंत्र होतें, घरें स्वच्छ करण्याचें ' व्हॅक्यूम क्लीनर ' नांवाचें यंत्रहि मला तेथें पाहावयास मिळालें. दिवसभर आठ-दहा तास सतत काम केल्यानंतर मि. लँट्झ आरामखुर्चीवर अंग टाकून टेलिव्हिजनची मौज लुटतात. त्यांच्या घरीं दोन मोटारी आहेत. एक त्यांची स्वतःची व दुसरी त्यांच्या मुलाची. अमेरिकेंतील बहुतेक सर्व शेतकरी या पद्धतीनें राहतात. आपल्याइकडील खेड्याप्रमाणें अमेरिकन शेतकऱ्यांचीं घरें एकत्र नसतात; तर विस्तीर्णपणें पसरणाऱ्या जमिनीवर मध्यभागीं ते आपलीं राजविलासी घरें बांधतात. शेतीचीं अवजारें ठेवण्यासाठीं एखादें छप्पर, गोठा, मोटारचा तबेला अशीं छोटीं छोटीं ठिकाणें या मोठ्या घरांभोंवतीं असतात. या सर्वांचें मिळून अमेरिकन खेडें होतें. जास्तींत जास्त तीन किंवा चार घरें. पण येथें शहरांतील सर्व सुखसोयी उपलब्ध असतात. विजेचा पुरवठा बहुधा सर्वत्र आहे. प्रत्येक घरापुढें पोस्टाची पेटी असते. रेडिओ व टेलिव्हिजनमुळें देशांतील बहुतेक सर्व वार्ता त्याला घरबसल्या समजतात. शिवाय सकाळीं जवळच्या गांवचें वृत्तपत्र येतेंच. १९५४ सालीं शेंकडा ९२ प्रमाणांत घरोघरीं विजेचा पुरवठा सबंध अमेरिकेंत झालेला होता. एवढ्या प्रमाणांत सर्वत्र रेडिओ आहेत. विजेवर चालणारीं धुलाईचीं यंत्रें शेंकडा ६० असून शेंकडा ६३ पर्यंत रिफ्रेजेटर्स आहेत. हे सर्व आंकडे तीन वर्षांपूर्वींचे आहेत. दरवर्षीं यांत फार मोठ्या प्रमाणांत वाढ होत असते. केवळ विभक्तपणें शेतीवाडीवर राहणाऱ्या अमेरिकन शेतकऱ्यांची ही नोंद आहे. नगरवासीयांचा विचार यांत नाहीं. प्रत्यक्ष शेतीसाठीं लागणारे ट्रॅक्टर्सहि भरपूर प्रमाणावर आहेत. घोड्यांनीं ओढले जाणारे नांगर आतां नवी पिढी फक्त म्यूझियममध्येंच पाहते. आपल्याकडील सर्वसामान्यपणें होणारी शेती-पद्धति ऐकून तेथील मुलांमुलींना नवलकथा ऐकल्यासारखें वाटतें. हें सर्व वैभव हळूहळू आकारास आलें आहे. १९१० सालीं या देशांत १००० ट्रॅक्टर्स होते. १९२० सालीं ही संख्या २४६,००० पर्यंत गेली. १९५४ सालीं ४·५ दशलक्ष ट्रॅक्टर्स अमेरिकेंत शेतांवर फिरूं लागले. १९२० पूर्वीं पांच टक्के शेती यंत्रानें होत होती; आतां जवळ जवळ सर्व शेती यंत्रांच्या साह्यानें होत आहे.

अमेरिकन शेतकऱ्यांचें जीवनमानहि याच प्रमाणांत वाढीस लागलें.

१९२० सालीं सात टक्के घरांना विजेचा पुरवठा झाला होता. १९४० सालीं हें प्रमाण ३३ टक्क्यांपर्यंत गेलें; आज ९५ टक्के घरांतून वीज खेळत असलेली दृष्टीस पडेल. पन्नास टक्के घरांतून टेलिफोन्स आजच व्यवहारांत आले आहेत. दळणवळणाची साधनेंहि भरपूर प्रमाणांत वाढलीं आहेत. शाळेंत जाणाऱ्या मुलांसाठीं शाळेची बस विनामूल्य येते. १९५० सालपर्यंत साठ टक्के शेतकऱ्यांना स्वतःची मोटार मिळाली होती. चारपैकीं तिघांना मोटार ट्रक घेण्याची ऐपत आली होती. त्यांच्या आरोग्याची सर्व प्रकारची काळजी घेण्यांत येते. निम्म्याहून अधिक घरांतून थंड व गरम पाण्याचे नळ आले आहेत. मि. लँट्झ यांच्या घरीं या सर्व सुधारणा दिसल्या. दूधदुभतें आणि भाजीपाला यांची समृद्धि होती. शनिवारीं कोठें सहलीस जाण्याचा कार्यक्रमहि अमेरिकन शेतकरी ठरवितो. मि. व मिसेस् लँट्झ, त्यांचा मुलगा व मी असे आम्ही रविवारीं दुपारीं बारा-साडेबारा वाजतां भोंवतींच्या प्रांतांत मोटारनें निघालों. चाळीस-पन्नास मैलांवर ॲशलँड नांवाचें गांव होतें. मायर्स पंपांचें मूळ स्थान म्हणजे हें ॲशलँड. येथें एका चर्चला जोडून असलेल्या इमारतींत आम्ही आलों. Smorgasboard नांवाच्या विशिष्ट प्रकारच्या जेवणाची व्यवस्था या ठिकाणी असल्याचें मला समजलें. आपला पाहुणा मांसाहार घेण्यास तितका खूष नसल्याचें त्यांनीं ओळखलें होतें. या प्रकारच्या भोजनांत जगांतील बहुतेक सर्व पदार्थ प्रामुख्यानें येतात. विशेषतः स्पॅनिश पदार्थांची भर अधिक. मीठमिरचीचे व मसाल्याचे पदार्थहि दुरून येणाऱ्या वासावरून मीं ओळखले. प्रत्येक पदार्थाजवळ त्याचें नांव व संक्षिप्त वर्णन होतें. कितीहि पदार्थ आपणांस लागतील तसे उचलावयाचे व संपले म्हणजे पुनः घ्यावयाचे अशी येथील पद्धति. रविवारचा दिवस असल्यामुळें गर्दीहि बरीच होती.

या दिवशींचा संध्याकाळचा कार्यक्रम विशेष रंगला. रात्रीं आम्ही सर्वजण पुनः शेल्बी येथील 'ग्रँज' संघटनेच्या इमारतींत जमलों. अमेरिकन शेतकऱ्यांच्या या विशिष्ट संघटनेबद्दल थोडें लिहावेंसें वाटतें. दि अमेरिकन फार्म ब्यूरो फेडरेशन, दि नॅशनल फार्मर्स युनियन व दि नॅशनल ग्रँज या तीन मोठ्या संस्था वा संघटना अमेरिकन शेतकऱ्यांच्या आहेत.

नॅशनल ग्रँज या संस्थेची सुरुवात १८६७ मध्यें झाली. शेतकऱ्यांची सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं या संघटनेची निर्मिति करण्यांत आली. शेतकऱ्यांना लाभलेल्या सर्व सुखसोयी या संघटनेनें केलेल्या चळवळींतुन निर्माण झाल्या. लहान लहान गांवीं सुद्धां ग्रॅजच्या शाखा आहेत. समाज-कल्याणाचीं विविध कार्यें याच संस्थेमार्फत चालतात. पिकांची शास्त्रशुद्ध पैदास करणें; रोगांविरुद्ध प्रतिकारात्मक उपाय शोधणें; तयार झालेल्या मालास बाजारपेठा निर्माण करणें; शिक्षण, धर्म, कला, शास्त्र वगैरेंच्या बाबतींत वेगवेगळे कार्यक्रम आंखणें व इतरहि सांस्कृतिक समारंभ घडवून आणण्याच्या कामीं हीच संघटना पुढाकार घेते. वाढत जाणाऱ्या तोंडांना खाणें पुरविण्याचें काम अमेरिकन शेतकरी मोठ्या जबाबदारीनें करतात. शेतकऱ्यांत बंधुभावाचें व खेळीमेळीचें वातावरण निर्माण होतें तें याच ग्रॅजच्या इमारतींत. अमेरिकन मनुष्य आधींच मनमोकळा, पण त्याच्या वागण्यांतील ऐसपैसपणा प्रकट होतो तो याच संस्थेच्या साप्ताहिक सभेंत. आज या संस्थेचे सभासद एकूण ८६०,००० पर्यंत आहेत. एका विशिष्ट पद्धतीनें सर्व देशभर संस्थेचीं कामें व्यवस्थितपणें चाललेलीं असतात. शेतकरीबंधूंची ही एक सहकार्याची पेढीच म्हणानात.

येथें आमचा आंतरराष्ट्रीय गट रविवारीं रात्रीं अखेरचा निरोप— शेतकरी बांधवांचा निरोप— घेण्यासाठीं उपस्थित झाला होता. प्रसंगास थोडेंसें गांभीर्य अभावितपणें प्राप्त झालेलें असल्यामुळें एरव्हीच्या थट्टा-मस्करीस मर्यादा पडली होती. बर्मा, मलाया, भारत, ईजिप्त, इटाली, बेल्जम, मेक्सिको, अमेरिका यांचें जणूं एक अभूतपूर्व संमेलनच भरलें होतें. बहुतेकांनीं आपापले राष्ट्रीय पोषाख घातले असल्यामुळें आधींच्या चित्रविचित्रपणांत भर पडलेली होती. प्रत्येक शेतकरी जोडप्यानें आपल्या पाहुण्यास आपल्यामध्यें बसवून पुढच्या कार्यक्रमासाठीं कान टवकारले होते. शेल्बीच्या लोकांनीं एवढे परदेशी पाहुणे प्रथमच पाहिले होते. मेक्सिकोच्या जोसेफिनचा बाहुल्यांच्या छापाचा घेरदार झगा ( स्कर्ट ) ते प्रथमच पाहत होते. जर्मन मुलींच्या डोळ्यांतील मिष्किलपणा त्यांना नवा वाटत होता. ब्रह्मदेश व मलाया येथील लोकांचे डोळे व चेहरेपट्टी त्यांना राहून राहून नवलाईची वाटत होती. आणि हिंदुस्थानची साडी ? तिच्याबद्दलचें कुतूहल

तर पुसूंच नका. सगळ्यांचे कॅमेरे साडीभोंवतीं सिद्ध झालेले होते. नृत्याचा, गाण्याचा, बजावण्याचा कार्यक्रम सुरू झाला. निरनिराळ्या देशाचें संगीत व नृत्य रंगांत येऊं लागलें. नॅशनल ग्रँजची म्हणून कांहीं ग्रामीण गीतें होतीं तीं वातावरणांत एकप्रकारचें गांभीर्य निर्माण करीत होतीं. "It's a good thing to be a Granger, it is a good thing." ( ग्रँजचे सभासद, व्हा, सभासद व्हा. ) म्हणून कोणी संस्थेची महती पाहुण्यांना पटवून देत होते. "The more we get together, together, together, the more we get together, the happier we'll be." (एकमेकांजवळ येऊं, एकमेकांजवळ येऊं आणि सुख समाधान पावूं. ) या गीतानें देशोदेशींच्या लोकांतील बंधुभाव निर्माण केला. छोटीं छोटीं भाषणें झालीं. अमेरिकन शेतकरी जणुं सर्व जगाचे रहिवासी या वेळीं बनले होते. कांहीं आदर्श कल्पना केली जात होती.

" O, give me a home where the buffalo roam,
Where the deer and the antelope play,
Where seldom is heard a discouraging word
And the skies are not cloudy all day."

( जेथें गाईगुरें चरतात, जेथें हरिणें बागडतात, जेथें पाडसें नाचतात, अनुत्साहाचा शब्दसुद्धां जेथें उच्चारला जात नाहीं आणि जेथील आकाशांत निराशेचे ढग दिवसभर कधींहि नसतात अशा ठिकाणचें घर मला पाहिजे )

सर्वत्र स्तब्ध शांतता होती. सभा संपल्यावर आम्हीं सर्वजण शेल्बीच्या शेतकऱ्यांना सोडणार होतों. अमेरिकन शेतकऱ्याचें आतिथ्य स्वीकारून आम्ही फक्त आमच्या आठवणीचीं पावलें शेल्बीस ठेवणार होतों. शेतकऱ्यांच्या भावड्या स्त्रियांचे डोळे तर पाण्यानें भरून आले. कोठें ईजिप्त आणि कोठें शेल्बी ! कोठें मलाया आणि कोठें शेल्बी ! पण ईजिप्तची अमीना शोकी येते आणि पोरांबाळांना लळा लावून दोन दिवसांत निघून जाते. मलायाची मिसेस् चिन् चॅन म्हातारीच्या जिवास चटका लावते व शेल्बी सोडण्याची भाषा बोलते ! सारेंच कांहीं अननुभूत असें असल्यानें यांत्रिक जीवनांत रममाण झालेल्या अमेरिकन शेतकऱ्यांचीं मनें द्रवून गेलेलीं दिसत होतीं. शेवटीं एका शेतकऱ्याच्या मुलीनें शेवटचें गीत म्हटलें:

Now the day is over
Night is drawing nigh
Shadows of the evening
Steal across the sky

Through the long nigh watches
May thine angels spread
Their white wings above me
Watching round my bed

When the morning wakens
Then may I arise
Pure and fresh and sinless
In the holy eyes.

( आतां दिवस कलून गेला, काळोखाचें राज्य आलें, सायंकाळच्या सावल्या आकाशांत पसरूं लागल्या. अंधाराचीं पावलें ऐकूं येत असलीं तरी तुझ्या देवतांचीं पांढरीं शुभ्र पंखें माझ्या बिछान्यावर चवऱ्या ढाळूं दे. आणि उद्यांच्या सुंदर प्रभातकाळीं तुला वंदन करण्यासाठीं मी अधिक पवित्र, निष्पाप व टवटवीत होऊं दे. )

या शुभेच्छा आम्ही एकमेकांना दिल्या आणि मग सर्व स्मृति मनांत ठेवून आमच्या गाड्या शेल्बीहून कोलंबसकडे धांवू लागल्या.

* * *

ओव्हायो स्टेटमध्येंच आणखी एका शेतकऱ्याच्या घरीं दोन-तीन दिवस राहण्याचा प्रसंग आला. आर्बाना शहराजवळ केबल नांवाचें एक अगदीं छोटें गांव आहे. तेथील मि. विल्फोर्ड कॅनॅगी यांच्या घरीं माझा मुक्काम फार गमतीचा झाला. मि. कॅनॅगी यांच्या एका मित्राच्या मोटारीनें मी जेव्हां त्यांच्या शेतवाडीवरील घरीं गेलों तेव्हां मि. कॅनॅगी यांच्या अंगावर शेती करतांना घालावयाचा विशिष्ट प्रकारचा पोषाख होता. वयानें जरा ास्त दिसणारा हा मनुष्य पंचेचाळीस वर्षांचा होता. त्यानें चटकन

माझें स्वागत आपल्या रानवट व खडबडीत हातानें केलें व मला घरीं घेऊन गेला. त्याची बायको फ्रॅन्सिस् त्याच्यापेक्षां स्थूल असून वयानेंहि दोन वर्षांनीं मोठी होती. तीन मुली व एक मुलगा असा त्यांचा प्रपंच होता. एक अगदीं परका पाहुणा—दहा हजार मैल दूरचा पाहुणा—आपल्या घरीं दोन दिवस राहणार म्हणून सर्व घरास कमालीचा आनंद झालेला होता. मला आनंद दुसऱ्याच एका गोष्टीचा झाला होता. मि. कॅनगी यांच्या घराच्या पुढल्या बाजूस असणारा झोपाळा पाहून मी एकदम खूष होऊन गेलों. अगदीं लहानपणीं माझें सर्व आयुष्य खेडेगांवीं झोपाळ्यावरच गेलें म्हणानात. पुढें पुण्यांतल्या वीतभर जागेंत झोपाळाच काय पण मुलींना पाळणा बांधणेंहि अशक्य झालें होतें. पण आतां येथें अगदीं परक्या देशांत ध्यानीं मनीं नसतांना झोपाळा बांधलेला पाहतांच मला माझें लहानपण आठवलें. संध्याकाळच्या सुमार होता. सूर्य डोंगरावरून बुडण्याच्या बेतांत होता. घराभोंवतीं गाई, डुकरें, कोंबड्या यांचा संचार जाणवत होता. घरांतल्या माणसांची ओळख झाल्यानंतर मी तडक झोपाळ्यावर येऊन मनसोक्तपणें झोके घेतले. सर्व श्रमाचा परिहार झाला. या पाहुण्याचा हा चमत्कारिक षोक पाहून तेथील सर्वांना नवल वाटलें. डिनरला अजून अवकाश होता. थोरली मुलगी शॅरी पियॅनोवर गाणें गाऊं लागली होती.

मि. कॅनगींचें कुटुंब साधेंभोळें होतें. हिंदुस्थानासंबंधीं फारसें ऐकलेलें नसल्यानें त्यांना सर्व गोष्टी अगदीं नव्या होत्या. भाबड्या मिसेस् कॅनगीनें मला आवडणारे सर्व पदार्थ विचारून घेतले व त्याप्रमाणें सगळी सिद्धता केली. टेबलाभोंवतीं जेवण तयार झाल्यानंतर मला बोलावण्यांत आलें. मुलें अजूनहि चकित होऊन माझ्याकडे पाहत होतीं. कॅनगी कुटुंब मोठें धार्मिक वृत्तीचें होतें. मि. कॅनगीनें मान खालीं घालून मोठ्यानें परमेश्वराची प्रार्थना केली. ‘ नव्या पाहुण्याच्या भेटीबद्दल देवा तुझे आभार मानतों. पूर्व आणि पश्चिम यांचा संगम सर्व जगास हितकारक ठरो ! जगांतील रोगराई, दुःख, दारिद्र्य व अज्ञान दूर होवो ! पाहुण्याचा परतीचा प्रवास सुखकर होवो ! त्याच्या मुलांबाळांचें कल्याण होवो ! ”— हा सर्व प्रार्थनेचा आशय होता. दुसऱ्या दिवशीं रविवार असल्यामुळें

आम्ही सर्वजण चर्चमध्यें गेलों. खेडेगांवचे हे शेतकरी चर्चबद्दल फारच प्रेम दर्शवितात. चर्चमध्यें जातेवेळीं मिस्टर व मिसेस कॅनेगी यांचा पोषाख अगदीं शहरी माणसाप्रमाणें होता. सूटबूट, टाय सर्व थाट अगदीं नागरी पद्धतीचा. त्याच दिवशीं आम्ही त्या भागांत खूप हिंडलों. शेतीची, निरनिराळ्या पिकांची, फळांची सर्व माहिती मला त्यांनीं मोठ्या ममत्वानें करून दिली. दुपारीं तेथून दहा-बारा मैलांवर असणारा एक सृष्टिचमत्कार पाहण्यास आम्ही गेलों. थोरली मुलगी शॅरी मोटार चालवीत होती. नेमका काय चमत्कार आहे हें मला माहीत नव्हतें. थोड्याच वेळांत एका लहानशा उंचवट्याजवळ आम्ही थांबलों. या उंच भागावर मला खूप फुलझाडें दिसलीं. मला वाटलें हाच चमत्कार, पण पांच-दहा मिनिटांत आम्ही एका छोट्या इमारतींतून खालीं जमिनींत उतरण्यास सुरुवात केली. बऱ्याच पायऱ्या उतरून गेल्यानंतर जमिनीच्या पोटांतून आम्हीं हिंडण्यास प्रारंभ केला. आवश्यक त्या ठिकाणीं विजेचे दिवे लावल्यामुळें सृष्टीचा हा रहस्यमय खजिना दृष्टीस पडून माझे डोळे दिपूनच गेले. निसर्गाचा आपोआप घडून आलेला हा चमत्कार आहे. कित्येक वर्षें पृथ्वीच्या पोटांतून पाण्याचा प्रवाह वाहतां वाहतां सृष्टीची ही मनोरम रचना आकारास आली आहे. नाना आकार, नाना रंग. निसर्गाचें हें खोदकाम अनंत रंगांनीं व आकारांनीं समृद्ध बनलेलें आहे. अजिंठा काय किंवा वेरूळ काय हीं सर्व माणसांचीं कर्तृत्वें आहेत. पण या ठिकाणीं माणसाचा हात परवां परवांपर्यंत लागलेला नव्हता आणि जो लागला तो फक्त बघणारांची सोय व्हावी म्हणून वीज पुरवण्यासाठींच. १८९७ पर्यंत कोणी मनुष्य इकडे फिरकला सुद्धां नव्हता. कोणा एका गुराख्यास दैववशात् या जामदारखान्याचा शोध लागला आणि आतां दररोज शेकडों लोक येतात व हें नैसर्गिक लावण्य पाहून संतुष्ट होतात. तीन-चार तासपर्यंत आपण फिरतच असतों. दर वेळेस नवा देखावा. नवी रंगपद्धति, नवें आकर्षण आणि प्रत्येकास रसिक अमेरिकन माणसानें दिलेलीं अर्थपूर्ण नांवें. सर्व चालणें तीन-चार मैलांचें सहज होऊन गेलें होतें. पण पाय दमेनात, डोळे तृप्त होईनात. मि. कॅनेगीचें भाबडें कुटुंब माझ्याबरोबर आहे हेंहि मी विसरून गेलों. लहानपणीं कृष्णाबाईच्या उत्सवाच्या वेळीं

मंडपांत लावलेलीं हंड्याझुंबरें मीं पाहिलीं होतीं; पण सृष्टीच्या पोटांतील हा निसर्गाचा उत्सव डोळ्यांचें पारणें फेडणारा होता. तेथून हलावें असें वाटेना. मिसेस् कॅनॅगी व थोरली मुलगी शॅरी अमेरिकन पद्धतीप्रमाणें ' वा, काय सुंदर ! फार छान ! ' असा उच्चार वारंवार करीत होत्या. पण मला तेंहि भान उरलें नव्हतें. मुकेपणानें सारें कांहीं डोळ्यांनीं प्यावें, पुनः प्यावें, पुनः प्यावें यांत मी दंग होतों.

## १३ : रगेल आणि रंगेल नायगारा!

भारतांत असतांना मीं नायगारा फॉल्सचें ( धबधब्याचें ) नांव अनेक वेळां ऐकलें होतें. त्या नांवाचा एक चित्रपटहि मीं दोन वेळां पाहिला असल्यानें नायगाऱ्याभोंवतीं एक प्रकारचें अद्भुतरम्य असें इंद्रधनुष्य मीं मनानें निर्माण केलें होतें. येथें ओव्हायो स्टेटमधील कोलंबस गांवीं सप्टेंबर महिन्यांत आल्याबरोबर युनायटेड स्टेटस्‌चा नकाशा काढून मी प्रथम नायगारा फॉल्स शोधून काढला. येथून अवघें तीनशें-साडेतीनशें मैलांचें अंतर होतें. रोज व्याख्यानें ऐकणें, चर्चा करणें, शिक्षणसंस्था वा कारखान्यांना भेटी देणें या कार्यक्रमास मी कंटाळलों होतों. मला कांहीं तरी विरंगुळा हवा होता. येथें कोलंबस गांवीं जगांतील सात आश्चर्यें लहान स्वरूपांत एका मोठ्या बाजारकेंद्रासमोर उभीं केलेलीं आहेत. त्यांत आपला ताजमहाल आहे व नायगारा आहे. पण या प्रतिकृतीवर वा मानसचित्रावर मला विसंबून राहावेसें वाटेना. पाण्याचे हिरवेपांढरे झोत डोळ्यासमोरून खालीं येत आहेत व त्यांचा गंभीर ध्वनि माझ्या कानांना सुखद जाणीव करून देत आहे हें मला प्रत्यक्ष अनुभवावयाचें होतें. माझ्याबरोबर एकूण दहा देशांतील वीस-बावीस लोक आहेत. त्यांच्यापैकीं कांहींना नायगाऱ्याचें आकर्षण मुळांतच नव्हतें. पण ऑस्ट्रेलिया, मेक्सिको, इटली, बेल्जम, पाकिस्तान या देशांचे लोक येण्यास तयार झाल्यामुळें आमचा आंतरराष्ट्रीय गट तयार झाला. ईजिप्तच्या दोन स्त्रियाहि आमच्यांत येऊन सामील झाल्या. अमेरिकेंत प्रवास करण्यांत एक और मजा आहे. त्यांतून या संमिश्र गटामुळें एक नवेंच वातावरण निर्माण झालें.

दि. २६ ऑक्टोबरला सकाळीं आठ वाजतां आम्हीं कोलंबस सोडलें. न्यू यॉर्क सेंट्रल रेल्वेनें आम्हांस उत्तरेस प्रथम क्लीव्हलंड येथें जावयाचें होतें. अकरा वाजून वीस मिनिटें झालीं. अवाढव्यपणें पसरलेलें क्लीव्हलंड

स्टेशन आलें. जगांतील मोठ्या स्टेशनांपैकीं हें एक आहे. पण आम्हांस पांच मिनिटांत गाडी बदलावयाची होती. नायगाऱ्याशेजारीं असणाऱ्या बफेलो गांवीं आम्हांस जावयाचें होतें. चटकन् धांवपळ करून रेल्वेच्या माणसानें दाखविलेल्या बफेलोस जाणाऱ्या गाडींत आम्ही बसलों. 'बफेलो' नांवाचें सर्वांना कौतुक वाटलें. मला विशेष वाटलें नाहीं. एक कारण असें कीं मला हें नांव माहीत होतें. पुण्याच्या टिळक कॉलेज ऑफ् एज्युकेशनचे प्रि. बापट हे गेल्या वर्षीं याच विद्यापीठांत होते. दुसरें असें कीं, या विक्षिप्त नांवाचा थोडा इतिहासहि मला माहीत होता. नायगारा नदीस, अमेरिकन रेड इंडियन्सनीं Beau Fleuve म्हणजे 'सुंदर नदी' असें आपल्या भाषेंत नांव दिलें होतें. पुढें इंग्रज लोकांनीं या सुंदर नांवाचें 'बफेलो' शहर करून टाकलें. नायगारा नदीच्या कांठीं असणाऱ्या या रम्य शहरीं आम्ही सायंकाळीं सुमारें साडेचार वाजतां येऊन पोंचलों आणि लागलीच नायगारा फॉल्सला जाणाऱ्या गाडींत आम्ही बसलों. एक-दोन डब्यांची ही डिझल कार मोठ्या ऐटीनें व रुबाबानें नायगारा फॉल्स-कडे आम्हांस नेणार होती. संध्याकाळचें कोवळें ऊन पडलें असलें तरी हवेंत एक प्रकारचा गारठा होता. गाडींत चढणारीं माणसेंहि थोड्या वेगळ्या प्रकारचीं होतीं. गाडीच्या बाहेरून व आंतून कांहींसें धुंद व मादक वातावरण आपोआप तयार झालें होतें. गाडी चालू झाली आणि आमचें चित्त नायगाऱ्याच्या दिशेनें धांवू लागलें. गाडी नायगारा नदीच्या कांठानेंच जात होती. नायगारा हीं खरें म्हणजे नदी नाहीं. दोन मोठ्या सरोवरांना सांधणारा एक दुवाच म्हणानात आणि हा दुवा आहे सदतीस मैल लांबीचा! पश्चिमेस असणारें ऐरि सरोवर पूर्वेकडील ऑंटॅरिओ सरोवरास या दुव्यानें जोडलें आहे. एक सरोवर दुसऱ्यापेक्षां १६० फुटांनीं कमी उंचीवर असल्यामुळें ऐरि सरोवराचें पाणी मोठ्या कड्यावरून उड्या घेतें व कांहीं अंतरावर ऑंटॅरिओ सरोवरास मिळतें. एवढें भूगोलाचें ज्ञान मीं आधींच मिळविलें होतें, पण तेवढ्यानें नायगाऱ्याचें सौंदर्य थोडेंच प्रकट होणार होतें! त्यासाठीं जलदीनें मार्ग आक्रमण करणेंच जरूर होतें. गाडी डौलानें चालली होती. वेळ संध्याकाळची आणि या गाडीस विशिष्ट घंटेचा नाद एक सारखा होत असल्यामुळें स्वदेशांतील नदीकांठीं देवळांतून

चालणाऱ्या आरतीची आठवण होऊन थोडी सुखद कल्पना जागृत झाली. नायगाऱ्याशिवाय दुसरा चर्चेचा विषय कोणास सुचणार ? पंचवीस मैलांचें अंतर लवकरच संपलें व आम्ही नायगारा फॉल्स या शहरीं येऊन पोंचलों. उतरण्याची व्यवस्था आधींच केलेली असल्यामुळें कोणतीच अडचण नव्हती. कॉनव्हर्स हॉटेलमध्यें आम्ही आमचें सामान टाकलें व लागलीच भटकण्यास बाहेर पडलों.

नायगारा फॉल्स हें शहर दहा हजार लोकवस्तीचें आहे. हौशी लोकांचें हें यात्रेचें ठिकाण अनेक दृष्टींनीं लक्षांत राहण्यासारखें आहे. जिकडे तिकडे दिव्यांचा लखलखाट, रस्त्यानें धांवणाऱ्या मोटारी आणि गुलहौशी जोडप्यांची धांवपळ असें वर्णन या ठिकाणाचें थोडक्यांत करतां येईल. सर्व वातावरण नायगारा फॉल्समय झालें होतें. खाण्याचे पदार्थ, पुस्तकें, अंगठी, बटणें, नेकटाय, दागिन्याच्या पेट्या, उशांचे अभ्रे, पैशाचीं पाकिटें, पर्सेस्, कोणतीहि वस्तु कोणत्याहि दुकानांत पाहा तीवर नायगाऱ्याचें चित्र असावयाचेंच. रात्रींच्या वेळीं आम्ही थोडा वेळ दुकानांतून घालविल्यावर आमची ठरलेली गाडी येऊन पोंचली. तीमधून आम्ही पहिली फेरी करणार होतों. आमच्या हॉटेलशेजारीं धबधब्याचा आवाज एकसारखा येत होताच. पण माणसांच्या गर्दींत व गाड्यांच्या धांवपळींत त्याची विशेष जाणीव झाली नव्हती. आतां आम्ही नायगारा फॉल्सच्या अगदीं नजीक येऊन पोंचलों. अंधारी रात्र व पावसाळी हवा यांमुळें येणारी उदासीनता कोठेंच नव्हती. उलट वातावरणांत एक प्रकारची मस्त धुंदी होती. नायगारा फॉल्सचे स्पष्टपणें दोन विभाग पडतात. एक अमेरिकन फॉल्स व दुसरा कॅनेडियन फॉल्स. प्रथम आम्ही अमेरिकन फॉल्सच्या कांठावर येऊन उभे राहिलों. या ठिकाणास 'प्रॉस्पेक्ट' असें नांव आहे. अगदीं नजीक डाव्या बाजूस नायगारा नदीचें पाणी सुमारें एक हजार फूट लांबीच्या व १६७ फूट उंचीच्या कड्यावरून कोसळत असतें. पाण्याची गति व एकसारखा होणारा आवाज यांखेरीज दुसरा विचार मनांत येत नाहीं. परमेश्वराची किमया येथें ह्या स्वरूपांत प्रकट झाली आहे. पांढऱ्या हिरव्या रंगाचें पाणी एकसारखें ह्या कड्यावरून उड्या घेत आहे. किती शतकें झालीं कोणास ठाऊक ?

त्याला अंत नाहीं, विश्रांति नाहीं, दम नाहीं. या ठिकाणीं उभें राहून किती लोकांनीं आश्चर्य व्यक्त केलें! रेड इंडियन लोकांचें तर हें दैवत. नंतर इंग्लिश आले, फ्रेंच आले. सर्वजण स्तब्ध होऊन गेले. रात्रीच्या अंधारांत माणसानें तयार केलेले दिवे कांहीं प्रकाश देत होते, पण मस्तवालपणें आणि रगेलपणें पाणी जो खेळ खेळत होतें त्याचें सौंदर्य कृत्रिम प्रकाशास बाजूस सारीत होतें. धो धो धो धो करीत उड्या मारणें एवढेंच त्यास माहीत. त्यांत नाजुकता नव्हती, लालित्य नव्हतें, तर रंगेलपणानें भरलेलें भैरवनृत्य होतें.

पण हें सर्व कांहींच नव्हे. पलीकडच्या बाजूस असणारा कॅनेडियन फॉल्स ( धबधबा ) खरा पाहण्यासारखा. नायगारा नदीचें एकदशांश पाणी अमेरिकन फॉल्समध्यें व उरलेलें नऊदशांश पाणी कॅनेडियन फॉल्समध्यें आहे. अर्थात् त्याची रौद्रता, भीषणता यापेक्षां अधिक असल्यामुळें आमचें लक्ष तिकडेहि वेधून होतेंच. गोट आयलंड ओलांडून या कॅनेडियन फॉल्सकडे जावयाचें होतें. या बेटाची लांबी अर्धा एक मैल असून तें बेट अनेक बेटांनीं वेष्टिलेलें असें आहे. एका बाजूनें अमेरिकन नायगारा नदी व दुसऱ्या बाजूनें कॅनेडियन नायगारा नदी अशी विवक्षित जागा या गोट आयलंडनें व्यापली आहे. या बेटावर म्हणे पूर्वीं पुष्कळ बोकड चरत असत. १७७९ सालीं कडाक्याची थंडी पडल्यामुळें बहुतेक बोकड मरून गेले आणि एक दाढीवाला बोकड मात्र टिकून राहिला आणि या बेटाचें नांव तेव्हांपासून भोंवतालच्या लोकांनीं ' गोट आयलंड ' असें ठेविलें. हें आयलंड ओलांडून आम्ही कॅनेडियन फॉल्सकडे आलों. खरें म्हणजे या प्रचंड धबधब्याचें नांव ' हॉर्स शू फॉल्स ' असें आहे. या अर्धवर्तुळाकार धबधब्याच्या कांठीं किती वेळ थांबलें तरी समाधानच होत नाहीं. अमेरिकन फॉल्सपेक्षां नऊ पटीनें पाणी या अर्धवर्तुळाकार कड्यावरून कोसळत असतें. आवाज दुपटीनें मोठा असून रात्रींच्या अंधाऱ्या वातावरणांत अधिकच भीषणता निर्माण झाली होती. भोंवतीं दोन्हीहि बाजूंस नायगारा शहर नाना प्रकारच्या व नाना रंगांच्या दिव्यांनीं लखलखत होतें, मानवाच्या ऐश्वर्याची पताका फडकवीत होतें, तर येथें समोर परमेश्वराची किमया शेंकडों वर्षें या ठिकाणीं आपला

दिमाख नृत्याच्या—भीषण नृत्याच्या—स्वरूपांत दाखवून आकारास आली होती. नाना रंगांच्या दिव्यांनीं व कृत्रिम साधनांनीं नायगारा नगरी रंगेल बनली होती. तर नायगारा धबधबा आपला रानटी रंगेलपणा सोडावयास तयार नव्हता. थोड्या वेळानें आम्ही कॅनेडियन हद्दींत जाऊन या दोन्हीहि फॉल्सकडे पाहूं लागलों. एकाचें सौंदर्य दुसऱ्याच्या भीषणतेवर मात करीत होतें, तर दुसऱ्याचा मस्तवालपणा पहिल्याच्या धिटाईस बाजूस सारीत होता. दोघांच्याहि अंगांत रंगेलपणा मुरलेला होता. अर्धवर्तुळाकार धबधब्याची लांबी २०१० फूट असून उंची १५८ फूट आहे. दोघांचें मिळून २१०,००० फूट क्यूबिक पाणी दर सेकंदास खालीं कोसळत असून त्यामुळें ४,९५०,००० अश्वशक्ति तयार होत असावी. पण हें सारें गणित नंतर सुचणारें आहे. पहिल्यानें मनावर ठसा उमटतो तो प्रचंडपणें धांवणाऱ्या व कड्यावरून उडी घेणाऱ्या नायगारा नदीच्या साहसाचा. निसर्गाचें एवढें मर्दानी दर्शन एवढ्या विविधतेनें दुसरीकडे क्वचितच सांपडेल.

तसें पाहिलें तर जगांत नायगाऱ्यापेक्षां लांबी—रुंदीनें व उंचीनें मोठे असणारे धबधबे किती तरी आहेत. पण नायगाऱ्याचा दिमाख कांहीं औरच आहे. रात्रीं नऊच्या सुमारास कॅनेडियन बाजूनें दोन्ही धबधब्यांवर निरनिराळ्या रंगांच्या प्रकाशांचे प्रचंड झोत टाकण्याची सोय करण्यांत आली आहे. हिरव्या, तांबड्या, निळ्या, पिवळ्या, जांभळ्या रंगाचे झोत दीडशें—दोनशें फुटांवरून कोसळणाऱ्या पाण्यावर टाकून माणसानें आपल्या बुद्धीचें प्रदर्शन येथें केलें आहे. लोकांना ही रंगीत किमया किती विलोभनीय वाटली ! नायगाऱ्याशीं स्पर्धा करणाऱ्या माणसाच्या बुद्धीची तारीफ करावीशी वाटली मला. माणसानें या ठिकाणीं काय काय केलें पाहा. मोठें शहर वसविलें, विद्युच्छक्तीचें मोठें केंद्र बनविलें, दिव्यांचा लखलखाट करून सोडला, विजेचे पाळणे धबधब्याच्या तळाशीं जाऊं लागले, ‘ मेड ऑफ् दि मिस्ट ’ नांवाची सुंदर नौका पाण्याच्या सहस्रावधि तुषारांखालून फेऱ्या घेऊं लागली, नाना रंगांचे कृत्रिम प्रकाशझोत तयार झाले, धोक्याच्या ठिकाणीं लोखंडी कठडे तयार झाले, म्हाताऱ्यांना विसाव्याच्या जागा तयार झाल्या, तरुणांना आडोशाच्या जागा निर्माण झाल्या. माणसानें

आपलें बुद्धिचातुर्य खर्च करून सर्व तऱ्हेचा रंगेलपणा येथें उभा केला. पण त्यांतूनहि नायगारा—मूळचा रगेल नायगारा—आजहि स्पष्टपणें दिसून येतो. या रांगड्या व रानटी नायगाऱ्याभोंवतीं माझें मन खिळून राहिलें. कोण-तीहि विज्ञानसंस्कृति नव्हती तेव्हांचा एकाकी नायगारा अधिक आकर्षक वाटूं लागला. दोन-चार रेड इंडियन्स येथें घर करून असावेत. बाकीच्यांनीं परमेश्वराच्या या कृतीस प्रत्यक्ष दैवतच मानलें होतें. प्रचंड अशा या परमेश्वराच्या कृतीच्या बुडाशीं कोणी भीषण दैवत असावें अशी या आदि-वासींची कल्पना. Oniagarah हें खरें म्हणजे रेड इंडियनांनीं दिलेलें नांव. त्याचें पुढें नायगारा झालें. या धबधब्याभोंवतीं राहणाऱ्या रेड इंडियन्समध्यें एक चमत्कारिक समजूत होती. धबधब्यांत वास करणाऱ्या जलदेवतेस संतुष्ट करण्यासाठीं वर्षांतून दोनदां गांवांतील एखादी सुंदर कुमारिका बळी देण्याची चाल होती. एका छोट्या नावेस फुलांनीं शृंगारून पाण्यांत सोडून देण्यांत येत असे. तींत ही कुमारिका शृंगारलेल्या अवस्थेंत कठड्यावरून उडी घेण्यास सज्ज असे. एकदां एका प्रमुखाच्या सुंदर मुलीची पाळी आली. लीलावाला तिचें नांव. पाण्याच्या वेगाबरोबर चाललेल्या नावेंत असणाऱ्या व धबधब्यांत असणाऱ्या आसरेस भेटावयास निघालेल्या या मुग्ध बालिकेनें आपल्या पित्याकडे एक शेवटचा करुणरम्य कटाक्ष टाकला. एकुलत्या एक मुलीच्या कटाक्षानें बापाचें हृदय विरघळून गेलें. बापानें लागलीच दुसऱ्या बोटींतून पोरीचा पाठलाग सुरू केला आणि शेवटीं दोघेंहि कड्यावरून खालीं कोसळून दिसेनाशीं झालीं. अशा किती तरी कथा या रगेल व भीषण नायगाऱ्याभोंवतीं केंद्रित झाल्या आहेत. नायगाऱ्यावर मात करण्याचे प्रयत्न किती तरी झाले. कोणी दोरावरून चालत गेले, कोणी पिपांत बसून प्रवाहांत मिसळले, कोणी आत्मार्पण केलें, एकेकाची एकएक साहसकथा या अद्भुत व रम्य अशा आहेत. या सर्व कथा ऐकतांना चित्त भांबावून जातें. मानवी संस्कृतीनें रंगेल बनलेला नायगारा खरा कीं, आपल्याच धुंदींत रगेलपणें कोणाची पर्वा न करतां आपली वाटचाल करणारा रगेल नायगारा खरा असा प्रश्न मनांत उभा राहतो.

सर्कलव्हील अमेरिकेच्या ओव्हायो स्टेटमधील एक छोटेंसें शहर. येथें आम्ही वीस-बावीस जण दि. १८ ते २० ऑक्टोबरपर्यंत होतों. अमेरिकेच्या सामाजिक जीवनाची एक नवी बाजू आमच्यासमोर उभी होती. रोजची धांवपळ, भव्यता, श्रीमंतीची ऐट सर्व कांहीं येथें होतें, पण त्याचें स्वरूप मात्र अगदीं वेगळ्या प्रकारचें. गांवांतील मुख्य रस्ता गजबजून गेलेला. दुतर्फा मोठमोठीं दुकानें, नाना खेळणीं, नाना खाद्यपदार्थ, रंगीबेरंगी कपड्यांनीं नटलेलीं माणसें, उल्हासानें नाचणारीं मुलें असें स्वरूप सर्कलव्हीलनें धारण केलें होतें. रंगीबेरंगी दिव्यांनीं ही छोटीशी नगरी नटून सर्वांचें स्वागत करीत होती. मेथॉडिस्ट चर्चशेजारीं नाना फुलांनीं सजविलेल्या दहा-बारा छोट्या छोट्या गाड्या उभ्या होत्या. लहान मुलांनीं आपल्या पोशाखांत सर्व प्रकारची विविधता व आकर्षकता आणली होती. कोणाची आई, कोणाची बहीण आपल्या मुलास, आपल्या भावास सजवीत होती, नटवीत होती; त्याच्या शृंगारावर अखेरचा हात फिरवीत होती. रात्रीं एक जंगी मिरवणूक निघणार होती. तींत आपली गाडी, आपला मुलगा उठून दिसावा, आपली आरास पहिल्या प्रतीची ठरावी म्हणून ही सर्व धडपड होती. प्रत्येक गाडीवर लहान-मोठे नाना आकारांचे, नाना रंगांचे भोपळे होते. सर्व सर्कलव्हील भोपळ्यांनींच नटून गेलें होतें ! ठिकठिकाणीं भोपळ्यांचे ढीग पर्वताकार पद्धतीनें रचलेले होते. नाना आकार, नाना प्रकार, नाना रंग. प्रत्येक दुकानावर जाहिराती भोपळ्यांच्या, हातरुमालावर चित्रें भोपळ्यांचीं. आमचा एक वाटाड्या होता, त्याच्या नेकटायवरहि चित्र भोपळ्याचें ! कारण सर्कलव्हीलचा भोपळ्यांचा उत्सव– पमकिन शो– सुरू होता.

पमकिन शो म्हणजे, एक मोठी जत्राच सर्कलव्हील येथें भरली होती. अमेरिकेंत खरें म्हणजे रोज जत्रा. अवाढव्य दुकानें, विजेच्या दिव्यांची आरास, खाद्यपदार्थांची लयलूट, नाना प्रकारचे खेळ वर्षभर चालू असतात. पण सर्कलव्हील येथील हा भोपळ्यांचा उत्सव कांहीं वेगळ्या प्रकारचा होता. अमेरिकेंत जे कांहीं आठ-दहा स्थानिक उत्सव गाजले आहेत, त्यांत सर्कलव्हीलच्या 'पमकिन शो'ची गणना होते. एवढा मोठा भोपळ्यांचा उत्सव दुसरीकडे होत नाहीं. त्यांतून यंदां या यात्रेचा पन्नासावा वाढदिवस. त्यामुळें लोकांच्यांत अमाप उत्साह होता. आजूबाजूचे लोक एकत्र येऊन उत्सवास भरती आणीत होते. आधीं दोन महिने खपून स्थानिक लोकांनीं कार्यक्रमाची तयारी केली होती. मोठीं माणसें लहान बनलीं होतीं. कागदाचीं फुलें करून आपापल्या गाड्या शृंगारण्याची स्पर्धा सर्वत्र चालू होती. यंदांचें बक्षीस आपणांस मिळावें म्हणून ज्याची त्याची धडपड होती. किती तरी प्रकारच्या स्पर्धा—लहान मुलांच्या स्पर्धा—मुलींच्या स्पर्धा—वृद्धांच्या स्पर्धा—एक ना दोन किती म्हणून सांगाव्यात ! भोपळ्यांच्या निमित्तानें माणसांची सारी शृंगारिक वृत्ति व सृजनशीलता सर्कलव्हीलच्या रस्त्यावर आकारास आली होती.

या उत्सवाच्या पाठीमागें करमणूक आहे, वर्षभर काम केल्यानंतर चार दिवस मौज करण्याची वृत्ति आहे आणि जीवनाची व्यावहारिक बाजूहि आहे. १९०३ सालच्या ऑक्टोबरमध्यें जॉर्ज हॅस्वेल नांवाच्या सर्कलव्हीलच्या मेयरनें ही कल्पना प्रथम पुढें मांडली. वेस्ट मेन स्ट्रीटवरील आपल्या घरासमोर त्यानें आपल्या परड्यांतील चांगले पोसलेले भोपळे मांडले. भोंवतीं मक्याचीं कणसें शोभिवंत दिसतील अशीं उभीं केलीं. लोक याला 'पमकिन शो' म्हणूं लागले. दुसऱ्या वर्षी शेजारीहि आपल्या मालाचा उठाव व्हावा म्हणून या 'शो' मध्यें सामील झाले. हा साधा व्यावहारिक उद्देश पुढें करमणुकीचें प्रधान साधन होऊन राहिला. १९०५ मध्यें मेरी गो राउंड चक्राची पहिल्यानें येथें रचना झाली. नंतर नाना प्रकारचीं चक्रें, नाना प्रदर्शनें, नाना दुकानें येऊन पमकिन शोस राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें. समाजांतील लोक एकत्रित यावेत, हेवेदावे नाहींसे

व्हावेत, शेतकीस व फळांच्या बागांस प्रोत्साहन मिळावें; गाई, कोंबड्या, भाजीपाला वगैरे आनुषंगिक उद्योग वाढीस लागावे ही या पमकिन शोमागची भूमिका. पहिल्या महायुद्धांत एकदां व दुसऱ्या महायुद्धांत दोन-तीनदां ही यात्रा भरली नव्हती. नाहीं तर दर वर्षी वाढत्या उत्साहानें ती भरत आली आहे. या वर्षी लोकांचा उत्साह शिगेस पोंचला होता. भोपळ्यांचीं निरनिराळीं प्रदर्शनें होतींच, पण चित्रकारी, छायाचित्रण, स्वयंपाक, विणकाम, भरतकाम, कलाकुसर या कलांचींहि प्रदर्शनें आपापल्या वैभवासहित पमकिन शोमध्यें स्पर्धेस सरसावलीं होतीं. नाना फळांचीं व नाना फुलांचीं प्रदर्शनें त्या त्या हौशी लोकांचा विषय बनून राहिलीं होतीं. माणसास कोणतें तरी निमित्त हवें असतें- त्या निमित्तानें तो आपलें सर्व सुप्त कौशल्य प्रकट करूं पाहतो. कधीं वयाचा मोठेपणा, कधीं सभ्यतेच्या वृथा कल्पना, कधीं अधिकाराची जाणीव पांघरून आपण आपलें स्वाभाविक वर्तन दडपून टाकीत असतों. पण या चार दिवसांत सर्कलव्हीलमधील लोक पोरापेक्षां पोर बनून गेले होते !

आम्ही तर त्यांचे पाहुणे. आम्हांपैकीं कित्येकजण मुख्याध्यापक, प्राचार्य, इन्स्पेक्टर्स, शिक्षणाधिकारी होते. सभ्यतेची बूज राखण्याची जबाबदारी आम्हां सर्वांवर होती ! पण सर्कलव्हीलमध्यें आम्ही सर्वजण लहानाहून लहान झालों ! एक तर येथील लोकांच्यांत मिसळणें अगत्याचें होतें आणि दुसरें असें कीं, आपल्या देशाचे कोणी पाहणारे येथें नाहीं याची जाणीव प्रत्येकास होती. माझेंच पहा ना. पुण्यास असतांना मुलीस घेऊन मी पेशवे वा संभाजी उद्यानांत किती तरी वेळां गेलों, पण दर वेळीं वृत्ति संकोचलेली ! सातारा जिल्ह्यांतील माझ्या खेड्यांतील जत्रा मी गेल्या वर्षी बऱ्याच वर्षांनीं पाहिली. पण पांढरपेशेपणामुळें मी थोडा फटकूनच राहिलों. मुलीबरोबर पाळण्यांत बसण्याचें माझ्या मनास शिवलेंहि नाहीं—पण येथें दहा हजार मैलांवर मी ‘ एकटा माझा मी ’ आहें, कोणी पाहणारें नाहीं. भोंवतीं आपणांस ओळखणारे विद्यार्थी नाहींत, या जाणिवेनें मी खुशींत होतों. सर्कलव्हीलमधील यात्रेंत नाना प्रकारचे विजेवर चालणारे व अतिशय वेगानें गरके घेणारे राहाटपाळणे होते. अमेरिकन लोक मोठे हौशी ! साठ-सत्तर वर्षांचे वृद्ध स्त्री-पुरुषहि

तरुण होऊन मेरी गो राउंडच्या खेळांत सामील झाले होते. माझ्याहि मनांत ही ‘ पोरकट ’ इच्छा निर्माण झाली. बरोबर आमच्या गटांतील पांच–दहा लोक येण्यास तयार झाले. एक मेक्सिकोमधील शारीरिक शिक्षणतज्ज्ञ होता. दुसरी त्याच देशांतील एक मुलगी पुढें सरसावली. जर्मनींतील दोन तरुण शिक्षक व शिक्षिका या अनुभवाचा लाभ घेण्यास प्रथमपासून तयार होते. माझ्या शेजारीं ऑस्ट्रेलियांतील एक शाळा-तपासनीस बसला होता. मोठा गंभीर व शांत वृत्तीचा. रोजच्या शैक्षणिक चर्चेंत प्रामुख्यानें भाग घेणारा. पण पोरांना व त्यांच्या शिक्षकांना शिस्त लावणारा हा अधिकारी आज सर्कलव्हीलच्या पमकिन शोमध्यें पोर बनला होता. इशारा होतांच विजेवर चालणारें हें चक्र अतिशय वेगानें फिरूं लागलें. एका नव्या जगांत मी होतों. मोठ्यानें हंसणें, खिदळणें, ओरडणें आणि शिट्या मारणें सर्व कांहीं या जगांत होतें. कोणी पाहत नाहीं ना, ही भावना मनांत त्याहि अवस्थेंत एकदां डोकावलीच !

असा हा पमकिन शो ! सारें शहर आपल्या पाहुण्यांसहित चार दिवस व चार रात्रीं रस्त्यावर मौज लुटीत होतें. त्यांत व्यापारी होते, चर्चचे अधिकारी होते, शाळांचे प्रमुख होते, विद्यापीठांचे प्राध्यापक होते. सर्वजण एका पातळीवर येऊन हंसत होते, इच्छेस येईल तें खात होते, पीत होते. किती दुकानें, किती खेळणीं, किती प्रदर्शनें ! भुयारांतून, बोगद्यांतून जाणारी एक आगगाडी—खरें म्हणजे मुलांचें खेळणें. पण सर्कलव्हीलमध्यें या चार दिवसांत लहान-मोठा असा भेद नव्हता. त्याहि आगगाडींत आम्ही बसलों ! खांचखळग्यांतून, अंधारांतून जाणाऱ्या गाडींतून प्रवास करतांना क्षणभर भीति वाटली. मध्येंच एक भुताचा सांगाडाहि होता. हा सर्व खेळ आहे ही जाणीव माझ्या मनाशीं स्थिरपणें होती म्हणून ठीक ! रोज रात्रीं निघणाऱ्या परेडची शोभा काय वर्णन करावी ! कित्येक शाळांचे व संस्थांचे बँड्स् हा सर्वांच्या आवडीचा विषय होता. मुलांचे, विशेषतः मुलींचे पोशाख, त्यांचें उडत उडत चालणें व बँडच्या ठेक्यावर प्रेक्षकांना झुलत ठेवणें हा प्रकार कांहींसा आगळा वाटला ! या वर्षी पमकिन शोसाठीं वॉशिंग्टनहून सरकारी मिलिटरी बँड आला असल्यानें सर्वांना तोच एक कौतुकाचा विषय झाला होता. नाना

स्पर्धांचे निकाल लागत होते. वयांप्रमाणें गट करून सौंदर्यस्पर्धा होत्या, त्यांत कोण कोण विजयी होतें याकडेहि सर्वांचें लक्ष होतें. वृत्तपत्रांच्या रकान्यांतून पमकिन शोखेरीज बातम्या नव्हत्या. प्रत्येक दुकानदार भोपळ्यांच्या प्रतीकानें आपल्या मालाची जाहिरात करीत होता. लहान मुलांच्या सौंदर्यस्पर्धा लोकांना विशेष उत्साहाच्या वाटत मिसेस् लिओनेल फिशर नांवाची बाई गेलीं पन्नास वर्षे न चुकतां पमाकिन शोस येत असे. १९०६ सालीं पहिली मुलांची आरोग्यस्पर्धा झाली या वेळीं या मुलीस पहिलें बक्षीस मिळालें होतें! आतां १९५६ सालींहि ही मुलगी चांगली चोपन वर्षांची बाई होऊन यात्रेस आली होती! नव्या मुलांना तिनें जुन्या काळच्या गोष्टी सांगून चांगलेंच रिझविलें. गेल्या वीस–पंचवीस वर्षांत ज्या युवतींनीं सौंदर्यस्पर्धांत विजय मिळाविला त्याहि पमाकिन शोस उपस्थित होत्या. १९३३ सालची पहिली सौंदर्यसम्राज्ञी 'मिस पमाकिन शो'–या वर्षीं हजर असल्यानें सर्वांच्या उत्साहास ऊत आलेला दिसत होता.

रात्रीच्या मिरवणुकींत हे सर्व विजयी वीर या सर्व सौंदर्यसम्राज्ञी मोठ्या थाटानें शृंगारलेल्या गाड्यांतून मिरवीत चालल्या म्हणजे एका नव्या जगाची साक्ष पटते. मुलांच्या गोजिरवाण्या मूर्ति अधिक लोभनीय कीं 'मिस् पमकिन शो' अधिक कमनीय, असा प्रश्न पाहणारास पडावा! शिवाय मिरवणुकींत इतर साजशृंगार व जाहिरात हे प्रकार होतेच. कोणाची जुनी मोटार, कोणाची घोडागाडी, कोणाचा नवा ट्रॅक्टर, कोणाची हात-गाडी, कोणाची नवी सायकल, कोणाची ५६ सालची नवी गाडी–या मिरवणुकींत आपल्या शृंगारासहित सामील झालेली दिसत होती.

याप्रमाणें सकाळपासून संध्याकाळपर्यंत सर्कलव्हील चार दिवस गजबजून गेलें होतें. आम्ही जगाच्या दहा दिशांतील दहा लोक चमत्कारिक वृत्तीनें व कांहींशा कुतूहलानें पमाकिन शो पाहत होतों व अमेरिकन लोक आमच्या या विचित्र गटाचा 'शो' बघून मनांत विस्मित झाले होते! मेक्सिको, हिंदुस्थान, पाकिस्तान, ईजिप्त, इटली, बेल्जम, जर्मनी, आइसलंड, ऑस्ट्रेलिया, ब्रह्मदेश व मलाया या देशांतील आमचा संमिश्र गट हेंहि यंदांच्या पमाकिन शोचें एक आकर्षणच बनून गेलें होतें.

## १५ : विचित्र नगरी सॅंटफी

नाताळच्या दिवसांत मी न्यू ऑर्लिन्स येथें होतों. या अमेरिकन पॅरिस-संबंधीं मीं मागें थोडें लिहिलें आहेच. वळणावळणानें जाणाऱ्या मिसिसिपीच्या तीरावर वसलेलें हें शहर अनेक दृष्टीनें महत्त्वाचें आहे. जेक्सन स्क्वेअर व तेथील सर्वांत जुनें असलेलें सेंट लुई कॅथीड्रल चर्च, येथून अनेक हौशी लोकांना स्फूर्ति मिळालेली आहे. कॅनॉल स्ट्रीट हा येथील प्रसिद्ध असा गजबजलेला व व्यापारी दृष्टीनें महत्त्वाचा रस्ता होय. रूझवेल्ट, यूंग, डी सोटो, न्यू ऑर्लिन्स, सेंट चार्ल्स, मॉंटोलिऑन इत्यादि हॉटेल्सच्या गगनचुंबी इमारती दृष्टींत भरण्याजोग्या आहेत. फ्रेंच क्वार्टरमधील जुनी कारागिरी व नक्षीकाम फार प्रसिद्ध असून अनेक जुन्या स्मृति आज येथें नव्यानें हुंकार देतात. चार्ल्स स्ट्रीटवरील नेपोलियनचें घर आज मोठ्या कुतूहलाचा विषय बनून राहिलें आहे. नेपोलियन सेंट हेलिना बेटांत असतांना त्यास गुप्ततेनें मुक्त करून येथें आणून ठेवण्याचा बेत न्यू ऑर्लिन्सच्या मेयरनें केला होता, पण हें सारें घडण्यापूर्वींच या दुर्दैवी बादशहाचें निधन झालें. किती गंमतीच्या गोष्टी या चमत्कारिक शहरांत ऐकूं येतात. मी सेंट चार्ल्स स्ट्रीटवर 'सॉमॅन्स टाऊन'मध्यें राहत होतों. याच चौकांत रॉबर्ट ली नांवाच्या गव्हर्नरचा एक पुतळा एका मोठ्या उंच मनोऱ्यावर उभा आहे. त्याचें तोंड उत्तरेस आहे. एका टॅक्सी ड्रायव्हरनें मला प्रश्न केला, 'रॉबर्ट ली उत्तरेकडे कां पाहतो माहीत आहे?...उत्तरेंतील अमेरिकन्सवर त्याचा विश्वास नाहीं. सख्त नजर असते त्याची उत्तरेकडे.' उत्तरेंतील अमेरिकन्सचा अधिकार दक्षिणेवर किती प्रमाणांत असावा हा आजहि वादाचा मुद्दा आहे. उत्तर-दक्षिणचा झगडा सर्वत्रच आहे तर!

प्रेसिडेंट बोटीवरून न्यू ऑर्लिन्स बंदराची सहल मोठी मनोरंजक वाटली. सबंध दक्षिण जगतास सांधणारें अमेरिकेचें हें प्रसिद्ध

असें बंदर आहे. मेक्सिकोचें आखात येथून ११० मैलांवर आहे. मिसिसिपीच्या मुखांतून अखंडपणें व्यापार चालू आहे. सर्वांत मोठ्या प्रमाणावर केळ्यांची आयात या बंदरांत होते. प्रतिवर्षीं सुमारें १२,०००,००० घड येथें बोटींतून उतरविले जातात. साखरेचें उत्पादनहि येथें प्रचंड प्रमाणांत होतें. व्यापाराच्या दृष्टीनें अमेरिकेचें हें दुसऱ्या क्रमांकाचें केंद्र आहे. फ्रेंचांची विलासप्रियता येथें जागजागीं दिसून येते. माझ्या खोलींत एक ज्यू तरुण माझा सहवासी म्हणून होता. त्याच्या मोटारनें मी रोज थोड्या दूरवर असणाऱ्या पॉंचेरट्रेन (Pontchartrain) सरोवराच्या कांठीं जात असे. विलासाचीं नाना साधनें या नितान्तरम्य सरोवराकांठीं निर्माण झालेलीं आहेत. नाताळच्या मुख्य दिवशींची लोकांची धांदल व रोषणाई यांचें वर्णन काय करावें ! रात्रीं दहा वाजतां मी खोलींत आलों तों तेथें एका मोठ्या बशींत केळीं, सफरचंदें, केक्स, बिस्किटें असा उपाहार मेरी ख्रिस्टमसच्या कार्डासहित टेबलावर सिद्ध होता. या हॉटेलमध्यें जेवण घेण्याची सोय नव्हती, पण परदेशी पाहुण्यांना या मोठ्या सणासाठीं हॉटेलच्या मालकानें हा उपाहार ठेवलेला होता. न्यू ऑर्लिन्सच्या विक्षिप्त, किंचित् तुसड्या आणि अहंमन्य लोकांच्या स्वभावांतील ओलावा ध्यानांत आला तो एवढाच !

लुइसियाना स्टेटमधील न्यू ऑर्लिन्स सोडून नाताळनंतर मी टेक्सेसमधील ह्यूस्टन शहरीं आलों. टेक्सेस हें अमेरिकेंतील सर्व संस्थानांत आकारानें मोठें स्टेट आहे. ह्यूस्टन हें एक दक्षिणेकडील प्रमुख उद्योगधंद्यांचें शहर. आठ-दहा लक्ष लोकवस्तीच्या या शहरांत नैसर्गिक गॅस, पेट्रोल, आणि विविध खनिजें यांचीं केंद्रें भरपूर प्रमाणावर दिसलीं. टेक्सेस स्टेटमधील लोक फार गर्विष्ठ, असा समज इतर अमेरिकन लोकांचा दिसतो. पण प्रत्यक्ष अनुभव फार चांगला आला. ह्यूस्टन येथील हवेंत एक प्रकारची प्रसन्नता होती. आल्हादकारक ऊन व निळें गर्द आकाश मनास तारुण्य प्राप्त करून देणारें वाटलें. सर्वत्र वातावरणाची भव्यता नजरेंत भरण्याजोगी होती. हवा आरोग्यवर्धक वाटली. येथील बागेंतून हलूंच नये असें वाटे. सॅम ह्यूस्टन हा या भागांतील पुढारी. याचे पुतळे जागजागीं दिसतात. हर्मन पार्कमधील प्राणिसंग्रहालयांतील मौजा नित्य मनांत रेंगाळणाऱ्या

होत्या. अनेक ऐतिहासिक घडामोडी या शहराभोंवतीं घडल्या. ह्यूस्टन-पासून वीस–बावीस मैलांवर सॅन्‌जॅसिंटो स्मारकाची जागा नैसर्गिक पार्श्वभूमीवर मनोल्हादक वाटली. जनरल सॅम ह्यूस्टननें मेक्सिकन सैन्याचा पराभव करून टेक्सेसचें स्वातंत्र्य अबाधित राखलें. याची स्मृति म्हणून २,०००,००० डॉलर्स खर्च करून उभारलेला स्मारकस्तंभ मनाचे व शरिराचे श्रम नाहींसे करणारा आहे. येथील वस्तुसंग्रहालयहि प्रेक्षणीय आहे. मेक्सिकोचें आखात येथून अवघ्या तीस मैलांवर आहे !

टेक्सेसमधील दुसरें महत्त्वाचें शहर डल्लेस हें होय. श्रीमान् उद्योगपतींच्या अखंड परिश्रमानें या शहराची निर्मिति झालेली आहे. फॅशनेबल स्त्रियांचें दक्षिणेकडील केंद्र म्हणूनहि डल्लेसची प्रसिद्धि आहे. येथें दोन-तीन दिवस राहून मी आतां पश्चिमेकडे निघालों होतों. टेक्सेसची महती आतां माझ्या मनांतून उतरली होती. अद्‌भुतरम्य अशा वैराण न्यू मेक्सिकोकडे माझें चित्त आकर्षित झालें होतें. अॅमॅरिलो हें टेक्सेसच्या पश्चिम-सीमेवरील छोटेंसें गांव. येथें आमची गाडी चुकली म्हणून तेथें सात–आठ तास मुक्काम करावा लागला. गांव छोटेंसेंच, पण आकर्षक होतें. रविवार असल्यामुळें रस्त्यावर शांतता होती. जेवणखाण उरकून वेळ जावा म्हणून एक चित्रपट पाहण्याचा बेत आम्ही केला. दि यार्लिंग नांवाचा एक उत्कृष्ट चित्रपट गाडी चुकल्याचा शीण घालविणारा वाटला. अमेरिकन वसाहत-कालांत घडलेल्या एका कुटुंबाची कथा मोठी मनास चटका लावणारी आहे. रानावनांत राहून निसर्गाशीं झगडणाऱ्या एका बालकाची व एका हरिणशावकाची ही मनोरम कथा निसर्गाच्या रम्य पार्श्वभूमीवर सजीव झाली आहे. ‘ हरिण-बालक ’ नांवानें ही कथा नुकतीच मराठींत आली आहे असें समजतें.

अॅमॅरिलो गांवाहून रात्रीच्या गाडीनें आम्ही पुनः पश्चिमेकडे निघालों होतों. पहाट झाली तेव्हां आम्ही न्यू मेक्सिको स्टेटमध्यें असल्याचें ध्यानीं आलें. सर्वत्र वैराण वाळवंट दिसत होतें. दूर कोठें तरी टेकड्यांचा, भुंड्या डोंगरांचा पुंज दिसून येई. न्यू मेक्सिकोचें हेंच का सौंदर्य ? या स्टेटमधील सर्वांत मोठें शहर, म्हणजे दीड लक्ष वस्तीचें अल्बुकर्की हें होय. सकाळीं येथें आल्याबरोबर कांहीं वेगळ्याच जगांत आल्याची प्रचीति आली.

अमेरिकेंतील प्रत्येक शहरांत दिसून येणाऱ्या उंच उंच इमारती नाहींत मोटारींची धांवपळ नाहीं. सर्व कसें अगदीं शांत होतें. रेड इंडियन्सच्या कांहीं बायका स्टेशनवर आपले दागदागिने विकत बसलेल्या दिसल्या. आम्हांस सँटफीस जावयाचें होतें. प्रत्यक्ष सँटफीस रेल्वे गेलेली नाहीं. तेथून एकोणीस-वीस मैलांवर असणाऱ्या लेमी नांवाच्या लहानशा स्टेशन-पर्यंत आम्ही जाण्याच्या तयारींत होतों. सँटफी रेल्वे मार्गावरील गाडी फार प्रसिद्ध आहे. पश्चिमेपासून शिकॅगोपर्यंत अंतर तोडणारी ही अद्भुत गाडी अनेक दृष्टींनीं महत्त्वाची आहे. या गाडींतून आमचा प्रवास चालू होता. सँटफी गांवाचें स्वरूप मी माझ्या डोळ्यासमोर आणण्याचा प्रयत्न करीत होतों. रेल्वे रस्त्याच्या दोन्हीहि बाजूंस आतां डोंगरांच्या रांगा भरपूर प्रमाणांत दिसत होत्या. रूक्ष वाळवंटांतून डोंगराळ भागांत आल्याचें समाधान कांहीं थोडें नव्हतें. सुमारें दीड—दोन वाजतां लेमी स्टेशन आलें. केवढीं मोठीं स्टेशनें मी यापूर्वीं या देशांत पाहिलीं होतीं. त्या मानानें एकच लहानशी इमारत उदासवाणी उभी असलेली पाहून मोठी मौज वाटली. सदर्न मराठा रेल्वेच्या मार्गावर अशीं स्टेशनें किती तरी मीं पाहिलीं होतीं. त्यांतील कोणत्याहि स्टेशनपेक्षां लेमी लहान होतें. लेमी आल्याबरोबर आम्ही उतरलों. आतां मोटारनें—बसनें आम्हांस सँटफीस जावयाचें होतें. ज्या बस कंपनीचीं तिकिटें आम्हांस वॉशिंग्टन ऑफिसनें काढण्याचा परवाना दिला होता ती बस कंपनी कांहीं वर्षांपूर्वींच बंद झाली होती. दोन हजार मैल दूर असणाऱ्या वॉशिंग्टनला लेमीसारख्या स्टेशनवर झालेला हा बदल माहीत नव्हता. नव्या बस कंपनीचीं तिकिटें काढून आम्हीं सँटफीस निघालों. पुनः वळणें वळणें घेत बस डोंगराच्या रांगारांगांतून जात होती. हिरवीगार झाडी आतां प्रथमच दिसली. रस्त्याच्या कडेला दोन-तीन घरें कच्च्या विटांचीं कशीं तरी बांधलेलीं दिसत. न्यू मेक्सिकोमधील हीं खेडीं! सातारा जिल्ह्यांतील खेड्यांना तरी कांहीं रूप होतें. पण हीं सर्व घरें बाहेरून उदास दिसत होतीं. मध्येंच एखाद्या घराशीं मोटार दिसे. एखाद्या घरावर टेलिव्हिजनच्या चौकोनी तारा दिसत. रस्त्यावरून जातां येतां कसलीहि धांवपळ नव्हती. आमचीच एक बस संथ गतीनें सँटफीकडे धांवत होती.

तीनच्या सुमारास सँटफीस आम्ही आलों. सँटफी हें डोंगरपठारावर वसलेलें टुमदार शहर असून बैठीं घरें लांबवर अस्ताव्यस्त पसरलेलीं. तिन्हीहि बाजूंस डोंगरांच्या निळ्याकाळ्या रांगा. आम्ही बसमधून जेथें उतरलों तेथून कोठें जावयाचें तें माहीत नव्हतें. मिसेस् एलेन हार्टनेट डिगनो हिनें कांहीं तरी व्यवस्था केली असावी असा आमचा तर्क होता. एका अरुंद अशा रस्त्यावर आम्ही सामानासह उभे होतों. मागाहून मला कळलें कीं, या शहरांतील हाच मोठा रस्ता, अगदीं नजीक ला फोंडा नांवाचें एक प्रशस्त हॉटेल होतें. तें हॉटेल असावें हें त्याच्या बाह्य रूपावरून ध्यानांतच येईना. कावेसारख्या मातीनें सारवलेली ती एक बैठी इमारत होती. खूप मोठा विस्तार होता, पण बाहेरून आकर्षित करून घेण्यासारखें तिच्याजवळ कांहीं नव्हतें. शिक्षणखात्यास फोन करून पहावा म्हणून मी या हॉटेलमध्यें जाऊन चौकशी केली. आमची प्रोग्रॅम ऑफिसर मिसेस् डिगनो ही आजारी असल्याचें कळलें. आतां उतरावें कोठें? ला फोंडा हॉटेल बाहेरून कसेंसेंच असलें तरी आंतून थाट बादशाही होता. भाडें एका दिवसाचें सात डॉलर्स...तीस रुपये! येवढ्या महाग जागेंत आम्ही आमच्या खर्चानें कधीं राहिलों नव्हतों. सँटफीस सर्व कांहीं स्वस्त अशीं आमची कल्पना होती; पण अनुभव निराळाच येऊं लागला. कोणी माहितीहि नीट देईना. स्पॅनिश लोकांचें इंग्लिश आम्हांस कळेना. आमचें त्यांना समजेना. शेवटीं पुढल्या चौकांत ' हॉटेल मॉंटेझूमा ' नांवाची एक पाटी पाहिली. चौकशी-साठीं आंत शिरलों; तों कौंटरवरच्या बाईनें हंसून स्वागत केलें. जणुं तिनें मला ओळखलें होतें. ' आपण एज्युकेशन डिपार्टमेंटचे पाहुणे ना? तुमची सोय माझ्या येथेंच केली आहे. या. या. तुम्हांला मॉंटेझूमा हॉटेल फार आवडेल. माझ्याचकडे सर्व परकीय पाहुणे येऊन राहतात......" त्या लाघवी बाईनें एका दमांत सत्र निवेदन केलें. आम्हांपैकीं प्रत्येकाच्या नांवावर एकेक खोली राखून ठेवण्यांत आली होती. याहि हॉटेलचें स्वरूप अगदीं वेगळें होतें. जेवणा-खाण्याची व्यवस्था येथेंच होती. मेक्सिको देशांतील मॉंटेझूमा हा जो एक प्राचीन बादशहा होऊन गेला त्याचें नांव या स्पॅनिश बाईनें आपल्या हॉटेलला दिलें होतें.

सँटफी हें शहर अमेरिकेंतील कोणत्याहि शहरापेक्षां वेगळें आहे.

वॉशिंग्टनचें वैभव कांहीं वेगळेंच आहे, पण शिकॅगो, कोलंबस, क्लीव्हलंड, डल्लेस, मेंफिस, ह्यूस्टन इत्यादि शहरांतून तोच तोच प्रकार फार आहे. त्याच उंच इमारती, त्याच प्रकारच्या हॉटेल्स, तसेच मोठे रस्ते, तीच रस्त्यावरची गर्दी, मोटारीची अखंडपणें चाललेली ये-जा. दुकानें तींच, माणसें तींच. या सर्व एक साचाचा आतां कंटाळा आला होता. सँटफी शहर अगदीं वेगळें वाटलें. बैठीं घरें आहेत. मातीनें सारवलेलीं आहेत. लांकडाच्या तुळया बाहेर डोकावत आहेत. रस्ते अगदीं अरुंद आहेत. माणसांची गर्दी नाहीं. शहराचा विस्तार पण मर्यादितच. स्पॅनिश व रेड इंडियन्स यांच्या संस्कृतीचें मजेदार मिश्रण येथें पाहावयास मिळतें. निराळीं गीतें, निराळी भाषा, निराळें खाणेंपिणें, निराळा निसर्ग, निराळीं माणसें निराळ्या इमारती. सँटफी म्हणजे अमेरिका देशांत वसणारें एक निराळें, स्वतंत्र असें छोटेंसें विश्वच. अगदीं शांत वातावरण. घाई गर्दीच्या कार्यक्रमास मी अगदीं विटून गेलों होतों. सँटफीस अगदीं आराम वाटला. बरोबर जर्मनीचे मि. ब्रुगमन व मि. कोनन असल्यामुळें एकटेपणा फारसा जाणवत नव्हता, पण आतां येथून पुढें एकटेंच भटकावयाचा निश्चय मीं केला.

सात हजार फूट उंचीवर वसलेल्या या शहराची हवा मोठी आल्हाददायक होती. जर्मनीतील लोकांना काय कौतुक वाटलें या जागेचें ! मी पांचगणीच्या डोंगराच्या कुशींतला. मला संतोष झाला तो पुनः प्रत्ययाचा. रिओग्रँड नदीच्या पूर्वेस तीस चौरस मैलांच्या टापूंत वसणारें हें टुमदार शहर अनेक प्रकारांनीं ध्यानांत राहणारें आहे. १३३०० फूट उंचीपर्यंत आकाशास भिडणाऱ्या सँग्री डी क्रिस्टो पर्वताच्या रांगा सभोंवार पसरलेल्या दिसतात. हिवाळ्यांत कडाक्याची थंडी नाहीं, उन्हाळ्यांत तापदायक ऊन नाहीं. कधीं चुकून थोडें-फार बर्फ पडत असेल नसेल. सूर्यप्रकाश आरोग्यदायक. १५९८ च्या सुमारास या रम्य प्रदेशाचें महत्त्व स्पॅनिश संशोधकांच्या ध्यानांत आलें. झेबुलॉन पिक, जेम्स पर्सेल, विल्यम बॅकनेल इत्यादींच्या साहसी प्रयत्नांनीं सँटफीचा तपास लागला. १८२२ सालीं मेक्सिको स्पॅनिश लोकांपासून स्वतंत्र झाला आणि मग संशोधकांची दृष्टि सँटफीकडे वळली. आज २५००० लोकसंख्या असणाऱ्या या शहरावर अर्थात्च त्याहि पूर्वीं कित्येक शतकें रेड इंडियन्सचें स्वामित्व होतें. १५९८ च्या सुमारास पहिली

वसाहत गोऱ्या लोकांनीं सॅन् गॅब्रील येथें केली. न्यू मेक्सिकोंतील स्पॅनिश लोकांच्या शिरकावाचा इतिहास मोठा रोमांचकारी आहे. १६१० सालीं न्यू मेक्सिकोची राजधानी सॅन् गॅब्रील येथें राहूं शकली नाहीं. ज्या नव्या जागीं ही राजधानी आली त्याचें नांव संशोधकांच्या नांवांशीं निगडित होऊन–ला व्हिला रिअल डी ला सँटफीडी सॅन् फ्रॅन्सिस्को–असें तयार झालें. आज सँटफी एवढेंच संक्षिप्त रूप शिल्लक आहे. जुन्या काळच्या सर्व खुणा आज येथें ताज्या स्वरूपांत दिसतात. रेड इंडियन्स व स्पॅनिश लोक आज गुण्यागोविंदानें येथें राहत असले तरी, त्यांच्या संग्रामाच्या साक्षी सभोंवारच्या प्रदेशांत अनेक आहेत.

सँटफी शहर पायीं हिंडूनच पाहण्यासारखें आहे. सर्वांत प्रसिद्ध ठिकाण म्हणजे प्लाझा. एक मोठा इतिहासप्रसिद्ध चौक. रिओग्रॅंड नदीच्या खोऱ्यांत होणाऱ्या विविध वस्तूंचा व्यापार फार पूर्वींपासून येथें चालत असे. जुन्या अमेरिकेचें हें एक इतिहासप्रसिद्ध केंद्र आहे. आज येथें लहान-मोठीं दुकानें, हॉटेल्स, पोस्ट ऑफिस, बँक इत्यादि गर्दीगर्दीच्या इमारती आहेत. येथील चर्चेस, पोस्ट ऑफिसच्या, बँकेच्या इमारती अगदीं जुन्या पद्धतीनें बांधलेल्या लांकडी खांबांच्या व मातीच्या कच्च्या विटांच्या, पण बाहेरून चांगल्या मातीनें सारवलेल्या आहेत. अशा प्रकारच्या घरांना ‘डोबी’ (Adobe) असें स्पॅनिश नांव असून सँटफी येथील सर्वांत आधुनिक दृष्टीनें कलापूर्ण घर म्हणजे असें मातीनें सारवलेलें! सरकारी इमारती, श्रीमंतांचे बंगले याच प्रकारचे आहेत. याच चौकांत अति प्रसिद्ध ठिकाण म्हणजे माजी इंडियन गव्हर्नरांचा वाडा. सबंध अमेरिकेंत सर्वांत जुनें असलेलें हें स्थान आहे म्हणे. पूर्वींच्या एका इंडियन खेड्यानें आपल्या गव्हर्नरासाठीं १६१०-१२ च्या सुमारास अशी या वाड्याची निर्मिति केली. स्पॅनिश व इंडियन्स यांच्या अनेक झटापटींत या वाड्याची पडझड अनेकदां झाली. आणि आज आतां नव्या जमान्यांत सन १९०९ पासून रेड इंडियन्सच्या जीविताचें सर्वांगीण स्वरूप दर्शविणाऱ्या प्रदर्शनाचें वास्तव्य येथें आहे. नैर्ऋत्य अमेरिकेंतील मानवजातीचा इतिहास या ठिकाणीं हर प्रकारच्या रूपांनीं उभा केलेला आहे. रेड इंडियन्सच्या संस्कृतीचा वांटा बराच मोठा आहे. १९१७ सालीं स्थापन झालेलें

न्यू मेक्सिको म्यूझियम आर्ट येथून अगदीं जवळच आहे. रेड इंडियनांची व स्पॅनिश लोकांची चित्रकारी व कलाकुसर जाणत्यांनीं वाखाणलेली आहे. मानववंशशास्त्र व समाजविज्ञान यासंबंधीं प्रदर्शनांतील विभागहि या प्रांताची पूर्ण कल्पना देणारी आहे. आंतरराष्ट्रीय लोककलेचें प्रदर्शन त्याच दिवशीं पाहण्यासाठीं आम्ही गेलों होतों. मेक्सिकोमधील लोकजीवनावरील एक फील्म दाखविण्यांत आली. या म्यूझियममध्यें बहुधा दक्षिण अमेरिकेंतील कलेच्या वस्तु मांडलेल्या होत्या. त्यांचें विणकाम, शिवणकाम नक्षीकाम, वस्त्रें, पात्रें, हत्यारें, दैवतें यांचा फार मोठा सांठा या इंटरनॅशनल फोक् आर्ट म्यूझियममध्यें आहे.

सँटॅफीच्या आसपास विशिष्ट जमातीचे अनेक इंडियन्स राहतात. शहरांतील प्रत्येक दुकानांत त्यांनीं केलेले दागिने, विणलेलीं वस्त्रें, काढलेलीं चित्रें आपणांस विकत मिळतात. पिब्लोज, नोव्हॅयो आणि अॅपॅची या तीन प्रकारचे इंडियन्स या भागांत राहतात. सुमारें अठरा-एकोणीस खेड्यांतून सोळा हजारपर्यंत पिब्लो इंडियन्स राहतात. यांतील कांहीं जमातींत मी राहिलों होतों, त्यांचीं नृत्यें पाहिलीं होतीं, ती सर्व हकीगत पुढें देत आहेंच. शिक्षणखात्यातर्फेंच आम्हांस नोव्हॅयो जमातीच्या धर्मविचारांचें व कृतींचें प्रदर्शन दाखविण्यांत आलें. या विशिष्ट जातीच्या इंडियन्सची धर्मकल्पना, आचारविचार, देवदैवतें पुष्कळ अंशीं पौर्वात्य धर्मांशीं जुळणारीं आहेत.

सँटॅफी येथें आमचा मुख्य कार्यक्रम निसर्गदर्शन असला तरी, स्टेटची शिक्षणपद्धतीची सर्व माहिती स्टेट डिपार्टमेंट ऑफ् एज्युकेशनच्या मिसेस् डिॅगनो हिनें आम्हांस दिली. तिनें आंखलेला इतर कार्यक्रमहि मनोरंजक होता. निरनिराळ्या दुकानांना भेटींची तत्परता तिलाच अधिक वाटत होती. एके दिवशीं मिसेस् डिॅगनो आमच्यासाठीं म्हणून सर्व प्रकारची रेड इंडियन्सची ज्युएलरी घालून आली. इतकेंच नव्हे तर एका ओळखीच्या इंडियन बाईस तिनें आपल्या ऑफिसमध्यें दागदागिने घेऊन बोलविलें होतें. युरोपमधील सर्व माणसें ती बाई व तिचे दागिने पाहून हरखून गेलीं. निळ्या रंगाच्या खड्याची अंगठी, कर्णभूषण, गळ्यांतील माळ, हातांतील कंकण सारे सारे प्रकार तिच्याजवळ होते. त्या दिवशींचा

सरकारी कार्यक्रम रद्द होऊन अमेरिकन इंडियन्सचे दागदागिने यावरच पाठ, प्रात्यक्षिकासहित झाला. मला या सर्व प्रकारांतील ज्ञान शून्य असल्यानें लोक फक्त याहि गोष्टीनें कसें वेडावतात तें मी पाहत होतों. फेडरल सरकारनें रेड इंडियन्सच्या मुलांसाठीं स्वतंत्रपणें वाटेल तेवढा खर्च करून शाळा चालविल्या आहेत. त्यांतील एका शाळेंत आम्ही मुद्दाम गेलों होतों. शाळेंत जाणाऱ्या या मुलांमुलींचे पोषाख आतां अमेरिकन पद्धतीचे बनले होते. त्यांची स्वतःची भाषा तर त्यांना येत होतीच, पण इंग्रजीचा लोभ त्यांना विशेष वाटत होता. न्यू मेक्सिको स्टेट हें द्विभाषिक आहे. स्पॅनिश व इंग्लिश या दोन्हीहि भाषांना शाळांतून व राज्यकार-भारांतून महत्त्व आहे. रेड इंडियन्सची भाषा शिकविली जात नाहीं. तिला लिखित स्वरूप नाहीं. तिच्यांत वाङ्मय नाहीं आणि वेगवेगळ्या भाषां-कुलांतील वेगवेगळ्या भाषा इंडियन्स बोलतात. त्यांत एकरूपता नाहीं. रेड इंडियन्सचीं मुलें तांबडीं लाल, हंसरीं पण थोडीं बुजरीं वाटलीं. त्यांचीं नांवें मोठीं काव्यमय असतात. एक इंडियन नांव व दुसरें खिश्चन नांव अशीं दुहेरीं नांवें त्यांना प्राप्त झालेलीं आहेत. एका मुलीच्या इंडियन नांवाचा अर्थ 'रात्रीचें फूल' असा होता. दुसऱ्या एका मुलाच्या नांवाचा अर्थ 'बर्फाचा पर्वत' असा आढळून आला.

याशिवाय सँटफी व न्यू मेक्सिकोसंबंधीं कांहीं रंगीत फिल्म्स आम्हांस दाखविण्यांत आल्या. त्या अतिशय रंजक होत्या. फिएस्ता उत्सव, इंडियन नृत्यें, हंगामाचा काळ इत्यादि विषयांवरील हें चित्रदर्शन होतें. न्यू मेक्सिको एज्युकेशन असोसिएशनच्या सभासदांशीं भेट हा कार्यक्रम फार महत्त्वाचा होता. पुष्कळांना परकीय पाहुणे नवखेच होते. कोणीहि 'खरा इंडियन' पाहिला नव्हता; त्यामुळें माझें महत्त्व अकारण वाढून गेलें. सँटफी या छोट्या गांवांत मी रमून गेलों होतों. रोज सकाळीं हवा थंड असली तरी पायीं चालूनहि मला जवळच्या डोंगर टेकडीवर जाऊन शहराचें स्वरूप न्याहाळतां येत असे. तेथून या विचित्र नगरीचा देखावा अपूर्व दिसे आणि सँटफीस 'सिटी ऑफ डिफरंट' हें नांव किती यथार्थ-पणें लागूं पडतें याची खात्री पटे.

## १६ : बॅंडेलिअर नॅशनल मॉन्युमेंट !

विचित्र नगरी सॅंटफी येथील दिवस मोठ्या मजेंत जात होते. अमेरिकेच्या उत्तर भागांत हिमवादळें होत असल्याच्या बातम्या कानांवर येत होत्या, तर आमच्याकडे सौम्य उन्हाचा आल्हाददायक देखावा अनुभवास येत होता. दीड–दोन हजार वर्षांपूर्वी रेड इंडियन्स ज्या डोंगरी गुहांतून राहत असत तें स्थान पाहण्यास जाण्याचें आमचें निश्चित झालें. मि. व्हिक्टर मॅलन यांना या विभागांतील चांगलीच माहिती होती. जर्मनीचे मि. ब्रुगमन, मि. क्रोनन, ईजिप्तची मिसेस् शोक्री, पाकिस्तानची मिसेस् घनी, आणि बेल्जमची मिस् कॅनन असे आम्ही पांच–सहा जण भल्या सकाळीं खाजगी मोटारीनें निघालों. युनायटेड स्टेट्स रस्ता क्रमांक २८५ वरून आमची गाडी भरधांवपणें जाऊं लागली. आजूबाजूला डोंगरांच्या लहान-मोठ्या रांगा होत्या. कालपरवां थोडें बर्फ पडून गेलें होतें तरी आजच्या सकाळची हवा स्वच्छ आणि उबदार होती. ज्या बॅंडिलिअर नॅशनल मॉन्युमेंटकडे आम्ही निघालों होतों तें स्थान सॅंटफीपासून वायव्येस सुमारें ४५ मैल दूर होतें. वळणें वळणें घेत, चढ-उतार करीत आम्ही मार्ग आक्रमीत होतों. मध्येंच डोंगराचें, भू-विभागाचें चित्रविचित्र आकाराचें दर्शन होई. प्रत्येकजण आपापला कॅमेरा सिद्ध करी, मोटार क्षणभर थांबे आणि पुढचें सौंदर्य टिपून झाल्यानंतर पुनः प्रवास सुरू होई. मध्येंच एक जमिनीचा उंचवटा लक्ष वेधून घेणारा होता. चांगली वीस पुरुष उंचीची ती टेकडी दोन विभागांत सुस्त होऊन अंग आखडून बसली होती. मान वर करून कांहीं तरी चघळत एखादा उंट बसावा तसें तें दृश्य होतें. आमच्यापैकीं प्रत्येकानें त्या ‘ उंटा ’वर बसून आपापल्या ‘ छबी ’ काढून घेतल्या. ईजिप्तच्या अमीना शोक्रीस या उंटाबद्दल जिज्ञासेनें वा थट्टेनें कांहीं मोहिता विचारणें झालें. पण सर्वांना ओढ होती ती रेड इंडियन्सच्या गुहा पाहण्याची.

न्यू मेक्सिको स्टेटमधून जाणारी अति प्रसिद्ध नदी म्हणजे रिओ ग्रँड ही होय. या नदीबद्दल अनेक प्रकारच्या दंतकथा मीं ऐकल्या होत्या. ‘ लुक् ’ मासिकांत या रहस्यमय नदीची सर्व प्रकारची माहिती आली होती, तें कात्रण मीं जपून ठेविलें होतें. या रिओ ग्रँडच्या पश्चिमेस हें ऐतिहासिक स्थान होतें. एका डोंगराच्या कुशींत आम्ही सुमारें आठ–साडे आठ वाजतां येऊन पोंचलों. येणाऱ्यांच्या स्वागतासाठीं, माहिती देण्यासाठीं एक प्रमुख छोटी इमारत होती. आमच्याप्रमाणेंच आणखीहि कांहीं लोकांच्या गाड्या अगोदरच येऊन पोंचल्या होत्या. प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर आमच्या खऱ्या संशोधनास सुरुवात झाली. डोंगराच्या एका भव्य दरींतून फ्रिजोल ( Frijoles ) नांवाची एक छोटी नदी वहात होती. नदी कसली ? एकाच ढांगेंत ओलांडतां येणारा पाण्याचा लहानसा प्रवाह होता तो, आणि समोर धिप्पाडपणें पसरून राहिलेला पहाड. एखाद्या भिंतीस असंख्य कोनाडे असावेत त्याप्रमाणें डोंगराच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत लहान लहान किती तरी भगदाडें दिसत होतीं.

दीड-दोन हजार वर्षांपूर्वीं अमेरिकन इंडियन्स येथें राहत असत. अमेरिकेच्या नैर्ऋत्य भागांत राहणाऱ्या एका खेड्यांतील संपूर्ण वसाहतीचे भग्नावशेष या ठिकाणीं इतस्ततः पसरून राहिलेले दिसत होते. पॅजॅरिओ ( Pajarito ) डोंगराच्या उतरणीवर जुन्या खेड्याच्या खुणा आजहि स्पष्टपणें दिसत होत्या. भूगर्भशास्त्र व पुराणवस्तुसंशोधनशास्त्र या दोन्हीहि दृष्टींनीं या स्थानाचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. नव्या जगांतील सर्वांत जुन्या काळच्या खुणा येथें सांपडलेल्या आहेत. ज्वालामुखींतून पसरलेल्या लाव्हानें आणि विझून गेलेल्या राखेनें या भूपृष्ठाची रचना झालेली आहे असें जाणत्यांचें मत मला माहीत होतें. जवळ जवळ २५००० एकरांचा हा प्रदेश आज संपूर्णपणें निर्जन असा आहे, पण एके काळीं कांहीं विशिष्ट प्रकारची संस्कृति असलेल्या ताम्रवर्णीय लोकांनीं हा भाग गजबजलेला असावा. सन १८८०–८६ या काळांत या जुन्या वस्तीचा ‘ शोध ’ लागला. ॲडॉल्फ बेंडिलियर नांवाच्या एका स्विस-अमेरिकन संशोधकानें या इतिहासप्रसिद्ध भूमीचा शोध लावला. डोंगराच्या

कड्यांमध्यें केलेली राहण्याची जागा आंत जाऊन पाहतां येण्यासारखी आहे. पुरुष-दीड पुरुष उंचीच्या या गुहा आकारानें, विस्तारानें मोठ्या आहेत. लोक रानटी असले तरी त्यांचीहि एक संस्कृति असावी. शेतकी हा प्रधान उद्योग प्राचीन इंडियन्सचा होता. मका, बीन्स आणि भोपळे यांचें उत्पादन त्यांना माहीत होतें. कापसाच्या वस्त्रांचें अवशेषहि येथें मिळाले आहेत. नाना प्रकारच्या मातीच्या भांड्यांचे नमुने येथें आजहि दिसून येतात. सबंध डोंगर या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पोखरलेला असल्यामुळें मधमाश्यांच्या पोवळ्याप्रमाणें दुरून दृश्य दिसतें. कधीं तरी मोठा पूर आला असावा, दुष्काळ पडला असावा, रोगाची सांथ आली असावी आणि सर्व वसाहतवाल्यांनीं हा डोंगराळ मुलूख कालांतरानें सोडून दिला असावा किंवा दक्षिणेंतून, मेक्सिकोंतून स्पॅनिश लोकांची टोळधाड आल्यानंतर या स्थानिक लोकांना पळ काढावा लागला असावा. आज या स्थानापर्यंत येतांना कित्येक ठिकाणीं ही पडझड पाहावयास सांपडते. खडकांत कोरलेल्या खोल्यांचे अवशेष तेवढे आपलें लक्ष वेधून घेतात. समुद्रसपाटीपासून सुमारें ५५०० फुटांवरून येथून रिओ ग्रँड वाहते. येथून पुढें दोन हजार फूट उंचीवर असणाऱ्या डोंगरावर या सर्व गुहा वा खोल्या प्राचीन खेड्याची साक्ष देणाऱ्या आहेत.

थोडासा सकाळचा फराळ झाल्यानंतर आम्हीं डोंगराळ भागांतून हिंडण्यास प्रारंभ केला. उन्हाचा त्रास अजिबात होत नव्हता. सुखद अशा वाऱ्याच्या झुळकीनें डोंगरावरून चढ-उतार करण्यास आनंद वाटत होता. शेंकडों गुहा आतां आमच्या समोर दिसत होत्या. कांहीं नुसत्या पाहाव्या, कांहींत शिरून थोडी विश्रांति घ्यावी, कांहींत उभें राहून जुन्या लोकांच्या कारागिरीचें कौतुक करावें असा क्रम चालू होता. खोलीची लांबी-रुंदी सर्वसाधारणपणें ६ ते ९ फुटांपर्यंत असून उंची पांच ते आठ फुटांची होती. प्रवेशाचा दरवाजा तीन फुटांचा असल्यामुळें आम्हा सर्वांना वाकूनच जावें लागत होतें. विटांचीं बांधण्यांत आलेलीं व आज संपूर्णपणें पडून गेलेलीं किती तरी मोठीं घरेंहि पायथ्याशीं दिसतात. या भग्न झालेल्या घरांत एकूण तीन हजार तरी लहान लहान खोल्या असाव्यात. त्यांची उंचीहि दोन-तीन पुरुष असावी. प्राचीन इंडियन लोकांची धर्मभावना

प्रखर होती. त्यांचे सर्व धार्मिक विधि, नृत्यादि कार्यक्रम ज्या ठिकाणीं होत असत तें स्थानहि आज मोडक्या तोडक्या अवस्थेंत पाहावयास सांपडतें. एका मोठ्या वर्तुळावर इमारतींचे भाग आज दिसतात. या स्थानास ‘ किवा ’ ( Kiva ) असें नांव असून त्याची खोली साधारणपणें आठ फूट दिसते. व्यास चाळीस फुटांचा असावा. या प्रकारच्या किवांतून कांहीं धार्मिक विधि होत असत. किवापासून निरनिराळ्या खोल्यांपर्यंत जाण्यायेण्याचे रस्तेहि आतां पडझड झालेल्या स्थितींत दिसतात. कांहीं खोल्यांतून जाण्यासाठीं आठ-दहा पायऱ्यांच्या शिड्या आहेत. कांहीं गुहांच्या भिंतींवर नाना प्रकारचीं वर्तुळें, कांहीं प्राण्यांचे आकार कोरलेले दिसतात. आज या सर्व जुन्या अवेशषांचें निरीक्षण करणारे जाणारे येणारे पाहुणेच होत. एऱ्हवीं मनुष्यवस्ती नाहीं. भोंवतीं दाट असें अरण्यच असून नाना आकारांचे डोंगर वेड्यावांकड्या पद्धतीनें पसरलेले दिसतात.

दीड हजार वर्षांपूर्वीं रेड इंडियन्स येथें वस्ती करून होते. त्यांचे दागदागिने, त्यांचीं वस्त्रें, त्यांचीं भांडींकुंडीं, त्यांचीं देवदैवतें त्यांचीं हत्यारें या सर्वांचें दर्शन येथेंच असलेल्या प्रदर्शनामध्यें आपणांस घडतें. मातीच्या भांड्यांचे आकार वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. ओबडधोबड पद्धतीनें काढलेली त्यावरची नक्षी जुन्या कलाकौशल्याचा नमुना दाखविणारी आहे. याहि इंडियन गटाचीं माणसें मंगोलियन जातीचीं असावींत. पांच फूट, चार-पांच इंचांची उंची, तांबडी तपकिरी त्वचा व काळेभोर केस हें त्यांचें रूप होतें. त्याची बायको पांच फुटांच्या आसपास उंचीनें असावी. शरीराची बांधणी चांगली मजबूत. कांहीं मुलें व एक कुत्री मिळून पूर्वींच्या रेड इंडियनचें कुटुंब पूर्ण होई. ‘ युका ’ हें न्यू मेक्सिको राज्याचें राष्ट्रीय झुडुप. याचाहि उपयोग अनेक कारणांसाठीं पूर्वींच्या इंडियन्स लोकांना माहीत होता. धनुष्य-बाणानें शिकार करणें आणि थोडी फार शेती करणें हे त्यांचे मुख्य उद्योग होते. लहान प्राणी पकडण्यासाठीं जाळीं वापरत असत- हरिणाची शिकार हा त्यांचा आवडता छंद होता. जनावरांच्या कातड्यांचे कपडे त्यांना उपयोगी पडत. अस्वलाचें कातडें थंडीपासून रक्षण करण्यास उपयुक्त होई. आठव्या शतकांत येथील इंडियन्सना कापसाचा उपयोग माहीत झाला.

आणि पुढील चार शतकांत कापसापासून जाडेंभरडें कापड तयार करण्याची कला त्यांना अवगत झाली. रेड इंडियन्सनीं तयार केलेल्या ब्लँकेट, सतरंज्या, रंगीबेरंगी कपडे वगैरे गोष्टी आजहि मोठ्या कौतुकाच्या म्हणून वर्णिल्या जातात. त्यांचे धर्मविचार व त्यांचीं दैवतें यांचाहि तपास येथें लागण्यासारखा आहे.

या ठिकाणीं आज पाहण्यासारखें म्हणजे भग्न स्थितींत असलेलीं जुनीं घरें व डोंगरांत पोखरून केलेल्या खोल्या. ऑफिसच्या इमारतींत कांहीं प्रदर्शनीय वस्तु आहेत. कांहीं माहितीपूर्ण पुस्तकें आहेत. पण येथें पोंचल्याबरोबर बाहेरची प्रसन्न हवा आणि अद्‌भुतरम्य वातावरण यांचीच ओढ आपणांस अधिक वाटते. मी खरा इंडियन म्हणून मलाहि कुतूहल होतेंच; पण माझ्याबरोबरीचीं माणसेंहि ‘ दोन इंडियन्स ’मधील साम्य-भेद शोधून पाहत होतीं. आपल्याकडे असणाऱ्या अजिंठा, वेरूळ येथील गुहा व लेणीं, कला, धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृति, शास्त्र, विद्या या दृष्टींनीं किती तरी भव्य, अर्थपूर्ण व बोलकीं आहेत. युरोपियन वा अमेरिकन माणसांना या जुन्या स्थानाचें नवल वाटतें. पण मला केवळ तें स्थान रेड इंडियन्सचें म्हणून महत्त्वाचें वाटलें. अमेरिकेंतहि अगदीं वेगळ्या प्रकारचीं माणसें येथें राहत होतीं. आज तीं माणसें सुधारण्याच्या पंथावर आहेत. सुधारण्याच्या म्हणजे विज्ञानप्रणीत जीवन स्वीकारण्याच्या. बॅंडेलियर नॅशनल मॉन्युमेंट पाहिलें म्हणजे अमेरिकन सरकार आपल्या पुराण्या जमातींची, त्यांच्या संस्कृतीची जपणूक कसें करतें तें ध्यानांत येतें.

## १७ : न्यू मेक्सिकोची यक्षभूमि !

सबंध अमेरिकेंत न्यू मेक्सिको हें आकारानें चौथ्या क्रमांकाचें राज्य. पण वस्ती किती तरी तुरळक. सबंध स्टेटची मिळून पांच-सहा लक्षांची वस्ती होईल. अफाटपणें पसरत जाणारा हा भूप्रदेश जवळजवळ निर्जन असाच आहे. भुंडे डोंगर या भागांत फार असले तरी, मधून मधून हिरवीगार वनराजी डोळ्यांना आल्हाद देते. वैराण वाळवंट असलें तरी सध्याकाळच्या वेळीं असंख्य प्राण्यांच्या रूपानें हें वाळवंट सजीव झाल्याचें भासतें. अगदीं जुन्यांत जुने अवशेष मानववस्तीचे याच स्टेटमध्यें सांपडले असून १९४५ सालीं पहिल्यानें तयार झालेला अणुबॉंब जवळच असलेल्या लॉस एल्मॉस येथील संशोधनकेंद्राचें नांव अजरामर करण्यास सिद्ध आहे. जुन्या–नव्या संस्कृतीचा मेळ या प्रदेशांत पूर्णपणें पाहावयास सांपडतो. विशिष्ट प्रकारच्या पोषाखाची हौस असलेल्या स्पॅनिश लोकांची खाद्यप्रियता व रंगीबेरंगी पोषाखांतील रेड इंडियन्सची नृत्यप्रियता यांचा सुरेख मिलाफ झालेला दृष्टीस पडतो. पर्वताशिखरें, पठारें, दऱ्याखोरीं, वाळवंटें, राष्ट्रीय स्मारकें, ऐतिहासिक संग्रामभूमि इत्यादि विविध नात्यांनीं या स्टेटचें नांव महशूर आहे. सीमेंटच्या भक्कम रस्त्यावरून गाडी जाऊं लागली कीं, प्रदेशाचें विविध सौंदर्य डोळ्यांना एकदम संतुष्ट करतें. एक-दोन घरांचीं खेडीं, इंडियन्सची राखीव जागा, तांबें, शिसें, झिंक यांच्या प्रचंड खाणी यांनीं या स्टेटच्या समृद्धींत भर पडलेली आहे. सर्वांत मोठें शहर अल्बुकर्की असून तेथील वस्ती सुमारें पावणेदोन लाखांची आहे. बहुतेक सर्व शहरें समुद्रसपाटीपासून पांच हजार फुटांवर आहेत. कार्ल्स्बाल्ड ( २८००० ), सॅंटफी ( ३५००० ), गॅलॅप ( १२००० ), अर्टेसिया ( १७००० ), लॉस एलमॉस ( १३००० ), लास क्रुसेस ( २४००० ) लास व्हेगस् ( १५००० ), रॉसवेल (३४०००), क्लोव्हिस (२५०००),

पाटलस ( १०००० ) हीं प्रमुख शहरें असून प्रत्येकाचें स्वतंत्र म्हणून एखादें वैशिष्ट्य आहेच. सृष्टीच्या सर्व प्रकारच्या विविधतेंत एक प्रकारची जादुगिरी आहे. हजारों प्रवासी या जादूनें मोहून जातात. म्हणूनच न्यू मेक्सिकोस 'लँड ऑफ एंचांटमेंट ' असें नांव पडलें आहे.

संशोधक मिशनरी, व्यापारी, साहसी प्रवासी यांनीं या भूमीचें केलेलें संशोधन मोठें मनोरंजक आहे. आठ-दहा हजार वर्षांपासून येथें मानवाची वस्ती झाली असावी. कांहीं संस्कृतीस प्रारंभ केला तो इंडियन लोकांनीं. पुढें दक्षिणेकडील मेक्सिकोमधून संशोधक सुवर्णाचा शोध करीत करीत उत्तरेकडे घुसत राहिले. तिकडे पूर्व किनाऱ्यावर गोऱ्या लोकांची वस्ती होत होती, त्याच वेळेस इकडे दक्षिणेकडून धाडसी स्पॅनिश प्रवाशांची दौड सुरू होती. कोलंबसानें या नव्या खंडाचा नव्यानें शोध लावल्यानंतर पंचेचाळीस वर्षांतच कॅबेझाडी व्हेका नांवाच्या प्रवाशानें न्यू मेक्सिकोच्या सरहद्दीवरून हिंडण्याचा प्रयत्न केला. त्यांना आलेलीं संकटें आज वाचलीं तर एक अद्‌भुत रोमांचकारी कादंबरी वाचल्याचा प्रत्यय येईल. इंडियन्सचे गुलाम म्हणून व्हेको व त्याचे सहकारी यांना रहावें लागलें. उत्तरेस सोनेरी कौलांचीं घरें असल्याच्या रम्य वार्ता ऐकून हे स्पॅनिश लोक मेक्सिको सिटीहून निघाले होते. १५३९ च्या सुमारास फ्रायर मॉरकॉस डी निझा यानें इस्टेव्हॅन नांवाच्या निग्रो माणसास बरोबर घेऊन असाच सोन्याच्या धुराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. फ्रॅन्सिस्को व्हॅस्कीस डी कोरोनॅडो यांची मोहीमहि इतिहासांत प्रसिद्ध आहे. अशा प्रकारें निरनिराळ्या संशोधकांनीं न्यू मॅक्सिकोची भूमि शोधून काढण्यांत, वसाहत करण्यांत मोठेंच धैर्य दाखविलें आहे. पश्चिम व दक्षिण अमेरिकेच्या इतिहासांतील अनेक महत्त्वाचे प्रसंग येथें घडलेले दिसून येतात.

न्यू मेक्सिकोच्या या यक्षभूमींत किती तरी उद्यानें व राष्ट्रीय स्मारकें आहेत. बॅंडेलियर स्मारकाची माहिती स्वतंत्रपणें मागील प्रकरणांत दिलीच आहे. सर्वांत महत्त्वाचें स्थान म्हणजे दक्षिणेकडील लास क्रुसेसजवळ असणाऱ्या कार्ल्स्बाल्ड गुहा. मागें मीं ओव्हायो स्टेटमधील या प्रकारच्या गुहांसंबंधी लिहिलें आहे. त्याहून अधिक रमणीय अशा गुहा न्यू मेक्सिको-मध्यें पृथ्वीच्या पोटांत सांपडल्या आहेत. लक्षावधि वर्षें यांची निर्मिति होत

असावी. या रंगीबेरंगी नाना आकारांच्या, नाना प्रकारांच्या गुहा डोळ्यांचें पारणें फेडणाऱ्या आहेत. शेंकडों प्रेक्षक यांचें दर्शन घेऊन तृप्त होऊन जातात. सर्वांत मोठ्या गुहेची उंची २५० फूट आहे! 'राजाचा दिवाणखाना' 'राणीचा दिवाणखाना' अशीं नांवें कांहींना मिळालीं आहेत. विजेचे पाळणे नुकतेच सुरू झाले असल्याकारणानें प्रवाशी लोकांचा वेळ वांचतो. सतत कायम असें उष्णतामान ५६ अंशांपर्यंत असतें. सृष्टीचा चमत्कार पाहतां पाहतां तहान-भूक हरपून जाते. पण कोणास कांहीं खावयाचें असेल तर जमिनीखालींच ७५० फूट खोल एक भोजनगृह तयार झालेलें आहे. सर्व जगांत या सृष्टिसौंदर्याची ख्याति फार मोठी आहे. इतिहासपूर्व कालांतील रानटी मानवानें कांहीं ठिकाणीं आपलें अस्तित्व या ठिकाणीं कोरलेलें असलें तरी बहुतेक सर्व ठिकाणीं स्वतः निसर्गच कलावंत बनलेला आहे. आज विजेच्या प्रकाशांत नऊ-दहा मैलपर्यंत नित्य नवें सौंदर्य आपणांस पाहतां येतें मार्ग-दर्शिका सर्व माहिती देत असते. छायाचित्रें घेणारांसाठीं स्वतंत्र फेरी ठेवण्यांत आली आहे. बारा वर्षांखालील मुलांना हा सर्व देखावा मोफत पाहतां येतो. थोरांना मात्र दीड डॉलर खर्च येतो.

याच स्टेटमधील शुभ्र वाळवंट मनास सात्त्विक संतोष देणारें आहे. अमेरिकेंतील 'बर्फाचें सहारा वाळवंट' म्हणून या राष्ट्रीय स्मारकाची प्रसिद्धि आहे. लांबच लांब पसरून राहिलेला शुभ्र वाळवंटाचा प्रदेश पाहण्यास त्या मऊ, भुसभुशीत शुभ्रतेंत लोळण्यास किती तरी हौशी लोक येत असतात. अल्मॉगोर्डो शहराशेजारून जाणाऱ्या युनायटेड स्टेट्स रस्ता क्र. ७० वर हें प्रचंड वाळवंट पसरलेलें आहे. झूनी इंडियन वसाहतीशेजारीं असलेलें एल् मॉरो नॅशनल मॉन्युमेंटहि इतिहासप्रसिद्ध आहे. कॉरोनॅडो व त्यांचे सहकारी यांनीं आपल्या ऐतिहासिक प्रवासाची नोंद मोठ्या खडकावर या ठिकाणीं करून ठेवली आहे. उत्तरेस रॅटॉनशेजारीं कॅपुलन पर्वत शांत झालेल्या ज्वालामुखीचें मुख म्हणून तज्ज्ञांना महत्त्वाचा वाटतो. मुखापर्यंत आपणांस जातां येतें. याशिवाय जुन्या काळच्या वस्तीचीं किती तरी ठिकाणें आज पुरातन स्मारकें म्हणून राखून ठेवण्यांत आलीं आहेत. ऐतिहासिक महत्त्वाचीं चर्चेस किती तरी पाहावयास सांपडतत. न्यू मेक्सिको स्टेटचीं म्हणून आणखी स्वतंत्र उद्यानें आहेतच. बॉटमलेस् लेक्स स्टेट पार्क

हिडेस्टेट पार्क, कॉन्ब्लस डॅम स्टेट पार्क, सिटी ऑफ् रॉक्स, किट् कार्सन स्टेट पार्क, ब्लू वॉटर पार्क हीं उद्यानें न्यू मेक्सिकोच्या रखरखीत मरुभूमीस चैतन्य प्राप्त करुन देत असतांना दिसतात. मिशन चर्चेसची परंपरा ख्रिस्ती लोकांना अभिमान वाटेल अशीच आहे. तीनशें चारशें वर्षांपूर्वीचीं चर्चेस आतां ऐतिहासिक वसाहतीचीं साक्ष देणारीं म्हणून प्रसिद्ध आहेत. इंडियन्सनीं हीं चर्चेस जाळावीत आणि गोऱ्यांनीं पुन्हां उभारावीत असा क्रम चालू होता. रेड इंडियन्सना ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्यासाठींच हीं चर्चेस असल्यामुळें त्यांच्या कार्यास आजहि महत्त्व आहे. अजून अशीं दहा चर्चेस न्यू मेक्सिकोमध्यें कार्य करीत आहेत. या सर्व चर्चेसची बांधणी इतरत्र कोठेंहि बघावयास मिळणार नाहीं.

न्यू मेक्सिको स्टेटमध्यें रॉकी पर्वताच्या दक्षिण भागाच्या रांगा येत असल्यानें चराऊ कुरणें खूपच आहेत. मध्येंच सरोवरें, नद्या, धरणें यांनी या राज्याच्या विविधतेंत भर पडली आहे. वनस्पतींचे नाना प्रकार असून स्टेटचें युका पुष्प सर्वांचें आवडतें आहे. माणसानें अजून स्पर्श न केलेला असा भू-विभाग सुमारें १,०००,००० एकरांचा आहे. पांच हजार फुटांपासून तेरा हजार फुटांपर्यंत हा प्रदेश अजून माणसाळलेला नाहीं. सबंध स्टेटमध्यें एकंदर वस्ती फारच तुरळक आहे. सँटफीचा आठ दिवसांचा मुक्काम संपल्यावर मी बसनें अगदीं दुसऱ्या टोंकास नैर्ऋत्येस यावयास निघालों होतों. सँटफी, वॅघन, रॉसवेल, सनसेट, हॉंडो, ग्रीन ट्री, हॉलीवुड, अलमॅगोर्डो, लास क्रुसेस, डेमिंग, बेअर्ड आणि मग सिल्व्हर सिटी असा मार्ग मी सबंध दिवसभर आक्रमीत होतों.

सकाळीं साडेसाताला सँटफी सोडल्यानंतर न्यू मेक्सिकोची यक्षभूमि सतत तेरा-चौदा तास मी पाहत होतों. सबंध अमेरिकेंत हा प्रदेश मला पसंत पडला. कारणें अनेक होतीं. धांवपळीच्या, गर्दीच्या जीवनास मी कंटाळलों असल्यानें हें शांत असें निसर्गाचें रूप बरें वाटलें. भव्यता नव्हती. भपका नव्हता. खानदेशांतील घरांप्रमाणें धाब्याचीं मातीचीं घरें सर्वत्र पाहून मनास जवळीक वाटूं लागली. तिसरें कारण असें कीं, मी आतां एक महिना दीड महिना एकटाच होतों. त्यामुळें थोडी खुशी वाढली असल्यास नवल काय? आणि आणखी महत्त्वाचें कारण म्हणजे मनांत बाळगून

ठेवलेली आशा–रेड इंडियन्सच्या जीविताची प्रत्यक्ष माहिती मिळविण्याची थोड्या अंशानें का होईना पण पूण झाली होती. आणि शेवटचें पण खरें कारण असें कीं, या भागांत मला तिखटामिठाचे पदार्थ प्रथमच खावयास मिळत होते. उत्तरेंतील आळणी आळणी अन्नाचा मला कंटाळा आला होता. सँटफीस तिखटांमिठाचे पदार्थ भरपूर मिळूं लागले. रेड इंडियन्सच्या संगतीनें स्पॅनिश लोकांनीं ज्या अनेक गोष्टी उचलल्या त्यांत तिखटामिठाचें व मसाल्याचें खाणें ही मुख्य होय. लास क्रुसेस येथें मला एक 'दि वर्ल्ड बुक' नांवाच्या एका मुलांच्या ज्ञानकोशाची प्रचारिका भेटली. तिनें सर्व चौकशी करून मला तेथील लज्जतदार 'इंचीलाडा' या तिखटामिठाच्या पदार्थांचा पहिल्यानें परिचय करून दिला. या सर्व कारणांनीं न्यू मेक्सिकोबद्दल वाटणारें ममत्व शिगेस पोंचल्याची प्रचीति पदोपदीं मला येत होती. लँड ऑफ् एंचांटमेंट म्हणून या स्टेटचा गौरव यथार्थ आहे, असें प्रत्ययास आलें. अमेरिकन शहरांतील तोचतोचपणा पाहून कंटाळलेल्या माझ्यासारख्या नवख्या माणसास न्यू मेक्सिकोच्या यक्षभूमींत एक महिना राहावयाचें होतें. याच एका गोष्टीमुळें मी हरखून गेलों होतों.

अमेरिकेंत एकुण तीन रंगांचीं माणसें दृष्टीस पडतात. तीन-चार शतकांपूर्वीं नाना कारणांसाठीं येथें युरोपांतून आलेले गोरे लोक यांनीं या देशांत आपल्या बुद्धिसामर्थ्यांवर व चिकाटीवर आधुनिक संस्कृतीचा भव्य इमला उभा केला. त्यांच्याबरोबरच प्रथम गुलाम म्हणून आले ते आफ्रिकेंतील काळे निग्रो लोक. अतिशय कष्टाचे असे दिवस यांनीं प्रथम गोऱ्या लोकांबरोबर काढले असले तरी सर्व बाबतींत त्यांची आज प्रगति झपाट्यानें होत आहे. काळे निग्रो व गोरे युरोपियन येथें येण्यापूर्वीं किती तरी शतकें अगोदर येथें वस्ती होती ती ताम्रवर्णीय लोकांची. सन १४९२ मध्यें हिंदुस्थान शोधावयास निघालेला कोलंबस या देशाच्या किनाऱ्यास लागला. त्यास प्रथम हीं तांबड्या रंगाचीं, चित्रविचित्र पोशाख केलेलीं माणसें दिसलीं. या नव्या देशास त्यानें हिंदुस्थान समजून या 'हिंदी' लोकांना 'रेड इंडियन्स' असें नांव दिलें. अर्थात् अमेरिकेंतील माणसांच्या रंगावरून केलेलें हें वर्णन अगदीं स्थूलमानानें समजावयाचें. काळसरपणांत जमा होतील असे किती तरी युरोपियन लोक येथें दिसतील. शुभ्र रंगाच्या कातड्याचे निग्रोहि मधून मधून आढळतील आणि रेड इंडियन्स तर नाना रंगांचे आहेत. उन्हाचा त्रास होऊं नये म्हणून, रानावनांतील भुतांखेतांचा त्रास होऊं नये म्हणून, विषारी कीटकांपासून बचाव व्हावा म्हणून ही मंडळी अंगास तांबडी माती फासत असत. म्हणून तर कोलंबसास हे लोक तांबड्या रंगाचे वाटले. आज हे सर्व रेड इंडियन्स ' अमेरिकन इंडियन्स ' या नांवानें ओळखले जातात. एक खरा इंडियन म्हणून अमेरिकेंतील या ' त्रैवर्णिकांबद्दल ' अमेरिकन इंडियन्स-बद्दल एक मजेदार लोककथा प्रचलित आहे : परमेश्वरानें सृष्टि निर्माण केली आतां त्याला मनासारखा मनुष्य तयार करावयाचा होता. प्रथम एक

माणूस तयार करून त्याला पक्केपणा यावा म्हणून परमेश्वरानें निखाऱ्यांत खुपसून ठेवलें. पण परमेश्वर दुसऱ्याच कोणत्या तरी कामांत गुंतून राहिल्यामुळें या माणसास बाहेर काढावयास उशीर झाला. माणूस करपून काळा ठिक्कर पडला. हा माणूस म्हणजे पहिला निग्रो. दुसऱ्या खेपेस परमेश्वर फारच सावध राहून वेळेच्या आधींच माणसास निखाऱ्यांतून बाहेर काढलें, त्यामुळें तो कच्चाच म्हणजे पांढरा शुभ्र राहिला तो पहिला गोरा मनुष्य. आतां तिसऱ्या खेपेस मात्र त्यानें विशेष लक्ष दिलें आणि योग्य वेळ होतांच त्यानें तिसऱ्या माणसास विस्तवांतून बाहेर काढलें. त्याच्या पसंतीस उतरलेला हा पहिला ताम्रवर्णीय मनुष्य. या आदिवासियांची मला पहिल्यापासूनच जिज्ञासा होती. अमेरिकेच्या पूर्व भागांत असतांना येथील इंडियन्सबद्दल मीं खूप ऐकलें होतें, वाचलें होतें. पण ही सर्व मंडळी पश्चिम भागांत आपल्या स्वतंत्र राखीव क्षेत्रमर्यादेंत राहत असल्यानें मी केवळ वाचनावरच संतुष्ट होतों. जानेवारी महिन्यापासून मी आतां येथें न्यू मेक्सिको स्टेटमध्यें होतों. माझ्या येथील मुक्कामांत मला किती तरी इंडियन्स भेटले. मी त्यांच्या वस्तींना दोन-तीन वेळां भेटी दिल्या. त्यांचे चित्रविचित्र पोशाख व त्यांचे नृत्यप्रकार पाहून या खऱ्या अमेरिकन आदिवासींची अधिकच जिज्ञासापूर्वक चौकशी करावीशी वाटली.

कोठून आले हे चित्रविचित्र लोक ? कोणत्या शतकांत हे येऊन स्थायिक झाले ? त्यांची भाषा कोणती ? त्यांचा धर्म कोणता ? त्यांनीं कोणत्या संस्कृतीची उभारणी केली ? कीं त्यांना संस्कृति नाहींच ? इत्यादि शेंकडों प्रश्न माझ्या मनांत निर्माण झाले. येथील जाणत्या पंडितांनीं या-विषयीं अलीकडे खूपच संशोधन केलें आहे. अनेक ठिकाणच्या उत्खननांत आजच्या अमेरिकन इंडियन्सचे पूर्वावशेष सांपडले आहेत. त्यांचीं घरें, त्यांचीं भांडींकुंडीं, त्यांचीं हत्यारें, त्यांच्या गुहा, त्यांचीं मंदिरें, त्यांचीं देवदैवतें यांच्या खुणांचा अभ्यास आज तज्ज्ञ लोक करीत आहेत. या लोकांच्या इतिहासावर जसजसा अधिक अधिक प्रकाश पडत आहे तसतसे इतिहासाचे अनेक दुवे आज सांपडण्यास मदत होत आहे. गोऱ्या लोकांनीं येथें एक विशिष्ट प्रकारची संस्कृति उभारली तरी ते येथें येण्यापूर्वींहि एक विशिष्ट प्रकारची संस्कृति येथें होती. अमेरिका शोधून काढली ती

या आदिवासी लोकांनीं. या देशांत माणसाची खरी वसाहत हजारों वर्षांपासून झालेली आहे. या देशाचा इतिहास आपण समजतों त्याप्रमाणें तो तीन-चार शतकांचा नाहीं. चार-पांच हजार वर्षांमागें जाऊन येथील मानवाच्या राहणीचे व त्यांच्या संस्कृतीचे अंदाज आज अचूकपणें करतां येणें शक्य झालें आहे. युरोपांतील अनेक पंथीयांचें व धर्मीयांचें एक चमत्कारिक मिश्रण अमेरिकेंतील गोऱ्या लोकांत आहे; पण त्यांच्या संस्कृतीवर छाप आहे ती रेड इंडियन्स लोकांची. किती तरी गोष्टी गोऱ्या लोकांनीं इंडियन्सपासून घेतल्या आहेत. अमेरिकेंतील नद्यांचीं, शहरांचीं, पर्वतशिखरांचीं, गांवांचीं नांवें या दृष्टीनें पाहण्यासारखीं आहेत. ओव्हायो, मिसिसिपी, मॅसॅच्युसेट्स्, मिशिगन, इलिनॉइस, कॅंटकी, टेनसी, मिसुरी, ॲरिझोना, न्यू मेक्सिको, विसकॉन्सिन अशीं किती तरी उदाहरणें देतां येतील. मका, बटाटे, रताळीं, मिरची व अनेक प्रकारची अन्नसामग्री गोऱ्या लोकांना माहीत झाली ती रेड इंडियन्सपासून. न्यू मेक्सिको स्टेटमध्यें एक प्रकारच्या मातीनें सारवलेलीं घरें पहिल्या प्रतीचीं समजलीं जातात. पण घरांची ही ठेवण स्पॅनिश लोकांनीं इंडियन्सपासून उचलली आहे. दररोज दहा वेळां तरी गोरे लोक आपल्या बोलण्यांत ओ. के. (O. K.) हा शब्द मोठ्या ऐटींत वापरीत असतात. पण त्या वेळीं हा शब्द इंडियन आहे हें त्यांच्या ध्यानांतहि नसतें.

हे इंडियन्स केव्हां, कसे व कोठून आले, माणसाच्या उत्पत्तीच्या कथा प्रत्येक जमातींत प्रसिद्ध आहेत. कांहीं माणसें समुद्रांतून वर आलीं, कांहीं आकाशांतून आलीं. रेड इंडियन्स सांगतात कीं, आम्ही सर्व लोक फार पूर्वीं जमिनीच्या पोटांतून वर आलों. पण आज शास्त्रज्ञांनीं बरेंच संशोधन केलें असल्यामुळें या सर्व समजुती केवळ गंमतीच्याच समजावयाच्या. शास्त्रज्ञांच्या निष्कर्षांचा विचार केला, तर कोलंबसानें यांना इंडियन्स चुकीनें मानलें तरी त्याच्या चुकींत खूपच तथ्य दिसतें. शास्त्रज्ञ सांगतात ही सर्व मंडळी हजारों वर्षांपूर्वीं पूर्वेकडून आशियांतून या भूमींत आलीं! आशिया तर येथून हजारों मैल दूर! पण थोड्या विचारानें ध्यानांत येतें कीं, उत्तर अमेरिकेच्या अलास्का प्रांताचें टोंक व आशियांतील सैबेरियाचें टोंक यांच्यांत आज पन्नास मैलांचाच जलविभाग आहे. फार पूर्वीं हीं

दोनहि भूपृष्ठांचीं टोंकें जोडलेलीं असावींत व या मार्गांतून हे सर्व लोक गटागटानें कांहीं शतकांच्या अंतरानें उत्तर अमेरिकेंत, मध्य अमेरिकेंत, मेक्सिकोंत, दक्षिण अमेरिकेंत वसाहत करीत पसरले असावेत. दहा हजार वर्षांपासून हें मानवजातीचें चमत्कारिक संक्रमण चालू होतें. एका विशिष्ट धर्माचे, एका जमातीचे, एकाच भूपृष्ठांतून आलेले हे लोक होते असें नाहीं. आजहि रेड इंडियन्समध्यें अनेक धर्मपंथ, अनेक वेगळ्या चालीरीति अनेक वेगळ्या भाषा रूढ असलेल्या दिसतात. पण एवढें निश्चित कीं, ही सर्व मंडळी आशियांतून आली. हिंदु लोकांनीं दक्षिण अमेरिकेंत एकेकाळीं वसाहत केलेली होती. दक्षिण अमेरिका, मेक्सिको येथें या खुणा आजहि दृष्टीस पडतात.

आणि अमेरिकन इंडियन्सच्या चालीरीतींत, धर्मविचारांत आणि सांस्कृतिक परंपरेंत कमालीचें साम्य हिंदु संस्कृतीशीं दिसून येतें. न्यू मेक्सिको स्टेटच्या राजधानीस सॅंटफीस मी आठ-दहा दिवस होतों. तेथें असलेलें दि म्युझियम आफ् नॅवॅहो सेरिमोनिअल आर्ट (The Museum of Navajo Ceremonial Art) पाहून मला अनेक गोष्टींचें नवल वाटलें. नॅवॅहो (Navajo) ही अमेरिकन इंडियन्सची एक प्रमुख जमात. त्यांच्या धर्मविचारांचें, संस्कृतीचें, कलाकृतींचें व नित्यनैमित्तिक व्रतांचें हें संग्रहालय, तेथील रांगोळीनें काढलेलीं चित्रें, त्यांच्या पाठीमागच्या रूपककथा, त्यांच्या प्रार्थनांचे अर्थ, त्यांचे धर्मविचार. स्वस्तिकांतील गूढ गर्भितार्थ, पृथ्वीची उत्पत्ति-कथा, सूर्यदेवतेचें वैभव, नाना प्रकारचीं 'दर्भा'सनें, त्यांच्या लोककथा, यांचीं निरनिराळीं गीतें, जलदेवतेचीं, सूर्यदेवतेचीं, पृथ्वीचीं, पर्वताचीं त्यांनीं गाइलेलीं सूक्तें, चार दिशांस वसणारे दिक्पाल इत्यादि गोष्टींचें बारकाईनें निरीक्षण केल्यास हे सर्व लोक पूर्वीं केव्हां तरी हिंदु धर्माशीं, बौद्ध धर्माशीं संबंधित असावेत असें वाटूं लागतें. येथील तज्ज्ञांनीं हाच निष्कर्ष आपल्या दीर्घ संशोधनानें काढला आहे. कोलंबसाच्या चुकींतहि सत्याचा अंश हा असा आहे. अर्थात् भिन्नताहि खूप आहे हेंहि नमूद करावयास पाहिजे.

अमेरिकेंतील इंडियन्सच्या अनेक जमाती-उपजमाती आहेत. न्यू मेक्सिको स्टेटमध्यें मुख्यतः तीन प्रकारचे इंडियन्स आहेत. स्पॅनिश लोक

मेक्सिकोंतून या न्यू मेक्सिकोंत आले, तेव्हां त्यांनीं या लोकांना खेडेगांवांत मातीचीं घरें करून राहतांना पाहिलें. स्पॅनिश भाषेंत खेडुतास प्युब्लो (Pueblo) असा शब्द असल्यानें यांनीं या लोकांना प्युब्लो इंडियन्स (Pueblo Indians) असें नांव दिलें. या जमातीनें या स्टेटचा बराच भाग व्यापला आहे. ही सर्व मंडळी आपल्या राखीव जागेंत अजून पूर्वींच्याच पद्धतीनें राहतात. त्यांचा रंगीबेरंगी पोशाख व डोक्यावरील पिसांचीं शिरस्त्राणें अजूनहि लोकांना विलोभनीय वाटतात. स्टेशनवर, रस्त्याच्या कडेनें सार्वजनिक बागेंत हे लोक मातीचीं भांडीं आणि दागदागिने विकत असतांना दृष्टीस पडतात. सॅन इल्डिफेन्सो (San Ildefonso) व सेन्टा क्लॅरा (Santa Clara) या त्यांच्या दोन वस्तींना मीं भेट दिली. गोऱ्या माणसास सहसा तेथें प्रवेश मिळत नाहीं. आधीं परवानगी मागावी लागते. माझ्याबरोबर माहितीचा एक गोरा मनुष्य होता म्हणून माझा प्रवेश गव्हर्नरच्या घरांतहि होऊं शकला. या गव्हर्नराची निवड नुकतीच पुनः तिसऱ्यांदां झाली होती. त्याच्या घरीं भिंतीवर लावलेलीं चित्रें, घरांतील भांडींकुंडीं, मातीनें सारवलेलें घर व घरांतील माणसांच्या चेहऱ्यांची ठेवण पाहून मला क्षणभर सातारा जिल्ह्यांतील माझ्या खेडेगांवीं आल्याचा भास झाला. गव्हर्नरनें दोनहि अंगांस सोडलेल्या दोन वेण्या पाहून मला आपल्या मंगोलियन लोकांची आठवण झाली. त्याच्या बायकोचा पोशाख कांहींसा इंग्रजी पद्धतीचा होता तरी त्यांत कांहीं जातीय खुणा होत्याच. या गव्हर्नराच्या सन्मानार्थ त्या दिवशीं त्याच्या घरासमोर ' गरुडनृत्य ' होणार होतें. पण दोन-तीन दिवसांपूर्वीं कोणी नातेवाईक दिवंगत झाल्यामुळें हें नृत्य ठरलेल्या जागीं न होतां जरा दूर अंतरावर एका मोकळ्या पटांगणांत झालें.

या सर्व Pueblo इंडियन्सची कॅट्सीना दैवतावर फार भक्ति. कॅट्सीनाच्या अनेक कथा आज अमेरिकेंत प्रसिद्ध आहेत. पाऊस आणणारें हें दैवत मानलें जातें. लोक दुःखी, कष्टी झाले कीं या देवता त्यांच्या बरोबर येऊन नाचूं लागत आणि मग पिकास आवश्यक तो पाऊस पडे. पुढें कालांतरानें माणसें शहाणीं झालीं आणि मग कॅट्सीना येईनाशा झाल्या, तरी पण आजहि या दैवतावर इंडियन्सची अतोनात

श्रद्धा आहे. हे इंडियन्स निसर्गाचेहि उपासक आहेत. ज्या ज्या निसर्ग-शक्ति, प्राणी, अन्नपदार्थ त्यांना प्रथम उपयोगी पडले, त्यांचीं त्यांचीं नृत्यें रूढ झालीं आहेत. ऋतूंचें चक्र बरोबर नियमितपणें फिरावें, जमिनीचा कस वाढावा. पर्वतानें, नदीनें आश्रय द्यावा म्हणून अनेक प्रकारचीं नृत्यें आजहि रूढ आहेत. इसवी सनाच्या दहाव्या शतकापासून येथें स्थायिक झालेले Navajo इंडियन्स आपल्या विशिष्ट धर्मपद्धतीमुळें प्रसिद्ध आहेत. नाना प्रकारचे दागिने घालून चित्रविचित्र पोशाखांत हिंडणारे हे इंडियन्स लोकांचें लक्ष आपणांकडे ओढून घेतात. हातांतील, गळ्यांतील, कानांतील अनेक आकारांचे व रंगांचे दागिने करणारे म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे. लांकडाच्या व मातीच्या घरांत राहणाऱ्या या लोकांचा धर्म अतिशय कडक आहे. प्रकृति सुधारण्यासाठीं, अन्नप्राप्तीसाठीं, जीवितरक्षणासाठीं, संकटनिवारणासाठीं यांचीं अनेक व्रतवैकल्यें आहेत. यांचे अनेक मंत्र अनेक अर्थांचे, अनेक प्रसंगीं उपयोगी पडणारे आहेत. रांगोळीच्या अनेक गूढ आकृत्या यांना परमेश्वरापासून प्राप्त झाल्या आहेत. या स्टेटमधील इंडियन्सचा तिसरा गट म्हणजे अॅपॅची ( Apache ) इंडियन्सचा. शूर योद्धे म्हणून यांची प्रसिद्धि आहे. शरिरानें धट्टेकट्टे व बांधीव असलेले हे लोक मोठे रुबाबदार दिसतात. गवताच्या टोपल्या विणण्यांतहि यांचें कौशल्य प्रकट झालेलें दिसतें. पण तूर्त यांचा मुख्य धंदा म्हणजे गुरें पाळण्याचा आहे.

न्यू मेक्सिको स्टेटमधील इंडियन्स हे नव्या प्रवासी लोकांचें मोठेंच आकर्षण बनून राहिलें आहे. मातीचीं सुंदर आकारांचीं व नक्षीचीं भांडीं विकावयास बसलेल्या रंगीबेरंगी पोशाखांतील इंडियन्सभोंवतीं सदोदित दहा-पांच तरी प्रवासी लोक असतातच. बायकांचा विशिष्ट भडक रंगाचा पोशाख, गळ्यांतील हातांतील दागिने, चेहऱ्याची व केसांची विशिष्ट ठेवण, पुरुषाच्या दोन वेण्या, त्याच्या डोक्यास गुंडाळलेली रंगीत कापडाची पट्टी आणि त्यांच्या समोर असलेली नाना आकारांचीं, प्रकारांचीं नक्षीचीं भांडीं, सर्वांना कौतुकाच्या वाटणाऱ्या या गोष्टी आहेत. हा त्यांचा धंदा फार जुन्या काळापासूनचा आहे. सर्व गोऱ्या लोकांना मातीच्या या भांड्यांचें आज फार नवल वाटतें. चांदीचे दागिने करण्यांतहि ही मंडळी

विशेष पटाईत आहेत. एका विशिष्ट निळ्या दगडाभोंवतीं नाना नक्षीच वेष्टण बसवून तयार झालेले दाग–दागिने मोठमोठ्या दुकानांत मोठ्या मानाच्या जागी मांडलेले असतात. गोऱ्या लोकांना याचेंहि फार आकर्षण वाटतें. नॅव्हो जमातीचे इंडियन्स विणकाम करण्यांत प्रसिद्ध आहेत. हातमागावर लोंकरीचे अनेक कपडे यांच्या बायका विणीत असतात. विशेषतः जमिनीवर अंथरण्यासाठीं लोंकरीच्या सतरंज्या अनेक रंगांत व अनेक आकारांत यांनीं विणलेल्या पहावयास मिळतात. अनेक प्रकारची चित्रकारी हा एक मोठा उद्योग इंडियन्स करीत असतात.

असे हे अमेरिकेंतील नाना पंथांचे, नाना धर्मांचे, नाना भाषा बोलणारे आदिवासी. सर्व अमेरिका झपाट्यानें गेल्या दोन शतकांत बदलून गेली. त्यांनीं आकाशास भिडणाऱ्या इमारती बांधल्या, यांत्रिक जीवनाची सीमा गांठली, ज्या न्यू मेक्सिको स्टेटमध्यें सर्वांत जुनीं मानवी हत्यारें सांपडलीं त्याच स्टेटमध्यें सर्वांत नवें अणुशस्त्र पहिल्यानें तयार झालें आणि सर्व जगाच्या इतिहासास नवें वळण मिळालें. दर दहा वर्षांनीं अमेरिकेच्या जीवनांत कमालीचें स्थित्यंतर घडून आलें– पण या देशांतील हजारों इंडियन्स अजूनहि आपल्या जुन्यापुराण्या पद्धतीनें अलिप्तपणें राहतात ! गोऱ्या लोकांचा सहवास सहसा टाळतात. येथील निग्रो त्या मानानें किती तरी सुधारलेले, पुढारलेले वाटतात. पण इंडियन्स आपल्या राखीव क्षेत्रमर्यादेंतून बाहेर पडावयास तयार नाहींत. गोऱ्या लोकांनीं यांना गेल्या शतकांत अतिशय निर्दयतेनें वागविलें. मित्र म्हणून यांनीं प्रथम गोऱ्या लोकांना उदार अंतःकरणानें आश्रय दिला. पण गोरे लोक यांच्यावरच उलटले. उलटपक्षीं, मारामाऱ्या, युद्धें परवापरवापर्यंत होत राहिलीं. अमेरिकेच्या इतिहासांत हें अतिशय रोमहर्षक प्रकरण आहे. नव्या मन्वंत गोऱ्यांनाहि आपली चूक समजून आली. अमेरिकन सरकार एके काळच्या आपल्या या शत्रूसाठीं आज त्याची परिस्थिति सुधारावी म्हणून अतोनात प्रयत्न करीत आहे. त्यांना शिक्षण मिळावें, त्यांना औषधपाण्याची मदत व्हावी, त्यांचीं घरें आरोग्यदृष्ट्या सुधारावींत, त्यांना नव्या जगाचें ज्ञान व्हावें म्हणून येथील मध्यवर्ती सरकार पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहे आणि याचा परिणाम झाल्यावांचून कसा राहील ? गेल्या पंधरा

वर्षांत अमेरिकन इंडियन्स खूप सुधारलेले दिसतात. विजेचे दिवे, पाण्याचे नळ, टेलिव्हिजन, मोटार हें सर्व. अमेरिकन वैभव आतां त्यांच्या कांहीं घरांतून दिसूं लागलें आहे. इंग्रजी शिक्षण घेणारी तरुण पिढी आतां इंग्रजी पद्धतीनें पोषाख करूं लागली आहे. त्यांचें बोलणें, त्यांचें वागणें आणि त्यांचे रिवाज आतां अमेरिकन सांचाचे होऊं लागले आहेत. अमेरिकन इंडियन्स सुधारण्याच्या मार्गावर आहेत हें पाहून एक प्रकारें बरें वाटलें. पण त्यांची विशिष्ट संस्कृति, त्यांचे धर्मविचार, त्यांची राहणी, त्यांचे चित्रविचित्र पोषाख, त्यांचीं अर्थगर्भ व गोऱ्या लोकांपेक्षां किती तरी पटींनीं श्रेष्ठ दर्जाचीं असणारीं नृत्यें, त्यांचे उद्योगधंदे, त्यांचें कलाकौशल्य या सर्व वैभवाच्या गोष्टी कालांतरानें नष्ट होणार कीं काय, या विचारानें मनास कमालीचा विषादहि वाटला.

# १९ : रेड इंडियन्सचें गरुडनृत्य

कोलंबस येथें मी ज्यांच्या घरीं राहत होतों, त्या मि. फ्रँक यांच्या घरीं एके दिवशीं रात्रीं एक विचित्र सभा होती. सात–आठ मुलें आपापल्या वडिलांच्याबरोबर तेथें एकत्र झालीं होतीं. त्यांचे पोषाख थोडे विचित्रच होते. प्रत्येकास वेगवेगळें सांकेतिक नांव होतें. प्रत्येकानें आपल्या डोक्यावर पिसांनीं सुशोभित केलेली एक छोटीशी रंगीत पट्टी बांधली होती. कमरेसहि तसल्याच प्रकारचें रंगीत कापड गुंडाळलें होतें. इंडियन गाईड्सची ही मासिक सभा होती.

अमेरिकेंतील आदिवासी रेड इंडियन्स यांच्यांतील बाप व मुलगा यांचें नातें आदर्श म्हणून मानलें जातें. त्याची आठवण लहान मुलांना करून देण्यासाठीं व अमेरिकन इंडियन्सच्या रंगीबेरंगी जीवनाची ओळख करून देण्यासाठीं गोऱ्या लोकांनीं ही पद्धति सुरू केली होती. अमेरिकेंत आल्यापासूनची माझ्या मनांत येथील इंडियन्सबद्दल असणारी जिज्ञासा या प्रकारामुळें फारच वाढीस लागली. पंधराव्या शतकाच्या अखेरीस कोलंबस येथें आला व त्यानें येथील आदिवासींना त्यांच्या रंगावरून 'रेड इंडियन्स' असें नांव दिलें. आपण हिंदुस्थान शोधून काढला, अशीच त्याची कल्पना जन्मभर होती. त्याच्या मतें हे लोक इंडियन्सच होते.

अमेरिकेच्या पूर्व भागांत रेड इंडियन्स सांपडणें कठिण. गोऱ्या लोकांनीं या आपल्या आदिमित्रांचा अतोनात छळ केला व त्यांना मागें रेटीत रेटीत पश्चिमेकडे हाकून दिलें. त्यांच्या राखीव क्षेत्रांत ते अजूनहि पूर्वींप्रमाणेंच राहतात, असें मी नुसतें ऐकलें होतें. या त्यांच्या भूमीकडे जाण्याची माझ्या मनास विलक्षण ओढ होती. कॅलिफोर्निया, कॉलोराडो, फ्लॉरिडा हीं राज्यें निसर्गसमृद्ध अशीं आहेत. तेथें राहण्यास मिळावें म्हणून आम्हांपैकीं कित्येकांची धडपड चालू होती. मी न्यू मेक्सिको

स्टेटमध्यें जाणार आहें, हें मला वॉशिंग्टनहून समजलें त्या वेळीं पराकाष्ठेचा आनंद झाला. कारण या स्टेटमध्यें जवळ जवळ पन्नास हजार इंडियन्स राहतात.

नाताळच्या सुमारास मी दक्षिणेकडील भागांत प्रवास करून टेक्सेस स्टेटमधील अमॅरिलो गांवीं आलों. न्यू मेक्सिको स्टेटची हद्द येथून जवळच होती. गाडी येण्यास थोडा अवकाश होता, म्हणून मी वेटिंग-रूममध्येंच बसून होतों. इतक्यांत एक रंगीबेरंगी पोषाख केलेली बाई गळ्यांत, हातांत, कानांत भरपूर दागिने घातलेली अशी माझ्या समोरून गेली! ही अमेरिकेंत मी पाहिलेली पहिली इंडियन काकी–मामी. चेहऱ्याची, डोळ्यांची ठेवण थेट पूर्वेकडील मंगोलियन पद्धतीची वाटली. प्रवासी लोकांना आपणांजवळचे दागदागिने विकत देण्यासाठीं ती स्टेशनवर आली होती. गाडी आल्यामुळें या भेटलेल्या पहिल्या इंडियनची मला ओळख करून घेतां आली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं न्यू मेक्सिको स्टेटची राजधानी सँटफी येथें मी आलों. सर्व अमेरिकन शहरांहून हें शहर सर्व दृष्टींनीं वेगळें आहे. उंच उंच इमारती नाहींत, मोटारींची धांवपळ नाहीं, अवाढव्य दुकानें नाहींत, गर्दी नाहीं, गोंधळ नाहीं. इंग्लिश, स्पॅनिश व इंडियन्स यांच्या मिश्रणाची एक अद्‌भुत संस्कृति या शहरांत आहे. सात हजार फूट उंचीवर असणाऱ्या या शहराची लोकसंख्या अवघी पस्तीस हजार! या विचित्र नगराची माहिती मी मागें विस्तारानें दिलीच आहे.

चेंबर ऑफ कॉमर्सकडून व न्यू मेक्सिको असोसिएशन ऑफ इंडियन अफेअर्सकडून मीं या स्टेटमधील इंडियन्ससंबंधीं बरीच माहिती मिळविली. आपल्या राखीव क्षेत्रांतील निरनिराळ्या खेड्यांतून हे इंडियन्स अजूनहि हजारों वर्षांपूर्वींच्या या थाटांत राहतात. अशीं त्यांच्या वस्तीचीं ठिकाणें सँटफीभोंवतीं व एकूण न्यू मेक्सिको स्टेटमध्यें अठरा-एकोणीस आहेत. त्यांना इंडियन पिब्लोज म्हणतात. स्पॅनिश भाषेंत पिब्लोज म्हणजे खेडे-गांवांत राहणारीं माणसें. यांपैकीं कांहीं पिब्लोजना भेट देण्याचा माझा विचार होता. पण परक्या लोकांना परवानगीशिवाय तेथें प्रवेश करतां येत नाहीं, हें मला कोणीं तरी सांगितलें होतें. सँटफी येथील शिक्षण-

अधिकाऱ्यांना गांठून मीं त्यांच्या वसाहतींना ६ जानेवारीस भेट देण्याची परवानगी मिळविली व एक वाटाड्याहि मिळवला. ६ जानेवारीस त्यांच्या खेड्यांत नृत्य होणार असल्याचें मला समजलें होतें.

गांवांत बरींच इंडियन माणसें फिरतांना दिसत होतीं. सँटफीस गव्हर्नर्स पॅलेस म्हणून एक मध्यवर्ती ऐतिहासिक ठिकाण आहे. तेथें बऱ्याच इंडियन स्त्रिया आपलें रंगीत पांघरूण पांघरून सकाळीच थंडींत आपली 'ज्युएलरी' विकत बसलेल्या दिसत होत्या. मला या दागदागिन्यांचा फारसा लोभ नव्हता. शिवाय त्यांतलें कांहीं कळतें असेंहि नाहीं. पण या बायकांच्या पोषाखानें मात्र माझें लक्ष वेधून घेतलें. मीं त्यांपैकी एकीच्या जवळ जाऊन शक्य तेवढ्या नम्र स्वरांत विचारलें : "बाई, मी तुमचा फोटो घेऊं का?" चकित होऊन त्या बाईनें माझ्याकडे पाहिलें व तेवढ्याच नम्रतेनें तिनें उत्तर दिलें : "कांहीं विकत घेणार? विकत घेतलें तर फोटो घ्या माझा–" मला तिच्या दागिन्यांशीं कांहीं कर्तव्य नसल्यामुळें मीं फार दूर अंतरावर जाऊन त्या सर्वांचा फोटो घेतला.

१ जानेवारीस इंडियन जमातींनीं आपल्यांतून एक गव्हर्नर निवडला होता. त्याच्या सन्मानार्थ ६ जानेवारीस प्रत्येक ठिकाणीं नृत्याचा कार्यक्रम होता. सँटफीपासून वीस-पंचवीस मैलांवर असणाऱ्या सॅन इल्डिफेन्सो ( San Ildefenso ) या वसाहतींत मी माझ्या वाटाड्याबरोबर गेलों. शहरी वस्तीपासून अगदीं अलिप्त असणारें हें एक बारकेंसें खेडें. सर्व मातीचीं घरें. माझ्या वाटाड्यानें तेथील गव्हर्नरशीं ओळख करून दिली. नृत्याचा कार्यक्रम सुरू होण्यास अजून दोन-तीन तास अवकाश असल्यामुळें आम्हीं इतर ठिकाणें पाहून घेतलीं.

अमेरिकन इंडियन्सच्या जीवनांत नृत्यास फार मोठें स्थान आहे. नृत्य हेंच त्यांचें जीवन म्हणानात! ज्या ज्या निसर्गशक्ति त्यांना उपयोगी पडल्या, जे जे प्राणी त्यांच्या जीवनास मदत करणारे झाले, जीं जीं पिकें त्यांना जीवन देणारीं झालीं, त्यांचीं त्यांचीं नृत्यें शेंकडों वर्षांपासून त्यांच्या जीवनाचें एक अविभाज्य अंग बनलीं. मी इतर ठिकाणें पाहून वसाहतींत आलों तों तेथें खूपच गर्दी झालेली दिसली. आमच्याप्रमाणें आणखी कित्येक प्रवासी नृत्य पाहण्यास जमले होते. नृत्य करणाऱ्या इंडियन्सपेक्षां

पाहणारांचीच संख्या जास्त झाली. आम्हीं लागलीच त्यांच्या मुख्याची गांठ घेतली. त्याच्या परवानगीनें मला छायाचित्रें घ्यावयाचीं होतीं. साध्या कॅमेऱ्यास एक डॉलर व मूव्ही कॅमेऱ्यास अडीच डॉलर अशी फी देऊन मीं माझे दोन्ही कॅमेरे सज्ज केले.

प्रथम गरुडनृत्य ( Eagle dance ) होणार होतें. अमेरिकन इंडियन्सच्या जीवनांत गरुड पक्ष्याला फार महत्त्व. या पक्ष्याची भरारी व त्याचें सामर्थ्य पाहून अमेरिकन इंडियन्सनीं याला आपला मित्र बनवून टाकलें. त्याला पकडणें, त्याच्या लांबलचक पांढऱ्या पिसांपासून शोभिवंत अशीं शिरस्त्राणें बनविण्याचा उद्योग पूर्वीं या लोकांनीं खूप केला आहे. गरुड पक्षी हा स्वर्ग व पृथ्वी यांच्यांतील एकमेव दुवा आहे, अशीहि इंडियन लोकांची समजूत आहे.

ठरलेली वेळ होतांच एका लहानशा घरांतून चार गरुड पक्षी बाहेर पडले. माणसांनीं गरुड पक्ष्यांचीं हुबेहूब सोंगें घेतलीं होतीं. कमरेस एक पांढरें स्वच्छ वस्त्र व मागील बाजूस शेपटी होती. डोक्यावर गरुडाची चोंच व त्याचे डोळे नेमके दिसतील असें कवच घातलेलें होतें. अंगास पांढरी स्वच्छ माती फासून गरुडाचा शुभ्रपणा आणण्याचा प्रयत्न केलेला होता. कमरेस व गुडघ्यास मोठे घुंगरू बांधलेले असून खांद्यापासून हातांवर गरुडाचे लांबलचक व सामर्थ्यवान पंख पसरलेले होते. आपले पंख हलवीत हलवीत गरुडांनीं सावकाशपणें मैदानावर प्रवेश केला. त्यांच्याबरोबर तीन इंडियन्स ढोल वाजवीत उभे होते. आपल्याकडे गोंधळ्यांची संबळ असते तशाच थाटाचे हे ढोल होते. त्यांचा व पावलांचा ठेका बरोबर जमण्यावर नृत्याची सर्व करामत अवलंबून होती.

गरुडाच्या प्रत्येक हालचालीचें अनुकरण अति सूक्ष्म पद्धतीनें करण्यांत या नृत्याचें यश सामावलेलें आहे. गरुडाची भरारी, भूमीवर उड्या मारीत चालणें, उंच जागीं एकदम उड्डाण मारणें, जमिनीवर एकदम स्थिर होणें, मादीशीं प्रणय करणें इत्यादि सर्व बारीकसारीक हालचाली पंखांच्या गतीवर व ढोलाच्या ठेक्यांवर नृत्यांतून प्रकट होत होत्या. मैदानावर एक पूर्ण मोठें वर्तुळ व आंत इंग्रजी आठाच्या आंकड्याप्रमाणें त्यांचा नृत्याचा मार्ग जणूं ठरलेला होता. त्यांची लयबद्ध हालचाल,

पंखांची हळुवार गति व मधूनच ' की-की ' करीत गरुडाच्या आवाजाची केलेली नक्कल वाखाणण्यासारखी होती.

गरुडाची अखेरची गति हा या नृत्याचा अखेरचा भाग होय. एक-दोन वेळ आठाच्या आकाराचीं आवर्तनें झालीं. सर्व गरुड वर्तुळाच्या बरोबर मधल्या भागीं आले. त्यांनीं आपले पंख खूप उंच उभारले आणि अगदीं शांत अशा वातावरणांत ते स्थिर राहिले. गरुडांनीं या वेळीं आपल्या टांचा वर उचललेल्या होत्या. ढोलाच्या ठेक्याबरोबर गरुडाची कमालीची उंची प्रत्ययास येऊन लागलीच सर्व गरुड ' की-की ' करीत परत वर्तुळांत जोरानें गिरक्या घेऊं लागले. त्यांचे पंख खालीं येऊं लागले. गरुडांनीं धरणीवर अंग टाकून दिलें. एक पंख लांब पसरलेला व एका पंखाची वृथा धडपड, हें त्यांच्या अखेरच्या गतीचें सूचक होतें. पंखांची गति शेवटीं मंदावते व ढोलाचा ठेकाहि फार हळूहळू येऊं लागतो. गरुडाच्या अंताबरोबर ढोलाच्या आवाजाचाहि अंत होतो. गगनाशीं स्पर्धा करणाऱ्या या पक्ष्यानें धरणीशीं दोस्ती केलेली असते.

रेड इंडियन्सचीं नृत्यें अनेक प्रकारचीं आहेत. पण सर्वांत प्रसिद्ध गरुड-नृत्य. महिषी-नृत्य, मृग-नृत्य, कृष्णसार-नृत्य, तृण-नृत्य ( कॉर्न डान्स ), सर्प-नृत्य इत्यादि त्यांच्या नृत्यांचे किती तरी प्रकार आहेत. नृत्याच्या प्रत्येक हालचालींतून एक एक भावच्छटा प्रकट करण्याचें सामर्थ्य यांच्याहि नृत्यांत असल्यामुळें गोऱ्या लोकांच्या नृत्य–प्रकारांपेक्षां इंडियन नृत्यें भावपूर्ण वाटतात, असें गोऱ्या लोकांनींच कबूल केलें आहे. कधीं कधीं हीं नृत्यें चार-चार पांच-पांच तास चालतात व त्यांतून एखादी कथा सूचित झालेली असते.

इंडियन लोकांचा हा केवळ एक करमणुकीचा प्रकार नाहीं. त्यांची जीवननिष्ठा नृत्यांतून आकारास आलेली आहे. अतींद्रिय शक्तींना प्रसन्न करून घेण्यासाठींहि कित्येकदां हीं नृत्यें केलीं जातात. रेड इंडियन लोकांच्या धार्मिक जीवनाचें हें एक महत्त्वाचें अंग आहे. युद्धाचा प्रारंभ व शेवटहि कांहीं नृत्यांनीं दर्शविला जातो. रोग्याचा आजार दूर होण्यासाठीं कांहीं नृत्यांचा उपयोग करण्यांत येतो. पिकें चांगलीं येण्यासाठीं हंगामाच्या वेळीं निसर्गशक्तीस प्रार्थना म्हणूनहि नृत्य करण्याचा प्रघात आहे. नृत्याबरोबर

कांहीं वेळां संगीतमय प्रार्थनाहि म्हटल्या जातात. अमेरिकन इंडियन्सचें जीवन म्हणजे नृत्य. त्यांचा पोषाख, त्यांचे दागदागिने, त्यांचें बोलणें–चालणें एकंदर सर्व नृत्यास साजणारेंच असतें.

गरुडनृत्य झाल्याबरोबर लहान मुलांच्या नृत्याचा एक कार्यक्रम झाला. डोक्यावर चित्रविचित्र पिसांच्या टोप्या घालून नाचणारीं मुलें फारच गोजिरवाणीं दिसत होतीं. कमरेपर्यंत पायास ठिकठिकाणीं घुंगरू बांधले असल्यामुळें मुलांच्या पायाच्या ठेक्यास गोड साथ मिळत होती. यानंतर आम्ही आणखी दुसऱ्या एका वसाहतींत गेलों. तेथें रेनबो डान्स ( इंद्रधनुष्य-नृत्य ) सुरू होता. दोन पुरुष व दोन स्त्रिया अनेक रंगांचा पोषाख करून हातांत इंद्रधनुष्याच्या आकाराचा एक सप्तरंगी पदार्थ धरून नाचत होत्या. नव्या गव्हर्नरच्या सन्मानार्थ हा सर्व नृत्यप्रकार होता. पुरुष आणि स्त्रिया यांनीं खास इंडियन पोषाख केलेला होता. तरी आजूबाजूनें बघणारे जे इंडियन स्त्री-पुरुष होते त्यांचे पोषाख मात्र इंडियन नसून अगदीं गोऱ्या लोकांप्रमाणें होते. या खेड्याचें नांव सँता क्लॅरा असें असून हें जरा सुधारलेलें दिसलें. जवळच लॉस एलमॉस गांवीं अण्वस्त्रांचें जगांतील पहिलें निर्मितिस्थान आहे. तेथें या इंडियन्सना पैसा खूप मिळतो आणि म्हणून गोऱ्या लोकांचें अनुकरणहि ते खूप करतात.

एकीकडे नृत्य चाललें होतें व दुसरीकडे त्यांचेच भाऊबंद दारू पिऊन तर्रर्र होऊन धिंगाणा करीत असलेले पाहून मनास विषाद वाटला. नृत्याची एवढी परंपरा निर्माण करणाऱ्या या अमेरिकन इंडियन्सचें झपाट्यानें आधुनिकीकरण झालें तर त्यांची ही कला, त्यांची संस्कृति, त्यांचे रिवाज, त्यांचा धर्म या गोष्टी ज्या हजारों वर्षें टिकून राहिल्या त्या इतिहासजमा होणार कीं काय, असा एक खेदकारक विचार मनाशीं येऊन गेला.

सिल्व्हर सिटी : न्यू मेक्सिको स्टेटमधील एक लहानसें शहर. सहा-सात हजारांची वस्ती. डोंगरावर पांच-सहा हजार फूट उंचीवर वसलेलें हें टुमदार शहर. न्यू मेक्सिको वेस्टर्न कॉलेजच्या मुलींच्या वसतिगृहाच्या अतिथिगृहांत मी कालपासून ( १० जानेवारी १९५७ ) राहत आहें. काल रात्रीं नऊ वाजतां मी येथें आलों. दिवसभर सबंध स्टेटमधून बसनें प्रवास केला. निसर्गाची विविधता भरपूर असल्यामुळें कंटाळा आला नाहीं कीं कसला त्रास झाला नाहीं. लासकुसेसवरून सिल्व्हर सिटीकडे जाणाऱ्या बसमध्यें दोन-तीन स्थानिक लोकांच्यांत मी एकटाच परदेशी आठ-दहा हजार मैलांवरून आलेला पाहुणा होतों. लोकांनीं मोठ्या आस्थेनें चौकशी केली. हिंदुस्थानबद्दल फार कमी माहिती त्यांना होती. गांधी, नेहरू, काश्मीर, योगी, पवित्र गाय एवढ्याच गोष्टी सर्वसाधारण अमेरिकन माणसास माहीत असतात. आणि तेंहि वॉशिंग्टन, शिकॅगो, न्यू यॉर्कसारख्या शहरीं. न्यू मेक्सिको तर मागसलेलें राज्य. त्यांतून ज्या भागांत मी आतां निघालों होतों तें तर अधिकच मागसलेलें. त्यांनीं खरा इंडियन प्रथमच पाहिला होता. डोंगराळ भागांतून बस चालली होती. मधूनमधून येणाऱ्या गांवीं होतीं तींहि चार-दोन माणसें उतरलीं आणि मी एकटाच गाडींत राहिलों. ड्रायव्हरनें माझ्याशीं दोस्ती केली. बेअर्ड, सेंट्रल, सिल्व्हर सिटी, सँटारिता या शहरांची माहिती दिली. मला एकट्यालाच घेऊन बस रात्रीच्या वेळीं पश्चिमेकडे डोंगरांतून आपला मार्ग काढीत होती. पौर्णिमा जवळ येत चालली होती. आल्हाददायक चांदण्यांतील प्रवास मोठा सुखद होता. माझ्या देशचा हा चंद्र आहे ही जाणीवहि एकलेपणांत धीर देणारी असल्यामुळें मनास उल्हास वाटत होता.

सिल्व्हर सिटीस रात्रीं नऊच्या सुमारास आलों. डॉ. हंट स्वतःची

मोटार घेऊन हजर होतेच. त्यांच्याबरोबर येथें रिच् हॉलमध्यें येऊन दाखल झालों. मुलींच्या वसतिगृहाची मिसेस् डेव्हिस हिनें माझ्या खोलीची सर्व व्यवस्था समजावून दिली आणि मी माझा एक महिन्याचा मुक्काम येथें सुरू केला. खोली चांगली प्रशस्त आहे. ऐसपैस आहे. दोन टेबलें, दोन खुर्च्या, दोन पलंग आहेत. कांचेची तीन-चार उत्तमपैकीं कपाटें आहेत. नाना सोयी दर्शविणारे अनेक विजेचे दिवे आहेत. पलीकडच्या बाजूस उत्तमपैकीं स्नानगृह आहे. मी झोपण्याच्या तयारींत आहें. दरवाजा लावून घेतला. रात्रीचे कपडे केले. दिवे मालवले आणि पांघरूण घेऊन पलंगावर पडून राहिलों. नेहमींप्रमाणेंच माझी झोप उडून गेली. शेजारच्या खिडक्यांचे पडदे मी वर केले. डोंगरावर वसणाऱ्या वेस्टर्न कॉलेजच्या इमारती व पायथ्याशीं लगतच्या बाजूस असणारी सिल्व्हर सिटी या गोष्टी माझ्या नजरेंत विशेष भरल्या. बारीक बारीक दिवे लुकलुकत होते. सर्व वातावरण कसें शांत गंभीर झालें होतें. या ठिकाणीं मी एकटा राहणार होतों. वॉशिंग्टनला आम्ही सर्व मिळून तीनशें लोक होतों. कोलंबसला आम्ही बावीसजण होतों. प्रवासांत पांच-सहाजण होतों. पण आतां सिल्व्हर सिटीस मी एकटाच महिनाभर राहणार आहें. इजिप्तची अमीना शोकी, जर्मनीचे मि. क्रोनन व ब्रुगमन, बेल्जमची मिस् कॅनन न्यू मेक्सिकोंतील वेगवेगळ्या ठिकाणीं गेले होते. मी एकटा सिल्व्हर सिटीस आलों होतों. आतां रात्र बरीच होऊन गेली होती. गेल्या चार-पांच महिन्यांच्या गर्दीगर्दीच्या कार्यक्रमांनीं व अडीच-तीन हजार मैलांच्या सतत प्रवासानें मी शिणून गेलों होतों. येथें आतां एक महिना विश्रांति मिळणार होती. शाळा पाहणें, व्याख्यानें ऐकणें वा देणें यांच्यापेक्षां या शहरांतील लोकजीवनाशीं समरस होणें हा मुख्य भाग असल्यानें कार्यक्रमांत थोडा वेगळेपणा येणार होता. मी खुशींत होतों. मी कल्पनासाम्राज्यांत गुंग झालों. मध्येंच थोडा डोळा लागला.

पहांटे जागा झालों तें कोंबड्याच्या आरवण्यामुळें ! अमेरिकेंतीलहि कोंबडे पहांटे आरवतात तर ! हा माझा पहिलाच अनुभव होता. मला सिल्व्हर सिटी एकदम आवडली. सातारा जिल्ह्यांतील मला माझ्या गांवची आठवण झाली. तें असेंच डोंगराच्या कुशींत आहे. अशीच तेथें

कोंबड्याच्या आरवण्यामुळें मला जाग येत असे. आज हा पुनः प्रत्यय आला. मीं पुनः खिडकींतून पाहिलें. अजून अंधारच होता. आकाशांत तारे लुकलुकत होते. रस्त्यांचे दिवे मिणमिण करीत होते. झगझगीत डोळे दिपवणारा प्रकाश नाहीं, ट्रामचा, मोटारींचा खडखडाट नाहीं. गर्दी नाहीं, धांवपळ नाहीं. सर्व शहर शांतपणें अजून झोपलें आहे. कॉलेजचीं मुलें अजून जागीं झालीं नाहींत. पूर्व दिशा उजळून निघाली. सर्वत्र लालीलाल होऊन गेलें. दूर कोठें तरी सँटारिता येथील तांब्याच्या खाणीची एक मोठी उंच चिमणी आकाशास भिडावयास गेली होती; तींतून धुराचे लोट बाहेर पडत होते. बस ! एवढाच कारखान्याचा संबंध या गांवाशी. थोड्याच वेळांत सूर्याचीं किरणें सर्वत्र पसरली. सर्व शहर सूर्यप्रकाशांत न्हाऊन निघालें. सूर्याच्या रुपेरी किरणांत रुपेरी नगरी नुकतेंच स्नान केलेल्या रमणीप्रमाणें लज्जाशील, संयमशील व लावण्यवती वाटली. मला सिल्व्हर सिटी फार आवडली.

सकाळीं सात-साडेसातच्या सुमारास कॉलेजमध्यें जाणाऱ्या मुलींचा चिवचिवाट सुरू झाला. मुलें आणि मुली सकाळची न्याहरी घेण्यासाठीं अन्नपूर्णागृहाकडे निघालीं. पुरेसा उजेड आल्यावर सिल्व्हर सिटीची पूर्ण कल्पना मला आली. आधींच हें गांव सहा हजार फूट उंचीवर. त्यांतून न्यू मेक्सिको वेस्टर्न कॉलेज तर एका टेकडीवर आहे. भोंवतालीं पुनः उंच उंच डोंगर. पश्चिमेच्या बाजूस खूप दूर अंतरावर डोंगराच्या कड्यावर W हें अक्षर कोरलेलें दिसत होतें. अंतर चांगलें आठ-दहा मैलांचें असावें. आपल्या कॉलेजचें हें आद्याक्षर विद्यार्थ्यांनीं मोठ्या आवडीनें त्या ठिकाणीं कोरलेलें आहे. न्याहरी घेण्यास मी गेलों तेव्हां सर्वजण माझ्याकडे मोठ्या कुतूहलानें बघत होते. फार थोड्यांनीं इंडियन माणसास पाहिलें होतें. कित्येकांनीं ओळख करून घेतली. कित्येकांनीं आपल्या कॉलेजची माहिती दिली. साठ-सत्तर विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हंसत खेळत सकाळची न्याहरी घेत होते. न्यू मेक्सिको वेस्टर्न कॉलेजची कीर्ति या भागांत विशेष आहे. शिक्षणशास्त्राचें अध्ययन–अध्यापन फार चांगल्या रीतीनें येथें होत असल्याचा लौकिक माझ्या कानावर आला होता. सन १८९३ सालीं एक साधें अध्यापन–विद्यालय म्हणून याची सुरुवात होऊन

आज कला–शाखेंतील प्रमुख विषयाचें शिक्षण येथें बी. ए., एम्. ए. पर्यंत दिलें जातें. एक प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, ग्रंथालयाची प्रशस्त इमारत, फिजिक्स-केमिस्ट्री–प्रयोगशाळा, कलाकौशल्यविभाग, आरोग्यविभाग, मुलींचें वसतिगृह, मुलांचें वसतिगृह, विवाहितांचें वसतिगृह, अन्नपूर्णागृह, नाट्यगृह, क्रीडागृह, व्यायामशाळा, गृहजीवन-शास्त्रविभाग, शासनीय विभाग, मुद्रणविभाग, धंदेशिक्षण-विभाग, संगीत-विभाग, इत्यादि महत्त्वाच्या इमारती या टेकडीवर असून सर्वांवर नियंत्रण बोर्ड ऑफ् एज्युकेशन कॉलेजतर्फे ठेवतें. सहा-सात हजार वसतीच्या गांवांतील सर्व शैक्षणिक गरजा या कॉलेजकडून भागविल्या जातात. आजूबाजूच्या लहानसहान गांवांहूनहि विद्यार्थी शिक्षणासाठीं येत असतात. गांवांत बोर्डानें चालविलेल्या इतर पांच–सहा प्राथमिक शाळा असतील तेवढ्याच. बाकी सर्व सांस्कृतिक चळवळी या कॉलेजच्या टेकडीवरून व्हावयाच्या. अमेरिकेंतील एका लहान कॉलेजचा हा उत्कृष्ट नमुना होता. एक वर्षांत साधारणतः तीन सहामाही किंवा सत्रें होतात. एका सत्राचा विद्यार्थ्यांचा सर्वसाधारण खर्च हा पुढीलप्रमाणें येतो :

| | | |
|---|---|---|
| शिक्षणाची फी | ५१ | डॉलर्स ( वसतिगृहांत राहणाऱ्यास ) |
| शिक्षणाची फी | १०२ | डॉलर्स ( वसतिगृहांत न राहणाऱ्यास ) |
| वैद्यकीय फी | २·५० | डॉलर्स |
| नोंदणी फी | ५ | डॉलर्स |
| इतर फी | १०·५० | डॉलर्स |

यांखेरीज इतर अनेक बाबतींत विद्यार्थ्यांना फी द्यावी लागते. वसति–गृहाचें भाडें प्रत्येकास तीस डॉलर्स महिन्यास याप्रमाणें द्यावें लागतें. जेवणाची पुनः यांत इतकीच रक्कम स्वतंत्र द्यावी लागते. सामाजिक शास्त्रें, विज्ञानशास्त्र, वाङ्मय, कला, संगीत, वैद्यक, शरीरविज्ञान, शारीरिक शिक्षण, मनोविज्ञान, इंग्रजी जीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र प्राणिशास्त्र, कला, विज्ञान, इतिहास, भू-विज्ञान इत्यादि विषयांचा प्रामुख्यानें येथें अभ्यास केला जातो. शिक्षणशास्त्रास तर फार महत्त्व या कॉलेजमध्यें दिलें जातें.

कांहीं विषय केवळ विद्यार्थिनींकरितांहि आहेत. स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन व इंग्लिश या भाषांना प्रमुख स्थान आहे.

येथील शाळांना भेटी देण्याचा कार्यक्रम माझ्याच सल्ल्यानें आंखण्यांत आलेला होता. कॉलेजच्या आवारांत असणाऱ्या दुय्यम शाळेंत मी या नाहीं त्या निमित्तानें रोज जात असें. सकाळीं तास–दीड तास प्राथमिक शाळेंतहि माझें मन रमत असे. या प्राथमिक शाळेंतील सूसी व्हीवर नांवाची एक गोड मुलगी पहिल्या दिवसापासून माझी मैत्रीण बनली होती. माझ्या प्रत्येक वागण्याचें, बोलण्याचें तिला नवल वाटे. माझ्या मुलींच्या छायाचित्रांवर ती बेहद्द खूष होऊन गेली होती. माझ्या थोरल्या मुलीचें नांव ' प्रतिभाराणी ' तिनें उच्चारण्याचा अगत्यपूर्वक प्रयत्न केला. तिचा पोषाख, तिचीं पुस्तकें, तिची शाळा, हिंदुस्थानांतील प्राणी, घरें, सण, उत्सव इत्यादींची माहिती तिनें डोळ्यांत नवलाई व उत्सुकता ठेवून ऐकली. मी जेव्हां तिला कांहीं चित्रें व तिकिटें देऊं केलीं तेव्हां तर तिच्या आनंदास सीमा उरली नाहीं. असे आणखी कांहीं बालमित्र मला मिळाले होते. त्यांच्या आग्रहासाठीं मला त्यांच्या वर्गांत जावें लागे. मी एक महिन्यानंतर सिल्व्हर सिटी सोडूं लागलों तेव्हां सर्वांत वाईट वाटलें तें या रुपेरी केसांच्या सूसी व्हीवरला. एके दिवशीं रात्रीं तिनें मला जेवावयास बोलावलें. माझ्या दोन्हीहि मुलींना तिनें उत्तमपैकीं खेळणीं बाक्षिस म्हणून दिलीं आणि शेवटीं ' सूसीची आठवण ठेवा ' म्हणून तिनें पुनः पुनः बजावलें.

सिल्व्हर सिटी हायस्कूलमध्यें माझ्या ओळखीचीं अशींच दोन-तीन मुलें नेहमीं माझ्याभोंवतीं असत. शाळेच्या मुखपत्राची संपादिका मिस् लाईम ही चिनी मुलगी फार तरतरीत व बोलक्या डोळ्यांची होती. तिनें माझी विस्तृत मुलाखत घेऊन आपल्या पत्रांत छापून प्रसिद्ध केली. तिचा भाऊ मोठा हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होता. खेळ व वक्तृत्व हे त्याचे आवडते विषय होते. याच शाळेंतील विद्यार्थी हॉचकिस तितकासा हुशार नव्हता; पण त्याची बुद्धि इतर कामांत विशेष चाले. त्याचे वडील शेजारच्या गांवीं एका मोठ्या शिसें, जस्त यांच्या खाणींत काम करीत असत. एकदां त्यानें मला त्या खाणीवर आपल्या मोटारनें नेलें. कामकरी

लोकांच्या पोषाखांत आम्ही ती सर्व खाण जमिनीच्या पोटांत शिरून पाहिली. मैल दीड मैल तरी हिंडणें पृथ्वीच्या पोटांत माझें त्या दिवशीं झालें. दुसरा एक विद्यार्थी व हायस्कूलचे ग्रंथपाल मि. पेज यांच्याबरोबर केलेल्या सफरींची हकीगत मी दुसरीकडे दिली आहे. स्टेला वॅघॅन या शिक्षिकेच्या घरीं मी एके रात्रीं जेवावयास गेलों होतों. निरनिराळ्या देशांच्या लोकांच्या ओळखी करून घेण्याचा तिला छंदच होता. तिच्या घरीं टेबलावरील आच्छादनावर ती आलेल्या पाहुण्याची सही घेते व मग ती सही ती रेशमानें विणून कायम करते. अशा किती तरी सह्या त्यावर मीं पाहिल्या. मलाहि तेथें सही करावी लागली. सही घेण्याचें वेड मूळचें अमेरिकेचेंच असावें असें वाटतें. या देशांतील प्रसिद्ध तिखटामिठाचा पदार्थ ' इंचिलाडा ' खाण्यासाठीं मी कांहीं मित्रांच्याबरोबर एका प्रसिद्ध हॉटेलमध्यें गेलों होतों. तेथील मालकानें आपल्या दरवाजाच्या पाठीवर खऱ्या इंडियनची सही घेण्याची व्यवस्था केली होती.

सिल्व्हर सिटींतील प्राथमिक शाळा दाखविण्याचा कार्यक्रम एके दिवशीं ठरला होता. बोर्ड ऑफ् एज्युकेशनच्या मिसेस् शिएंपेनें मला सर्व शाळांतून हिंडवून आणलें. बहुतेक मुलांना इंग्रजी येतें. पण स्पॅनिश मातृ-भाषा असणारीं पुष्कळच मुलें आहेत. त्यांना इंग्रजी ही परकीय भाषा म्हणून शिकावी लागते. स्पॅनिशभाषी मुलांसाठीं याच कारणासाठीं एक स्वतंत्र शाळाहि आहे. मिसेस् होमर या शिक्षिकेनें माझीं कांहीं छायाचित्रें मुलांच्यासहित घेतलीं तीं दुसऱ्या दिवशीं स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्धहि झालीं. याशिवाय बेअर्ड, सेंट्रल, डेमिंग इत्यादि आजूबाजूच्या शाळांनाहि मी भेटी दिल्या. कॉलेजचे प्रेसिडेंट (प्रिन्सिपल) डॉ. मिलर हे मोठे उमदे गृहस्थ होते. उणीपुरी उंची व सतत हंसरा चेहरा यांमुळें त्यांची छाप सर्वांवर चटकन पडे. त्यांच्याहि घरीं मी एके दिवशीं जेवावयास गेलों होतों. त्यांनीं केलेला आदरसत्कार विशेष होता. मिसेस् मिलरला तर हिंदुस्थानांतील प्रत्येक गोष्ट नवीन वाटत होती. दोघांचेहि स्वभाव फार मनमिळावू व प्रसन्न होते. बहुतेक वेळीं बाहेर जातांना ते माझ्या-बरोबर असत. चेंबर ऑफ् कॉमर्सतर्फे मेजवानी होती तेव्हां त्यांनीं माझी ओळख मोठ्या मजेदार पद्धतीनें करून दिली. याच संस्थेतर्फे त्यांनीं

आपल्या पाहुण्यास सिल्व्हर सिटीच्या नागरिकत्वाचें मानचिन्ह अर्पण करण्याचा समारंभ घडवून आणला. त्यांचे साहाय्यक डॉ. हंट यांनींहि माझी सर्व प्रकारची चिंता वाहिली.

हिवाळ्याचे दिवस होते, तरी हवा मोठी प्रसन्न होती. मधून मधून बर्फ पडे. पण एकंदरींत आरोग्यदायक सूर्यप्रकाशांत मनास मोठा उल्हास वाटे. मि. पेज यांच्याबरोबर सिटी ऑफ् रॉक्स, सँटारिता येथील तांब्याची खाण मी पाहावयास गेलों होतों. मोठमोठे खडक एकत्र आलेले होते, ती झाली फत्तरांची नगरी ! तांब्याची खाण मात्र अति विस्तृत अशी होती. एक मोठा विस्तीर्ण खड्डा जमिनीच्या पोटांत खणला होता व दिवसेंदिवस त्याचा परिघ वाढत होता. खोली जास्त होत होती. तळापर्यंत रेल्वेमार्ग तयार केला असल्यामुळें एकंदर दृश्य फार भव्य व गंमतीचें दिसें. वळणें वळणें घेत गेलेला रेल्वेमार्ग व त्यावरून जाणारी–येणारी गाडी कांठावर उभे राहून पाहण्यासारखा हा देखावा वाटतो. येथून हर्ले नांवाचें एक गांव जवळ आहे. तेथील चर्चचे अधिकारी रे. आल्फ्रेड क्लाईन यांची कामगिरी वर्णन करण्यासारखी आहे. कम्युनिटी चर्च कसें असावें याचा उत्कृष्ट नमुना त्यांनीं हर्ले गांवांत तयार केलेला होता. गांवांतील सर्व कार्यक्रम चर्चमध्यें होत असत. त्यांच्याहि घरीं मी एके रात्रीं जेवावयास गेलों होतों. अमेरिकेंतील बहुतेक धर्मगुरूंना ख्रिश्चन धर्म हाच एक मोठा वाटतो. पण रे. क्लाईन यांचीं मतें फार उदार होतीं. हिंदुधर्माबद्दल त्यांना फार अभिमान वाटत असलेला दिसला. धर्माबद्दलची आस्था अमेरिकन माणसास फार आहे. मोठमोठ्या शहरांतून माणसें गर्दींत, घाईत असतात; पण लहानशा गांवी जीवन संथ असतें. एकमेकांचें अगत्य विशेष असतें. उदारपणाची जाणीव त्यांना विशेष झालेली असते. परक्या देशचा पाहुणा त्यांना विशेष आवडतो. शिक्षणाचे प्राध्यापक डॉ. हंट यांची सेक्रेटरी मिसेस् कॅनेडी माझ्या सर्व कार्यक्रमांची व्यवस्था नीट ठेवीत असे. मला हवें नको तें ती सर्व पाही. प्रिन्सिपल मिलर यांची सेक्रेटरी मिसेस् र्‍होडीन माझ्या येणाऱ्या-जाणाऱ्या टपालाची व्यवस्था चोखपणें ठेवी. हिंदुस्थानांतून येणाऱ्या पत्रांवरचीं तिकिटें तिला नवलाईचीं वाटत. 'साधना' साप्ताहिकांतील लेखाचीं कात्रणें आलीं तेव्हां आपली मुद्रित लिपि पाहून सर्वांना नवल

तर वाटलेंच; पण एक नवें ज्ञान झाल्याचा प्रत्यय ऑफिसमध्यें सर्वांना आला.

सिल्व्हर सिटीचे दिवस हे असे चालले होते. वॉशिंग्टनहून पत्र आलें व अटलांटिक सिटीस भरणाऱ्या एका परिषदेस हजर राहण्याची विनंति मला करण्यांत आली. त्यामुळें आठ दिवस आधींच हें गांव सोडावें लागलें. एक महिन्याचा सहवास संपणार होता. ५ फेब्रुवारी १९५७ रोजीं पहांटे कॉलेजचे प्रिन्सिपल डॉ. मिलर मोटार घेऊन दाराशीं उभे राहिले. सहा वाजतां आम्ही सिल्व्हर सिटी सोडली. डॉ. मिलर सँटफीस एका सभेसाठीं जाणार होते. मला मध्येंच २५० मैलांवर असणाऱ्या गांवीं सोडणार होते. तेथून मी पुढें कॅन्सस सिटी, शिकॅगोमार्गें वॉशिंग्टनला जाणार होतों. माझा मोहरा आतां पूर्वेकडे वळला होता. आतां अखंडपणें पूर्वेकडेच हिंदुस्थान येईपर्यंत जावयाचें होतें. एक महिन्यांत मी अमेरिका देश सोडणार होतों. वाटेंत शिकॅगो, वॉशिंग्टन, अटलांटिक सिटी, न्यू यॉर्क वगैरे शहरांत पांच-सहा दिवसांचा मुक्काम होता. डॉ. मिलर यांची मोटार पूर्वेकडे धांवू लागली तेव्हां हेच विचार माझ्या मनांत सुरू झाले. मी आतां पुनः सिल्व्हर सिटीस केव्हां येणार? या लोकांना पुनः कधीं भेटणार? वगैरे विचारहि मनांत येत होतेच. समोर पूर्वेकडचा भाग लालीलाल होऊन गेला होता. डॉ. मिलर यांनीं पुनः सर्व न्यू मेक्सिको स्टेटची माहिती दिली. संथशा प्रवासांतील सकाळच्या गप्पागोष्टी मोठ्या हृद्य होत्या. बेअर्ड, सेंट्रल, डेमिंग, हॅच्, ट्रूथ ऑफ कॉन्सिक्वेन्सेस सोकॅरो, बर्नरडो या गांवांनंतर बेलन येणार होतें. कधीं डोंगराळ भाग, कधीं सपाट पृष्ठ-भूमि, कधीं वाळवंट, कधीं हिरवीगार वृक्षराजी ही न्यू मेक्सिकोची यक्षभूमि पुनः एकदां पाहून झाली. पुनः एकदां कांहीं रेड इंडियन्सचीं खेडीं पाहिलीं. आणि शेवटीं एकदाचें बेलन आलें. डॉ. मिलर हे स्टेशनवर आले होते. त्यांनीं माझा प्रेमभरानें निरोप घेतला. पुनः कधीं तरी भेटण्याचीं आश्वासनें एकमेकांनीं एकमेकांस दिलीं. आणि मी आतां पूर्वेस जाणाऱ्या सँटफी रेल्वेमार्गावरील सुपर चीफ् गाडीचें वेळापत्रक पाहूं लागलों. थोड्याच वेळांत ही लँड ऑफ् एंचांटमेंट मी सोडणार होतों. रुपेरी नगरी आतां फक्त स्मृतींत राखणें शक्य होतें.

## २१ : निवडुंगाचा बगीचा

न्यू मेक्सिको स्टेटमधील सिल्व्हर सिटी येथें मी असतांना अनेक लोकांच्या ओळखी झाल्या असल्यामुळें कार्यक्रमांची गर्दी होती. न्यू यॉर्क, शिकॅगो, न्यू ऑर्लिन्ससारख्या मोठ्या शहरांतील धांवपळ व अवाढव्य कारभार सात हजार वस्तीच्या या गांवीं नसल्यामुळें मनास बरें वाटत होतें. समुद्रसपाटीपासून सहा हजार फूट उंचीवर असणारें सिल्व्हर सिटी हें एक डुमदार शहर रॉकी पर्वताच्या दक्षिण टोकाच्या कांहीं रांगांवर वसलेलें आहे. स्पॅनिश व रेड इंडियन्स यांच्या संस्कृतीचें चमत्कारिक मिश्रण या भागांत पाहावयास मिळतें. तिखटामिठाचा 'इंचीलाडा' पदार्थ येथें मला प्रथमच चाखावयास मिळाला. सबंध अमेरिकेंत कोठेंहि न आढळणारीं मातीनें सारवलेलीं पण आधुनिक सोयींनीं सुसज्ज अशीं घरें याच भागांत प्रथम पाहावयास सांपडलीं. न्यू मेक्सिको वेस्टर्न कॉलेजच्या वसतिगृहांत मी पाहुणा म्हणून होतों. तेथील ग्रंथपाल मि. बेंजामिन पेज माझ्या चांगल्या परिचयाचे झाले होते. चित्रपटांची विशेष आवड त्यांना होती. अमेरिकन चित्रपट भारतीयांना कितपत आवडतात याची चर्चा चालू असतांना मला पसंत असलेल्या वॉल्ट डिस्नेच्या 'लिव्हिंग डेझर्ट' या चित्रपटाचा मीं उल्लेख केला. मि. पेज एकदम खूष झाले आणि मला म्हणाले, "येत्या रविवारीं येणार का माझ्याबरोबर? 'लिव्हिंग डेझर्ट' मध्येंच आपण जाऊं या. वॉल्ट डिस्नेच्या चित्रपटांतील सर्व सजीव-निर्जीव सृष्टि मी तुम्हांस दाखवितों. चला जाऊं या. इतर कार्यक्रम रद्द करा..." माझे बहुतेक कार्यक्रम मि. पेज यांच्याच सल्ल्यानें ठरत असल्यानें मनांत होकार व्यक्त होण्याच्या आधींच आमचें नक्की झालें.

ज्या ठिकाणीं आमचें जाण्याचें ठरलें होतें त्याचें नांव 'सोवॅरो नॅशनल मॉन्युमेंट' ( Saguaro National Monument ) असून तें सिल्व्हर

सिटीहून सुमारें तीनशें मैल दूर पश्चिमेकडे होतें. अमेरिकन सरकारनें या भौगोलिक प्रदेशाची जोपासना राष्ट्रीय स्मारक म्हणून केलेली असून ॲरिझोना स्टेटमधील एक प्रेक्षणीय ठिकाण म्हणून त्याचा लौकिक आहे, एवढेंच माझ्या कानावर आलें होतें. वॉल्ट डिस्नेच्या चित्रपटांतील उंच उंच चमत्कारिक आकाराचीं झाडें माझ्या स्मरणांत होतींच; पण या नॅशनल मॉन्युमेंटचा कसलाहि अंदाज नवख्या माणसास करतां येण्यासारखा नव्हता. फेब्रुवारीच्या तीन तारखेस सकाळीं सहा वाजतां मि. पेज यांच्या मोटारीनें आम्ही निघालों. बरोबर आणखी सिल्व्हर सिटी कॉलेजमधील दोन-तीन विद्यार्थी होते. वेळ सकाळची व ऐन हिवाळा असला तरी त्यांतील दक्षिणेकडील उबदारपणा, यामुळें मन उल्हसित झालें होतें. रॉकीच्या वळणावळणांतून मोटार ताशीं ७०–८० मैल वेगानें जात होती. अमेरिकेंत मोटारीचा वेग हा असाच सर्वत्र सर्व ठिकाणीं असतो.

डाव्या अंगास दिसणाऱ्या सूर्योदयाची रंगीबेरंगी किमया, चमत्कारिक वृक्ष व झुडपें, तऱ्हेवाईक पक्षी, डोंगरकड्यांचे बनलेले चित्रविचित्र आकार यांचा स्वाद घेत घेत आम्ही मार्ग आक्रमीत होतों. न्यू मेक्सिको स्टेटची हद्द ओलांडून आम्ही ॲरिझोना स्टेटमध्यें आल्यावर एक गंमतीचा विचार माझ्या मनांत आला. आतां याच्या पुढील स्टेट म्हणजे कॅलिफोर्निया. लॉसएंजल्स, सॅन्फ्रान्सिस्को हीं जगप्रसिद्ध शहरें या बाजूस आहेत. तेथेंहि जाण्याची तीव्र इच्छा मनांत होती. कल्पनेनें त्याहि ट्रिपचें रूप मनांत रंगवीत असतांनाच आम्ही ट्यूसॉनच्या मार्गावर आलों. नैर्ऋत्य अमेरिकेंतील हें अतिशय प्रसिद्ध असें हवेचें आरोग्यदायक ठिकाण असून गेल्या तीस-चाळीस वर्षांतच त्याची वाढ झपाट्यानें झाली आहे. ट्यूसॉन-( Tucson ) च्या पूर्वेस तेरा-चौदा मैलांवर सोवॅरो मॉन्युमेंट होतें. सोवॅरो ही एका विशिष्ट प्रकारच्या निवडुंगाची जात आहे. अशा प्रकारचे निवडुंग फक्त याच भागांत मेक्सिकोपर्यंत पसरलेल्या वाळवंटांत सांपडतात मीं फक्त स्वदेशांतील नागफणी निवडुंग तेवढा पाहिला होता, त्यामुळें या नव्या निवडुंगाची व त्याच्या राष्ट्रीय महत्त्वाची मला कल्पनाच येण्यासारखी नव्हती.

ट्यूसॉनला जातांना रस्त्याच्या दोन्हीहि कडांना या मॉन्युमेंटच्या केवढाल्या

जाहिराती फडकल्या होत्या. दुकानांवर, हॉटेल्सवर, पेट्रोल पंपांवर, मोटेल्सवर, सार्वजनिक इमारतींवर सोवॅरो मॉन्युमेंट येणाऱ्या प्रवाशांना आमंत्रण देत होतें. सोवॅरो या कॅक्टसच्चीं–निवडुंगाच्चीं मोठालीं चित्रें जिकडे तिकडे फडकत होतीं. कांहीं ठिकाणीं तर निवडुंगाच्चीं झाडेंच आणून उभीं केलीं होतीं. रस्त्याच्या कडेस असणाऱ्या कुंपणावर अथवा टेलिफोनच्या खांबांवरून सोवॅरो मॉन्युमेंट आतां तीस मैल...वीस मैल... पंधरा मैल अशीं निरनिराळीं विनोदी चित्रें माझ्या मनाची अधीरता वाढवीत होतीं. नायगारा फॉल्स वा मिसिसिपी नदी जवळ आली असतांनाहि मी एवढा उत्सुक झालों नव्हतों. गुलाबाचे ताटवे, जाई-जुईचा मांडव, प्राजक्ताचा सडा आणि सोनचांफ्याच्या फुलांची बरसात माणसास नेहमींच जवळ खेचून घेईल. पण कांटेरी निवडुंगाचा लोभ कोणास वाटावा ? नाना औषधें टाकून निवडुंगाचा नायनाट करण्याचा प्रयत्न स्वदेशांत झाल्याचें मला माहीत होतें. त्यामुळें ओबडधोबड दिसणाऱ्या, ओंगळ स्वरूप धारण करणाऱ्या, कांट्याकुट्यांचें आवरण घेणाऱ्या या निवडुंगाच्या बगीच्याकडे माझें मन पुनः पुनः कां ओढ घेत होतें कोणास माहीत ?

आमची मोटार मुख्य रस्ता सोडून आडवळणाच्या डोंगराळ भागांतून जाऊं लागली. निवडुंगाचे छोटे-मोठे अवशेष मधून मधून दिसूं लागले होते. ही जात मीं फक्त चित्रपटांत पाहिली होती. उंच उंच वाढणाऱ्या आणि सर्व बाजूंनीं पर्णविरहित अशा अनेक फांद्या फुटत जाणाऱ्या या चमत्कारिक वृक्षविशेषाबद्दल मला कमालीचें कुतूहल वाटत होतें. बघतां बघतां दोन्हीहि बाजूंना शेकडों निवडुंग मला दिसूं लागले. कांहीं उंच, कांहीं बुटके, कांहीं रुंदावलेले, कांहीं सडपातळ स्वरूपांत उंचावलेले. मि. पेज यांना मीं विचारलें, "थांबा, मी कांहीं फोटो घेतों यांचे...." त्यावर त्यांनीं मला सांगितलें, "आणखी थोडा दम धरा. हे निवडुंग कांहींच नाहींत...आणखी पुढें जाऊन पहा काय सृष्टीचा चमत्कार आहे तो..."

मि. पेज यांनीं मला पांच-दहा मिनिटांतच सोवॅरो मान्युमेंटच्या द्वाराशीं आणून उभें केलें. मोटारमधून उतरून आम्हीं त्या अद्भुत

बगीच्यांत प्रवेश केला. या डोंगराळ भागांत एकट्या निवडुंगाखेरीज कोणतींच झाडें दिसत नव्हतीं. या सर्व प्रदेशाचें क्षेत्रफळ सुमारें त्रेसष्ट हजार एकरांपर्यंत होतें. डाव्या बाजूस बगीच्यासंबंधीं सर्व प्रकारची माहिती देणाऱ्या कचेरीची जागा होती. तेथील प्रदर्शन आम्हीं नंतर पाहण्याचें ठरविलें. कारण आम्हांस कमी होत जाणाऱ्या सूर्यप्रकाशाचा उपयोग फोटोसाठीं करून घ्यावयाचा होता. निवडुंगांच्या या बगीच्यांतून मोटार जाईल अशा प्रकारचा एक छोटा रस्ता सुमारें सर्व वळणें मिळून नऊ मैल लांबीचा तयार केला आहे. प्रारंभींचीं कांहीं झाडें आम्हीं पायीं हिंडूनच पाहिलीं. प्रत्येक झाडाच्या पायथ्याशीं एका चौकटींत त्या झाडाचें शास्त्रीय नांव, त्याचें वय, त्याच्या फुलाचा रंग, त्याची उंची वगैरे माहिती बिनचूकपणें लिहिलेली आहे.

भोंवतीं पसरलेलीं हजारों झाडें एकाच जातीचीं होतीं, पण रूपानें एक दुसऱ्याप्रमाणें मुळींच नव्हतें. अनेक चित्र-विचित्र आकार फांद्यांच्या वेगवेगळ्या वळणांमुळें त्यांना प्राप्त झाले होते. बहुतेकांची उंची तीन पुरुषांपर्यंत आहे. क्वचित् ठिकाणीं झाडें पन्नास फुटांपर्यंतहि वाढलेलीं दिसत होतीं. झाडाचें मुख्य खोड हाताला बरेंच खडबडीत, कांटेरी आवरणानें आच्छादलेलें असें वाटलें. कांहीं खोडांतून व फांद्यांतून पक्ष्यांनीं चोंची मारमारून आपल्या निवाऱ्याची सोय केलेली दिसली. ऐन हिवाळ्याचा मोसम असल्यामुळें निवडुंगाचीं फुलें मात्र पाहावयास सांपडलीं नाहींत. एप्रिल-मे महिन्यांतील या बगीच्याची शोभा वर्णन न करण्या-सारखी असते. निवडुंगाच्या कांटेरी देहांवर नाना रंगांचीं फुलें फुलतात; बोंडें बाहेर आलेलीं असतात, त्यांना कुरतडणारे शेंकडों लहान प्राणी आपल्या शेपट्या हलवीत, लुकलुकत्या डोळ्यांनीं व लवलवणाऱ्या जिभांनीं वा अणकुचीदार चोंचींनीं या नव्या वैभवाची लूट करीत असतात. जमिनीवरचा भाग असंख्य रानफुलांच्या आच्छादनानें झाकून गेलेला असतो.

या झाडांचें जीवित जास्तींत जास्त दोनशें वर्षांचें असतें. प्रथम यांची वाढ हळूहळू होते. तीस वर्षांचें झाड फार तर तीन-चार फूट उंचीचें असतें. मग त्याची उफाड्याची वाढ सुरू होऊन पंचाहत्तराव्या वर्षी

तें ऐन तारुण्यांत आलेलें दिसतें. याच वेळीं त्याला अनेक शाखांचा लाभ होतो. खरें म्हणजे हा प्रदेश डोंगराळ असून सर्वत्र एक प्रकारचें वाळवंटच पसरलेलें आहे. या निर्जल प्रदेशांत पावसाचा–तसें म्हटलें तर दुष्काळच; पण थोड्याशा पावसाचें पाणी सांठवून धरण्याची शक्ति या निवडुंगाच्या खोडांत व मुळांत असते. अति टणक, चिवट आणि आर्द्रता टिकवून धरणारी अशी साल या झाडांना लाभलेली असते. चांगलें वयांत आलेलें निवडुंगाचें आठ-दहा टन वजनाचें झाड एक टनापर्यंत पावसाचें पाणी अंगीं सांठवून धरूं शकतें. वर्षभर या पाण्याचा उपयोग शरीरपोषणासाठीं म्हणून त्याला करतां येतो. शोषण-क्रियेची ही अद्भुत किमया या निवडुंगांना खरोखरच जीवनदायी आहे. त्यांचा अवाढव्य आकार आणि मान उंच करावयास लावणारी त्यांची उंची पाहून त्यास पाहणारा मानव अधिकच ठेंगणा, बुटका वाटूं लागतो. या एकाच प्रदेशांत इतकीं लक्षावधि झाडें निर्माण करणाऱ्या निसर्गाची अद्भुत कारागिरी हिवाळ्यांतील थोड्या रूक्ष हवामानांतहि पटते.

या बगीच्यांतून जाणाऱ्या मोटाररस्त्यावर महत्त्वाच्या ठिकाणीं उभे राहून निरीक्षण करण्यासाठीं, विसांवा घेण्यासाठीं सोइस्कर अशा जागा निर्माण केल्या आहेत. प्रत्येक ठिकाणीं आम्ही मोटारींतून उतरत असूं. नव्या आकाराचे व वेगळ्या उंचीचे, चमत्कारिक आकार धारण केलेले निवडुंग आम्हांला जवळ बोलावून घेत असत. आमच्यासारखेच आणखी किती तरी लोक हा बगीचा पाहण्यासाठीं आले होते. म्हातारे होते, तरणे होते, बायका होत्या, मुली होत्या, शाळकरी मुलांचे घोळके तर उल्हासानें नाचत होते. मधून मधून ओळखीचा फड्या निवडुंग दिसत होता. मोठ्या अननसाप्रमाणें जमिनींतून वर येणारा व काट्यांनीं आच्छादलेला दुसराहि एक प्रकार होता. सभोंवतीं लहान-मोठीं पर्वतशिखरें या बगीच्याच्या रक्षणास जणुं सिद्ध होतीं.

अमेरिकेंतील भव्य धांवपळीचें, गर्दीचें जीवन विसरून या बगीच्यांत किती तरी लोक शनिवारीं-रविवारीं विश्रांतीसाठीं येतात. या रानटी आणि ओंगळ वृक्षविशेषाचें कौतुक करतात. छानछोकीनें राहणाऱ्या व कपड्याची इस्त्री सांभाळणाऱ्या शहरी अमेरिकन लोकांना या रांगड्या डोंगराळ

विभागांत खूप गंमत वाटते. विविधतेनें नटलेल्या आपल्या अमेरिका देशाचा एक गूढरम्य स्वाभिमान त्यांच्या मुखांवर विलसूं लागतो. आम्ही परदेशी पाहुणे अमेरिकन लोकांचें हें निसर्गकौतुक बघत असतों आणि अमेरिकन आम्हा परदेशी माणसांकडे आपुलकीनें पाहून आपल्या देशाचें वैभव खुलवून सांगत असतो. आणि या दोन्हीहि प्रकारच्या माणसांकडे पाहून धिप्पाडपणें वाढणारीं हीं निवडुंगाचीं झाडें प्रत्येक टप्प्यावर मनांतून हंसत असतात.

निवडुंगाच्या या बगीच्यांतील प्राणिजीवन तर मानवाच्या कल्पनाशक्तीस व सृजनव्यापारास चालना देणारें आहे. निवडुंगाचीं फुलें मला बघावयास मिळालीं नाहींत म्हणून मीं त्यांचीं खरींखुरीं मूळच्या रंगांतील चित्रें विकत घेतलीं. संध्याकाळीं फुलणाऱ्या या फुलांना एक प्रकारचा मादक सुवास असतो म्हणे. या फुलांभोंवतीं अनेक लहान कीटकांचे थवे झडप घालीत असतात. त्यांच्यावर ताव मारणारे किती तरी पक्षी शिकारीच्या तयारींत राहतात. त्यांचीहि शिकार करणारे मोठे प्राणी आहेतच. लहानशा शेपट्या असणाऱ्या खारी दुडूदुडू इकडून तिकडे पळत असतात. विंचू कोठें निघतील त्याचा नेम नाहीं. त्यांचेहि अनेक प्रकार. त्यांचें विषहि भयंकर असतें. या भागांत केवळ विंचवाच्या दंशानें मरणारीं माणसें किती तरी. सर्पांच्या, अनेक जाती; लहान-मोठ्या, करड्या, हिरव्या वगैरे सर्व प्रकारच्या सर्पांची गर्दी येथें आहे. सर्प व विंचू यांच्यापासून आपलें रक्षण कसें करावें व विषबाधेवर कोणता उपचार करावा याची माहिती दर आठवड्यास येथील हायस्कूलमध्यें विद्यार्थ्यांना कां देतात हें माझ्या ध्यानीं या ठिकाणीं पूर्णपणें आलें. नाना प्रकारच्या गोमी, कोळी, पुंगळाच्या जातीचे प्राणी, मुंग्या, मुंगळे, माशा अशीं किती तरी नांवें घेण्यासारखीं आहेत. लांडगे, तरसें, डुकरें, ससे, घुबडें, कोल्हे, हरिणें इत्यादि लहान-मोठे प्राणी रात्रीच्या वेळीं या वाळवंटास जिवंत करीत असतात. पक्ष्यांचे तर शेंकडों प्रकार आहेत. या सर्व प्राण्यांचा संग्रह ट्यूसॉनजवळ असलेल्या ॲरिझोना-सोनोरा डेझर्ट म्यूझियममध्यें मोठ्या आस्थेवाईकपणें केलेला आहे.

आम्हीं जवळ जवळ चार-पांच तास या बगीचांत घालविले. मानवानें

निर्माण केलेलें असें कांहींहि येथें नव्हतें. अमेरिकेंतील इतर सर्व उद्यानांतून माणसाच्या सुधारणांचाच संस्कार फार. इमारती, पाळणे, कारंजीं, छोट्या रेल्वेगाड्या, दुकानें यांनीं समृद्ध असलेलीं उद्यानें शहरीच वाटतात. पण सोवॅरो मॉन्युमेंट म्हणून प्रसिद्ध असणारा बगीचा मात्र पूर्णपणें रानवट होता. एका निवडुंगाचेंच अधिराज्य त्या ठिकाणीं होतें. तेथील राजा निवडुंग होता. प्रजा निवडुंगच होती आणि माणूस भयभीत होऊन दूर एका कोपऱ्यांत मोठ्या अदबीनें अंग चोरून उभा होता. प्रवेशद्वाराशीं सुरुवातीसच डाव्या अंगास असणारी कचेरी आम्हांस पाहावयाची होती. या ठिकाणीं मात्र पुनः माणसाच्या संस्कृतीस प्रारंभ झालेला दिसला. नाना आकारांचीं, रंगांचीं माहितीपूर्ण पुस्तकें, नव्या वर्षासाठीं प्रसिद्ध झालेल्या भेट देण्यासाठीं पुस्तिका, चित्रकार्डें प्रवासी लोकांसाठीं येथें सर्व कांहीं तयार होतें. कचेरींत प्रवेश केल्याबरोबर पश्चिमेस असणारी अतिशय मोठी कांचेची भिंत एकदम डोळ्यांत भरते. तीमधून निवडुंगाच्या बगीच्याचें पुनः एकदां सामग्र्यानें दर्शन होतें. इतर भिंतींवर किती तरी चित्रें, नकाशे, आराखडे टांगून ठेवले आहेत. निवडुंगाचे निरनिराळे विभाग, त्यांचीं कार्यें व त्यांचा एकूण जीवनक्रम यांचा एक वस्तुपाठच जणूं येथें मिळतो. फार पूर्वीं रेड इंडियन्स निवडुंगाचा उपयोग औषधासाठीं म्हणून कसा करीत याचींहि चित्रें या ठिकाणीं पाहावयास मिळतात. या वाळवंटांत सांपडणाऱ्या प्राण्यांचे नमुनेहि जतन करून ठेवण्यांत आले आहेत. एका कोपऱ्यांत एक स्वयंचलित प्रोजेक्टर आहे. त्यांत निवडुंगाच्या रंगीबेरंगी फुलांचीं चित्रें मिनिटामिनिटाला बदलत असतात.

१९३३ सालीं जेव्हां राष्ट्रीय उद्यान म्हणून हें ठिकाण घोषित झालें तेव्हां फार थोडे लोक या वाळवंटांत येण्याचे श्रम घेत असत. १९४८ सालापासून अनेक सुधारणा झाल्यामुळें २०,००० लोक एका वर्षांत येऊं लागले. १९५४ सालीं ही संख्या ७७,००० पर्यंत गेली. भेटीस येणारे लोक नाना प्रकारचीं छायाचित्रें व सकस जीवनशक्ति घेऊन जातात व जातांना आपल्या पावलांच्या खुणा व आश्चर्यमय उद्गार या बगीचाबद्दल मागें ठेवून जातात.

## २२ : ट्यूसॉनचें सजीव उद्यान !

ॲरिझोना स्टेटमधील उत्तम हवेचें आरोग्यदायक ठिकाण म्हणजे ट्यूसॉन. गेल्या तीस-चाळीस वर्षांतच या शहराची वाढ झपाट्यानें झाली. येथून पूर्वेस सतरा मैलांवर असलेलें सोवॅरो नॅशनल मॉन्युमेंट ( Saguaro National Monument ) पाहतां पाहतां दंग होऊन गेलों होतों. निवडुंगाच्या उद्यानांत माझें मन चांगलेंच रमलें होतें. सिल्व्हर सिटी ह्या हायस्कूलच्या ग्रंथालयाचे मि. पेज यांनीं मला सावध केलें नि म्हटलें, "मि. जोशी आपणांस आणखी एक अद्‌भुत म्यूझियम पाहावयाचें आहे तीन-चार वाजेपर्यंत तिकडे पोंचावयास पाहिजे." यानंतर आमची मोटार आतां पश्चिम दिशेनें धांवूं लागली. ट्यूसॉन शहर ओलांडून डोंगरांच्या वळणावळणानें आम्ही आणखी पश्चिमेस निघालों. पुढें असणाऱ्या म्यूझियमच्या जाहिराती डाव्या-उजव्या बाजूस आमंत्रण देण्यास सिद्ध होत्या. सुमारें पंधरा-सोळा मैल आम्ही मोटारनें आलों. आजूबाजूला डोंगरच डोंगर असून आतां आम्हीहि डोंगरमाथ्यावर आलों होतों. ॲरिझोना सोनोरा डेझर्ट म्यूझियम–( Arizona-Sonora Desert Museum ) पर्यंत आम्ही येऊन पोंचलों. आमच्या आधींच आलेल्या लोकांच्या असंख्य मोटारी तळावर दाटीदाटीनें उभ्या होत्या. कशीबशी थोडी जागा पाहून मि. पेज यांनीं गाडी उभी केली आणि आम्ही म्यूझियमच्या मुख्य इमारतीशीं आलों. प्राथमिक माहितीपत्रकें मिळविलीं. निवडुंगाचें उद्यान अजून माझ्या मनांत तरळत होतें. पण या ओसाड वाळवंटांत कोणते प्राणी, कोणते पक्षी राहतात ? त्यांची उपजीविका कशी चालते ? त्यांचें एकमेकांतील शत्रुत्व वा मित्रत्व कसें असतें ? या प्रश्नांचीं उत्तरें या म्यूझियममध्यें मिळणार होतीं. वॉल्ट डिस्नेच्या 'लिव्हिंग डेझर्ट' ची भूमि पुनः येथें सजीव स्वरूपांत पाहावयास मिळणार

असल्यानें मनास उल्हास वाटला. मी माझे दोनहि कॅमेरे सिद्ध केले.

ॲरिझोना सोनोरा डेझर्ट म्यूझियम जगांत फार प्रसिद्ध आहे. प्रत्येक मोठ्या शहरांत एखाद्या उद्यानांत एखादें प्राणिसंग्रहालय असतेंच. पण त्यांत असलेले प्राणी धरून आणलेले असतात. त्यांचें नैसर्गिक स्वरूप नष्ट होऊन फक्त आकारादि विशेष तेवढे शिल्लक राहिलेले असतात. अशा प्राणिसंग्रहालयांवरून प्राण्यांचें नैसर्गिक जीवन कसें समजणार ? यासाठीं ट्यूसॉनपासून दूरवर असणाऱ्या एका डोंगरावरच नैसर्गिक परिस्थितींत राहणाऱ्या प्राण्यांचें एक म्यूझियम बनविलें आहे. या म्यूझियमचें वेड लोकांना अतिशय आहे. प्रतिवर्षीं सुमारें पांच लाख लोक येथें सहलीसाठीं येतात आणि या प्राण्यांच्या सहवासांत आपला एक दिवस मोठ्या मजेंत घालवितात. शैक्षणिक दृष्टया तर याचें मोल विशेष आहे. ट्यूसॉनचें डोंगरावरील हें उद्यान सुमारें ३०,००० एकरांचें आहे. डोंगरउतरणीवर सोॅवरो जातीच्या निवडुंगाचीं उंच उंच झाडें खूप असून त्यांतच प्राण्यांची जोपासना करण्यांत आली आहे. वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, भूगर्भविज्ञान, मानव-वंशशास्त्र इत्याहि विषयांचा अभ्यास करणारांना ही जागा फार महत्त्वाची वाटते. १९५२ सालापासून या विषयासंबंधींच्या वस्तु या म्यूझियममध्यें मांडून ठेवण्यांत आलेल्या आहेत. रानावनांतून मोठ्या कष्टानें हिंडतांना अचानकपणें दिसणाऱ्या सर्व प्राण्यांचा संग्रह या विस्तीर्ण उद्यानांत नैसर्गिक पद्धतीनें करण्यांत आला आहे. हवा तीच, भूमि तीच, वनस्पतिसृष्टि तीच, फक्त प्राणिसृष्टीवर थोडें मानवाचें नियंत्रण ! तासन् तास या प्राणिविश्वाकडे पाहत बसावें असें अपार सौंदर्य येथें आकारास आलें आहे.

बहुधा सर्व प्रकारचे प्राणी या संग्रहालयांत आहेत. सिंह, चित्ता, हरिण, अस्वल, रानमांजर, रानडुक्कर इत्यादि हिंस्र व अजस्र प्राण्यांपासून तों किडा-मुंगीपर्यंत सर्व प्राण्यांचे जिवंत नमुने येथें पाहावयास मिळतात. मुंगी, मुंगळा, विंचू, पुंगळाच्या जातीचे प्राणी, लहान लहान किडे, पाली, यांचें विश्व चिमुकलें असलें तरी परमेश्वराच्या किमयेचें खरें दर्शन येथेंच घडतें. सर्पांच्या किती विविध जाती येथें आहेत. पक्ष्यांचेहि नाना प्रकार येथें संग्रहित झाले आहेत. निवडुंगांच्या सुमारें दोनशें जाती व इतर

वनस्पतींचे चारशें प्रकार या म्यूझियममध्यें पाहावयास सांपडतात. मत्स्यालयाचा विभाग तर नवल करण्यासारखा आहे. या वाळवंटांतील नद्यांतून, सरोवरांतून सांपडणाऱ्या मत्स्यांचे प्रकार कोणते हें जाणत्यांनीं येथें येऊन शिकावें. वाळवंटांत सांपडणारे नाना जातींचे दगड, खनिजें, नाना रंगांची मृत्तिका यांचाहि अभ्यास करण्याची सोय येथें आहे. कांहीं विद्यापीठें, कॉलेजें, संशोधन-संस्था यांची ही प्रयोगशाळाच आहे म्हणानात. पॅपॅगो जातीच्या इंडियन्सचें घर येथें संपूर्णपणें उभें केलें असून त्याची रचना अगदीं जशीच्या तशी असल्यानें त्या शास्त्राच्या अभ्यासकांची सोय झाली आहे. या प्रकारच्या इंडियन्सनीं काढलेलीं रांगोळीचीं चित्रें ( Sand painting ) गोऱ्या लोकांना फार नवलाचीं वाटतात.

म्यूझियमची इमारतहि फार शोभिवंत आहे. नॅशनल पार्क सर्व्हिसतर्फे १९३७ मध्यें २५०,००० डॉलर्स खर्च करून या इमारतींची उभारणी करण्यांत आली आहे. इमारतींत प्रवेश केल्याबरोबर उजव्या बाजूस लहान प्राण्यांची खोली आहे. किडा, मुंगी, पालो, झुरळें यांचा संग्रह व्यवस्थित रीतीनें केलेला दिसून येतो. प्रत्येकाचें नांव, शास्त्रीय वर्ग, आयुष्य इत्यादि नोंदीहि केलेल्या आहेत. डाव्या बाजूच्या विभागांत निरनिराळ्या रंगांचे दगड, खनिजें व मासे यांचा संग्रह आहे. इमारतीच्या पाठीमागें आपण गेलों कीं, लांबवर पसरलेली डोंगराची उतरण असून निवडुंगाच्या झाडांनीं सर्व सृष्टि फुलून गेलेली दिसते. उजव्या बाजूनें प्राण्यांचें विश्व व डाव्या अंगास वनस्पतिविश्व अशा दोन विभागांचें मिळून एक मोठें वर्तुळ तयार होतें. माणसानें तयार केलेल्या या जिवंत निसर्गानें पाहणारा दंग होऊन जातो.

या जिवंत उद्यानाची निर्मिति गेल्या पांच-सहा वर्षांतील असून त्याचें सर्व श्रेय ऑर्थर एन्. पॅक प्रेसिडेंट ॲरिझोना सोनोरा डेझर्ट म्यूझियम यांच्याकडे व विल्यम् एच्. कार नांवाच्या कल्पक माणसाकडे जातें. १९५१ सालीं ट्यूसॉनच्या डोंगरावर अशा प्रकारचें प्राणिसंग्रहालय तयार करावें या कल्पनेचा जन्म झाला. विल्यम कारनें न्यू यॉर्कच्या आसपास अशा प्रकारचीं उद्यानें तयार करून कीर्ति मिळविलेली असून तो आतां ट्यूसॉनचा नागरिक झाला होता. अर्थात् याहि उद्यानाचें काम त्याच्या-

कडेच ओघानें चालत आलें. सहा हजार फूट उंच असणाऱ्या डोंगरावर एक सजीव उद्यान तयार करण्याचें निश्चित झालें आणि त्या दृष्टीनें पैसे जमविण्यास, जागा शोधण्यास इमारतींची आंखणी करण्यास प्रारंभहि झाला. सोवॅरो निवडुगानें सर्व डोंगर भरून गेला होता. तो सर्वच्या सर्व दृष्टीच्या टापूंत यावा अशी जागा नक्की करण्यांत आली. भोंवतालचें प्राणिजगत् व वनस्पतिविश्व यांची शास्त्रशुद्ध जोपासना व्हावी, संशोधन व्हावें, संरक्षण व्हावें आणि अमेरिकन लोकांना तें एक विश्रांतिस्थान वाटावें हे प्रमुख उद्देश या उद्यानापाठीमागें होते. सर्वांची मान्यता घेण्यासाठीं म्हणून आधीं या उद्यानाची एक छोटी प्रतिकृति तयार करण्यांत आली. मार्व्हिन एच्. फ्रॉस्ट यानें एका रात्रींत ट्यूसॉनचा डोंगर आणि शंभर सोवॅरो निवडुंगाचीं झाडें तयार करून एक छोटेंसें उद्यान बनविलें. इंच-दीड इंच उंचीचीं हीं झाडें होतीं ! दहा हजार डॉलर्सची रक्कम मंजूर होऊन १९५२ च्या १ एप्रिल रोजीं कामास जोरानें प्रारंभ झाला. वनस्पतींची वर्गवारी, त्यांचीं नांवें, प्राण्यांसाठीं मोठीं घरें, त्यांचीं नांवें, त्यांचीं वयें, ऑफिसची व म्यूझियमची इमारत या सर्व गोष्टींना झपाट्यानें आकार येऊं लागला. सप्टेंबर महिन्यांत म्हणजे अवघ्या चार महिन्यांनीं उद्यानाचें उद्‌घाटन होणार होतें.

सभोंवतालच्या वाळवंटांत सांपडणाऱ्या सर्व प्राण्यांचें व वनस्पतींचें संशोधन सुरू झालें. त्यांचा संग्रह आतां उद्यानांत होणार होता. सर्व सिद्धता झाली आणि १९५२ च्या सप्टेंबरमधील लेबर-डे दिवशीं अमेरिकेंतील सर्व वृत्तपत्रांतून ट्यूसॉनच्या या सजीव उद्यानाची हकीगत प्रसिद्ध झाली. पहिल्या दिवशीं ट्यूसॉनच्या वृत्तपत्रांना व रेडिओ केंद्रांना याशिवाय दुसरा विषयच नव्हता. सकाळींच आजूबाजूचे आवार मोटारींनीं भरून गेलें. माणसांचा सागरच्या सागर लोटला. अर्ध्या अर्ध्या मैलांपर्यंत दोन्हीहि बाजूंनीं मोटारींच्या रांगा उभ्या होत्या, वाढत होत्या. रोज संख्या वाढत गेली. दर आठवड्यास कांहीं नवें आकारास येत होतें. सोवॅरो निवडुंगाचा विविध प्रकारचा उपयोग दर्शविणारें एक छोटेंसें घरच निर्माण करण्यांत आलें. दहा हजार डॉलर्स मंजूर झाले होते, पण खर्च आला चाळीस हजार डॉलर्स. विजेची, टेलिफोनची, रेडिओची सर्व सोय करणें

भाग पडलें. उद्यानाचा नामकरण–समारंभ अजून व्हावयाचा होता.

ट्यूसॉनच्या या उद्यानांत ॲरिझोनामधील प्राणी होतेच, पण मेक्सिको कांहीं दूर नव्हता. मेक्सिकोच्या उत्तरेस असणारा सोनोरा प्रांत ॲरिझोनास जोडूनच असल्यामुळें वाळवंटाचा भाग दोन्ही देशांत पसरलेला होता. मेक्सिकोच्या या देशाचें नांव निगडित करून अमेरिकेंतील पहिलें आंतर-राष्ट्रीय उद्यान निर्माण करण्याची कल्पना सर्वांना एकदम पसंत पडली. 'ॲरिझोना सोनोरा डेझर्ट म्यूझियम' असें नांव निश्चित होऊन १९५४ च्या डिसेंबरमध्यें सोनोरा स्टेटचा गव्हर्नर इग्नॅसिओ सोटो यानें उद्यानाला भेट देऊन मेक्सिकोचें निशाण फडकविलें. आज प्रवेशद्वारीं अमेरिकेचें एक व मेक्सिकोचें दुसरें अशीं दोन राष्ट्रीय निशाणें फडकतांना दिसतात. मध्यवर्ती सरकारकडूनहि भरपूर मदत पुढें मिळत गेली. २००,००० डॉलर्सची देणगी चार्ल्स लॅथ्रॉप फाउंडेशनकडून प्राप्त झाली. १९५३ सालीं कॅलिफोर्नियांतून आणलेल्या 'जॉर्ज' नांवाची सिंहाची प्राप्ति उद्यानास झाली. या जॉर्जच्या नांवानें ट्यूसॉनच्या वृत्तपत्रांत दर रविवारीं नियमितपणें मजकूर प्रसिद्ध होत असे. ८ मार्च १९५५ रोजीं जॉर्जचा मृत्यु झाल्यानें सर्वांना अतिशय वाईट वाटलें. त्याच्या दफनभूमीवर तेथेंच उद्यानांत एक संगमरवरी शिलालेख कोरलेला आज आपणांस दिसतो. त्यावर लिहिलेला जॉर्जचा मजकूर वाचून उद्यानाच्या चालकांची कल्पकता ध्यानांत येते. यानंतर दुसऱ्या एका सिंहाची योजना उद्यानांत झाली आहे. नित्य नव्या कल्पना जन्मास येतात आणि उद्यानाची वाढ सतत होत आहे. ट्यूसॉनला टेलिव्हिजन-केंद्र निर्माण झाल्याबरोबर येथील प्राण्यांचा साप्ताहिक कार्यक्रम सुरू झाला. शाळांतील मुलांच्या सहली आतां वारंवार या उद्यानाकडे येऊं लागल्या. १९५६ सालीं उद्यानाचा चौथा जन्मदिन मोठ्या उत्साहानें साजरा झाला. या वेळीं पांच लक्ष लोकांनीं उद्यानास भेट दिली. आणि चालकवर्ग म्हणत आहे ही तर नुसती सुरुवात. अजून या सजीव उद्यानाचा विकास पुढेंच आहे.

## २३ : विवेकानंद येथून बोलले !

५ फेब्रुवारी १९५७ रोजीं दुपारीं बारा-साडेबारा वाजतां अल्बुकर्की, न्यू मेक्सिकोहून मी सँटफी रेल्वेमार्गाच्या सुपर चीफ आगगाडीनें शिकॅगोस जाण्यास निघालों. कॅलिफोर्नियांतील लॉसएंजल्सपासून निघणारी ही वेगवान गाडी सर्व सोयींनीं समृद्ध अशी होती. पहिल्या वर्गाचें तिकीट असल्यामुळें सर्व प्रकारचा आराम होता. एक स्वतंत्र छोटी खोलीच मला मिळाली होती. बाहेरची वनशोभा पाहत पाहत सुपर चीफ बेफामपणें मार्ग आक्रमीत होती. कधीं ओसाड वाळवंट, कधीं भुंडे डोंगर, कधीं गर्द झाडी, कधीं नुसतेंच माळरान अशा विभागांतून माझा प्रवास चालू होता. न्यू मेक्सिको, कोलोरॅडो, कॅन्सस, मिसुरी आणि इलिनॉस या स्टेटमधून माझा प्रवास एकसारखा होणार होता. हजार-दीड हजार मैलांचें अंतर एका दिवसांत तोडून मी शिकॅगोस जाणार होतों. त्रिनिदाद, लाजुंटा, हॉचकिन्सन, कॅन्सस सिटी या प्रमुख शहरांवरून सुपर चीफ थांबत थांबत जाणार होती. रात्रीच्या वेळीं कॅन्सस सिटी केव्हां आली नि केव्हां गेली हें ध्यानांतहि आलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं साडेबारा वाजतां सुपर चीफ शिकॅगोस येऊन पोंचली. स्टेशनपासून वाय्. एम्. सी. ए. ची इमारत जवळच होती. शिकॅगोस मी तीन-चार दिवस राहणार होतों. हवा अगदीं कुंद बनून रस्त्यावर सर्वत्र बर्फ पडलेलें दिसत होतें. अंगास झोंबणारा वारा बाहेर पायीं हिंडूं देणारा नव्हता. अमेरिकेंतील प्रसिद्ध असें हें उद्योगधंद्याचें केंद्र माणसांनीं, मोटारींनीं नि रेल्वेमार्गांनीं गजबजून गेलें होतें. अनेक प्रकारचे चित्रविचित्र कर्णकटु आवाज मनास अस्वस्थ करीत. औद्योगिक केंद्रास शोभणारी भव्यता शिकॅगोस प्राप्त झाली असली तरी गलिच्छ वस्तीहि त्याच कारणासाठीं सांपडणारी होती. चार-पांच मिनिटांच्या अंतरावर मिशिगन सरोवर व शिकॅगोच्या सर्वप्रसिद्ध इमारतींनीं सुशोभित असलेले

रस्ते होते. संध्याकाळच्या सुमाराची गर्दी, धांवपळ तर कांहीं पुसूं नका. सरोवराच्या कांठानें लोकल्स धांवतात, रस्त्यानें मोटारींची अखंड ये–जा चालू असते. डोक्यावरून धाडधाड करीत जाणाऱ्या ट्रामगाड्या तर पायीं चालणारास सतावून सोडतात. शिकॅगोबद्दल पहिल्यानें मनावर संस्कार झाला तो असा.

शंभर–सव्वाशें वर्षांपूर्वी शिकॅगो एक लहानसें खेडें होतें. आज अमेरिकेंत लोकसंख्येच्या दृष्टीनें दुसऱ्या क्रमाकांचें हें शहर बनलें आहे. येथील उद्योगधंदे व व्यापार या आश्चर्य करण्यासारख्याच गोष्टी आहेत. जगांतील शहरांत लोकसंख्येनें शिकॅगोचा चौथा क्रमांक लागतो आणि १९६८ च्या सुमारास शिकॅगोचा नंबर पहिला येईल असें भाकीत येथील जाणत्या लोकांचें आहे. १६७४ च्या सुमारास येथील खेड्यांत कांहीं इंडियन्स राहत असत. लुई ज्यूलिएट व जॅकेस मार्केटी यांच्या साहसी प्रयत्नांनीं गोऱ्यांच्या वसाहतीस हळूहळू प्रारंभ झाला. १७९५ च्या सुमारास शिकॅगो नदीकांठची कांहीं भूमि इंग्रजांनीं विकत घेतली आणि १८०३–४ च्या सुमारास फोर्ट दरबॉर्न नांवाचें एक लहानसें बंदर अस्तित्वांत आलें. मध्यंतरीं स्वातंत्र्य-युद्धाच्या काळांत येथील स्वामित्व अमेरिकनांना सोडावें लागलें. पुढें लहानशा आगीनें या छोट्या गांवाचा नाश झाला. १८३३ मध्यें खऱ्या शिकॅगोची निर्मिति झाली. त्या वेळीं लोकसंख्या फक्त ५०० पर्यंत होती. चार वर्षांत ही चार हजार पर्यंत वाढली. १८४७ सालीं पहिला लोहमार्ग शिकॅगोस येऊन शिकॅगोची वाढ झपाट्यानें होत राहिली. १८६० सालीं लोकसंख्या १०९२६० होती ती दहा वर्षांत २९८९७७ पर्यंत वाढली. १८७१ मध्यें एक मोठी आपत्ति शहरावर कोसळली. अति भयाण आगींत १७००० इमारती जळून खाक झाल्या. २००,०००,००० डॉलर्सची मालमत्ता नष्ट झाली. एक लक्ष लोक निराधार झाले. या आपत्तींतून तीन-चार वर्षांतच शिकॅगो बाहेर पडून आजचें भव्य रूप त्यास हळूहळू प्राप्त झालें.

शिकॅगोची प्रसिद्धि तेथील उंच उंच इमारतींमुळें आहे. मिशिगन सरोवराच्या कांठानें आकाशास भिडणाऱ्या या इमारती निसर्गावर मानवानें मिळवलेल्या स्वामित्वाच्या पताकाच वाटतात. मिशिगन रस्त्यावर

उभी असणारी पामऑलिव्ह इमारत सर्वांत उंच म्हणून गणली जाते. इमारतींच्या बांधकामाचे सर्व नमुने येथें दृष्टीस पडतात. प्रत्येक इमारतीस कमींत कमी पांच लक्ष डॉलर्स तरी खर्च आलेला आहे. सर्व इमारती मिळून आजची मालमत्ता ५००,०००,००० डॉलर्सची आहे! शिकॅगोस सिटी ऑफ टॉवर्स असेंहि दुसरें नांव याच कारणासाठीं मिळालें आहे. लंडन गॅरेंटी ॲंड अक्सिडेंट बिल्डिंग, दि बॅंकर्स बिल्डिंग, पिट्सफील्ड बिल्डिंग, दि फील्ड बिल्डिंग इत्यादि इमारती फार प्रसिद्ध आहेत. प्रत्येकीची रचना निराळी, आकृति निराळी. ग्रॅंट पार्कमधील अति मोठ्या चौकाची शोभा वर्णावी तेवढी थोडीच. व्यापार आणि उद्योगधंदे यांचें फार मोठें केंद्र म्हणजे शिकॅगो. आज लोकसंख्या ५०,००,००० च्या आसपास असून मुख्य शहराचा विस्तार २९२ चौरस मैलांचा आहे. येथील प्रवासाचीं साधनें, नगराची रचना, हॉटेल्स, वृत्तपत्रें, रेडिओ, टेलिव्हिजन, संग्रहालयें यांना तोड इतरत्र क्वचित्च सांपडेल. अब्राहाम लिंकन, क्लीव्हलंड, हॅरिसन, रूझवेल्ट इत्यादि नऊ राष्ट्राध्यक्षांच्या नांवांनीं येथें असणाऱ्या इमारती डोळ्यांत भरण्याजोग्या आहेत. पंचावन्न हजार मोटारी एका दिवसांत शिकॅगो नदीवरचा पूल ओलांडून जातात–येतात.

शिकॅगोचा आर्थिक व्यवहार फार प्रचंड प्रमाणावरचा आहे. त्रेपन्न-चोपन्न बॅंका शिकॅगोची आर्थिक घडी नीटपणें बसवीत असतात. नॅशनल बॅंक व स्टेट बॅंक या दोन प्रमुख असून त्यांचें भांडवल अनुक्रमें १,२९१, १९४,००० व ३२०,९९१००० डॉलर्सचें आहे. शिकॅगोच्या पोस्ट ऑफिसची इमारत नव्यानें तयार झाली असून जगांतील सर्वांत मोठें पोस्ट ऑफिस म्हणून त्याची ख्याति आहे. इमारतीची किंमत २२,०००,००० डॉलर्स असून वर्षाच्या काठीं १,३६२,७९१,९५३ वस्तूंची देवाण-घेवाण या पोस्टांतून होत असते. याखेरीज आणखीहि लहान-मोठीं ग्रंथालयें आहेतच. शिकॅगोची युनिव्हर्सिटी शास्त्र, कला, संगीत व शिक्षण या विषयांसाठीं फार प्रसिद्ध असून अनेक देशांतील विद्यार्थी तेथें अभ्यासासाठीं आलेले असतात. आणखीहि कांहीं विद्यापीठें शिक्षणक्षेत्रांत प्रसिद्ध आहेत. चर्चेसनीं चालविलेलीं खाजगी विद्यालयेंहि लोकप्रिय झालेलीं दिसून येतात.

शिकॅगोच्या म्यूझियम्सचें वर्णन मी स्वतंत्रपणें करणार आहें. हिस्टॉरिकल सोसायटी, अॅड्लर प्लॅनेटोरियम, शेड मत्स्यालय, फाउण्टन ऑफ् टाईम, बकिंगहॅम कारंजें, जॅक्सन पार्क,सनकीन गार्डन्स, लिंकन पार्क,वॉशिंग्टन पार्क, शिकॅगो ऑपेरा, दि मर्केंडाइस मार्ट इत्यादि किती तरी ठिकाणें शिकॅगोस पाहण्यासारखीं आहेत. शिकॅगोचा कत्तलखाना जगप्रसिद्ध आहे. गुरांचा फार मोठा बाजार येथें आहे. १९४२ सालीं १०,३६८,०६२ जनावरें विकलीं गेलीं. एकट्या शिकॅगोहून अमेरिकेंतील पंचवीस मोठ्या शहरांना मांस पुरविलें जातें. आधुनिक यंत्रांनीं हजारों प्राण्यांचा संहार एकसारखा चाललेला असतो. शिकॅगोचीं रेल्वे-स्टेशन्स नेहमीं गजबजलेलीं दिसून येतात. अमेरिकेच्या प्रत्येक भागांतून येणाऱ्या गाड्या येथें एकच गर्दी करून सोडतात. रोज सुमारें १३०० गाड्या येथून सुटतात. प्रमुख लोहमार्गांचें केंद्रीकरण करण्याची नवी योजना १५,०००,००० डॉलर्स खर्च करून तयार होत आहे. हें असें प्रचंड उलाढालीचें शिकॅगो शहर.

शिकॅगोचीं म्यूझियम्स मला फार आवडलीं. नॅचरल हिस्ट्री म्यूझियम मिशिगन सरोवराकांठींच असून मी राहत होतों तेथून पांच–दहा मिनिटांच्याच अंतरावर होतें. तेथील भव्य इमारत मला एकसारखें आमंत्रण देत होती. कोलंबसानें ही नवी भूमि शोधून काढल्याचा चारशें वर्षांनंतरचा मोठा उत्सव १८९३ सालीं अमेरिकेनें शिकॅगोस साजरा केला. त्या वर्षींच या संग्रहालयाची खरें म्हणजे सुरुवात झाली. आणि तेव्हांपासून हळूहळू वाढ होत आज त्याला भव्य स्वरूप प्राप्त झालें आहे. मिशिगन सरोवराच्या कांठीं असणाऱ्या म्यूझियमच्या इमारतीवरून आंतील स्वरूपाची फारशी कल्पना येत नाहीं. मी सकाळीं नऊच्या सुमारास इमारतीच्या प्रवेशद्वाराशीं उभा होतों. हवा कुंद असून अंगाला झोंबणारें वारें हुडहुडी भरवण्यास समर्थ झाल्याचें दिसत होतें. बर्फाचा वर्षाव सर्वत्र एकसारखा होत राहिला असल्यामुळें वातावरण मला थोडें अनुत्साहाचेंच वाटलें. म्यूझियमच्या इमारतींत प्रवेश केल्यावर एकदम उबदारपणा वाटला. माणसें अगत्याचीं वाटलीं. ओव्हरकोट, हातापिशवी, कॅमेरा वगैरे सामान 'चेकरूम'-मध्यें देऊन मीं पहिल्या प्रशस्त हॉलमध्यें नजर टाकली. सारें कसें प्रसन्न वातावरण होतें.

स्टॅनूले हॉलच्या मधोमध दोन प्रचंड हत्ती स्तब्धपणें मुलांचीं मनें आकर्षून घेत होते. हॉलची विस्तीर्णता नजरेंत भरण्याजोगी होती. ३०० फूट लांब, ७० फूट रुंद व ७५ फूट उंच अशी त्याची क्षेत्रमर्यादा असून प्राथमिक स्वरूपाच्या आकर्षक वस्तु तेथें नीटनेटक्या रीतीनें मांडलेल्या दिसतात. हेन्री हेरिंग नांवाच्या कलावंतानें या वस्तुसंग्रहालयाचे हेतु स्पष्ट करणारे मोठे पुतळे तयार करून येथें उभे केले आहेत. या हॉलच्या डाव्या-उजव्या अंगांना प्रदर्शनाचे मुख्य विभाग आहेत. पहिल्या मजल्यावर प्राणिविभाग असून येथें नाना प्रकारचे पक्षी, त्यांचे सांगाडे, अमेरिकन प्राणी, जनावरें, सस्तन प्राणी, सरपटणारे प्राणी, कीटकजीव, आशियांतील प्राणी इत्यादींचा संग्रह मनोवेधक आहे. याच मजल्यावर मानववंश-शास्त्राचा एक प्रेक्षणीय विभागमुद्धां आपला किती वेळ घेऊन बसतो हें ध्यानांत येत नाहीं. मानवाच्या जाती, त्याची उत्क्रान्ति, निरनिराळे मानव-वंश, अमेरिकन इंडियन्स, इत्यादि विषय या विभागांत मूर्तिमंत होऊन उभे राहिलेले दिसतात. दुसऱ्या मजल्यावर वनस्पतिशास्त्राचीं विविध दर्शनें होतात. जगांतील प्रमुख वनस्पतींचा संग्रह येथें पाहावयास मिळतो. नाना प्रकारचीं फळें, पानें व फुलें यांचें नयनमनोहर दृश्य येथें प्रेक्षकांना नेत्र-पल्लवी करीत असतें. याच मजल्यावर भूस्तरशास्त्र, खगोलविज्ञान, जीर्णाव-शेष ( फॉसिल्स ) इत्यादि विभाग आहेत. तळमजल्यावर पुनः मानव-जातीचा इतिहास उभा केला आहे. अश्मयुगांतील मनुष्य, मादागास्कर, हवाई, न्यूझीलंड, आफ्रिका, फिलिपाईन्स, इंडोनेशिया इत्यादि देशांतील आदिवासी आपापल्या जुन्या ऐश्वर्यासहित येथें जमा झालेले आहेत. सागराच्या पोटांतील मत्स्यादि प्राण्यांचा संग्रहहि डोळ्यांना संतोष देणारा आहे.

कांहीं विभागांचें थोडें तपशीलवार वर्णन दिलें तर तुम्हांस तें आवडेल असें वाटतें. मानववंशशास्त्र हा एक महत्त्वाचा विभाग. मानवाचा इतिहास, त्याचे पोषाख, त्याचीं भांडींकुंडीं, त्याचीं घरें, त्याची चेहरेपट्टी, त्याची संस्कृति, त्याच्या कला या सर्वांचा विचार येथें झालेला आहे. खऱ्या माणसाच्या उंचीचे पुतळे मानवाच्या मुख्य मुख्य वंशांचीं वैशिष्ट्यें प्रकट करून दाखविण्यास समर्थ होते. नाक, डोळे, कातडीचा रंग, केसांची ठेवण

वगैरे सर्व बाबतींत नीटनेटकेपणा व शास्त्रशुद्धता होती. आपल्या देशांतील बंगाली मनुष्य, बनारसचा मनुष्य, जयपूरचा माणूस, बंगाली स्त्री या व्यक्तिरेखा बऱ्यापैकीं साधल्या होत्या. अमेरिकन इंडियन्सची तर सर्व कथा या संग्रहालयांत बोलकी झालेली आहे. वनस्पतिशास्त्राचा विभाग असाच अभ्यासकांना उपयुक्त आहे. वनस्पतिजीवन-विभागांतील जगांतील बहुतेक सर्व प्रमुख वनस्पतींची विभागणी शास्त्रशुद्ध पद्धतीनें केलेली आढळते. खाद्यपदार्थ, पेयें, मसाल्याचे पदार्थ, लांकूडफाटा, रबर, चीक व तेलें इत्यादि वनस्पतींचे उपयोगहि येथें दाखविले आहेत. उत्तर-दक्षिण अमेरिकेंतील वृक्षविशेष तर आहेतच; पण हिंदुस्थान, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, फिलिपाईन्स, जपान इत्यादि ठिकाणच्या वनस्पतिजीवनाचें प्रदर्शनहि या वस्तुसंग्रहालयांत बघावयास मिळतें. पानांपासूनचे विविध उपयोग येथें दर्शित झालेले आहेत. वस्त्रासाठीं तंतु; टोपल्या, हॅट, कापूस इत्यादि विविध प्रकारचे उपयोग अगदीं सहजासहजीं ध्यानांत येतात. पाहणाराचा सबंध दिवस येथें जातो. ज्ञानाचीं शेकडों दालनें या ठिकाणीं उभीं आहेत. आपले दोन डोळे पाहण्यास अपुरे पडतात.

शिकॅगोची प्रसिद्धि अशा म्यूझियम्ससाठीं आहे. येथील कत्तलखाना फार मोठा आहे. येथून व्यापारी उलाढाल फार मोठ्या प्रमाणावर होते. अमेरिकेंतील प्रमुख उद्योगधंद्यांचें हें प्रमुख केंद्र. नव्या वैभवाचें, नव्या सामर्थ्याचें जणुं प्रतीक ! मी मिशिगन सरोवराकांठीं असणाऱ्या एका प्रशस्त हॉटेलमध्यें राहत होतों. शिकॅगोस येऊन पोंचलों तेव्हां प्रथम आठवण झाली ती १८९३ मध्यें स्वामी विवेकानंद येथें आले होते त्या प्रसंगाची. कोलंबसानें ही भूमि शोधून काढली. या घटनेच्या स्मृतीसाठीं एक मोठें प्रदर्शन भरणार होतें. त्याचाच एक भाग म्हणून एक धर्मपरिषद् आंखण्यांत आली होती. या धर्मपरिषदेस हिंदुस्थानच्या या आगंतुक स्वामीनें केवढें वेगळें स्वरूप दिलें ! भारतीय धर्माची केवढी विलक्षण चमक याच शहरांत साठ वर्षांपूर्वीं लोकांचे डोळे दिपविती झाली. या धर्मपरिषदेचें ठिकाण कोणतें ? शिकॅगोस आल्यावर माझ्या मनांत हा प्रश्न प्रथम उभा राहिला होता. याच मिशिगन सरोवराकांठीं स्वामीजी हिंडले असल्याचें मला स्मरत होतें. दोन-अडीच हजार पृष्ठांच्या टेलिफोन

डिरेक्टरींत कसलाहि तपास लागण्यासारखा नव्हता. पण मनांत तें ठिकाण सांपडावें ही इच्छा मात्र तीव्र होती.

पहिल्याच दिवशीं मी शिकॅगोची प्रसिद्ध कलासंस्था दि आर्ट इन्स्टिटयूट ऑफ् शिकॅगो पाहण्यास गेलों होतों. सहज कुतूहल म्हणून मीं संस्थेच्या इतिहास-ग्रंथासंबंधीं चौकशी केली. इमारतीच्या इतिहासांत याच ठिकाणीं १८९३ मध्यें धर्मपरिषद् भरली होती हाहि उल्लेख पाहून मीं चमकलों. मला कमालीचा हर्ष झाला. याच ठिकाणीं भारतांतील एका तरुण संन्याशानें शेंकडों धर्ममार्तंडांना बाजूस सारून हिंदु धर्मास मानाच्या स्थानावर बसविलें होतें. येथूनच स्वामीजींच्या मुखांतून सहस्र लोकांनीं प्रथमच हिंदु धर्माचें स्वरूप समजावून घेतलें होतें. कला-विभागांतील चित्रें व नाना प्रकारचे भव्य पुतळे माझ्यासमोर होते. नव्यानेंच सुरू झालेलें छायाचित्रांचें प्रदर्शन पाहण्यांत माणसें दंग होऊन गेलीं होतीं. पण माझ्या मनापुढें १८९३ सालीं भरलेल्या धर्मपरिषदेचें चित्र आकारास येत होतें.

अनेक धर्मांचे पुढारी व्यासपीठावर रांगेनें आपली पाळी केव्हां येते याची वाट पाहत बसल्याचा देखावा मला दिसूं लागला. सकाळचे दहा वाजण्याचा सुमार असावा. जगांतील सर्व धर्मांचे पुढारी या ठिकाणीं एकत्र झाले होते. स्टेजवर मध्यभागीं रोमन कॅथॉलिक पंथाचे अधिकारी विराजमान झालेले होते. त्यांच्या प्रार्थनेनें सभेस प्रारंभ झाला. त्यांच्या दोन्ही बाजूंस पौर्वात्य देशांतील धर्मांचे पुढारी बसलेले होते. प्रतापचंद्र मुजुमदार, गांधी, चक्रवर्ती, ॲनी बेझंट, धर्मपाल आपापल्या धर्मपंथाचा निर्देश सभेंत करणार होते. स्वामीजी त्याच रांगेंत आपल्या भगव्या पोषाखानें व चेहऱ्यावरील तेजानें सर्वांचें चित्त ओढून घेत होते. प्रत्येकजण आपलें भाषण आठवून आठवून तयार ठेवीत होता. भाषणाची तयारी करणें विवेकानंदांना माहीत नव्हतें. समोर असणारा संमिश्र समाज पाहून प्रथम ते भांबावून गेले. वयानें, ज्ञानानें, अनुभवानें श्रेष्ठ असणारे हे सर्व वक्ते व ऐकणाराहि समंजस पण बुद्धिमान श्रोतृवर्ग. सर्वत्र देखावा त्यांनीं पूर्वीं कधीं पाहिलेला नसल्यामुळें विवेकानंद गोंधळून गेले. दरवेळीं आपली पाळी आली कीं, त्यांनीं दुसऱ्यास बोलावयास सांगितलें. सभेपुढें धीटपणें उभें कसें रहावयाचें व बोलावयाचें तरी काय हाच प्रश्न त्यांना पडलेला

होता. त्यांचा घसा कोरडा पडून बोबडी वळण्याचा प्रसंग आला.
पण शेवटीं डॉ. बरोज यांनीं या तरुण संन्याशाची ओळख करून दिली. विवेकानंद कसेबसे उठून उभे राहिले. धडधडत्या अंतःकरणानें त्यांनीं सरस्वतीचें नमन म्हटलें व त्यांच्या मुखांतून शब्द बाहेर पडले, "माझ्या अमेरिकन बंधु-भगिनींनो !" वीज चमकून जागृति यावी तशीं सर्व माणसें चटकन् भानावर आलीं. भाषणाची सुरुवात अशा पद्धतीनें ते प्रथमच ऐकत होते. कित्येकांनीं उभे राहून नकळत या तरुण माणसास प्रणाम केले. 'सभ्य स्त्री-पुरुषहो,' म्हणून नित्याचा मार्ग सोडून बंधुत्वाचें नातें जोडणारा हा तरुण पोरगा बोलणार तरी काय ? अशा विचारानें सर्वांनीं आपले कान एकत्र केले. स्वामींचें भाषण अस्खलित इंग्रजींत सुरू झालें. हिंदु धर्माची सहिष्णुता ते श्रोत्यांना समजावून सांगत होते. सर्व धर्मांना आश्रय हिंदु धर्मानें कसा दिला याचें निरूपण त्यांनीं केलें. यापूर्वीं ज्यानें त्यानें आपल्या धर्माचें वैभव वर्णन केलें होतें. पण विवेकानंदांनीं विश्वधर्माची महती निवेदन केली. तुम्ही कोणताहि धर्म स्वीकारा, कोणत्याहि पंथाचे असा, कोणत्याहि देशाचे तुम्ही असानात, तुमची प्रामाणिकपणें केलेली सेवा शेवटीं परमेश्वरापाशीं रुजू होणारच. हें त्यांच्या व्याख्यानाचें मुख्य सूत्र होतें. सभेंतील प्रत्येक श्रोत्यास वाटलें हा मनुष्य आपल्याच धर्मासंबंधीं बोलतो आहे आणि यांतच त्यांच्या यशाचें मर्म होतें. सर्व धर्मांच्या वतीनें हिंदु धर्म स्वामींच्या मुखांतून आकारास येत होता. जात, वर्ण, धर्मपंथ यांचीं बंधनें तोडून एका मानवतेची उपासना करणारा धर्म स्वामी विवरून सांगत होते. कोणत्याहि धर्मावर त्यांनीं टीका केली नाहीं. कोणाचेहि दोष त्यांनीं दाखविले नाहींत. स्वामींच्या विजयाचें एकमेव कारण हेंच होतें. स्वामींचें भाषण सर्वांनीं अगदीं शांतपणें ऐकून घेतलें. ज्याच्या त्याच्या तोंडीं हिंदु धर्म व स्वामीजी असे शब्द ऐकूं येऊं लागले. सबंध सभेचें रूप पालटून गेलें. परिषदेंत स्वामीजी एकूण बारा–तेरा वेळां बोलले. स्वामींचें भाषण सभापति मुद्दामच शेवटीं ठेवीत. कारण तोंपर्यंत लोक निश्चयानें थांबणारच हें त्यांना माहीत होतें. शेवटच्या समारोपाच्या भाषणांत त्यांनीं सांगितलें, "कोणीहि ख्रिश्चन हिंदु होणार नाहीं. कोणीहि हिंदु ख्रिश्चन होणार नाहीं. प्रत्येकजण आपापल्या धर्माप्रमाणें वागून मानव-

धर्मांची उपासना करीत राहील. जगांतील पावित्र्य, शुद्धता आणि चारित्र्य हें कांहीं कोणा एका धर्माचें वा धर्मपंथाचें वैभव नाहीं. सर्व धर्मांनीं या गोष्टींना महत्त्व दिलें आहे. दुसऱ्या धर्माचा द्वेष करणारा खरा धर्मच नव्हे. '' नव्या जगासमोर स्वामींनीं हिंदु धर्म विशद करून ज्या ठिकाणीं सांगितला तेथें उभे असतांना मला हा सारा देखावा दिसत होता. स्वामींचा विजय मला स्फुरण देत होता. त्यांच्या मुखांतून स्त्रवलेले शब्द मला पावन करीत होते. सर्वांनीं केलेलें त्यांचें कौतुक मला ऐकूं येत होतें. स्वामींची धीरगंभीर व चैतन्यमय मूर्ति माझ्या डोळ्यांसमोरून मुळीं हलेनाच ! मी या भव्य इमारतींतील चित्रप्रदर्शन पाहणार तरी कसें ? डोळे असून मी आंधळा झालों होतों. कान असून मला ऐकूं येत नव्हतें. किती तरी नव्या गोष्टी पाहण्यासाठीं मी निघालों होतों. अमेरिकेची चित्रकारी व मूर्तिकला यांचे विविध नमुने येथें नीटपणें मांडले होते. लिसा लार्सन या तरुण मुलीनें छायाचित्रणांत मोठेंच नांव अलीकडे कमाविलें आहे. तिचीं सर्व चित्रें प्रदर्शनांत होतीं. फ्रेंच कलाकृतींचा नवा डौल येथें मांडण्यांत आला होता. जपानी चित्रांचें एक नवें दालन उघडण्यांत आलेलें असल्यामुळें हौशी रसिकांची एकच गर्दी जमलेली होती. नाना प्रकारचीं, विविध पोषाखांत माणसें ये-जा करीत होतीं, शिकॅगोच्या आर्ट इन्स्टिट्यूटमधील चित्रांचा आस्वाद घेत होतीं. पण मला मात्र एकच चित्र दिसत होतें. साऱ्या कलाकृतींना मागें सारणारें, साऱ्या कौशल्यास लाजविणारें व सर्व रंगांना रंग देणारें तें चित्र होतें. सजीवपणें माझ्यासमोर उभे राहून साठ वर्षांपूर्वींचा प्रसंग मला स्पष्टपणें सांगण्याचा प्रयत्न तें चित्र करीत होतें. वेदांचा, उपनिषदांचा, भगवद्गीतेचा, रामकृष्णांचा, चैतन्यांचा, ज्ञानदेव-तुकारामाचा संदेश पाश्चिमात्य जनतेस पहिल्यानें सांगणारे विवेकानंद माझ्या डोळ्यांसमोर उभे होते.

ज्ञान ही एक शक्ति आहे. याच शक्तीच्या साह्यानें मानवानें सृष्टींतील अनेक गूढ रहस्यें उकलून दाखविण्याचा अद्वितीय पराक्रम केला आहे. जें अज्ञात आहे, दडलेलें आहे, अमूर्त आहे त्यास धरून पकडून आपल्या सेवेस लावण्याचा अविरत उद्योग गेल्या शतकांत अमेरिकेंत झालेला दिसून येतो. एऱ्हवीं आपणांस ज्ञानाचा विषय म्हणून ध्यानांतहि नसावा, पण त्याची सर्व बाजूंनीं चौकशी करून या महा बुद्धिमान् व जिज्ञासू माणसांनीं त्याचें एक शास्त्र बनवून आपणांपुढें उभें केलेलें असतें. किडामुंगीसारख्या क्षुद्र वाटणाऱ्या प्राण्याच्या जीवित-रचनेपासून तों गत इतिहासांतील अजस्र प्राण्यांपर्यंतची सर्व हकीगत शिकॅगोच्या नॅचरल हिस्ट्री म्यूझियममध्यें मी डोळ्यांनीं बघितली होती. आदिमानवानें गारगोटीवर दगड आपटून अग्नि निर्माण केला, तेव्हांपासून वीज तयार झाल्यापर्यंतचे सर्व शोध त्या ठिकाणीं मूर्तिमंत स्वरूपांत उभे असलेले मीं पाहिले होते. एक सबंध दिवस या ठिकाणीं मीं घालविला होता. जगांतील बहुतेक सर्व शास्त्रांचें व कलांचें ज्ञान या पदार्थसंग्रहालयांत बोलक्या स्वरूपांत आपल्या सेवेस हजर असल्याचा अनुभव मला आला होता. आतां आणखी कांहीं पाहण्यासारखें नाहीं अशी माझ्या मनाची समजूत झाली. ज्ञानविद्येचें संवर्धन व जतन म्हणजे काय याचा फार उत्तम नमुना मीं शिकॅगोस मिशिगन सरोवराकांठीं एका भव्य इमारतींत पाहिला आणि निवासस्थानीं परत आलों. आणखी एक दिवस मला या धनाढ्य नगरींत राहावयाचें होतें. फेब्रुवारीचा पहिला आठवडा असल्यानें हवा कुंद होऊन सर्वत्र बर्फच बर्फ पडलेलें होतें. माझ्या एका फिलिफाईन्समधील मित्रानें दुसऱ्या दिवशीं दुसऱ्या एका म्यूझियमला भेट देण्याचा विचार ठरविला. आतां आणखी पाहण्यासारखें काय उरलें आहे? सर्व ज्ञानांची व विद्यांची बेरीज तर यापूर्वींच नॅचरल हिस्ट्री

म्यूझियममध्यें पाहून झाली. आतां ज्ञानाचे विषय तरी कोणते आहेत या देशांत? या जिज्ञासेच्या पोटींच दुसऱ्या दिवशीं आम्ही शिकॅगो येथील 'म्यूझियम ऑफ सायन्स अँड इंडस्ट्री' पाहण्यास निघालों.

नजरेंत पहिल्यानें भरली ती म्यूझियमची अवाढव्य इमारत, भोंवतींची विस्तीर्ण झाडी व पाठीमागचें मिशिगन सरोवर. इमारतीच्या समोर चांगला ऐसपैस असा मोठा चौक, चांगले रस्ते आणि मुबलक अशी गाड्या ठेवण्यासाठीं जागा. शिकॅगोसारख्या गजबजलेल्या व दाटीदाटीच्या शहराशेजारींच एवढ्या शांत जागेंत एवढी मोठी इमारत येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवासी लोकांनीं गजबजून गेली असेल अशी कल्पना नव्हती. गेल्या पंचवीस-तीस वर्षांतच खरें म्हणजे या म्यूझियमची उभारणी झाली आहे. ज्यूलियस रॉसेन्वाल्ड नांवाच्या एका धनाढ्य उद्योगपतीनें या इमारतीसाठीं सुरुवातीस ३०००,००० डॉलर्स देणगी म्हणून दिले. पुढें इमारत पूर्ण होण्यासाठीं, आंतील प्रदर्शनाची व्यवस्था नीट होण्यासाठीं त्यानें आणखीहि कांहीं खर्च केला. त्याचा एकट्याचा एकूण खर्च या इमारतीच्या कामांत ७,५००,००० डॉलर्सचा झाला! म्यूझियमची कीर्ति वाढूं लागली. निरनिराळ्या देशांतील कित्येक प्रवासी या प्रसिद्ध प्रदर्शनाचा लाभ घेऊं लागले. असें सांगतात कीं, १९५५ सालीं २५ लक्ष लोकांनीं या संस्थेस भेट दिली! सबंध इमारतीचा डौलहि डोळ्यांना दिपविणारा आहे. ३५०,००० घनफूट दगड एकूण २८००० टन वजनाचा या इमारतीस लागला आहे. प्रत्यक्ष प्रदर्शनाचें क्षेत्रफळ २६३,००० चौरस फूट म्हणजे जवळजवळ सहा एकरांचें आहे. इमारतीची लांबी सुमारें ११४५ फुटांपर्यंत असून पहिल्या मजल्यापासून मधला घुमट १२० फूट उंच आहे. म्यूझियमच्या भोंवतालची जागा धरून एकंदर व्याप चौदा एकरांचा आहे.

देशांत विज्ञानशास्त्र व उद्योगधंदे यांत गेल्या शतकांत जी प्रगति झाली तिचें मूर्तिमंत दर्शन या ठिकाणीं होतें. प्रत्येक कारखान्यास वा संशोधन-क्षेत्रास भेट देण्यास प्रत्येकास सवड कोठें आहे? पण या म्यूझियममध्यें सर्व कारखान्यांची व सर्व उद्योगधंद्यांचीं लहान लहान रूपें पण संपूर्ण कल्पना देणारीं अशीं उभीं केलीं आहेत. नुसतीं उभीं नाहींत तर त्यांची संपूर्ण प्रक्रिया व कार्यपद्धति येथें समजून येते. शाळेंतील मुलांनाच काय पण चांगल्या

चांगल्या जाणत्या माणसांनाहि येथें आपण शहाणे झालों, बहुश्रुत झालों, समृद्ध झालों असा अनुभव येतो. प्रत्येक विभागांत संशोधनाची मूळ कल्पना कशी निघाली व प्रचंड प्रमाणांत उत्पादन व्हावें म्हणून तिचा उपयोग उद्योग-क्षेत्रांत कसा झाला याचें प्रात्यक्षिक येथें पाहावयास मिळतें. आजच्या विज्ञान-संस्कृतीस जें जें आवश्यक तें तें येथें उभें आहे. एकाच छपराखालीं वस्त्रें तयार कशीं होतात, किड्यांपासून रेशीम कसें मिळतें, ट्रॅक्टर जमीन कशी नांगरतो, इत्यादि विविध उद्योगांची माहिती आपणांस होते. विज्ञानाच्या व उद्योगधंद्याच्या इतिहासांतील किती तरी सोनेरी पानें येथें वाचावयास मिळतात. मीं या भव्य इमारतींत प्रवेश केला तेव्हां प्रथम दोन-चार तासांत बाहेर पडण्याचा निश्चय मी माझ्या मित्राला बोलून दाखविला. सकाळचे साडेनऊ वाजले होते. आणि आम्हीं भराभरा सर्व काहीं पाहण्याचें ठरविलें. बरोबर मध्यभागीं एक भव्य असें पृथ्वीचें प्रतीक उभें केलें आहे. याच्याच वर या प्रदर्शनाचें स्वरूप थोडक्यांत निवेदन केलें आहे. “Science discerns the laws of nature. Industry applies them to the needs of Man.” निसर्गांतील रहस्यें विज्ञान शोधून काढतें आणि मानवाच्या हितार्थ त्यांचा उपयोग उद्योगधंद्यांत केला जातो. असा भावार्थ या वाक्याचा या मध्यबिंदूपासून सभोंवतीं वेगवेगळे मोठे हॉल्स आहेत. पूर्वेच्या बाजूस प्लॅस्टिक्सची सर्व किमया कशी सिद्ध होते व आजच्या मानवी जीवनांत याचा केवढा प्रभाव आहे हें समजतें. नजीकच पंखावरून प्रगति नांवाच्या विभागांत विमानविद्येचा इतिहास साकार झाला आहे. युनायटेड एअर लाईन्सनें हा विभाग उभा केला असून येथें चित्रपट, मॉडेल्स, नकाशे, आलेख, चित्रें इत्यादींच्या साह्यानें मानवानें हवेवर मिळविलेल्या विजयाचा इतिहास येथें दृश्य स्वरूपांत साकार झाला आहे.

अमेरिका देश अवाढव्यपणें इकडे तिकडे पसरलेला. सुरुवातीच्या काळांत पूर्व-पश्चिम टोकें रेल्वेनें सांधण्याचा अद्‌भुत विक्रम येथील लोकांना करावा लागला. सुमारें तीन हजार मैलांच्या या रेल्वे मार्गाच्या रोमांचकारी कथा आतांहि अमेरिकेंत चित्रपटाच्या विषयांचे नमुने म्हणून गाजलेल्या आहेत. या म्यूझियममध्यें तीन हजार चौरस फूट भूमीवर सॅंटॅफी रेल्वे

रोडचें एक छोटेसें स्वरूपच उभें केलें आहे. याचें कार्य एकसारखें चाललेलें असतें. मुलांच्या खेळण्यासारखी रेल्वे नव्हती. सर्व मार्गांचें यथार्थ वर्णन येथें पाहावयास मिळणारें होतें. रॉकी पर्वतांतून पश्चिमेच्या मरुभूमींत धांवणारी रेल्वे गाडी, मालगाडी आपणांस येथें चालत्या धांवत्या स्वरूपांत दिसते. ग्रँड कॅननचा भाग थोड्या फार प्रमाणांत पाहिल्याचें श्रेय मिळतें. कॅलिफोर्नियाच्या फळबागा, तेलाच्या खाणी, आणि अनेक कारखाने यांना जोडणारी ही रेल्वे या ठिकाणीं आपणांस उभे असतांनाच दहा-पांच मिनिटांत सर्व अमेरिकेंत हिंडवून आणते. रबराच्या उत्पादनाची व उपयोगाची कथा अशीच दृश्य केली आहे. गुडरिच या प्रसिद्ध उद्योगपतीच्या कंपनीची ही जाहिरात असली तरी अनेकांच्या ज्ञानांत त्यामुळें भर पाडणारी आहे. रबराचे गुणधर्म, त्याची निर्मिति, आणि आधुनिक मानवी जीवनांत त्याचा हरघडी होणारा वापर यांचें यथार्थ दर्शन कोणास घ्यावयाचें असेल तर शिकॅगोच्या या विलक्षण म्यूझियममध्यें यावें. येथेंच शेजारीं स्विफ्ट कंपनीनें आपणांस हव्या असणाऱ्या अन्नाचें व खाद्यपदार्थांचें पृथक्करण करून मांडलेलें प्रदर्शन होतें. माणसास जास्तींत जास्त वर्षें आयुष्य प्राप्त होण्यासाठीं खाण्यांत रोज कोणते पदार्थ हवेत हें तेथें लोक समजावून घेतात. मनांत विचार आला आमच्या येथें कांहीं का होईना पण खावयास मिळालें तरी पुष्कळ पण या श्रीमंत राष्ट्रांत खाण्याचेंहि शास्त्र बनलें आहे. विशिष्ट प्रकारचें खाद्य दिल्यामुळें चांगली पोसलेली व खाद्याचा प्रकार बदलल्यामुळें रोडावलेली कोंबडी जीवनसत्त्वांचा धडा देत होती. एका बाजूस बरींच कोंबडीचीं अंडीं असून दर दोन-तीन मिनिटांस एकेक अंडें कृत्रिम उपायानें उबवून त्यांतून पिलूं बाहेर आणलें जातें. चोंचीनें कवच फोडून बाहेर येणारा जीव आपणांस जीवशास्त्राचा पाठ देण्यास तत्पर झालेला असतो. लहान मुलांची, बायकांची, पुरुषांची गर्दी येथें कायमची असते. वरवर निर्जीव दिसणाऱ्याचें एकदम सजीवांत झालेलें रूपांतर नवलाचें वाटतें. सजीव आणि निर्जीव यांतील भेदरेषा नेमकी कोणती हें सांगणें कठीण आहे असें आपलें अध्यात्मज्ञान म्हणतें, याची साक्ष येथें पटण्यासारखी आहे.

दक्षिण बाजूस स्वयंचलित वाहनांचा इतिहास आहे. 'जनरल मोटर्स' या

विख्यात कंपनीनें मोटारींचा इतिहास उभा करून अगदीं चालू वर्षीं तयार झालेल्या मोटारीची सुखसोय प्रकटपणें मांडलेली दिसून आली. पहिल्यानें ओबडधोबड स्वरूपांतील मोटार या ठिकाण बघून झाली कीं, नव्या सौंदर्यानें डोळे तृप्त होतात. चाकाच्या इतिहासापासून येथें प्रारंभ आहे. चाकाची कल्पना माणसास सुचली कशी, त्यांत आरे ( स्पोक्स ) कसे निर्माण झाले, त्यावर रबरी धावा कशा चढल्या या सर्व गोष्टी येथें आपल्या ज्ञानांत भर घालण्यास तयार आहेत. पहिलीं पहिलीं यंत्रें पाहून गंमत वाटते. मधून मधून नवीं यंत्रेंहि मांडून ठेवलीं आहेत. कोणाच्या मनांत आलें कीं, तो चालवून पाहतो. तशा सूचना तेथें लिहिलेल्या असतात. नव्या कोऱ्या डौलदार मोटारी ज्याप्रमाणें आपलें चित्त आकर्षित करून घेतात त्याचप्रमाणें जुन्या रांगड्या गाड्या आजहि लोकांना गंमतीच्या वाटतात. एका फार पूर्वींच्या गाडींत चढून, गाडी आपण हाकीत आहोंत अशा थाटांत किती तरी हौशी लोक आपलें छायाचित्र काढून घेतात. ही पोरकट इच्छा मींहि भागवून घेतली. पंचवीस सेंट्स दिल्यावर एका क्षणांत त्या खटाऱ्यासहित आपलें चित्र घेतलें जातें आणि अर्ध्या तासांत तें आपणांस तयार होऊन मिळतें. नव्यालाहि माणूस कधीं कधीं कंटाळतो. त्याला जुन्या वस्तूंतहि नवेपणा वाटूं लागतो.

पलीकडच्या बाजूस सरपण आणि खनिजें यांचा विभाग होता. येथील सर्वांत आकर्षक गोष्ट म्हणजे लहान प्रमाणांत कार्य दाखविणारी एक कोळशाची खाणच तयार केली आहे. पंचवीस सेंट्स दिले कीं, आपणांस विजेच्या जिन्यावरून जमिनीच्या पोटांत जातां येतें. कोळशाच्या खाणीचें प्रत्यक्ष काम कसें चालतें याचा खरा अनुभव आपणांस घेतां येतो. पेट्रोलियमच्या खाणींची अशीच तऱ्हा. मानवी प्रगतींत या महत्त्वाच्या खनिजास केवढें महत्त्व आहे हें समजतें. एका मोठ्या जगाच्या नकाशांत विजेच्या दिव्यांनीं पेट्रोल सांपडणाऱ्या भू-विभागांची नोंद करून शेजारीं तपशिलांत सर्व खुलासा केलेला पाहावयास सांपडतो. खनिजाचा संग्रह जमिनीच्या पोटांत कसा होतो, भूस्तरांचे प्रकार कोणते असतात, पेट्रोलियमचा शोध कसा घेतात, आणि तेल वरतीं कसें आणलें जातें यासंबंधींची माहिती चित्रें, मॉडेल्स, आलेख यांच्या साह्यानें समजावून दिली आहे.

इतर मुख्य धातूंच्या खाणींसंबंधीं व त्यांच्या उत्पादनासंबंधीं विस्तारानें या प्रदर्शनांत माहिती मिळते.

या प्रदर्शनाच्या एका छोट्या विभागांत शेतीचें संपूर्ण प्रात्याक्षिक पाहावयास मिळतें. झाडेंझुडपें, शेतांतील पिकें, प्राणी आणि आधुनिक यंत्रसामग्री येथें आपणांस अमेरिकन शेतकऱ्याचें जीवन उभें करतांना दिसतें. ट्रॅक्टर व त्यास जोडावयाचीं कांहीं अवजारें त्यांच्या कार्यासहित येथें पाहावयास मिळतात. नांगरणी, पेरणी, बेणणी, कापणी, मळणी हीं शेतीचीं विविध कामें यंत्रांच्या मदतीनें कशीं होतात याचें जणुं छोटेंसें विश्वच येथें आकारास आलें आहे. विज्ञान-विभागांत सर्व शास्त्रांचा इतिहास निवेदन केला आहे. गणिताच्या भागांत गणितांतील अनेक चमत्कार जाणत्यांना मनोरंजक वाटतात. अंकगणित, भूमिति, बीजगणित या शास्त्रांचा उदय-विकास कसा झाला, आधुनिक शास्त्राच्या प्रगतीस गणिताचा हातभार कसा आहे याची कल्पना येथें पूर्णपणें येते. गणित करणारीं यंत्रें येथें आहेत. व्यापाऱ्यांचा हिशेब करणारीं यंत्रें येथें आहेत. कालमापनाच्या पद्धतीचा इतिहास येथें डोळ्यांना पाहावयास मिळतो. जुन्यापुराण्या घड्याळापासून तों एका क्षणांत पृथ्वीच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत संदेश देण्याच्या प्रगतीपर्यंतचा इतिहास या ठिकाणीं आकारलेला आहे. पाहतां पाहतां भान हरपून जावें.

टेलिफोनचा विभाग तर सर्वांना करमणुकीचा वाटतो. विविध रंगांचे टेलिफोनचे सेट्स मोठे आकर्षक आहेत. बेल टेलिफोन सिस्टिमनें हें प्रदर्शन मोठ्या आकर्षक स्वरूपांत मांडलेलें आहे. प्रत्येकास येथून बोलतां येतें, आपला आवाज ऐकतां येतो. कांहीं विशिष्ट भाषांतून आपणांस उत्तरेंहि मिळतात. टेलिव्हिजन हें सर्वांत महत्त्वाचें मनोरंजनाचें साधन ! याचें काम कसें चालतें तें या ठिकाणीं समजावून घ्यावें. आपण एका ठिकाणीं उभें रहावें तों दुसऱ्या बाजूस टेलिव्हिजन सेटवर आपलें चित्र आपणांस दिसूं लागतें. आपली हालचाल आपणांस तेथून वेडावूं लागते. येथून लौकर हलूच नयेसें वाटतें. कोलंबस गांवीं असतांना मी रोज रात्रीं टेलिव्हिजनवरचे कार्यक्रम पाहत असे. दोन-तीन वेळां टी. व्ही. केंद्रावरहि मी गेलों होतों. पण ‘ पडद्यामागील ’ कार्यपद्धति पाहून मन हरखून गेलें. दोन-चार

तासांत सर्व प्रदर्शन पाहून संपवावें हा माझा उद्देश होता; पण आतां दीड वाजण्याचा सुमार होता आणि फक्त एकच मजल्यावरचें प्रदर्शन नुसतें पाहून झालें होतें. सर्व गोष्टी बारकाईनें पाहावयाच्या म्हणजे दोन-तीन दिवस तरी पाहिजेत. दुपारची वेळ झाली असल्यानें तेथेंच तळघरांत असणाऱ्या अन्नपूर्णागृहांत मी जेवण घेण्यास गेलों. किती तरी लोकांची गर्दी तेथें लंचसाठीं झालेली होती. कांहींनीं आपल्या घरून लंच आणली असल्यानें त्यांच्यासाठीं टेबलें–खुर्च्या टाकून एक स्वतंत्र व्यवस्था कांहीं निसर्गाचा देखावा निर्माण करून केली होती. म्हणजे सहजासहजीं वनभोजनाचाहि थाट व्हावा. थोडी विश्रांतीहि मला हवी होती. नव्या नव्या गोष्टी पाहतांना वेळेचें व पाय दुखत असल्याचें भान राहत नव्हतें. पण लंच घेण्यास बसल्यावर मग मात्र त्याची जाणीव होत असे.

सुमारें सव्वा दोनच्या सुमारास सभोंवतींच्या गॅलरींतून प्रदर्शनाचा जो प्रेक्षणीय विभाग होता त्याकडे आम्ही वळलों. प्रत्येक ठिकाणीं समजावून देण्यास एखादी बाई वा मुलगी उभी असेच, पण खुद्द वस्तूच इतक्या बोलक्या असत कीं, सहजासहजीं मांडणीवरून सारें ध्यानांत यावें. अमूर्त तत्त्व आलेख, चित्रें, प्रतिकृति, नकाशे यांच्या मदतीनें साकार व दृग्गोचर कसें करावें याचें शास्त्रच अमेरिकेंत बनलें आहे. कधीं ठसकेबाज व्यंग-चित्रांनीं सुद्धां फार चांगलें काम होतें. शिकॅगोस असतांनाच एके दिवशीं मला थोडा ताप आल्यासारखें झालें म्हणून मी दिवसां दुपारीं दीड-दोनच्या सुमारास पलंगावर पडलों होतों. तों मोलकरीण खोली स्वच्छ करण्यास आली. तिनें दार उघडलें व परत झटकन् लावून घेतलें. तिला वाटलें, मी खोलींत नव्हतों. नंतर तिनें बाहेरच्या दारावर एक लहानशी पाटी लावल्याचें माझ्या ध्यानांत आलें. मी जिज्ञासेनें पाहिलें तों एक व्यंग-चित्र होतें तें. तोंडाचा चंबू करून, दोन्ही ओठांपाशीं तर्जनी धरून तें सांगत होतें, 'शू: शू: ! माझी प्राकृति बरी नाहीं मला कृपा करून त्रास देऊं नका.' बहुतेक सर्व व्यवहार अशा गंमतीच्या व्यंगचित्रांनीं साधले जातात. शिकॅगोच्या या म्यूझियममध्यें अशा चित्रांचा फार परिणामकारक रीतीनें उपयोग केलेला आहे. विद्युच्छक्ति आणि लोहचुंबक यांच्या कथा विस्तारानें बोलूं लागल्या होत्या. लहानपणीं पुस्तकांत वाचलेलें व

इतर मुख्य धातूंच्या खाणींसंबंधीं व त्यांच्या उत्पादनासंबंधीं विस्तारानें या प्रदर्शनांत माहिती मिळते.

या प्रदर्शनाच्या एका छोट्या विभागांत शेतीचें संपूर्ण प्रात्यक्षिक पाहावयास मिळतें. झाडेंझुडपें, शेतांतील पिकें, प्राणी आणि आधुनिक यंत्रसामग्री येथें आपणांस अमेरिकन शेतकऱ्याचें जीवन उभें करतांना दिसतें. ट्रॅक्टर व त्यास जोडावयाचीं कांहीं अवजारें त्यांच्या कार्यासहित येथें पाहावयास मिळतात. नांगरणी, पेरणी, बेणणी, कापणी, मळणी हीं शेतीचीं विविध कामें यंत्रांच्या मदतीनें कशीं होतात याचें जणुं छोटेंसें विश्वच येथें आकारास आलें आहे. विज्ञान-विभागांत सर्व शास्त्रांचा इतिहास निवेदन केला आहे. गणिताच्या भागांत गणितांतील अनेक चमत्कार जाणत्यांना मनोरंजक वाटतात. अंकगणित, भूमिति, बीजगणित या शास्त्रांचा उदय–विकास कसा झाला, आधुनिक शास्त्राच्या प्रगतीस गणिताचा हातभार कसा आहे याची कल्पना येथें पूर्णपणें येते. गणित करणारीं यंत्रें येथें आहेत. व्यापाऱ्यांचा हिशेब करणारीं यंत्रें येथें आहेत. कालमापनाच्या पद्धतीचा इतिहास येथें डोळ्यांना पाहावयास मिळतो. जुन्यापुराण्या घड्याळापासून तों एका क्षणांत पृथ्वीच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत संदेश देण्याच्या प्रगतीपर्यंतचा इतिहास या ठिकाणीं आकारलेला आहे. पाहतां पाहतां भान हरपून जावें.

टेलिफोनचा विभाग तर सर्वांना करमणुकीचा वाटतो. विविध रंगांचे टेलिफोनचे सेट्स मोठे आकर्षक आहेत. बेल टेलिफोन सिस्टिमनें हें प्रदर्शन मोठ्या आकर्षक स्वरूपांत मांडलेलें आहे. प्रत्येकास येथून बोलतां येतें, आपला आवाज ऐकतां येतो. कांहीं विशिष्ट भाषांतून आपणांस उत्तरेंहि मिळतात. टेलिव्हिजन हें सर्वांत महत्त्वाचें मनोरंजनाचें साधन ! याचें काम कसें चालतें तें या ठिकाणीं समजावून घ्यावें. आपण एका ठिकाणीं उभें रहावें तों दुसऱ्या बाजूस टेलिव्हिजन सेटवर आपलें चित्र आपणांस दिसूं लागतें. आपली हालचाल आपणांस तेथून वेडावूं लागते. येथून लौकर हलूच नयेसें वाटतें. कोलंबस गांवीं असतांना मी रोज रात्रीं टेलिव्हिजनवरचे कार्यक्रम पाहत असे. दोन-तीन वेळां टी. व्ही. केंद्रावरहि मी गेलों होतों. पण 'पडद्यामागील' कार्यपद्धति पाहून मन हरखून गेलें. दोन-चार

तासांत सर्व प्रदर्शन पाहून संपवावें हा माझा उद्देश होता; पण आतां दीड वाजण्याचा सुमार होता आणि फक्त एकच मजल्यावरचें प्रदर्शन नुसतें पाहून झालें होतें. सर्व गोष्टी बारकाईनें पाहावयाच्या म्हणजे दोन-तीन दिवस तरी पाहिजेत. दुपारची वेळ झाली असल्यानें तेथेंच तळघरांत असणाऱ्या अन्नपूर्णागृहांत मी जेवण घेण्यास गेलों. किती तरी लोकांची गर्दी तेथें लंचसाठीं झालेली होती. कांहींनीं आपल्या घरून लंच आणली असल्यानें त्यांच्यासाठीं टेबलें—खुर्च्या टाकून एक स्वतंत्र व्यवस्था कांहीं निसर्गाचा देखावा निर्माण करून केली होती. म्हणजे सहजासहजीं वनभोजनाचाहि थाट व्हावा. थोडी विश्रांतीहि मला हवी होती. नव्या नव्या गोष्टी पाहतांना वेळेचे व पाय दुखत असल्याचें भान राहत नव्हतें. पण लंच घेण्यास बसल्यावर मग मात्र त्याची जाणीव होत असे.

सुमारें सव्वा दोनच्या सुमारास सभोंवतींच्या गॅलरींतून प्रदर्शनाचा जो प्रेक्षणीय विभाग होता त्याकडे आम्ही वळलों. प्रत्येक ठिकाणीं समजावून देण्यास एखादी बाई वा मुलगी उभी असेच, पण खुद्द वस्तूच इतक्या बोलक्या असत कीं, सहजासहजीं मांडणीवरून सारें ध्यानांत यावें. अमूर्त तत्त्व आलेख, चित्रें, प्रतिकृति, नकाशे यांच्या मदतीनें साकार व दृग्गोचर कसें करावें याचें शास्त्रच अमेरिकेंत बनलें आहे. कधीं ठसकेबाज व्यंग-चित्रांनीं सुद्धां फार चांगलें काम होतें. शिकॅगोस असतांनाच एके दिवशीं मला थोडा ताप आल्यासारखें झालें म्हणून मी दिवसां दुपारीं दीड-दोनच्या सुमारास पलंगावर पडलों होतों. तों मोलकरीण खोली स्वच्छ करण्यास आली. तिनें दार उघडलें व परत झटकन् लावून घेतलें. तिला वाटलें, मी खोलींत नव्हतों. नंतर तिनें बाहेरच्या दारावर एक लहानशी पाटी लावल्याचें माझ्या ध्यानांत आलें. मी जिज्ञासेनें पाहिलें तों एक व्यंग-चित्र होतें तें. तोंडाचा चंबू करून, दोन्ही ओठांपाशीं तर्जनी धरून तें सांगत होतें, 'शूः शूः ! माझी प्राकृति बरी नाहीं मला कृपा करून त्रास देऊं नका.' बहुतेक सर्व व्यवहार अशा गंमतीच्या व्यंगचित्रांनीं साधले जातात. शिकॅगोच्या या म्यूझियममध्यें अशा चित्रांचा फार परिणामकारक रीतीनें उपयोग केलेला आहे. विद्युच्छक्ति आणि लोहचुंबक यांच्या कथा विस्तारानें बोलूं लागल्या होत्या. लहानपणीं पुस्तकांत वाचलेलें व

शिक्षकांनीं शिकविलेलें, पण बुद्धि बेताचीच असल्यानें फारसें न समजलेलें आतां कोठें ध्यानांत येऊं लागलें. एडिसनचा डायनोमा आणि जेम्स वॅटचें वाफेचें एंजिन या गोष्टी अनेक वेळां ऐकल्या होत्या, पण त्यांचें महत्त्व व कार्य आतां थोडें थोडें ध्यानांत येऊं लागलें. प्रकाशकिरणांसंबंधीं मी विज्ञानकथा लिहितांना दोन वर्षांपूर्वीं खूप वाचलें होतें, पण या ठिकाणीं ते सर्व प्रयोग भव्य प्रमाणांत बोलके झालेले दिसले.

सर्वांत महत्त्वाचा व आकर्षक विभाग आहे तो आरोग्यशास्त्र व शरीर-विज्ञान यांचा. मानवी शरीररचनेचें कुतूहल माणसास प्रथमपासूनच फार मोठें आहे. आपला श्वासोच्छ्वास कसा चालतो, रुधिराभिसरण कसें चालतें, आपल्या मेंदूचें काम कोणतें, कोणते वेगळाले कप्पे कोणतीं विशिष्ट कामें करीत असतात, अन्नाचा घास गिळल्यानंतर पचनक्रिया सुरू कशी होते इत्यादि सर्व भाग या नाहीं त्या कारणांनीं मी पूर्वीं समजावून घेतला होता. पण या प्रदर्शनांत मानवदेहधारी आकृतींनीं व प्रतिकृतींनीं हें सारें शास्त्र सहस्रमुखांनीं आपली महती वर्णन करीत होतें. स्त्री-देहाचीं व पुरुषदेहाचीं मोठीं मॉडेल्स येथें आंतील सर्व व्यापार स्पष्ट करून सांगण्यासाठीं उभीं होतीं. गर्भाच्या पहिल्या दिवसाच्या अवस्थेपासून नऊ महिन्यांपर्यंतच्या वाढीच्या मुख्य अवस्था कोणत्या हें येथें कांचेच्या प्रतिकृतींवरून सुस्पष्ट होतें. जुळीं मुलें पोटांत कशीं राहतात तें येथें समजून येतें. मानवी गर्भावर परिस्थितीमुळें व अनुवंशशास्त्रामुळें कोणता परिणाम होतो याचे आलेख येथें वाचावयास, खरें म्हणजे पाहावयास मिळतात. मानवी हाडांची रचना, स्नायूंचे प्रकार सर्व शरीरावर व प्रसंगीं मनावर स्वामित्व गाजविणाऱ्या निरनिराळ्या ग्रंथी, कातडीचें महत्त्व, रक्ताचे घटकावयव, केसांचें पृथक्करण या सर्व गोष्टी पाहून मन गुंग होऊन जातें. फार मोठ्या डोळ्याचें मॉडेल येथें तुम्हांस पाहावयास मिळेल. कानाची आंतररचना येथें स्पष्टपणें तुम्हांस समजेल. शारीरिक दुःखावर माणसानें विजय कसा मिळविला आहे याची कहाणी मोठ्या मनोरंजक रीतीनें येथें निवेदन केली आहे. भूल देण्याचा शोध लागण्यापूर्वीं माणसाचीं दुःखें कोणतीं होतीं आणि नंतरच्या काळांत कोणत्याहि प्रकारचें ऑपरेशन किती सुलभ झालें आहे याचें दर्शन येथें होतें.

येथें एक तीस वर्षें वयाची एक प्लॅस्टिक्सची बाई उभी आहे. तिच्या देहांतील बारीकसारीक कार्यें आपणांस सहज समजून येतात. मानवी शरीरांत हृदयाचें महत्त्व केवढें आहे. कथा-काव्याच्या प्रान्तांत तर हृदय-दानाचीच भाषा नेहमीं वापरली जाते. हृदयांत स्थान देण्याचें बोलणें कितीतरी स्त्री-पुरुषांनीं आजवर केलें असेल. दगडासारखें हृदय आपणांस ऐकून माहीत आहे. मऊ लोण्याहूहि असणारे विष्णुदास आपणांस माहीत आहेत. हे हृदयींचें तें हृदयीं घातलें म्हणून ज्ञानेश्वरांची भाषा मला माहीत होती. पण हृदय म्हणजे आहे तरी काय? या प्रदर्शनांत सोळा फूट उंचीचें एक मानवी हृदय आहे. म्हणजे माणसाच्या जवळ जवळ तीनपट उंचीचें. या हृदयांत रक्ताचें कार्य कसें चालतें तें एका वेळेस तीन-चार माणसें आंत जाऊन पाहूं शकतात. मींहि त्या हृदयांत प्रवेश केला. लक्ष्यार्थानें माझा प्रवेश कोणत्या हृदयांत आहे हें मला माहीत नाहीं, पण शिकॅगो येथील हृदयांत मात्र मीं खऱ्या अर्थानें प्रवेश केला. हृदयाचें सर्व कार्य काव्यमय आहेच, पण या काव्याचें स्वरूप मात्र अगदीं वेगळें आहे. शिकॅगो हार्ट असोसिएशननें हा विभाग सर्वांना सत्य ज्ञान देण्यासाठीं उभा केला आहे.

इलिनॉइस विद्यापीठानें मानवी जीवनाच्या वाढीचा इतिहास उभा केला आहे. विकास, सतत विकास हें मानीव जीवनाचें मुख्य सूत्र आहे. अमेरिकेंत कॅन्सरच्या रोगाचें प्रमाण फार आहे. याहि रोगाचें खरोखर स्वरूप काय आहे व त्याचा प्रतिकार कसा करावा याचें शास्त्रशुद्ध विवेचन येथें सर्वांना समजून येतें. प्रश्नोत्तरांच्या स्वरूपांत कॅन्सरची माहिती येथें दिली जाते. याच विभागाशीं लगटून आणखी कांहीं नवीन दालनें आहेत. ऐतिहासिक काळांत पराक्रम केलेलीं वेगवेगळीं विमानें येथें टांगलेलीं दिसतात. धुक्यांतून, अंधारांतून वस्तूंचा शोध घेणारीं आधुनिक रॅडार यंत्रें कार्य कसें करतात याची माहिती येथेंच मिळते. शेजारच्या लहानशा थिएटरमध्यें यासंबंधींची फिल्म दाखविण्यांत येते. आपल्या घरांत आधुनिक सुखसोयी कोणत्या असाव्यात याचीहि आदर्श मांडणी येथें झालेली आपणांस दिसते. मुख्य दिवाणखाना, टेबल-खुर्च्या, सोफासेट्स, दिवे, पडदे, स्वयंपाकघरांतील सुखसोयी, न्हाणीघरांतील व्यवस्था इत्यादि सर्व

प्रकारची आधुनिक मांडणी आकर्षक व सौंदर्यवान कशी करावी याचें प्रात्यक्षिकच पाहावयास सांपडतें. रंगसंगतीपासूनचा विचार केलेला असतो. न्हाणीघरांत भिंतीचा रंग, टबचा रंग, टॉवेलांचा रंग यांचेंहि शास्त्र बनलेलें दिसलें. येथून जवळच टंकलेखन-यंत्राची सर्व प्रकारची माहिती जाणाऱ्या-येणाऱ्यास मिळण्याची सोय आहे. प्रारंभींच्या काळापासून अगदीं आजच्या दिवसापर्यंत या यंत्रांत कोणत्या सुधारणा झाल्या याची नोंद येथें केलेली आहे.

तळघरांत मांडलेल्या प्रदर्शनाचा व्यापहि कांहीं लहान नाहीं. आपले विचार व्यक्त करण्यासाठीं माणसानें आपल्या बोलण्यास अक्षरादि आकृतींनीं बद्ध कसें करून घेतलें याचा मनोरंजक इतिहास येथें वाचावयास मिळतो. लिपीची जन्मकथा येथें समजतेच, पण जगांतील प्रमुख लिप्या कोणत्या हेंहि ध्यानांत येतें. जुन्या काळीं माणसें आपल्या दैवतांचीं चित्रें जमिनीवर, भिंतींवर कशीं काढीत असत, त्यांत रंगभरणी कशी करीत याचे नमुने येथेंच पाहावयास मिळतात. त्यानंतर खिळ्यांची जुळणी होऊन मुद्रणकलेचा जन्म झाला. याहि शास्त्रांत आजपर्यंत अनेक सुधारणा झाल्या. त्या सर्वांची नोंद येथें घेण्यांत आली आहे. चार-पांच रंगांनीं आजचें मुद्रण कसें शोभिवंत दिसतें याचें प्रात्यक्षिक येथें दाखविलें जातें. शेजारच्या दिवाणखान्यांत जगांतील निरनिराळ्या देशांच्या बाहुल्या एकत्र केल्या आहेत. फीनलंड, मलाया, बर्मा, जपान, लॅटिन अमेरिका, मेक्सिको, नॉर्वे, स्वीडन, इटाली, ईजिप्त इत्यादि देशांतील बाहुल्यांवरून त्या त्या देशांचीं वस्त्राभरणें, केशरचना, अलंकार, चेहऱ्याची ठेवण इत्यादि प्रकारांची जाणीव पाहणारास सहजासहजीं होते. भारतांतील बाहुलीची साडी -- नऊवारी व पांचवारी पाहून प्रत्येकास मोठें नवल वाटतें.

नजीकच्या दालनांत लांकडाचे निरनिराळे प्रकार व त्यांचे बहुविध उपयोग यांचें प्रदर्शन आहे. वनस्पतिशास्त्राच्या दृष्टीनें झाडाची वाढ कशी होते याचा नमुना येथें पाहतां येतो. झाडाच्या खोडाचे रंग किती विविध प्रकारचे असतात हेंहि समजतें. लांकडाची कापणी यंत्रानें कशी होते याचेंहि प्रात्यक्षिक आपणांस पाहावयास मिळतें. एका मोठ्या पृथ्वीच्या गोलावर जगांतील सर्व देशांत कोणत्या प्रकारचें लांकूड सांपडतें याचा

आलेख चित्रित केलेला आहे. आपणांस हव्या त्या प्रकारावर बोट दाबून पाहिलें कीं, तो प्रकार भू-विभागांत जेथें जेथें होतो तेथें तेथें विजेचे दिवे लागतात. एका क्षणांत जगाचा सर्व भूगोल आपण तयार करूं शकतों. नौकानयनास प्रारंभ कसा झाला ? प्रारंभींच्या होड्या कोणत्या स्वरूपाच्या होत्या, त्यांच्यावरील चित्रांचा अर्थ काय, युद्धनौकांचें स्वरूप कोणत्या प्रकारचें होतें, आज या शास्त्रांतील प्रगति कशी झाली आहे, ही सर्व माहिती मोठमोठ्या प्रतिकृतींच्या साह्यानें देण्यांत येते. पाणबुड्या बोटींच्या कार्याची माहिती मिळते. दुसऱ्या महायुद्धांत या बाबतींत झालेल्या पराक्रमाची साक्ष येथें पटते. मोठमोठे पूल कसे बांधतात, त्या पुलांचे प्रकार कोणते, उपयोग कोणते, ही सर्व माहिती प्रत्यक्ष लहान कृतींवरून आपणांस होते. मोठमोठीं धरणें कशीं बांधलीं गेलीं. किती पाणी आडवतां येतें, त्याचा शेतीस उपयोग कसा केला जातो यासंबंधींहि प्रत्यक्ष ज्ञान या ठिकाणीं आपणांस सहजासहजीं मिळून जातें. पाटबंधारे, मोठमोठे बोगदे, भुयारांतील आगगाडी, लांबच लांब लोहमार्ग यांचींहि प्रात्यक्षिकें येथें बघण्यासारखीं आहेत. आग विझविण्याचीं साधनें पूर्वीपासून आतां-पर्यंत कोणतीं झालीं ती नोंद येथें आहे. सूक्ष्म असणारें प्राणिजीवन मोठ्या प्रमाणांत पडद्यावर आपणांस पाहावयाचें असेल तर येथें सोय आहे. शक्तिमान सूक्ष्मदर्शक यंत्रें कसें काम करतात तें येथें पाहावयास मिळेल. अगदीं लहान जीवांचें जीवनकार्य बघण्याची संधि येथें साधणारास आहे. रसायनशास्त्राच्या विभागांत हें शास्त्र व त्याचा उद्योगधंद्यांतील प्रत्यक्ष उपयोग यांचें प्रदर्शन फार मोठ्या प्रमाणावर आहे. नैसर्गिक गॅस कसा सांपडतो व तो जमिनीखालून मोठमोठ्या शहरांतून कसा पुरविला जातो हें येथें प्रत्यक्ष स्वरूपांत मांडलेलें असल्यामुळें ध्यानांत येतें. एक छोटासा कांचेचा कारखानाच येथें उभा केलेला आहे. अल्युमिनियमचे उपयोग, गंधकाचे गुणधर्म, बंदुकीच्या दारूची उत्पत्ति, इत्यादि विषयांची सर्वांगीण माहिती येथें मिळण्यासारखी आहे.

असें आहे हें शिकॅगोचें म्यूझियम ऑफ सायन्स अँड इंडस्ट्री ! सर्व-सामान्य मनुष्य सहज बघावें म्हणून आंत जातो आणि मानवी कर्तृत्वाबद्दल मनांत एक प्रकारचा विलक्षण आदर मनांत बाळगून बाहेर येतो. माणसानें

आपल्या प्रचंड कर्तृत्वानें निसर्गावर केवढा विजय मिळवलेला आहे व त्यायोगें आपल्या सुखसोयींत कशी भर झाली आहे याचें मूर्तिमंत दर्शन या प्रदर्शनांत होतें. विज्ञान व त्याचा उद्योगधंद्यांत उपयोग याचें यथार्थ दर्शन मीं कसें तरी एका दिवसांत घेतलें. साडेपांच वाजले तेव्हां शेवटचा भाग मला कसा तरी घाईघाईनें पाहावा लागला. सबंध दिवसांत जें पाहिलें त्यासंबंधींची पुस्तकरूपानें माहिती, लहानलहान मॉडेल्स, रंगीत चित्रें मिळण्याचें एक चांगलें दुकान येथेंच आहे. या प्रदर्शनाचा छाप असलेल्या किती तरी वस्तु आपणांस घ्याव्याशा वाटतात. विशिष्ट प्रकारचा फॉर्म भरून दिला कीं, आपणांस हवीं असलेलीं माहितीचीं पुस्तकें मोफत मिळतात. जनरल मोटर्सचें माहितीपत्रक, दि मोटोरामा, डिझेल दि मॉडर्न पॉवर, ट्रान्स्पोर्टेशन प्रोग्रेस, रेडिओ यु. एस्. ए., दि मॅजिक ऑफ् कम्युनिकेशन, शॉर्ट स्टोरीज ऑफ् सायन्स अँड इन्व्हेन्शन्, ए पॉवर प्रायमर इत्यादि पुस्तिकांतून अगदीं सोप्या भाषेंतून चित्रादि साह्यानें विज्ञान-विषय फार सुलभ रीतीनें समजावून दिले आहेत. शिकॅगोच्या या म्यूझियममधील वस्तूंत दरवर्षी भर पडून अद्ययावत्पणा राखला जातो. एका दिवसाच्या फेऱ्यांत मानवी जीवनाची सर्वांगीण प्रगति दर्शविणारें हें प्रदर्शन जर कोणीं बघितलें नाहीं तर त्यानें शिकॅगोस उगाच दिवस घालविले असाच अर्थ करावा लागेल. मानवी बुद्धीचा, प्रयत्नांचा, कर्तृत्वाचा, चिकाटीचा, विजयाचा सामग्र्यानें प्रत्यय येतो तो अशा प्रकारच्या प्रदर्शनानें. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचें हें एक मोजमाप आहे.

## २५ : अटलांटिक सिटीचा शैक्षणिक सोहळा

फेब्रुवारी १९५७ मध्यें मी न्यू मेक्सिको स्टेटमधील पांच-सहा हजार वस्तीच्या सिल्व्हर सिटी नांवाच्या टुमदार शहरांत एक महिन्यासाठीं होतों. सहा हजार फूट उंचीवर वसलेल्या या गांवीं दिवस मोठ्या मजेंत जात होते. न्यू यॉर्क, वॉशिंग्टन, शिकॅगो, कोलंबस, न्यू ऑर्लिन्स इत्यादि मोठ्या शहरांतील गर्दी व धांवपळ या ठिकाणीं नसल्यामुळें मनास थोडें बरें वाटत होतें. उरलेल्या आठ-दहा दिवसांचे कार्यक्रम मी आंखीत होतों, तों वॉशिंग्टनहून आमच्या प्रोग्रॅम ऑफिसरकडून एक पत्र आलें. अगदीं पूर्व किनाऱ्यावरील न्यू जर्सी स्टेटमधील अटलांटिक सिटी येथें भरणाऱ्या शैक्षणिक अधिवेशनासाठीं मी हजर राहावें असा त्यांत उल्लेख होता. दोन-तीन दिवसांत सिल्व्हर सिटी सोडावी लागणार होती. मनांत संदेह निर्माण झाला. लॉस्एँजल्स, सॅन्फ्रॅन्सिस्को येथील आंखलेला कार्यक्रम रद्द करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. नाहीं म्हटलें असतें तर चाललें असतें. पण मनांत विचार आला अधिवेशन फार मोठें आहे. पुन्हां एकदां सहा महिने पाहिलें, ऐकलें त्याचें आपोआप संकलन होईल. निरनिराळ्या लोकांच्या गांठी-भेटी होतील. या विचारानें होकाराचें पत्र पाठवून दिलें आणि अमेरिकेच्या नकाशांतील न्यू जर्सी स्टेट हुडकून अटलांटिक सिटी-संबंधीं माहिती जमविण्यास आरंभ केला.

दोन-तीन दिवसांनीं निवास-समितीकडून पुनः पत्र आलें. माझ्या येण्याची तारीख व वेळ त्यांना हवी होती. अटलांटिक सिटीस कोणत्या हॉटेलमध्यें उतरणार हेंहि त्यांना हवें होतें. पत्रासोबत अटलांटिक सिटीचा एक नकाशा होता. अटलांटिक महासागराच्या काठीं असणारें हें एक टुमदार व सुंदर शहर. समुद्रकांठानें सर्व हॉटेल्सच होतीं. त्यांच्या नांवापुढें आंकडे देऊन त्यांचा सर्व तपशील पुढें दिला होता. प्रत्येक हॉटेल

आपल्या प्रचंड कर्तृत्वानें निसर्गावर केवढा विजय मिळवलेला आहे व त्यायोगें आपल्या सुखसोयींत कशी भर झाली आहे याचें मूर्तिमंत दर्शन या प्रदर्शनांत होतें. विज्ञान व त्याचा उद्योगधंद्यांत उपयोग याचें यथार्थ दर्शन मीं कसें तरी एका दिवसांत घेतलें. साडेपांच वाजले तेव्हां शेवटच्या भाग मला कसा तरी घाईघाईनें पाहावा लागला. सबंध दिवसांत जें पाहिलें त्यासंबंधींची पुस्तकरूपानें माहिती, लहानलहान मॉडेल्स, रंगीत चित्रें मिळण्याचें एक चांगलें दुकान येथेंच आहे. या प्रदर्शनाचा छाप असलेल्या किती तरी वस्तु आपणांस घ्याव्याशा वाटतात. विशिष्ट प्रकारचा फॉर्म भरून दिला कीं, आपणांस हवीं असलेलीं माहितीचीं पुस्तकें मोफत मिळतात. जनरल मोटर्सचें माहितीपत्रक, दि मोटोरामा, डिझेल दि मॉडर्न पॉवर, ट्रान्स्पोर्टेशन प्रोग्रेस, रेडिओ यु. एस्. ए., दि मॅजिक ऑफ् कम्युनिकेशन, शॉर्ट स्टोरीज ऑफ् सायन्स ॲंड इन्व्हेन्शन्, ए पॉवर प्रायमर इत्यादि पुस्तिकांतून अगदीं सोप्या भाषेंतून चित्रादि साह्यानें विज्ञान-विषय फार सुलभ रीतीनें समजावून दिले आहेत. शिकॅगोच्या या म्यूझियममधील वस्तूंत दरवर्षी भर पडून अद्ययावत्‌पणा राखला जातो. एका दिवसाच्या फेऱ्यांत मानवी जीवनाची सर्वांगीण प्रगति दर्शविणारें हें प्रदर्शन जर कोणीं बघितलें नाहीं तर त्यानें शिकॅगोस उगाच दिवस घालविले असाच अर्थ करावा लागेल. मानवी बुद्धीचा, प्रयत्नांचा, कर्तृत्वाचा, चिकाटीचा, विजयाचा सामग्र्यानें प्रत्यय येतो तो अशा प्रकारच्या प्रदर्शनानें. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचें हें एक मोजमाप आहे.

# २५ : अटलांटिक सिटीचा शैक्षणिक सोहळा

फेब्रुवारी १९५७ मध्यें मी न्यू मेक्सिको स्टेटमधील पांच-सहा हजार वस्तीच्या सिल्व्हर सिटी नांवाच्या टुमदार शहरांत एक महिन्यासाठीं होतों. सहा हजार फूट उंचीवर वसलेल्या या गांवीं दिवस मोठ्या मजेंत जात होते. न्यू यॉर्क, वॉशिंग्टन, शिकॅगो, कोलंबस, न्यू ऑर्लिन्स इत्यादि मोठ्या शहरांतील गर्दी व धांवपळ या ठिकाणीं नसल्यामुळें मनास थोडें बरें वाटत होतें. उरलेल्या आठ-दहा दिवसांचे कार्यक्रम मी आंखीत होतों, तों वॉशिंग्टनहून आमच्या प्रोग्रॅम ऑफिसरकडून एक पत्र आलें. अगदीं पूर्व किनाऱ्यावरील न्यू जर्सी स्टेटमधील अटलांटिक सिटी येथें भरणाऱ्या शैक्षणिक अधिवेशनासाठीं मी हजर राहावें असा त्यांत उल्लेख होता. दोन-तीन दिवसांत सिल्व्हर सिटी सोडावी लागणार होती. मनांत संदेह निर्माण झाला. लॉस्एँजल्स, सॅन्फ्रॅन्सिस्को येथील आंखलेला कार्यक्रम रद्द करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. नाहीं म्हटलें असतें तर चाललें असतें. पण मनांत विचार आला अधिवेशन फार मोठें आहे. पुन्हां एकदां सहा महिने पाहिलें, ऐकलें त्याचें आपोआप संकलन होईल. निरनिराळ्या लोकांच्या गांठी-भेटी होतील. या विचारानें होकाराचें पत्र पाठवून दिलें आणि अमेरिकेच्या नकाशांतील न्यू जर्सी स्टेट हुडकून अटलांटिक सिटी-संबंधीं माहिती जमविण्यास आरंभ केला.

दोन-तीन दिवसांनीं निवास-समितीकडून पुनः पत्र आलें. माझ्या येण्याची तारीख व वेळ त्यांना हवी होती. अटलांटिक सिटीस कोणत्या हॉटेलमध्यें उतरणार हेंहि त्यांना हवें होतें. पत्रासोबत अटलांटिक सिटीचा एक नकाशा होता. अटलांटिक महासागराच्या काठीं असणारें हें एक टुमदार व सुंदर शहर. समुद्रकांठानें सर्व हॉटेल्सच होतीं. त्यांच्या नांवापुढें आंकडे देऊन त्यांचा सर्व तपशील पुढें दिला होता. प्रत्येक हॉटेल

नेमकें कोठें आहे, समुद्रापासून किती दूर आहे, अधिवेशनाची जागा कोठें आहे, हॉटेलचा दैनिक खर्च किती आहे, अशी सर्व माहिती त्या पत्रकांत होती. माझ्या पसंतीच्या अनुक्रमानें मी त्यांनीं सुचविल्याप्रमाणें चार हॉटेलसचीं नांवें सुचविलीं आणि मी सिल्व्हर सिटीच्या लोकांचा निरोप घेण्याच्या अवघड उद्योगास लागलों. अटलांटिक सिटी एकदम विरुद्ध दिशेस. कॅन्सस सिटी, शिकॅगो, वॉशिंग्टनमार्गें माझ्या परतीच्या प्रवासाची व्यवस्था झाली होती. वॉशिंग्टनला आल्यानंतर समजलें, ईजिप्त, पाकिस्तान, युरेग्वे ( दक्षिण अमेरिका ) ऑस्ट्रेलिया, इराण, बर्मा, जर्मनी इत्यादि देशांतील आमचे बरोबरचे एकूण पंधरा-वीस लोक अटलांटिक सिटीस येणार आहेत. आमच्या सर्वांची व्यवस्था करण्यासाठीं एका अधिकाऱ्याची नियुक्ति झालेली होती.

१७ फेब्रुवारीस आम्ही सर्वजण अटलांटिक सिटीस येऊन पोंचलों. हवा खाण्याचें रम्य ठिकाण म्हणून याची प्रसिद्धि असली तरी तूर्त हिवाळा असल्यामुळें शिक्षणक्षेत्राखेरीज इतर लोक फारसे शहरांत नव्हतेच. गांवांत स्थानिक लोक थोडेच. चार दिवस समुद्रकांठचीं मौज लुटावयास येणारे शोकीन फार. त्यामुळें घरांपेक्षां हॉटेल्सची संख्याच फार मोठी. सातशें—आठशें लोकांना एकाच वेळीं ऐसपैसपणें राहतां येईल एवढीं मोठीं हॉटेल्स. येणाऱ्या लोकांचें स्वागत करणें, त्यांना राहावयास जागा देणें, त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणें हाच या शहराचा एकमेव उद्योग होता. व्यापार नाहीं, कारखाने नाहींत, चार दिवस गंमत करणारांसाठीं प्रसिद्ध असणारें हें शहर अनेक दृष्टींनीं स्मरणांत राहण्यासारखें आहे. समुद्र-किनाऱ्यास समान्तर असणारे चार-पांच मोठे रस्ते आणि रस्त्यांच्या दुतर्फा मोठमोठीं शोभिवंत हॉटेल्स असें या नगराचें स्वरूप होतें. आम्ही पोंचलों त्या वेळीं हवेंत गारठा फार होता. नुकतेंच बर्फ पडून गेलें होतें. समुद्रा-वरून येणारा गार वारा अंगास झोंबणारा होता. ‘ रनीमीड ’ नांवाच्या एका प्रशस्त हॉटेलमध्यें आम्हांपैकीं बहुतेकांची व्यवस्था केली होती.

हें शैक्षणिक प्रदर्शन अमेरिकन असोसिएशन ऑफ् स्कूल ॲड्मिनेस्ट्रेटर्स ( A. A. S. A. ) नांवाच्या संस्थेतर्फें भरलें होतें. शिक्षणाचा कारभार करणारे सर्व लोक या ठिकाणीं उपस्थित होते. अमेरिकेंत फार प्रसिद्ध असणारी

नॅशनल एज्युकेशन असोसिएशन–( N. E. A. ) चीच A. A. S. A. ही एक शाखा. या वर्षी या संस्थेचा जन्मशताब्दि येत असल्यामुळें थोडा उत्साह अधिक होता. सन १८५७ सालीं 'प्रॅक्टिकल एज्युकेटर्स' या नांवानें त्रेचाळीस शिक्षणतज्ज्ञ एकत्र येऊन फिलाडेल्फिया येथें त्यांनीं "नॅशनल टीचर्स असोसिएशन" नांवाची एक संस्था स्थापन केली. तेरा वर्षांनंतर आणखी दोन संस्था या संस्थेस मिळाल्या आणि सर्वांची मिळून N. E. A. ही प्रभावी संघटना निर्माण झाली. अमेरिकेंत सर्वांत मोठी अशी ही शिक्षणतज्ज्ञांची संस्था असून आज तिचे सुमारें ६१३,००० सभासद आहेत. १०,८३,००० संबंधित लोक या संस्थेंत आहेत. इतर लहान-मोठ्या मिळून ५५४२ संस्था या संघटनेशीं संलग्न अशा आहेत. या विशाल संघटनेचा व्याप फारच मोठा आहे. कला-शिक्षण, औद्योगिक शिक्षण, शैक्षणिक संशोधन, शारीरिक शिक्षण, औद्योगिक कला, ग्रामीण शिक्षण, शास्त्रीय विषयांचें शिक्षण, गृहजीवनशास्त्राचें शिक्षण अशीं एकूण तीस स्वतंत्र खातीं या संघटनेचीं आहेत. शिवाय, नियतकालिक, दृक्श्राव्यशिक्षण, हिशेब, प्रवास अशीं आणखी किती तरी पोटखातीं आहेतच. या राष्ट्रीय संघटनेची एक शाखा म्हणजे A. A. S. A. शिक्षणाचा कारभार पाहणारे या अधिवेशनास आले होतेच. पण शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी, वृत्तपत्राचे संपादक आणि शिक्षणतज्ज्ञ यांचीहि उपस्थिति डोळ्यांत भरणारी होती. सबंध अमेरिकेंतून एकूण सुमारें २२,००० शिक्षणतज्ज्ञ अटलांटिक सिटीस एकत्र आले होते.

नगरांत आल्याबरोबर आम्ही सर्वजण प्रथम जेथें अधिवेशनास प्रारंभ झाला होता त्या ठिकाणीं गेलों. अशा प्रकारचीं मोठीं अधिवेशनें भरावींत म्हणूनच खूप मोठ्या हॉलची निर्मिति कांहीं वर्षांपूर्वीं येथील लोकांनीं करून ठेवली होती. जाणारे-येणारे यांची एकच गर्दी उसळली होती. अमेरिकेंतील शिक्षक म्हणजे स्त्री-शिक्षक किंवा शिक्षिका त्यांची गर्दी विशेष होती. बहुधा प्रत्येकीनें आपल्या 'मालकां.'ना बरोबर आणलें होतें. पुरुष शिक्षकांनीं आपल्या पत्नीस आणण्याची खबरदारी घेतली होती. अशा प्रकारचीं अधिवेशनें अशा मिश्र समुदायानेंच या देशांत शोभायमान होतात. पत्नीसहित वा पतीसहित सर्वांनीं हजर राहावयाचें

असाच जणूं संकेत होता. कांहीं ठिकाणीं पति व पत्नी दोघेंहि शिक्षण-क्षेत्रांत असल्याचें दिसून येण्यासारखें होतें. या गर्दीतून वाट काढीत काढीत आम्ही आमची हजेरी लावण्यासाठीं मुख्य ऑफिसकडे गेलों. आद्याक्षरांच्या अनुक्रमानें पंधरा-वीस ठिकाणीं नांवें नोंदण्याची व्यवस्था होती. आम्हा 'पाहुण्यां'ना ओळखून एका चुणचुणीत मुलीनें आमची अगत्यपूर्वक चौकशी करून आम्हांस सर्व माहिती करून दिली. आमचीं नांवें नोंदवून घेतलीं. आम्हांस कार्यक्रम-पत्रकें दिलीं आणि चार-पांच मिनिटांत आम्ही A. A. S. A. चे प्रतिनिधि बनून आमच्या छातीवर तशीं प्रतीकचिन्हें झळकूं लागलीं.

सर्व कार्यक्रमांची माहिती देणारें पुस्तक होतें शंभर पृष्ठांचें. पॉल जे. मिस्नर नांवाचे या संस्थेचे कार्याध्यक्ष होते; त्यांच्या सहीनें अधिवेशनाची पार्श्वभूमि प्रसिद्ध झाली होती. सहा दिवसांत कोठें काय केव्हां चालू आहे याचें उत्तम दर्शन या पुस्तिकेवरून होण्यासारखें होतें. परिसंवाद ( Symposium ) हें एक अमेरिकन अधिवेशनाचें खास अंग असतें. असे परिसंवाद या आठवड्यांत किती तरी होणार होते. निरानिराळ्या विषयांच्या वेगवेगळ्या समित्या होत्या, त्यांचेहि स्वतंत्र कार्यक्रम मधल्या वेळांत असत. निरनिराळ्या शैक्षणिक समस्यांचा सर्वांगीण विचार करण्यासाठीं म्हणून संबंधित जाणकार एकत्र येऊन चर्चा करीत. त्यांच्याहि वेळा व जागा जाहीर झाल्या होत्या. या सर्व कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या शिक्षण-तज्ज्ञांची ओळख त्यांच्या छायाचित्रांसहित प्रसिद्ध झालेली होती. प्रत्येक सभेच्या सुरुवातीस प्रार्थना कोण म्हणणार, उद्घाटन कोण करणार, भाषणें कोण करणार, समारोप कोण करणार, यांचाहि तपशील प्रसिद्ध झालेला असल्यामुळें सर्वसाधारण सभेची पहिली बैठक रविवारीं दुपारीं साडेतीन वाजतां सुरू होणार होती. अगोदर अर्धा तास लुई मिलर यांचें ऑर्गन-वादन चालू होतें. धार्मिक प्रार्थना झाल्यानंतर पॉल जे. मिस्नर यांच्या देखरेखीखालीं सभेच्या कामास सुरुवात झाली. सात–आठ हजार माणसें बसतील एवढा हॉल अगदीं भरून गेला होता. A. A. S. A. च्या कार्यकारी मंडळांतील सभासदांचा त्यांनीं केलेल्या वार्षिक कार्याचा गौरव करण्याचा कार्यक्रम याच वेळीं होता. ' The Moral Requirements

for Public Leadership ' या विषयावर डॉ. हॅरॉल्ड बॉस्ले यांचें मुख्य भाषण झालें. अशा एकूण आठ सभा सबंध अधिवेशनांत झाल्या. प्रत्येक वेळीं कांहीं वादनादि कार्यक्रम, संघगीतें, प्रार्थना, नामवंतांचा सत्कार आणि विशेष शैक्षणिक प्रश्नांवरील भाषण, असें सर्वसाधारण स्वरूप दर्शविणारा कार्यक्रम असे. American Schools and the Challenge of Change; Men for Tomorrow's Technology; Where do we get the Money ? Education Burden and Blessing (कोरियाचे राजदूत डॉ. यू. चॅन यँग यांचें); Education and Human Relation इत्यादि भाषणें फारच गाजलीं. विशेषतः अमेरिकन सिनेटर जॉन एफ्. कॅनेडी हा उमदा व तरुण वक्ता सर्वांचा मोठा लाडका दिसला. व्यासपीठावर तो आला तेव्हां सर्वांनीं आपला सिनेटर आला म्हणून उभे राहून त्याला अभिवादन केलें. आणि त्याचें मिश्किल शब्दांनीं भरलेलें ' The Education of an American Politician ' या विषयावरचें भाषण लोकांनीं अगदीं तन्मयतेनें ऐकलें. याच भाषणाचें वृत्त एज्युकेशन डायजेस्ट ( मे १९५७ ) मध्यें प्रसिद्ध झालें आहे. याखेरीज इतर शेंकडों विषयांवर लहान-मोठ्या गटांच्या सभा सर्वत्र सुरू होत्या. Television in the Classroom; Pros and Cons of Merit Rating; Making Adaptations for the Giftted Child; Fiscal Independence–Yes or No ? What's New in the Teaching of Science ? Pupil Transportation; Are we moving Toward Larger Classes ? Teacher Education; इत्यादि विषयांच्या चर्चा विशेष महत्त्वाच्या झाल्या.

इतर संलग्न संस्थांच्या बैठकीहि याच वेळीं आपापले प्रश्न सोडविण्यांत गर्क झाल्या होत्या. अमेरिकन एज्युकेशनल रिसर्च असोसिएशन, असोसिएशन फॉर चाईल्डहूड एज्युकेशन, डिपार्टमेंट ऑफ क्लासरूम टीचर्स, डिपार्टमेंट ऑफ रूरल एज्युकेशन, अशीं कित्येक नांवें देतां येतील. रात्रीं करमणुकीच्या कार्यक्रमास गर्दी विशेष असे. पण इतर सर्व प्रश्नांची चर्चा आस्थेवाईकपणें होत होती. या सर्वांचें तपशीलवार वर्णन देणें येथें उचित होणार नाहीं. अधिवेशनाचें दुसरें एक महत्त्वाचें अंग म्हणजे शैक्षणिक

साहित्याचें मोठें प्रदर्शन. एवढें मोठें प्रदर्शन एतरत्र क्वचित्‌च भरत असेल. शाळांतून लागणाऱ्या टाचणीपासून स्कूलबसपर्यंत सर्व वस्तु या प्रदर्शनांत होत्या. फारशी चौकशी न करतां एका टोंकाहून दुसऱ्या टोंकापर्यंत नुसतें पाहत पाहत जाण्यासहि आठ-दहा तास लागत. प्रत्येकानें आपलें दुकान असें सजविलें होतें कीं, पाहणारा गर्दींत असला तरी क्षणभर तो तेथें थांबावाच. या सर्व प्रदर्शनाचें स्वरूप थोडक्यांत निवेदन करणें अस्थानीं होणार नाहीं.

जीवनाच्या सर्व प्रांतांत अमेरिकेंत झपाट्यानें सुधारणा होत आल्या आहेत. समाजाच्या गरजा दर दहा-पंधरा वर्षांनीं बदलत राहिल्या कीं, त्या दृष्टीनें शिक्षणपद्धतीहि बदलत राहते. अनेक नवीं तत्त्वज्ञानें, अनेक नवे प्रयोग या देशांत सर्वत्र सर्वदां सुरू असतात. नव्याची हौस जात्याच अमेरिकन रक्तांत आहे. प्रयोगसिद्ध जें जें तें सर्व स्वीकारण्याची तयारीहि या देशांत सर्वसाधारण माणसाची असते. अटलांटिक सिटी येथील शैक्षणिक प्रदर्शनांत अमेरिकन राष्ट्राचा हा स्वभावधर्म यथार्थत्वानें प्रकट झालेला दिसून आला. प्रदर्शनांतील कांहीं विभागांचें वर्णन येथें देण्यासारखें आहे. गेल्या दहा-पंधरा वर्षांत अमेरिकेंतील शाळांच्या इमारतींत फार मोठी सुधारणा झालेली आहे. सर्व आधुनिक सोयींनीं समृद्ध असणाऱ्या इमारती आज लक्षावधि डॉलर्स खर्च करून बांधण्यांत येत आहेत. भोंवतीं खेळण्यासाठीं विस्तीर्ण क्रीडांगणें, प्रशस्त असे वर्ग, भरपूर प्रकाशासाठीं जवळ जवळ एका बाजूस संपूर्ण असलेली कांचेची भिंत, विद्यार्थ्यांना कपडे, पुस्तकें, ओव्हरकोट्स ठेवण्यासाठीं छोटीं कपाटें, हिंवाळ्यांत खेळण्यासाठीं क्रीडागृहें, पोहण्याचे तलाव, दुपारचें जेवण घेण्यासाठीं आधुनिक दृष्ट्या परिपूर्ण असलेलें अन्नपूर्णागृह, टेलिफोन्स, टेलिव्हिजन-सेट्स, वर्कशॉप, प्रयोगशाळा, ग्रंथालय, इत्यादि सर्व गोष्टींनीं परिपूर्ण अशा या आधुनिक इमारतींच्या प्रदर्शनाचा भाग विशेष प्रेक्षणीय होता. मोठमोठ्या टांगत्या फलकांवर इमारतींचें विस्तीर्ण फोटोग्राफ्स, त्या त्या इमारतींच्या वैशिष्ट्यासहित उपस्थित होते. पुष्कळ ठिकाणीं छोटीं छोटी मॉडेल्स इमारतींची यथार्थ कल्पना आणून देण्याइतपत परिपूर्ण होतीं. दगड, विटा, सिमेंट, लांकूड, पोलाद, प्लॅस्टिक्स इत्यादि जे जे पदार्थ वापरण्यांत येतील त्यांची

यादी तयार, किंमती तयार, तुम्ही फक्त ‘ प्लॅन ’ पहावयाचा आणि पसंत करावयाचा शेंकडों प्लॅन्स समोर असतात. हा चांगला कीं तो चांगला हा संभ्रम पाहणारास होतोच. कांहीं उणीव म्हणून उरलेली नसते. समाजाच्या नव्या गरजांना अनुरूप असे इमारतीचे प्लॅन्स दरवर्षी नव्यानें तयार होतात आणि गेल्या वर्षांचे मागें पडतात.

इमारतींत वापरण्यांत येणाऱ्या फर्निचरची तीच गोष्ट. किती प्रकारचीं बांकें, किती प्रकारच्या खुर्च्या, किती टेबलें, किती कपाटें सर्व सुखसोयींनीं आपणासमोर या वस्तु उभ्या असतात. त्यांचें वर्णनात्मक वाङ्मय छाया-चित्रांसहित प्रत्येकास मिळतें. शाळेंतील बाथरूम कशी असावी? याचा विचार तुम्हांस करावयास नको. तेथें बाथरूमची एक प्रतिकृति तयार. गार व गरम पाण्याचे नळ, शॉवर, साबण, टॉवेल ठेवण्याची जागा, आणि सात-आठ किंवा बारा-तेरा वर्षें वयाच्या मुलाचें मॉडेल. हा मुलगा आंघोळ शास्त्रीय पद्धतीनें कशी करावी याचा धडा भेट देणाऱ्या सर्वांना जणुं देत असतो. शाळेची इमारत साफ करावयाची आहे ना? मग चला या स्टॉलकडे. येथें नाना प्रकारचे व्हॅक्यूम क्लीनर्स आहेत. विजेनें चालणारीं हीं यंत्रें तुमच्या शाळेंतील सर्व वर्ग अगदीं थोड्या वेळांत स्वच्छ करून देतील. नाना प्रकारचे खेळ, आरोग्य, स्टेशनरी, छायाचित्रकारी, हिशेब ठेवणारीं यंत्रें, चित्रकलेचें साहित्य, व्यायामविषयक सामग्री, किती म्हणून सर्वांची गणना करावी? रेडिओ, टेलिफोन्स, टेलिव्हिजन्स यांचा शाळांतून कसा उपयोग करावा याचें ठिकठिकाणीं प्रात्यक्षिक अनेक प्रकारचे कॅमेरे, त्यांच्या साह्यानें घेतलेलीं रंगीत चित्रें, प्रोजेक्टरच्या साह्यानें पडद्यावर दिसणारें त्यांचें भव्य दर्शन, या सर्व गोष्टी तुमच्या समोर सारख्या घडत असतात त्यांत करमणूक आहे, शिक्षण आहे. विमानविद्येच्या स्टॉलसमोर तुम्ही थांबाल तर एका क्षणांत जगप्रवास करण्याची बुद्धि तुम्हांस होईल. पुस्तकांना उपयोगी पडणारीं प्लॅस्टिक्सचीं कव्हर्स पाहिलीं कीं, त्यांचा गुळगुळीत स्पर्श अनुभवावा अशी पोरकट इच्छा मनांत होतेच. विद्यार्थ्यांच्याकरितां किती तरी मासिकें, किती तरी वृत्तपत्रें अमेरिकेंत आहेत. शाळेच्या भिंती व जमिनी कशा सुशोभित कराव्यात याचें शास्त्र तयार झालेलें दिसेल. घडीचे दरवाजे कसे वापरावेत, रिफ्रिजरेटरचा उपयोग

कोणता, मुलांना सकस व हितकारक अन्न कोणतें, त्यांच्या वयाच्या पांचव्या वर्षीं, सहाव्या वर्षीं, सातव्या वर्षीं कोणती काळजी घ्यावी, मुलां-मुलींचा पोषाख कोणता असावा, केशरचना कशी असावी, ओठांना, गालांना रंग कोणते असावेत, मोटार चालवतांना कोणती काळजी घ्यावी, शिवण्याचीं कोणतीं नवीं यंत्रें आलीं आहेत ? विजेच्या शेगडींत कोणत्या सुधारणा झाल्या आहेत, मुलांचा कार्यक्रम फिल्मवर मुद्रित कसा करावा, शाळेच्या सभागृहाचें व्यासपीठ कसें सजवावें, गणवेशाबाबत कोणतें तारतम्य वापरावें, इत्यादि शेकडों गोष्टींचें जें ज्ञान नसतें, तें हें प्रदर्शन बघण्यानें होण्यासारखें होतें. आपल्या मालाचा उठाव व्हावा म्हणून ही जाहिरात तर खरेंच, पण पुन्हां जाहिरात करण्याचेंहि शास्त्र आहे. मूव्ही प्रोजेक्टरमध्यें फिल्म कशी बसवावी याचा धडा प्रत्येकास एके ठिकाणीं मिळत होता. दिलेल्या सूचनांवरून प्रत्येकजण प्रयत्न करी व त्याबद्दल कांहीं बक्षिस मिळे तें घेऊन जाई. यंत्रांतील माहिती मला पहिल्यापासून कमीच. पण मींहि धिटाई केली. फिल्म बसवून संपविली तों घड्याळावरील काटा २३ सेकंदांचा काळ दर्शवीत होता. तसा शिक्का एका लालभडक चेंडूवर मारून त्यांनीं मला दिला. येथें आल्यावर माझ्या धाकट्या मुलीचें तें एक आवडतें खेळणें झालें असलें तरी मला अटलांटिक सिटीची स्मृति त्यामुळें एकदां तरी होतेच.

प्रदर्शनांतील स्टॉल्सवर असणारीं माणसें व्यापारी होतींच, पण माणसांना आपलेसें करून घेण्याचें शास्त्र वा कला त्यांनीं आत्मसात् केली होती. आमच्या-सारखा पाहुणा समोर पाहतांच आधीं हंसून मनमोकळ्या रीतीनें स्वागत करतील, तेवढ्या गडबडींत गांधी, नेहरू, काश्मीर या विषयांवर अर्धवट माहितीच्या आधारें तुमच्याशीं नातें निर्माण करतील आणि मग आपणच म्हणतील, " तुम्हीं प्रवासांत आहांत. विमानानें सामान कसें जास्त नेणार ? तुमचा पत्ता द्या, आम्हीं आमचें वाङ्मय तुमच्या घरीं पाठवूं. " असे पत्ते पन्नास-साठ ठिकाणीं मी दिले होते. पंधरा-तीन वारांनीं मी पुण्यास घरीं आलों तों माझ्याहि आधीं किती तरी वाङ्मय हवाई मार्गानें येऊन पडलें होतें. आमच्या स्टॉलला भेट दिलीत, फार चांगलें झालें अशा अर्थाचें एक एक पत्र ! कित्येक वेळां नाहीं म्हटलें तरी हातांत वाङ्मय साठतेंच

मग एखादा विक्रेता म्हणेल, “ ही कागदाची भक्कम पिशवी घ्या. तुमचा हात अवघडणार नाहीं. ” ही सुटसुटीत पिशवी घेऊन पुनः आपला प्रवास चालू होतो. पेन्सिली, रबरें, नेलकटर्स, स्लेटपाटी, बुक-कव्हर्स, खूप चित्रें, रंगपेट्या, इत्यादींची भर नको नको म्हणत असतां आपल्या पिशवींत पडत राहते. श्रीमंत राष्ट्राची ऐट ही अशी असते. अमेरिका राष्ट्र श्रीमंत आहे, प्रगतिपथावर आहे याचीं जीं कारणें आहेत त्यांत त्यांची शिक्षणांवरील अचल निष्ठा हें एक प्रमुख आहे. अटलांटिक सिटीस याचाच तीव्र ठसा माझ्या मनावर उमटला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## २६ : ऐश्वर्यशाली न्यू यॉर्क

न्यू यॉर्कनें प्रथमदर्शनीं माझ्या मनावर म्हणावासा अनुकूल परिणाम केला नाहीं. अमेरिकेंत प्रथम पाऊल ठेवलें तें न्यू यॉर्क शहरींच. पण अवघ्या दोन-तीन तासांचा तो मुक्काम विमानतळावरचा होता. न्यू यॉर्कच्या उंच इमारती, प्रख्यात बंदर, स्वातंत्र्यदेवीचा पुतळा, ती जगप्रसिद्ध एम्पायर स्टेट इमारत कांहीं कांहीं माझ्या दृष्टीस पडलें नव्हतें. लागलीच मी विमानानें वॉशिंग्टनला गेलों. पुढें सहा महिनेपर्यंत अमेरिकेंतील बहुतेक सर्व प्रमुख शहरें या नाहीं त्या निमित्तानें पाहण्यांत आलीं. हिंडून हिंडून, प्रवास करकरून मनास एक प्रकारचा उबग आला होता. युरोपमध्यें पंधरा दिवस थांबण्याचें निश्चित झालें होतें. त्याहि प्रवासाचा होणारा ताण मनास आतांच व्यथित करीत होता. अशा प्रकारें दमल्याभागल्या मन:स्थितींतच मी वॉशिंग्टनहून रेल्वेनें निघून न्यू यॉर्कला येऊन पोंचलों. दुपारचे तीन वाजण्याचा सुमार होता. गुजराथकडच्या मिस् मच्छर, मेक्सिकोची मिस् जोसेफिना, उमरावतीचे श्री. पेंढारकर असे आम्ही चौघे-पांचजण न्यू यॉर्कला एकत्र येऊन पोंचलों. आकाश अंधारून आलेलें होतें. आधींच उंच इमारती दोन्हीहि बाजूंनीं असल्यामुळें भर दुपारीं रस्त्यावर अंधारच असतो. त्यांतून बर्फाळ हवा सुरू होती. रस्त्यावर घोट्यापर्यंत चिखलच माजून राहिला होता. कदाचित् हेंहि कारण असेल माझ्या उदास मन:स्थितीचें.

मार्टिनिक हॉटेलमध्यें आम्ही सर्वजण तीन-चार दिवसांच्या मुक्कामासाठीं उतरलों होतों. तीन-साडेतीन डॉलर्स रोज प्रत्येक खोलीस हा दर न्यू यॉर्कच्या मानानें फार नव्हता. हॉटेलमध्यें व्यवस्था फार उत्तम होती. प्रसिद्ध अशा ब्रॉडवे स्ट्रीटवरच हें हॉटेल असल्यामुळें न्यू यॉर्कची घाई-गर्दी सहज ध्यानांत येण्यासारखी होती. हॉटेलमध्यें सामानाची व्यवस्था केल्यानंतर

मी बाहेर पडलों. पावसाची म्हणजे बर्फाची भुरभूर चालूच होती. अंगाला झोंबणारें वारें चांगलेंच जाणवत होतें. ब्रॉडवे स्ट्रीट माणसांनीं व वाहनांनीं गजबजून गेला होता. टापटीप, व्यवस्था, शिस्तबद्धता या गोष्टी या प्रसिद्ध शहरांत जरा कमी प्रमाणांतच वाटल्या. या शहरापेक्षां स्वच्छ, नव्या धर्तीवर मांडणी केलेलीं, सौंदर्यानें नटलेलीं अधिक चांगलीं शहरें अमेरिकेंत निश्चितपणें आहेत. तीं खास अमेरिकन शहरें आहेत. न्यू यॉर्कमध्यें केवळ अमेरिकन संस्कृतिच सांपडेल असें नाहीं. जगांतील कित्येक धर्मांचे, पंथांचे लोक या संमिश्र शहरांत एकत्र झालेले दिसतात. जगांतील साऱ्या उलाढाली या शहरांत होतात. साऱ्या रंगांचीं आणि विविध मुद्राभिनयांनीं युक्त असणारीं माणसें येथें भेटतात. कपडे, दागदागिने, खाद्यपदार्थ यांचें जागतिक संमेलनच येथें भरलेलें असतें. रस्त्यावर, फूटपाथवर, चौकाचौकांतून हातगाड्या नाना पदार्थ विकतांना येथें प्रथमच दिसल्या. न्यू यॉर्कच्या रस्त्यावरील पहिली व्यक्ति ध्यानांत आली ती कमरेच्या पिशवींत साधनें अडकवून उभा राहिलेला न्हावी. इतर कोणत्याहि शहरांत ही कला रस्त्यावर आलेली पाहिली नव्हती. प्रशस्त अशा दुकानांतून डॉलर–दीड डॉलर या कामासाठीं पडतात. पण रस्त्यावरच्या या माणसानें आपल्या पाठीवर एक भला मोठा फलक लाविलेला असतो. त्यावर पन्नास सेंट्स असा सवलतीचा दर लिहिलेला प्रामुख्यानें नजरेंत भरतो. आणि खालीं ठळक अक्षरांत सूचना असते–' We also shave. आम्ही दाढीहि करतों ! '

पहिल्या दिवशीं न्यू यॉर्क असें थोडें बकाली स्वरूपाचें वाटलें आणि न्यू यॉर्कची वाढ आणि या प्रसिद्ध शहराचा इतिहास ध्यानांत घेतां सध्यांचें हें स्वरूप त्यास प्राप्त होणेंच शक्य असल्याचें दिसून येतें. किती वेगवेगळ्या लोकांचा हात या शहराच्या वाढीस कारणीभूत झालेला आहे ! तीनशें एकोणीस चौरस मैलांपर्यंत पसरलेल्या या अफाट शहराची लोकसंख्या १९५३ सालीं ऐंशीं लक्षांच्यावर होती. पण ही हळूहळू वाढत गेलेली संख्या आहे. आजचें नगर मॅनहॅट्न, ब्रुकलीन, ब्रॉंक्झ, क्वीन्स आणि रिचमंड या पांच उपविभागांतून विभागलेलें आहे. १६०९ सालच्या सप्टेंबर महिन्याच्या ११ तारखेस मुख्य बेट मॅनहॅट्न याचा शोध लागला. ज्या ब्रॉडवेवर मी

राहत होतों त्याच स्ट्रीटवर युरोपियन लोकांनीं पहिलें घर बांधलें. १६२६ सालीं रेड इंडियन्सकडून नेदरलंडच्या लोकांनीं हें बेट विकत घेऊन या शहरास न्यू ॲम्स्टरडॅम असें नांव दिलें. या वेळीं बेटाची म्हणजे या लहान शहराची लोकसंख्या होती दोनशें ! १६६४ मध्यें इंग्रजांनीं हें बेट जिंकून वाढत राहणाऱ्या शहरास न्यू यॉर्क असें नांव दिलें. १६७३ मध्यें पुनः डच लोकांनीं या शहराचा ताबा मिळवून त्यास न्यू ऑरेंज असें नवें नांव दिलें. पुढल्याच वर्षीं इंग्लिशांनीं पुनः या शहरावर स्वामित्व मिळवून न्यू यॉर्कची प्राणप्रतिष्ठा केली.

१७०० सालापासून सरकारी इमारतींची बांधणी सुरू झाली. युनायटेड स्टेट्सचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यानें येथील फेडरल हॉलमध्यें आपला पहिला शपथविधि पूर्ण केला. १७७६ सालीं स्वातंत्र्याचा जाहीरनामा येथेंच प्रथम वाचण्यांत आला. १७८५–१७९० पर्यंत देशाची राजधानी म्हणून न्यू यॉर्कचें महत्त्व वाढीस लागलें. येथून पुढें नव्या-जुन्या जगांना सांधणारें प्रसिद्ध व्यापारी बंदर म्हणून न्यू यॉर्कला महत्त्व येत गेलें. सन १८१९ सालीं पहिली आगबोट येथून युरोपकडे निघाली. १८३२ सालीं घोड्यांच्या गाड्या रस्त्यावरून धांवूं लागल्या. १८४४ पासून शहर पोलिसांची व्यवस्था न्यू यॉर्क शहरास लाभली. १८४६ सालीं न्यू यॉर्क ते फिलाडेल्फिया ही जगांतील पहिली तारायंत्राची व्यवस्था सुरू झाली. रेल्वेमार्ग, ट्रॅममार्ग, नवे नवे पूल यांची एकसारखी भर पडत गेली. १८८६ पासून न्यू यॉर्क बंदरांत स्वातंत्र्यदेवीचा पुतळा मुक्ततेचा संदेश जगास देण्यास उभा राहिला. आज या शहराचें वैभव अनेक दृष्टींनीं पहिल्या प्रतीचें बनलें आहे. जुनाटपणा ठायीं ठायीं दिसतोच, पण नव्यानें आकारास आलेलीं सहस्र कामें आज नजरेंत भरण्याजोगीं आहेत. सुमारें १८०,००० प्रवासी रोज या नाहीं त्या कामासाठीं या शहरांत येत असतात. वीस लक्ष उतारूंची ने–आण रोज स्थानिक गाड्या करीत असतात. चारशें फुटांच्या वर उंच असणाऱ्या चाळीसच्या वर इमारती येथें आकाशाला जाऊन भिडलेल्या आहेत. कोट्यवधि डॉलर्सची उलाढाल रोज या शहरांतून होते. सर्व शहराची मालमत्तेची मोजदाद केली तर ती सुमारें २०,०००,०००,००० डॉलर्सपर्यंत भरेल. ३६ मैल लांब व २५

मैल रुंद या प्रमाणांत १९८९४२ एकरांपर्यंत पसरलेल्या या अवाढव्य शहराचे प्रमुख विभाग असेः—

(१) मॅनहॅट्न बेट–१२॥ मै. लांब, २½ मै. रुंद; लो. सं. २,०००,०००
(२) ब्रुकलिन– ११ मै. लांब, १० मै. रुंद; लो. स. २,८२५,०००
(३) ब्रॉक्झ– ८ मै. लांब, ८ मै. रुंद; लो. सं. १,४९१,०००
(४) क्वीन्स– १५ मै. लांब, १३ मै. रुंद; लो. सं. १,५००,०००
(५) रिचमंड– १५ मै. लांब ७ मै. रुंद; लो. सं. १९९,०००

न्यू यॉर्कला आल्यावर काय काय पाहावयाचें याची यादी मी हिंदुस्थानांत असतांनाच केली होती. पुण्याचे तेथील प्रसिद्ध व्यापारी श्री. मराठे यांचा पाहुणचार व्यावयाचा होता. रॉकफेलर सेंटर, एम्पायर स्टेट बिल्डिंग, स्टॅच्यु ऑफ् लिबर्टी, युनायटेड नेशन्स मेट्रॉपोलिटिन म्यूझियम, टाईम्स स्क्वेअर, कोलंबिया युनिव्हर्सिटी– केवढी मोठी यादी माझ्याजवळ होती. न्यू यॉर्कला नायलॉनच्या साड्या फार चांगल्या व स्वस्त मिळतात अशी माहिती वॉशिंग्टनला सौ. तळेकर व सौ. पिंपरकर यांनीं दिली असल्यामुळें तें ठिकाण शोधून काढण्याचें सर्वांत महत्त्वाचें काम होतें. आणि हिंडण्याचा, फिरण्याचा, नकाशा पाहून दिशा, बसचे-ट्रॅम्सचे नंबर्स शोधण्याचा कंटाळा आला होता. पण पहिल्या रात्रीं झोप चांगली लागली त्यामुळें दुसऱ्या दिवशीं नवा हुरूप आला. आणि थोड्या बालिश अधाशीपणानें जास्तींत जास्त पाहून घेण्याचें ठरवून हॉटेलबाहेर पडलों. पुनः केव्हां संधी येईल न येईल हा विचार मनांत आलाच. पाहण्यासारखीं बहुतेक ठिकाणें जवळपासच आहेत हा शोध प्रथम आम्हीं लावला.

मार्टिनिक हॉटेलपासून पांच मिनिटांच्या अंतरावर एक फोटो-सामानांचें दुकान होतें. तेथून कांहीं फिल्म्स खरेदी केल्या आणि तेव्हां ध्यानांत आलें, प्रसिद्ध एंपायर स्टेट इमारत ती हीच! आश्चर्यानें मन थक्कच झालें. न्यू यॉर्कच्या मानानें आजूबाजूचे रस्ते कांहीं मोठे रुंद नव्हते. आणि एवढ्याशा अडचणीच्या जागीं एवढी इमारत उभी तरी कशी केली. वर मान केली तर शेवटच्या शिखरापर्यंत दृष्टि ठरत नाहीं, ही गोष्ट तर खरीच. पण एंपायर स्टेट इमारत चांगल्या ऐसपैस अशा मोकळ्या जागीं असेल अशी पहिली कल्पना. पण प्रत्यक्ष ही इमारत फारच गर्दीच्या

विभागांत असलेली दिसली. सर्व भोंवतींच्या इमारतींचा नक्षा हिनें उतरविला आहे यांत शंका नाहीं. माणसानें बांधलेली जगांतील सर्वांत उंच असलेली ही इमारत १४३२ फूट उंच असून एकूण मजले एकशें-बारा आहेत. शिवाय, जमिनीच्या खालीं दोन तळमजले आहेत ते निराळेच. इमारत पाहणाऱ्यांची व्यवस्था करणारांचें एक स्वतंत्र खातेंच आहे. पहिल्या पांच वर्षांत पन्नास लक्ष लोकांनी प्रत्येकीं दीड डॉलर देऊन ही इमारत पाहिली ! शेवटच्या मजल्यावरून भोंवतींच्या पन्नास मैलांचा न्यू यॉर्क शहराचा टापू असा दिसतो कीं, वर्णन करतां करतां सर्व कांहीं ठेंगणें वाटावें. सकाळीं ९-३० पासून रात्रीं बारापर्यंत प्रेक्षकांची एक-सारखी रीघ लागलेली असते. दुपारचा देखावा निराळा आणि रात्रीं विजेच्या चमचमाटाचा देखावा पाहून भान हरपून जातें. सर्वांत शेवटच्या मजल्यावर टेलिव्हिजन टॉवर आहे. १९५१ सालीं या दोनशें फूट टॉवरची सिद्धता झाली. १९३१ सालीं जगांतील सर्वांत उंच असणारी ही इमारत न्यू यॉर्कचें वैभव सर्वांना सांगण्यासाठीं सिद्ध झाली. ८६ व्या मजल्यावर प्रेक्षकांना निरीक्षणासाठीं एक गॅलरी आहे. आरामशीरपणें बसण्यासाठीं जागा आहे. नाना प्रकारचीं पेयें येथें विकत मिळतात. बरोबर असणारी गाईड सर्व माहिती सांगत असते. एंपायर स्टेट इमारतींत नाना दुकानें, नाना ऑफिसें, नाना खाद्यपदार्थांचीं दुकानें असल्यानें एक छोटें गांवच या इमारतींत वसलें आहे.

न्यू यॉर्कला दुसरी पाहण्यासारखी इमारत म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाची. जगाची चावडीच म्हणानात ही. प्रसिद्ध उद्योगपति जॉन डी. रॉकफेलर यांनीं देऊं केलेल्या जागेवर युनायटेड नेशन्सच्या या भव्य इमारती गेल्या पांच-सहा वर्षांत उभ्या राहिल्या आहेत. न्यू यॉर्कच्या नागरिकांच्या औदार्याचा भागहि या जगप्रसिद्ध इमारतींत आहे. सर्वांत प्रसिद्ध इमारत म्हणजे सेक्रेटरीएटची. एका उंच विटेसारखी उभी राहिलेली चाळीस मजली बिल्डिंग ! १९५१ सालीं पूर्ण झालेली ही इमारत संगमरवर, पोलाद आणि कांच या साधनांनीं आकारास आलेली आहे. आजूबाजूस जनरल असेंब्ली इमारत, ग्रंथालय इमारत, सभागृह अशा कांहीं प्रमुख विभागांची भर एकसारखी पडत आहे. या सर्व इमारतींना लागणारी ६५,०००,०००

डॉलर्सची रक्कम अमेरिकेनें बिनव्याजी कर्जाऊ म्हणून दिली आहे. जगांतील प्रमुख राष्ट्रांनीं आपापले प्रतिनिधि येथें पाठवून दिले असून संगमरवरी दगड, तावदाने, फर्निचर, पडदे, चित्रकारी इत्यादींच्या निमित्तांनीं प्रत्येक देशानें आपल्या संस्कृतीची देणगी या जगाच्या छोट्या राजधानीस दिली आहे. नाना देशचे नाना लोक दररोज या इमारतींना भेटी देतात. आपापल्या देशाची स्मृति प्रत्येकास होऊन प्रत्येक जण मनांत खूष होऊन जातो. सकाळीं ९-३० पासून दुपारीं ५ पर्यंत मार्गदर्शिकांसहित प्रवासी लोकांचे अनेक गट इमारती पाहण्यांत दंग झालेले असतात. प्रत्येक प्रौढास एक डॉलरप्रमाणें फी द्यावी लागते. सर्व इमारतीची रचना आधुनिक पद्धतीची असून कलाकुसर, टापटीप आणि भव्यता यांचा एक संमिश्र परिणाम आपल्या मनावर होतो. युनोच्या ग्रंथालयांत व पुस्तक–विक्रीच्या दुकानांत संयुक्त राष्ट्रासंबंधींचीं सर्व प्रकाशनें मिळण्याची सोय आहे. युनायटेड नेशन्सनें निरनिराळ्या निमित्तांनीं काढलेलीं प्रतीकात्मक तिकिटें हौशी लोकांना येथें थोडी फार किंमत दिली म्हणजे मिळूं शकतात. निरनिराळ्या देशांच्या बाहुल्या, कलाकौशल्य, दागदागिने यांचा एक चमत्कारिक संग्रहहि येथें पाहण्यासारखा आहे.

रॉकफेलर सेंटर हें आणखी एक न्यू यॉर्कचें वैभव दर्शविणारें ठिकाण. शास्त्रीय संशोधनासाठीं व प्रसिद्ध अशा रुग्णालयासाठीं विख्यात असणारीं रॉकफेलर इन्स्टिटयूट वेगळी आणि बारा एकर जागेंत पंधरा गगनचुंबी इमारतींचा एक संच म्हणून रॉकफेलर सेंटर प्रसिद्ध आहे. या इमारतींतून अनेक उद्योगपतींच्या कचेऱ्या, मोठमोठीं दुकानें, रेडिओ, टेलिव्हिजनचीं केंद्रें, उपाहारगृहें, क्रीडागृहें यांची एकच गर्दी उडून गेलेली असते. रॉकफेलर सेंटरमधील प्रमुख इमारत म्हणजे आर. सी. ए. बिल्डिंग. सत्तर मजल्यांच्या या इमारतीवर उभे राहून न्यू यॉर्कचा सर्व भाग पाहतां येतो. पुढच्या चौकांत पिवळाधमक असा प्रॉमेथ्युअस या ग्रीक दैवताचा एक मोठा पुतळा व त्याच्याभोंवतींचें कारंजें नजरेंत भरतें. त्याच्यापुढें असणारें छोटेंसें उद्यान नाना रंगांच्या व गंधांच्या फुलांनीं डवरून गेलेलें असतें. असंख्य माणसांची ये–जा एकसारखी चाललेली असून सबंध सेंटरला मायाबाजाराचें स्वरूप प्राप्त झालेलें दिसून येतें. सर्व कांहीं चकचकीत,

प्रमुख बोगदे, भुयारांतील गाड्या आणि सर्वत्र असणाऱ्या अनेक मजल्यांच्या इमारती शहराच्या सौंदर्यांत व भव्यतेंत भर घालतांना दिसतात. ट्रिनिटी व सेंट पॅट्रिक्स हीं दोन चर्चेस फार महत्त्वाचीं समजलीं जातात. न्यू यॉर्कची जगप्रसिद्ध कोलंबिया युनिव्हर्सिटी, न्यू यॉर्क युनिव्हर्सिटी, इत्यादि शैक्षणिक केंद्रें आज जगाचें लक्ष आपणांकडे ओढून घेत आहेत.

पण न्यू यॉर्क म्हटल्याबरोबर प्रथम लक्षांत येतें तें न्यू यॉर्क बंदर आणि तेथील स्वातंत्र्यदेवीचा पुतळा. मॅनहॅट्न बेटाचें टोंक बॅटरी म्हणून प्रसिद्ध आहे. व्यापारी विभाग म्हणून याची महती असून महत्त्वाच्या जुन्या इमारती येथेंच आहेत. याच विभागांतून स्वातंत्र्यदेवीच्या पुतळ्याकडे दर पांच-दहा मिनिटांनीं बोटी निघतात. न्यू यॉर्क बंदरालगतच एक छोटेंसें बेड्लो नांवाचें बेट असून त्यावर हा जगप्रसिद्ध पुतळा उभा आहे. आम्ही सकाळीं नऊ–साडेनऊच्या सुमारास मिस लिबर्टी या लहानशा बोटीनें स्वातंत्र्यदेवीचा पुतळा पाहण्यास निघालों. आभाळांत ढग असले तरी रंगीत फोटो घेण्यास ही हवा उत्तम होती. बॅटरी विभागापासून दीड मैलावर असणारा हा पुतळा खूप दूरवरून दिसतो. दुरून त्याच्या भव्यतेची कल्पना येत नाहीं. पण बेटाशीं जाऊन पोंचतांच या मानवी आश्चर्यानें डोळे दिपून जातात. चित्तावर एक प्रकारचें दडपण येतें. मित्रत्वाची भावना कायम राहावी म्हणून फ्रान्सनें अमेरिकेच्या स्वातंत्र्यप्रिय लोकांना हा पुतळा नजर केला आहे. सन १८८६ सालीं त्याची येथें स्थापना झाली. फ्रेड्रिक बार्थोडो नांवाच्या मूर्तिकारानें याची रचना केली. २५०,००० डॉलर्स पुतळ्यास खर्च आला. तेवढीच किंमत त्याच्या पायासाठीं म्हणून न्यू यॉर्कच्या लोकांना द्यावी लागली. केवळ पुतळ्याचें वजन ४५०,००० पौंड असून पायापासूनची उंची ३०५ फूट १ इंच आहे ! पुतळ्याचा उजवा हात उंच उभारला असून त्यांत प्रतीकात्मक मशाल घेतलेली आहे. या नुसत्या हाताची लांबी ४२ फूट असून दोन डोळ्यांतील अंतर २ फूट ६ इंचांचें आहे. पुतळा आंतून पोकळ असून वरपर्यंत चढण्यास वाटोळे जिने आहेत. उंचीची कल्पना नसल्यानें आम्हीं पायीं चढण्याचा उद्योग आरंभला. शेवटीं थकत–भागत १६८ पायऱ्या

चढून जाव्या लागल्या. पुतळ्याच्या डोक्याशीं आम्ही आलों होतों. सबंध वर्तुळाकार डोक्यावर एकाच वेळीं चाळीस माणसें नीटपणें उभे राहून भोंवतींचा देखावा पाहूं शकतात. उजव्या हातांत असलेल्या मशालीपर्यंत सुद्धां एका वेळेस बारा माणसें जाऊं शकतात. सरळ नाकाची लांबी ४ फूट ६ इंच असून तोंडाची रुंदी तीन फुटांची आहे ! असा हा स्वातंत्र्य-देवीचा भव्य पुतळा न्यू यॉर्क बंदरांत येणाऱ्यांना स्वातंत्र्याचा संदेश देत सत्तर वर्षेपर्यंत उभा आहे. अमेरिकेचें एक राष्ट्रीय स्मारक म्हणून या पुतळ्याचें महत्त्व मानलें जातें. या लिबर्टी बेटावरच पुतळ्याच्या आसपास कांहीं दुकानें आहेत. तेथें पुतळ्याच्या लहान-मोठ्या सुबक प्रतिकृति विकत मिळतात. रंगीत फोटो, फिल्म्स, स्लाईड्स आणि किती तरी स्मृतिविषयक वस्तु येथें विकावयास ठेवलेल्या दिसतात. अमेरिकन माणसाच्या रक्तांत स्वातंत्र्याचें प्रेम भरून राहिलें आहे त्याची साक्ष प्रथम पटते ती या स्वातंत्र्यदेवीच्या भव्य पुतळ्याकडे पाहून.

## २७ : यांत्रिक जीवनाला धर्माची ऊब

अमेरिकेंत आल्याबरोबर पहिल्या प्रथम जाणीव होते ती येथील कमालीच्या यांत्रिक जीवनाची. सकाळपासून संध्याकाळपर्यंतच्या नित्याच्या व्यवहारांत यंत्राची मदत असते. अगदीं साधें बिनश्रमाचें का काम असेना पण तेथेंहि यंत्र सेवेस हजर असतें. कोठें बटन दाबा, कोठें चावी फिरवा कीं नाना यंत्रें तुमच्यासाठीं भराभर कामें करूं लागतील. अमेरिकन जीवनांतील दुसरा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे गतिमानता, गर्दी, धांदल, गडबड जीवनाच्या सर्व अंगांतून प्रगट झालेली असते. रस्त्यावर अखंडपणें मोटारींची धांवपळ चालू असते. जितकीं माणसें तितक्या मोटारी म्हणानात ! यंत्र मदतीस असलें तरी प्रत्येक मनुष्य खूप काम करतो. श्रीमंत राबतात, गरीब–गरीब फारसे या देशांत नाहींत–सुद्धां राबतात. श्रम करण्यांत कोणासहि कमीपणा वाटत नाहीं. चांगलीं श्रीमंतांचीं मुलेंहि वृत्तपत्रें विकतात. दुसऱ्याच्या घरीं ‘ बेबीसिटर ’ होऊन मुलें सांभाळण्याचें काम करतात. सकाळीं आठ वाजल्यापासून संध्याकाळीं साडेचार-पांच वाजेपर्यंत बहुतेकांना कामें करावीं लागतात. रेडिओवरील बातम्या ऐकत ऐकत, हवामानाचे अंदाज ऐकत ऐकत ब्रेकफास्ट उरकून माणसें कामावर जाण्याच्या गर्दींत असतात. शहरांतील सर्व रस्ते मोटारींच्या धांवपळीनें गजबजून गेलेले असतात. दुपारीं बारा वाजतां अशीच गर्दी, धांदल सुरू होते. रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, ड्रग स्टोअर्स, कॅफेटिरियाज इत्यादि ठिकाणीं, बायकांची, पुरुषांची, तरुणांची, वृद्धांची, गर्दी सुरू होते. स्वतःच्या घरीं ‘लंच’ घेणारे फार थोडे. सायंकाळची ‘ डिनर ’ वा ‘ सपर ’ मात्र ज्याच्या त्याच्या घरीं असते. ४॥ वाजल्यापासून पुनः उलट्या गतीनें मोटारींची रीघ सुरू होते. कोठें शैथिल्य, आळस, उगाच आराम करण्याची वृत्ति दिसावयाची नाहीं. अनेक सभा, अनेक मुलाखतींच्या वेळा, अनेक ‘ फोन कॉल्स ’, रोज टाईप करावीं लागणारीं

अनेक पत्रें असा सार्वजनिक जीवनाचा थोडक्यांत आढावा आहे. रात्रीं बारा वाजेपर्यंत टेलिव्हिजनवर चांगले चांगले कार्यक्रम असतातच.

अमेरिकन जीवनाचा तिसरा महत्त्वाचा विशेष म्हणजे भौतिक सुखाची तीव्र लालसा. जास्तींत जास्त पैसा व त्यापासून निर्माण होणारें सुख कसें प्राप्त होईल याकडे सर्वांचें लक्ष असतें. सुखाचे, चैनीचे, विलासाचे नाना प्रकार, नाना तऱ्हा या देशांत दृष्टीस पडतील. मोठमोठ्या उद्योगधंद्यांचें आगर कित्येक शहरांतून पाहावयास सांपडेल. धरणीच्या पोटांत खणून खणून येथील माणसानें अगणित संपत्ति उभारली आहे. अफाटपणें पसरलेली व खऱ्या अर्थानें ' वसुंधरा ' असलेली जमीन कधीं संपेल किंवा खनिजांचा सांठा केव्हां तरी संपुष्टांत येईल याची जाणीवच नाहीं. शास्त्राच्या व श्रमाच्या बळावर ऐहिक सुखाची पेठ या नव्या जगांत उतरलेली आहे असा देखावा येथील मानवानें उभा केला आहे. जीवनांतील कृत्रिमता नित्याची झाली त्यामुळें तोहि जीवनाचा एक भाग होऊन बसला. हवा कृत्रिम, उष्णता कृत्रिम, उजेड कृत्रिम, इतकेंच काय भोंवतीं झाडांफुलांनीं सृष्टि नटलेली असतांना घरांतील कुंड्यांत कागदाचीं, प्लॅस्टिक्सचीं फुलझाडें दिसतील व यांत कांहीं कृत्रिमता आहे असें कोणाच्या ध्यानांतहि नसतें.

अमेरिकेस निघण्यापूर्वी मीं हें सर्व वर्णन ऐकलें होतें. तेव्हां मनांत प्रश्न उभा राहिला होता कीं, ऐहिक सुखाच्या पाठीमागें लागलेल्या या यांत्रिक जीवनाच्या माणसांना धर्माचें महत्त्व कळतें कीं नाहीं ? परमेश्वरावर यांचा विश्वास आहे कीं नाहीं ? तत्त्वज्ञान, अध्यात्म, पारमार्थिक विचार यांना सुचतो कीं नाहीं ? जीवनाच्या या अंगाचा आम्ही भारतीयांनीं अधिक सूक्ष्मतेनें विचार केला आहे. पण गर्दीच्या, धांवपळीच्या यांत्रिक व कृत्रिमतेनें भारावलेल्या अमेरिकन जीवनांत या गोष्टींना कांहीं अर्थ आहे काय ? मीं या देशांत आल्यापासून या दृष्टीनें पाहणी सुरू केली. अनेक चर्चेसमध्यें जाऊन तेथील सर्व कार्यक्रम पाहिले. अनेक धर्मपंडितांच्या मुलाखती घेतल्या. अमेरिकन कुटुंबांत तीन-चार महिने राहण्याचा योग आल्यामुळें दैनिक जीवनांतहि धर्माचें काय स्थान आहे हेंहि हळूहळू ध्यानांत येऊं लागलें. रोज डोंगराएवढें प्रसिद्ध होणारें धार्मिक विषयावरील वाङ्मयहि नजरेखालून घालण्याचा प्रयत्न केला. आणि या सर्वांचा निष्कर्ष असा—

अमेरिकेंत गोऱ्या लोकांची वसाहत झाली ती युरोपमध्यें धार्मिक छळ सुरू झाला म्हणून. आपला धर्म बचावण्यासाठीं लोक या नव्या जगांत तीनशें वर्षांपूर्वीं येऊं लागले. अर्थात् धनाचा लोभ, साहसाची आवड, नव्या भूमीची लालसा या गोष्टी त्याबरोबर होत्याच. युरोपांतून शेंकडों-हजारों लोक दरसाल येऊन या भूमींत दाखल झाले. इंग्लिश आले, डच आले, स्पॅनिश आले, फ्रेंच आले, जर्मन आले, स्कॉटिश आले आणि जे आले त्यांनीं आपापला धर्म बरोबर आणला. त्यामुळें थोड्याच काळांत या देशांत सर्व धर्मांचें चमत्कारिक मिश्रण तयार झालें. प्रथम प्रथम हे धर्मपंथ अलग अलग राहिले. पण कालांतरानें सामाजिक जीवनांत या बहुतेक सर्व धर्मपंथांचें सहकार्य उत्कृष्टपणें होऊं लागलें. आतां या देशांत ख्रिश्चन धर्मांचेच किती तरी उपपंथ सलोख्यानें नांदत आहेत. बॅप्टिस्ट, कॅथॉलिक ख्रिश्चन सायंटिस्ट, काँग्रेशनॅलिस्ट, एपिस्कोपिलियन, ल्युथरिन, ज्यूइश, मेथॉडिस्ट, प्रेसबिटेरियन, क्वेकर अशीं किती तरी नांवें सांगतां येतील. येथें हिंदु आहेत, मुसलमान आहेत, बौद्धहि आहेत आणि कोणताच धर्म न मानणारे, कोणताच देव न मानणारे ६४,०००,००० अमेरिकन्स आहेत. ही संख्या दिसते तितकी मोठी नाहीं. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक कटु अनुभवांमुळें म्हणा वा इतर अन्य कारणांमुळें म्हणा चर्चमध्यें जाणारांची संख्या झपाट्यानें वाढीस लागली. कांहीं आंकडे माझ्यासमोर आहेत. सन १९५२ सालीं ही ९२,२७७,१२९ संख्या होती. सन १९५३ सालीं ही संख्या ९४,८४२,८४५ पर्यंत वाढली. शेंकडा साठाच्या वर लोक चर्चमध्यें जातांना दिसतात. १९५२ सालीं अमेरिकेंत २८५२७७ चर्चेस् होतीं. १९५३ सालीं ही संख्या २९४३५९ पर्यंत वाढली. कोणत्या पंथाचे किती लोक आहेत हेंहि पाहणें मनोरंजक होईल—

| | |
|---|---|
| बौद्ध धर्मीय ... ... | ६३००० |
| जुने कॅथॉलिक ... | ३६६०४४ |
| रोमन कॅथॉलिक ... | ३१४७६२६१ |
| प्रॉटेस्टंट ... ... | ५३८३७३२५ |
| ज्यू ... ... ... | ५०००००० |

या प्रमुख धर्मपंथांचीं चर्चेस अर्थातच वेगवेगळीं आहेत. बुद्धाचीं मंदिरें एकूण ४८ आहेत. जुन्या कॅथॉलिक लोकांचीं चर्चेस २५६ आहेत. ज्यू लोकांचीं ३९९०, रोमन कॅथॉलिकांचीं २०६१८ व प्रॉटेस्टंट लोकांचीं २६८१०७ चर्चेस अमेरिकेंत आहेत. या सर्व संख्या दरवर्षीं वाढत आहेत. कांहीं आंकडे उद्‌बोधक होतील. सन १८०५ सालीं फक्त १६ टक्के लोक चर्चमध्यें जाणारे होते. १८९० सालीं २२ टक्के लोकांना चर्चचें महत्त्व समजूं लागलें. १९०० सालीं ३६ टक्के लोक चर्चमध्यें जाणारे होते. १९४० सालीं ही संख्या ५० टक्केपर्यंत वाढली आणि १९५४ सालीं शेंकडा ६० टक्के लोक चर्चमध्यें जाणारे झाले. चर्चेसची संख्याहि वाढत आहे. नव्या नव्या मोठ्या शोभिवंत इमारती अगदीं अलीकडच्या काळांत तयार झालेल्या दिसतात.

अमेरिकन जीवनांतील रविवार या दृष्टीनें पाहण्यासारखा आहे. सर्व-साधारण मनुष्य रविवारीं लौकर उठून आपल्या कुटुंबियांसहित चर्चमध्यें जाण्याच्या तयारीस लागतो. सर्वजण चांगल्यापैकीं पोषाख करतात. मुलें ' संडे स्कूल'च्या तयारींत असतात. पुरुषवर्ग आपले सूट, आपला टाय, आपला एकूण रुबाब नीट तपासून पाहतो. स्त्रियाहि वेगवेगळ्या पद्धतीनें नटतात. विविध प्रकारच्या, आकाराच्या, टोप्या बहुतेक स्त्रिया घालतात. सकाळीं आठ वाजल्यापासून मोटारींची रीघ चर्चकडे सुरू होते. प्रार्थना-संगीत, मिनिस्टरचें बिशपचें भाषण सर्व कांहीं अगदीं शांततेनें पार पडतें. मुलें आपल्या रविवारच्या शाळांतून बायबलचे धडे घेत असतात. थोर माणसांचेहि वेगवेगळे वर्ग चर्चमध्यें सुरू असतात. अमेरिकन चर्चेस म्हणजे केवळ प्रार्थनेचीं ठिकाणें नाहींत. धर्माचा खरा अर्थ येथें आकारास आलेला दिसतो. समाजाच्या जेवढ्या जेवढ्या गरजा आहेत तेवढ्यांचा विचार चर्चनें केलेला दिसून येतो. चर्च ही एक धार्मिक व सामाजिक अशी नित्य उपयोगी पडणारी संस्थाच म्हणानात! कोलंबस (ओव्हायो स्टेट) गांवीं असतांना माझा संबंध मेथॉडिस्ट चर्चशीं फार आला. खिस्ताचा संदेश प्रत्येक दिवशीं, केवळ रविवारीं नव्हे, घरोघरीं पोंचविण्याचें कार्य हें चर्च करीत असतांना दिसतें. दगडांचें व विटांचें एक भव्य मंदिर म्हणजे चर्च असें येथील लोकांना वाटत नाहीं.

व्यक्तीचे सर्व हितसंबंध चर्चभोंवतीं केंद्रित झालेले दिसतात. चर्चवर व मिनिस्टरवर सर्वांची अति श्रद्धा दिसून आली. मी ज्या कुटुंबांत राहत होतों तेथील घरमालकीण मला एकदां म्हणाली, " चर्च मला घरासारखें वाटतें. आणि मिनिस्टर तर जवळचा नातेवाईक वाटतो. फार मोठा मनुष्य आहे. जीझस कसा होता हें मला माहीत नाहीं. पण चर्चमध्यें मिनिस्टर बोलूं लागला कीं, जीझस बोलतो आहे, कनवाळूपणें सांगतो आहे असा भास मला होतो." मला तिच्या या श्रद्धेंत बरेंच तथ्य दिसलें. मॅथॉडिस्ट चर्चचे मिनिस्टर डॉ. वेब यांचीं कांहीं व्याख्यानें मीं ऐकलीं आहेत. श्रद्धा, पावित्र्य आणि स्वच्छ जीवन प्रत्येकाच्या वांट्यास यावें म्हणून त्यांची धडपड असते. ख्रिस्ताचा कनवाळूपणा तर त्यांच्या प्रत्येक शब्दांतून प्रकट झालेला दिसतो. सर्व सामाजिक जीवनाचें केंद्र चर्च व्हावें म्हणून अनेक प्रकारें चर्चची कक्षा वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. चर्चच्या इमारतींतच किती तरी विभाग आपणांस दृष्टीस पडतील. लहान मुलांसाठीं, प्रौढांसाठीं नाना प्रकारच्या शिक्षणाचे वर्ग आहेत.

महिलांचा संघ चर्चचा एक विभाग म्हणूनच काम करीत असतो. नाना उद्योगपतींच्या कांहीं बैठका चर्चमध्येंच होतात. समाजाच्या हितासंबंधीं पैसा उभारला जातो तो चर्चमधूनच. विद्यार्थ्यांचे संघ बहुधा चर्चशीं संबंधित असतात. आठवड्यांतून एकदां माणसें गटागटानें 'लंच'साठीं चर्चमध्येंच जमून एकत्र चर्चा करीत असतात. नवविवाहित जोडपीं नाचासाठीं चर्चमध्येंच मधून मधून जमतात. नाना करमणुकीचे प्रकार, व्याख्यानें, सभा, चर्चा, विचारविनिमय यांचें केंद्र म्हणजे चर्च. इतरत्र ज्या सार्वजनिक सभा होतात त्या बहुधा प्रार्थनेनें सुरू होतात. उद्योगपति असोत, डॉक्टर्स असोत, शिक्षणतज्ज्ञ असोत वा बस ड्रायव्हर्स असोत, त्यांच्या सभेची सुरवात बहुधा सर्व धर्मपंथीयांना लागूं पडेल वा मान्य होईल अशा प्रार्थनेनें होत असते. अमेरिकन सरकार व धर्म यांची फारकत फार पूर्वीपासून झालेली आहे. ती सर्वांना चांगलीच मानवलेली आहे. ज्याला त्याला आपापल्या मतांप्रमाणें धर्मविचारांची जोपासना करतां येते. पण अमेरिकन सरकार देवापासून वा धर्मापासून अगदींच फटकून आहे असें नाहीं. येथील पोस्टाच्या तिकिटावर व नाण्यावर ' InGod We Trust'

( केवळ परमेश्वरावर आमचा विश्वास आहे ) अशीं अक्षरें कोरलेलीं दिसतात. मी एका शेतकऱ्याच्या घरीं पाहुणा म्हणून एक-दोन दिवस होतों. त्याच्या बायकोनें मला एक पुस्तक भेट म्हणून दिलें. पुस्तकाचें नांव A man called Peter Marshall असें होतें. अमेरिकन सीनेटमध्यें धार्मिक प्रार्थना म्हणण्याचें काम पीटर मार्शल नांवाच्या धर्मपंडिताकडे होतें. पीटर मार्शल दिवंगत झाल्यानंतर त्याच्या पत्नीनें– कॅथॉरिन मार्शलनें– हें पुस्तक लिहिलें. याच नांवाचा चित्रपटहि अमेरिकेंत फार लोकप्रिय झाला आहे. पुस्तकाच्या प्रती तर लाखोंनीं आज खपत आहेत.

सामूहिक जीवनांत धर्माचें महत्त्व अमेरिकेनें ओळखलेलें दिसतें. पण रोजच्या वैयक्तिक जीवनांत कोणास देवाची, धर्माची आठवण होते ? एकमेकांचें सहकार्य, बंधुभाव, सलोखा, उदारता या गुणांनीं येथील सामाजिक जीवन खरोखरीच समृद्ध आहे. पण नित्याच्या धांवपळींत, गर्दींत थोडा एकान्तवास, चिंतन-मननास लागणारा वेळ, प्रार्थनेस लागणारें मनःस्वास्थ्य कोणास मिळतें काय ? सकाळीं ब्रेकफास्ट घेतांना दोन मिनिटें हात जोडून, मान वांकवून, डोळे मिटून नवी सुप्रभात दिल्याबद्दल बहुतेक ठिकाणीं परमेश्वराचे आभार मानण्यांत येतात. पण याव्यतिरिक्त कांहीं वैयक्तिक प्रार्थनेची, चिंतनाची, मननाची आवश्यकता या लोकांना भासते काय ? रोजचें नित्यकर्म कर्तव्य पार पाडल्यानंतर अशा प्रकारचा एकान्त– धार्मिक वाचनास, प्रार्थनेस तत्त्वचर्चेस, ख्रिस्तकथा शिकण्यास आवश्यक आहे काय ? इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें आज येथील लोक शोधीत आहेत. डॉ. वेब यांना मी हेच प्रश्न विचारले तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, "होय. आमच्या या गर्दीच्या व यांत्रिक जीवनास ऊब देणारी प्रार्थना रोज प्रत्येकास करतां यावी. आज तरी अमेरिकन माणसास रोजच्या धांदलींत असा वेळ सांपडणार नाहीं. पण याविना त्यांचें जीवन अपुरें राहील, त्यांत कमतरता उरेल. माझी धडपड याचसाठीं आहे. धकाधकीच्या व गतिमान असणाऱ्या आमच्या जीवनास ऊब मिळेल ती दैनिक प्रार्थनेनेंच."

अमेरिकन जीवनांतील धर्माचा आणखी एका अंगानें विचार करण्यासारखा आहे.

लोकशाही सरकार धर्मशिक्षण देऊं शकत नाहीं. अनेक धर्मांचीं मुलें

वर्गांत असतात. कोणत्या धर्माचें शिक्षण द्यावें ? असा प्रश्न उद्‌भवतो. म्हणून येथील सर्व सार्वजनिक शाळांतून धर्मशिक्षणाचें उच्चाटण झालें आहे. कित्येक अमेरिकन विचारवंतांना ही गोष्ट लागून राहिली आहे. मुलांना धर्माचें शिक्षण देणें अगत्याचें आहे, असें पटल्यामुळें कित्येक धर्मपंथीयांनीं सरकारच्या मदतीची अपेक्षा न धरतां आपल्या स्वतंत्र शाळा, स्वतंत्र महाविद्यालयें सुरू केलीं. हेहि आंकडे माझ्या समोर आहेत. कॅथॉलिकांच्या प्राथमिक शाळा या देशांत ९००० असून जवळजवळ ३,२००,००० मुलें या शाळांतून शिक्षण घेत असतात. २,२५० माध्यमिक शाळांतून ६००,००० विद्यार्थी आहेत. सुमारें २७५,००० विद्यार्थी कॅथॉलिक कॉलेज किंवा विद्यापीठांतून शिक्षण घेतात. अशीं कॉलेजें या देशांत एकूण २२५ आहेत. याशिवाय चर्चला जोडून असणारे नाना वर्ग व 'संडे स्कूल्स' आहेतच. अशा शाळांतून जाणाऱ्या मुलांची संख्या वाढत आहे, हें खालील आंकड्यांवरून ध्यानांत येईल.

| वर्ष | संडे स्कूल्सची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १९२६ | १८४६८६ | २३,२०६,३७४ |
| १९४२ | २१३४२४ | २४,१००,७१० |
| १९५० | २४६२४० | २९,७७५,३५७ |
| १९५३ | २६२०८४ | ३५,३८९,४६६ |

कॅथॉलिकांप्रमाणें ज्यू लोकांनीं स्वतंत्र शाळा सुरू केल्या आहेत. एकूण ३३६०८४ मुलें १९५२ सालीं या धार्मिक संस्थांतून शिक्षण घेत होतीं. इतर धर्मपंथीयांच्या शाळाहि आहेतच. पण सर्वांना खरी गरज भासते ती सर्व विद्यार्थ्यांना सार्वजनिक शाळांतून धर्मशिक्षण मिळण्याची. आई-वडील दोघेंहि नोकरीवर असल्यामुळें मुलास वा मुलीस धर्मशिक्षण कुटुंबांत मिळणें कठीण झालें. भोंवतीं चित्रपट, टेलिव्हिजन, चटोर वाङ्मय, अनिर्बंधित स्वातंत्र्य यांच्या माऱ्याखालीं लहान मुलें व तरुणवर्ग सांपडलेला आहे. कोणती तरी श्रद्धा, कोणता तरी धर्म, त्यांच्या धकाधकीच्या, गर्दीच्या, धांदलीच्या, गुंतागुंतीच्या यांत्रिक जीवनास सुखद ऊब निर्माण करून देण्यास उपयोगी पडेल काय ? हा प्रश्न आज अनेक विचारवंतांपुढें आहे !

अमेरिकेंतील वास्तव्यांत प्रामुख्यानें माझ्या नजरेस आलेल्या अनेक गोष्टींसंबंधीं आतांपर्यंत विस्तारानें वर्णन केलें. आतां या शेवटच्या प्रकरणांत समारोपात्मक कांहीं विचार मांडावयाचे आहेत. पूर्व व पश्चिम-नव्या व जुन्या जगांची देवाण-घेवाण नाहीं म्हटलें तरी आतां होणार आहे. दोन्ही जगांतील साम्यविरोधांची यथार्थ कल्पना आपणांस यावयास पाहिजे. त्यांचे सद्गुण आम्ही निष्ठेनें घ्यावयास पाहिजेत. त्यांचे दुर्गुण आम्ही आग्रहानें त्याज्य मानावयास पाहिजेत. आम्हांसहि कांहीं त्यांना द्यावयाचें आहे याचीहि स्वाभिमानपूर्वक जाणीव आपणांस हवी. पाश्चात्य व पौर्वात्य यांच्यांतील चांगल्यावर उद्यांची संस्कृति उभी राहिली तर तें एक विलोभनीय दृश्य तयार होईल. पुढील विवेचन या दृष्टीनें महत्त्वाचें मानतां येईल.

भारतांतील लोक हे दैवी प्रकृतीचे आणि पश्चिमेकडे मत्त मस्त झालेली आसुरी संस्कृति, हा भ्रम आहे हें नव्यानें सांगावयास नको. दैवी गुणांची वांटणी परमेश्वरानें हेतुतः केलेली आहे असें नाहीं. तामसी गुण तेवढे पाश्चात्य राष्ट्रांना मिळाले हें आतां कोण मान्य करील? ‘ आसुरी भारत ’ आणि ‘ आध्यात्मिक युरोप ’ हीं दोन शब्दचित्रें मराठींत ‘ संस्कृति संगम ’-कारांनीं काढलेलीं जाणत्यांच्या लक्षांत असतीलच. धर्मप्रवृत्ति ही काय भारतांतच रुजली व वाढली ? अमेरिकेसारख्या नव्या जगांत तिची ओळख कोठून असणार ? मागच्याच प्रकरणांत आपण याचा सविस्तर विचार केला आहे. ज्या योगें समाजाची धारणा होते तो ‘धर्म’, असा धर्म शब्दाचा अर्थ घेतला, तर अमेरिकेंतील लोक जास्त धर्मनिष्ठ आहेत असें म्हणावें लागेल. दया, प्रेम, बंधुभाव, आपापसांतील प्रीति, सहानुभूति, मिळतें घेण्याची वृत्ति व आपद्ग्रस्तांची चिंता या गोष्टी अमेरिकन

सामाजिक जीवनांत पदोपदीं दिसून येतात. हेवा, मत्सर, वैषम्य व भांडणें हीं तेथें नाहींत असें नाहीं. वृत्तपत्रांत खुनाच्या वार्ता नसतात असें नाहीं. पण एकंदरींत सामाजिक जीवन आपल्यापेक्षां अधिक आरोग्यसंपन्न आहे. लोक समूहानें जगतात, विचार करतात, खेळाला प्रवृत्त होतात. प्रत्येकाचें वैयक्तिक वैशिष्ट्य सांभाळून सर्व रोगांना हटवून शंभर वर्षें जगण्याची प्रतिज्ञा पुरी करण्यासाठीं तेथें अट्टाहास चालू आहे. पासष्ट टक्के लोक नियमानें दर रविवारीं चर्चमध्यें जाऊन अगदीं शांतपणें तीन-तीन तास परमेश्वराचें चिंतन करतात. व्यापाऱ्यांची, शिक्षणतज्ज्ञांची, राजकारणी पुढाऱ्यांची, कारखानदारांची कोणतीहि सभा असो, बहुतेक ठिकाणीं प्रारंभ होतो तो बायबलमधल्या प्रार्थनेनें. सिनेटचें उद्‌घाटन होईल तेंहि आयसेनहोअरनें नेमलेल्या धर्मगुरूच्या प्रार्थनेनें. लोक धर्माला मानतात. प्रत्येकाच्या घरीं बायबलच्या तीन-चार तरी वेगवेगळ्या प्रती असतात. सकाळची न्याहरी घेतांना बहुतेक जण नवी सुप्रभात दाखविल्याबद्दल व अन्नवस्त्र भरपूर दिल्याबद्दल परमेश्वराचें चिंतन करतात. या देशाच्या नाण्यांवर व तिकिटांवर ‘ आमची केवळ परमेश्वरावर श्रद्धा आहे ’ अशीं अक्षरें असतात. धार्मिक विषयांची चर्चा करणारीं किती तरी मासिकें वा साप्ताहिकें प्रसिद्ध होतात. हें लेखन करतांना माझ्या हातांत Religion in Life चा ताजा अंक आहे. त्याची अनुक्रमणिका पाहिल्यास विषयांची विविधता सहज ध्यानांत येण्यासारखी आहे.

चर्चनें चालविलेलीं किती तरी महाविद्यालयें आहेत. सार्वजनिक शाळांतून धर्मशिक्षण मिळत नाहीं म्हणून चर्चनें चालविलेल्या संडे स्कूल्समधून बहुतेक मुलें बायबलचें शिक्षण घेतात. चर्च म्हणजे नुसतें प्रार्थनेचें ठिकाण नाहीं. समाजांतील सर्व चळवळींचें तें एक केंद्रस्थान असतें. लहान-मोठ्यांना तें विश्रांतिस्थान वाटतें. कॉलेजमधील हॉस्टेलमध्यें मी राहत होतों. पहिल्याच दिवशीं कॉलेजच्या कॅफेटेरियांत ब्रेकफास्ट घेण्याच्या वेळचा प्रसंग. तरुण मुलें-मुलीं एकत्र हसत होतीं. खेळत होतीं. नाना रंगांचे, नाना फॅशनचे त्यांचे कपडे होते. मी माझी न्याहरी सुरू करणार एवढ्यांत दोन विशेष नखरेल मुली आपलें साहित्य घेऊन माझ्या टेबलाशीं येऊन उभ्या राहिल्या. ‘ मि. जोशी, आम्ही बसूं का येथें ? ’

माझें नांव त्यांना आधींच माहीत झालें होतें. मीं हसून ' हो ! ' म्हटलें खरें, पण त्यांच्या शृंगारावरून व छानछोकीवरून मन फारसें अनुकूल नव्हतें. न्याहरीची मांडामांड दोघींनीं एका क्षणांत केली आणि दुसऱ्या क्षणीं त्या दोघी गंभीर झाल्या. दोघींनीं डोळे मिटले. त्याआधीं त्यांच्यापैकीं एकजण म्हणाली, ' मि. जोशी, विल यू जॉईन अस ? ' मीहि चकित झालों होतों. नकळत मान खालीं वाकवून मीहि प्रार्थनेंत सहभागी झालों आणि नंतर खेळीमेळीचें वातावरण सुरू झालें. कॉलेजमध्यें असणाऱ्या ' धर्मसंघा ' ची ती नखरेल मुलगी एक प्रमुख होती. धर्माबद्दल तिनें बराच अभ्यास केला होता. पुढल्या रविवारीं आपल्याबरोबर मला चर्चमध्यें घेऊन जाण्यास ती चुकली नाहीं. धर्माबद्दलची ही आस्था सार्वत्रिक आहे.

आपल्या इतिहासाबद्दलहि अमेरिकन लोकांना अशीच प्रीति आहे. जुन्याचें विस्मरण झालें कीं, मरण ओढवलेंच असें हे लोक निश्चितपणें समजतात. तसें पाहिलें तर त्यांचा इतिहास चार-पांच शतकांचा. पण केवढा अभिमान त्यांना आहे त्याचा ! आपला इतिहास आपण कसा जतन करीत आहोंत याची चर्चा येथें नको. इतिहास यापुढें शिकवूंच नये असें नवें तत्त्वज्ञान आकारास येत आहे. अमेरिकेंतील लोकांना आपल्या तुटपुंज्या इतिहासाचा विलक्षण अभिमान आहे. बारीकसारीक गोष्टींचें जतन त्यांनीं कोट्यवधि डॉलर्स खर्च करून केलें आहे. या देशांतील वसाहतींची सुरुवात करणाऱ्या ' मे फ्लॉवर ' जहाजापासून तों काल-परवांच्या रॉकेटस्‌पर्यंत सर्व वस्तु त्यांना भावी पिढीसाठीं जपाव्याशा वाटतात. जॉर्ज वॉशिंग्टनचें घर कसें होतें, तो कोणत्या खुर्चीवर बसे, त्याची पार्टी कोणती होती, त्याची अभ्यासिका कशी होती, त्याचें लिहिण्याचें टेबल कोणत्या प्रकारचें होतें अशी सर्व माहिती माउंट व्हर्नान येथें आज आपणांस पाहावयास मिळते. अमेरिकेंतील लोकांचें हें तीर्थस्थान आहे. वॉशिंग्टन येथील पुराणवस्तु-संग्रहालयाच्या इमारतीवर पुढील मननीय वाक्य कोरलेलें आहे: ' The heritage of the Past is the seed that brings forth the harvest of the future. ' आपणांकडे आधुनिक काळांत इतिहासाविषयीं आवड निर्माण झाली आहे. तरी एकंदर सर्वत्र अनास्थाच !

या थोड्याशा इतिहासांत अमेरिकेनें केवढें विश्व निर्माण केलें ! नाना धर्मांचीं, नाना देशांचीं माणसें एकाच प्रकारच्या अडचणींतून या नव्या जगांत राहावयास आलीं. प्रतिकूल परिस्थितीशीं त्यांनीं सामना दिला. अनेक संकटांना तोंड दिलें. भूमि समृद्ध व सकस आहे. खनिज संपत्तीचा फार मोठा सांठा या भूमींत आहे. पण या सर्व गोष्टींचा फायदा श्रमांचे पर्वत उभे करून व्यावयास गोरे लोकच कारणीभूत झाले. नाहीं तर आधीं दोन-तीन हजार वर्षांपासून रेड इंडियन्स होतेच. पण युरोपियन्स आले आणि त्यांनीं अतोनात कष्ट केले. कोणत्याहि कामास कमी लेखलें नाहीं. आज सर्व जगास दिपविणारे प्रचंड करखाने दिसतात. डोळे दिपणारें ऐश्वर्य दिसतें. पण या वैभवामागें अमेरिकन माणसाच्या रक्तांत असणारी श्रमाची हौस नजरेआड करून चालणार नाहीं. आजहि तेथें श्रीमंतांचीं मुलेंसुद्धां वृत्तपत्रें विकतात, दुसऱ्यांचीं मुलें सांभाळतात, दुकानांत कामें करतात. काम करणें– अंग मोडून सर्वांनीं काम करणें–हें या श्रीमंत देशांतहि फार महत्त्वाचें मानलें जातें. आपण आपल्या देशांत स्वातंत्र्यानंतरच्या काळांत श्रमाचें महत्त्व तात्त्विक दृष्ट्या वाढविलें आहे. श्रमदानाची चळवळ चालू केली. ' आराम करना हराम है ' म्हणून सर्वत्र बोधवचनें लावलीं. पण अंग मोडून काम करण्याची जबाबदारी नोकरवर्गांत कितीशी वाढली हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे ! केवळ परिस्थितीनें नाडलों तरच आपण काम करणार, नाहीं तर वाडवडिलांनीं जें मिळविलें त्यावरच भिस्त. काम करण्याची–शारीरिक कष्ट करण्याची–लाज आपणांस वाटते. स्वस्थपणें राहून दुसऱ्यास हुकूम सोडण्याची वृत्ति आपल्या अंगीं मुरलेली आहे. गरीब लोक श्रीमंतांचें दास्य करण्याकरितांच आहेत असा आपला समज आहे. उत्तर हिंदुस्थानांत या सर्व प्रकारांचें दर्शन आपणांस आजहि होईल. आम्ही श्रमाला, यत्नाला तुच्छ लेखलें आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या वैभवालाहि नाशवंत ठरवून निकालांत काढलें. भिकाऱ्यांचें कायदेशीर समर्थन व दारिद्र्याचें तत्त्वज्ञान या दोन अंगांवर आमचा समाज आज कसाबसा उभा आहे. पुढें खाणाऱ्या तोंडांची संख्या एवढ्या झपाट्यानें वाढली कीं, काम करूं म्हणणाऱ्यासहि काम मिळेनासें झालें. पण येथें प्रश्न आहे काम ज्यांना मिळालें आहे त्यांचा. आपण समाजाचें

देशाचें कार्य जास्तींत जास्त कर्तव्यबुद्धीनें करावें असें किती जणांना वाटतें ? आपला देश अतिशय उष्ण, थोड्या कामानें थकवा येतो म्हणून काम एकंदरींत कमी होतें, या मुद्द्यांच्या मर्यादा आपण ओळखल्या पाहिजेत.

आपल्या समाजाची, आपल्या देशाची योग्य ती जाणीव सर्वसामान्य जनतेसहि असणें ही देशाच्या भाग्याच्या दृष्टीनें केवढी मोठी गोष्ट आहे ! एक शिक्षणाचा प्रश्न आपण घेऊं. आपल्या समाजास कोणत्या प्रकारचें शिक्षण पाहिजे याचा निर्णय अजून आपण करूं शकलों नाहीं. रोज नवे प्रयोग. थोडें रशियांतून, थोडें अमेरिकेंतून आपण उसनें आणतों. आपल्या मुलांच्या परिस्थितीचा कोण विचार करणार ? त्यांच्या मनाची भूक कोण भागविणार? या महत्त्वाच्या प्रश्नावर पालक व समाज किती जागरूक असतो ? सरकार-वर टीका करणारे आपला स्वतःचा कर्तव्याचा वांटा ध्यानांत आणतात काय ? सरकार म्हणजे शेवटीं आपणच कीं नाहीं ? अमेरिकेंतील खूप श्रीमंती सोडून द्या. येथें फक्त सर्वांना झालेली शैक्षणिक जाणीव पाहूं. प्रत्येक शहर आपल्या मुलांना कोणतें शिक्षण हवें याचा विचार करतें आणि आपल्या गरजांप्रमाणें आपला शिक्षणक्रम आंखतें. प्रत्येकास यासाठीं कर द्यावा लागतो. स्वतःचा कारखाना उत्तम चालावयाचा असेल तर कारखान्यांत येणाऱ्या तरुण मुलां-मुलींना उत्तम प्रकारें शिक्षण मिळालें पाहिजे हें तेथील कारखानदार व व्यापारी ओळखतात. प्रत्येक ठिकाणीं 'चेंबर ऑफ कॉमर्स 'ची एक शिक्षण-समिति असते. गांवांतील शाळांना सर्व प्रकारचें आर्थिक साह्य ह्या समितीच्या प्रयत्नामुळें होत असतें. सर्व समाजानें मिळून आपला शैक्षणिक प्रश्न सोडविलेला असतो. हें सामूहिक जीवन आपणांकडे किती प्रमाणांत आढळतें ? आधीं सर्व लोक साक्षर करण्याचा उद्योग करून मग लोकशाहीची उभारणी झालेली इतरत्र दिसते. आपणांकडे उलट प्रकार तर होत नाहीं ना ? शिक्षणाची महती आपणांस कितीशी पटली आहे ?

आणि या शिक्षणांतून निर्माण होणारी ज्ञानसंपदा ? ज्ञानासारखी पवित्र वस्तु दुसरी नाहीं असें आपण मानतों. पण प्रत्यक्ष आचरणांत काय आहे ? ज्ञानाची जोपासना व उपासना आपण कितीशी करतों ? ज्ञानाचें संवर्धन

व जतन आपण कोणत्या मार्गानें करतों ? एका अध्यात्मज्ञानाची उपासना आपणांपैकीं फार थोड्यांनीं एकचित्तानें केली ही गोष्ट खरीच, पण गेल्या दोन-तीन शतकांत ज्ञानाच्या व विद्येच्या सहस्र शाखा पल्लवित होत असतांना आपण त्या कितीशा आत्मसात् केल्या ? कांहीं वेळ यंत्रवादाची व जडवादाची आपण हेटाळणीच केली, पण जगांत इतर राष्ट्रांबरोबर मानानें जगावयाचें असेल तर या नवशास्त्रांना व विद्यांना दूर करून कसें चालेल ? ऐहिक जीवनावरील श्रद्धा बळकट करावयाची असेल तर पाश्चात्यांची ज्ञानोपासना आपणांस डावलून चालावयाचें नाहीं. अमेरिकेंत प्रत्येक शहरांत असणारीं पदार्थसंग्रहालयें पाहिलीं म्हणजे ज्ञानावरील त्यांची श्रद्धा प्रत्ययास येते. मोठमोठे उद्योगधंदे या ज्ञानावर आधारलेले आहेत. निसर्गावर स्वामित्व प्राप्त झालें तें ज्ञानाच्या उपासनेमुळें. शास्त्रज्ञानांतून शस्त्रविद्या व त्यांतून जगांत मोठेपणा हें व्यावहारिक सत्य डावलून कसें चालेल ? अमेरिकेंतील मुलें फार चौकस आहेत. दुसऱ्यांबद्दल असणाऱ्या अज्ञानाबद्दल त्यांना लाज वाटते. दुसरा देश, दुसरे लोक समजावून घेण्यासाठीं शेंकडों प्रश्न तीं विचारतात. प्रत्येकाच्या घरीं दोन-तीन वृत्तपत्रें चार-दोन मासिक पुस्तकें असतातच. बहुतेकांच्या घरीं एखादा ज्ञानकोश असतोच. येथें प्रश्न श्रीमंतीचा नसून ज्ञानाच्या हव्यासाचा आहे. व्यासंगी पंडितांसंबंधीं मी लिहीत नाहीं. सर्वसामान्य माणसास ज्ञानाची अभिरुचि किती आहे हें येथें सांगत आहें. आपल्याकडे कितीशा श्रीमंत माणसांकडे ग्रंथालयें आहेत ? उत्पन्नाचा ठराविक भाग सकस वाङ्मयाच्या वाचनाकडे खर्च करणारीं कुटुंबें आपल्याकडे कितीशीं आहेत ?

स्वतंत्र झालेल्या राष्ट्रास स्वतःची म्हणून एक दानत उभारावी लागते. प्रामाणिकपणा, सचोटी, कर्तव्यतत्परता, देशप्रीति, सहानुभूति, सार्वजनिक कार्याबद्दल निष्ठा इत्यादींनीं ही राष्ट्रीय दानत तयार होते. अमेरिकेंत लूटमार होते, दरोडे पडतात, खून होतात हें सर्व खरें आहे, पण एकंदर समाजाचा विचार केला तर समाजांत राष्ट्रीय सद्गुण अधिक विकसित झालेले दिसतात. एकमेकाचा एकमेकांवरील विश्वास फार मोठ्या प्रमाणावर या देशांत पहावयास मिळतो. चौकांतील वृत्तपत्र त्याची किंमत टाकून गिऱ्हाइकानें नेणें व सावकाश संध्याकाळीं विक्रेत्यानें हिशेब पाहणें हें नित्याचें आहे. अवाढव्य

दुकानें दहा–दहा मजल्यांचीं पसरलेलीं असतात. कोणीहि कोणत्याहि मालाची पाहणी मनसोक्त, वाटेल तितका वेळ करावी. माल चोरीस जाण्याचे प्रकार क्वचितच. बसमध्यें वा ट्रॉममध्यें फक्त ड्रायव्हर असतो. कंडक्टर, चेकर, त्याच्यावरचा चेकर हा प्रकार नाहीं. 'खिसेकापूपासून सावध !' अशा पाट्या तेथें नाहींतच. होय, तो श्रीमंत देश; तेथें चोरी-क्षुल्लक वस्तूंची चोरी-करण्याची बुद्धि कोणास होणार ? मी येथें राष्ट्रीय दानतीसंबंधीं लिहीत आहें. आपल्या येथें गरिबीमुळें दुर्गुण निर्माण झाले व टिकले. पण श्रीमंतांची काय अवस्था आहे ? नादारीचा अर्ज करणारीं किती तरी श्रीमंतांचीं मुलें दिसतात ! मोफत दवाखान्यांत औषध घेणारे व मोफत वाचनालयांत वाचणारे श्रीमंत आपल्या देशांत किती तरी आहेत !

आपल्या देशानें किती तरी गुण अमेरिकन लोकांपासून घेण्यासारखे आहेत. त्यांचा वक्तशीरपणा, कामांतील टापटीप, मनमोकळेपणा, जीवनाकडे पाहण्याचा आशावाद, रोजच्या व्यवहारांतील सौंदर्यदृष्टि, निसर्गाच्या सान्निध्यांतील जिवंतपणा मनमुराद लुटण्याची हौस. एक ना दोन किती तरी गोष्टींचा अभ्यास आपण पूर्वेकडील लोकांनीं करावयास हवा. कांहींची चर्चा मीं थोड्या विस्तारानें केली आहे. पश्चिमेकडून आपण पूर्वेनें कांहीं घ्यावयाचें असेल तर हें घ्यावें. मी अमेरिकेंत सहाच महिने होतों. तेथील सरकारनें मला शिष्यवृत्ति दिली होती. तेथें हिंडून, तेथलें वैभव पाहून मी दिपलों आहें असें नाहीं. 'जिसका दाना उसका गाना' या अर्थानें मी त्या लोकांचें स्तुतिस्तोत्र गावयास बसलों आहें असेंहि नाहीं. मात्र पश्चिमेनें पूर्वेस काय द्यावें हें सांगितलें. पण पूर्वेसहि पश्चिमेला कांहीं देण्यासारखें खचित आहे. अमेरिकेंतून आपण कांहीं गोष्टी मुळींच घेऊं नयेत असेंहि माझें मत बनलें आहे.

अमेरिकेंत असतांना मी किती तरी वेगवेगळ्या कुटुंबांत राहिलों होतों. कित्येक आदर्श कुटुंबें तेथें दिसतील. पण सर्वसाधारण दृष्टीनें विचार केला, तर कुटुंबसंस्थेचा त्यांना गंभीरपणें विचार करावा लागणार आहे. या बाबतींत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. बहुतेक ठिकाणीं घरची स्त्री नोकरी करीत असते. सर्व घराची व्यवस्था ठेवणें, नोकर-माणूस

नसतांना घरचेंहि सांभाळणें आणि परत बाहेरचें काम पत्करणें हें आज अमेरिकन स्त्रीला करावें लागतें. ऑफिस, कारखाना, शाळा, दुकानें हीं तिच्या कामाचीं मुख्य क्षेत्रें झालीं तरी टॅक्सी वा ट्रक्स चालविण्याचीं कामेंहि अमेरिकन स्त्री करीत असते. सबंध नोकरवर्गाचा हिशेब केला तर एकतृतीयांशाहून अधिक स्त्रिया आज नोकरी करणाऱ्या आहेत. पुरुषाच्या बरोबरीनें सर्व क्षेत्रांत नांव कमावणाऱ्या कर्तबगार महिला म्हणून एका बाजूस त्यांची स्तुति होत राहते, तर दुसऱ्या बाजूस घरच्या कर्तव्याकडे साहजिकपणें त्यांचें दुर्लक्ष होतें. आई, बाप दोघेंहि नोकरीवर. घरच्या मुलांवर लक्ष कोण ठेवणार ? जास्तींत जास्त मुलें असावींत असें आजच्या अमेरिकन जोडप्यास वाटतें, पण त्यांची योग्य ती निगा राखण्यास त्यांना वेळ आहे काय ? मुलांच्या मनाचा विकास कसा होत आहे, त्यांच्या संवयी कशा वाढत आहेत, रिकाम्या वेळांत तीं काय करतात, या गोष्टींचा तपास करावयास कोणास सवड आहे ? मुलांत गुन्हेगारी वाढण्याचीं जीं अनेक कारणें जाणत्यांनीं दिलीं आहेत त्यांतील हें एक असल्यानें व आपल्या मध्यम वर्गापुढें आज हाच प्रश्न असल्यानें त्याचा उल्लेख केला आहे. अमेरिकन कुटुंबांत स्त्रीला व मुलांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा कोणीहि हेवा करील. पण त्यांतूनच कांहीं अनर्थपरंपराहि निर्माण होत आहेत. मुलें थोडीं वयांत आलीं कीं, तीं आईबापांना वा शिक्षकांना जुमानीत नाहींत. त्यांच्या वागण्यांत थोडा उद्धटपणा येतो. घरापासून शक्य तों दूर राहण्याचा विचार त्यांना सुचूं लागतो. हायस्कूलपासूनच्या वयांतच प्रत्येकानें आपला जोडीदार निवडून ठेवलेला असतो. इतर प्रलोभनें पुष्कळच आहेत. अशा प्रसंगीं वयांत आलेलीं मुलें थोडीं बेतालच दिसतात. स्वातंत्र्याचा दृश्य परिणाम स्त्रियांच्या बाबतींतहि दिसून येतो. अमेरिकेंत घटस्फोटांची संख्या सर्व देशांपेक्षां अधिक आहे. कौटुंबिक स्थिरतेच्या दृष्टीनें ही गोष्ट अनिष्ट आहे. अशा विच्छिन्न कुटुंबांतील एक तरुण न्यू ऑर्लिन्स येथें माझ्या बरोबर पांच-सहा दिवस अचानकपणें होता. त्याची मर्मभेदक कहाणी सर्वांना विचार करावयास लावणारी आहे. आपल्या स्वातंत्र्याला थोडी मुरड घालून शेवटीं तडजोडीनें मिळतें घेणें यांतहि समाधान आहेच कीं नाहीं कांहीं ?

स्वातंत्र्याच्या याच विचित्र कल्पनेपोटीं आणखी एक गंभीर प्रश्न अमेरिकेंत माझ्या ध्यानीं आला. या देशांत आई आणि वडील आपल्या मुलांच्याबरोबर कधींहि राहत नाहींत. मुलगा बायकोस घेऊन एकाच गांवांत दुसरीकडे राहतो किंवा आपलें घर मुलास विकत देऊन आईबाप तरी दुसरीकडे बिऱ्हाड थाटतात. मुलाच्या संसारांत—सुनेच्या संसारांत—आम्ही कशाला आणि आमच्या संसारांत त्यांचा अधिकार कशाला, असा विचार आईबाप करतात. कांहीं प्रसंगीं ही वडीलधारी मंडळी मुलांना, नातवंडांना भेटावयास येतात; पण एकत्र राहणें तेथें कोणासच पसंत नाहीं. वरवर ही व्यवस्था फार चांगली दिसत असली तरी किती तरी गंभीर प्रश्न यांत गुंतलेले आहेत. नवरा दिवंगत झाल्यावर एकाकी दिवस कंठणारी त्याची म्हातारी बायको वा पत्नी निवर्तल्यावर एकाकी आयुष्य काढणारा म्हातारा पती यांचें उरलेलें जीवन थोडें भयानक वाटतें. अनेक वेळां ' यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशन ' मध्यें राहणाऱ्या अनेक म्हाताऱ्या लोकांना पाहून मला कमालीचा विषाद वाटला. संस्थेचें नांव ' ओल्ड मेन्स ख्रिश्चन असोसिएशन ' असेंच ठेवण्याची पाळी आली आहे असें वाटलें. ही मंडळी एकटीच राहतात, एकटीच जेवण करतात आणि एकट्यानेंच कोठें कोपऱ्यांत बसून तासन् तास टेलिव्हिजन पाहतात. एका वृद्ध माणसानें आपल्या मुलांबाळांत, नातवंडांत जाऊन राहण्याची इच्छा मला अश्रुपूर्ण नयनांनीं निवेदन केली. पण प्रस्थापित रूढीचा फायदा मुलेंहि घेतात आणि आईबापांकडे दुर्लक्ष करतात ! वृद्धालयें का हा प्रश्न सोडवणार आहेत ? अमेरिकन लोकांपुढें हा मोठा गंभीर प्रश्न आहे. विख्यात कथालेखिका पर्ल बक हिनें आपल्या आत्मवृत्तांत अमेरिकन समाजांतील नेमक्या याच दोषावर बोट ठेवून मोठी कडक टीका केली आहे. त्याचबरोबर पूर्वेकडे दिसून येणाऱ्या कुटुंबसंस्थेचें तिनें मनापासून गोडवे गाइले आहेत. आपल्याकडेहि समाजरचना झपाट्यानें बदलत आहे. हाच प्रश्न आपणांसहि भेडसावणार नाहीं कशावरून ?

अमेरिकन माणसाची प्रीति पैशावर आहे हेंहि नाकारून चालणार नाहीं. तसें पाहिलें तर पैसा कोणास नको आहे ? पण अमेरिकन मनुष्य सर्व कांहीं मोजतो तें पैशाच्या मापानें. श्रीमंती असल्यानें अनेक वस्तु

मोफत वांटतील, पण त्यामागें प्रचाराचा, व्यापाराचा हेतु असणार. मी कुटुंबांत तीन महिने राहिलों होतों. मला आलेले विविध अनुभव मी इतरत्र सांगितले आहेत. पण पेइंग गेस्ट म्हणून आलेल्या अनुभवाची वाच्यता येथेंच प्रथम करीत आहें. पैसा सढळ हातानें, विचार न करतां खर्च करण्याचा माझा खरें म्हणजे स्वभाव. पण अमेरिकेंतील माझी मालकीण–होस्टेस–ज्या तऱ्हेनें हिशोब करीत असे तसा हिशोब मी कधींच पाहिला नव्हता. म्हणजे हिशोबाच्या दृष्टीनें तो अगदीं बरोबर असे, पण पूर्वेकडील मनास तो निःसंशय खटकणारा होता. कित्येक लोकांचा हा एक धंदाच होऊन बसला आहे. अमेरिकन माणूस कोणत्या वस्तूचा धंदा करील त्याचा नेम नाहीं. आपल्या येथील 'अतिथि' शब्दाचें गांभीर्य तेथें उरलेलेंच नाहीं. पाहुणा शब्दाचा अर्थ बहुधा 'पैसे रोख मोजणारा पाहुणा' असाच तेथें रूढ आहे. पैशांची अशी देवाण–घेवाण नात्या-नात्यांतहि चालते. पैशानें न मोजतां येणाऱ्या कांहीं गोष्टी आहेत याची जाणीव फार थोड्या अमेरिकन लोकांना आहे.

अमेरिकन लोकांबद्दल एक अढी माझ्या मनांत कदाचित् उगाचच असेल, पण ती आहे. मांसाहार त्यांना अतिशय प्रिय आहे. एकंदर लोक अति खादाड. सर्वांना मांस अतिशय प्रिय; कोंबडी, डुक्कर आणि गाय यांचें मांस फार आवडतें. एका शेतकऱ्याकडे मी पाहुणा म्हणून होतों. किती तरी उत्तम उत्तम टर्की कोंबड्या त्यानें पाळल्या होत्या. मला ती सजीव संपत्ति पाहून खूप गंमत वाटली. मी त्यांचें एक छायाचित्रहि घेतलें. त्यावर तो म्हणतो, 'बरें झालें, पुढल्या आठवड्यांत एकहि दिसणार नाहीं. 'थँक्स् गिव्हिंग डे'ला यांचेंच पक्वान्न असतें.' मी वरमलों. एवढा सुंदर देश परमेश्वराने दिला म्हणून नोव्हेंबर महिन्यांत परमेश्वराचे आभार सर्व लोक मानतात; व त्यासाठीं लक्षावधि कोंबड्यांचा संहार होतो! मी मुद्दामच कांहीं कत्तलखाने पाहिले. दर मिनिटास एक गाय मारण्याचा विक्रम करणारीं यंत्रें या देशांत आहेत. मिनिटास चार-पांच डुकरें मारण्याची सोय येथें आहे. हा सर्व भयंकर प्रकार मी तास दीड तास उभा राहून पाहत होतों. माझ्या या विक्षिप्त वागण्याचा अर्थ बरोबरच्या लोकांना समजण्यासारखा नव्हता. स्वतःचें मांस व स्वतःची

चरबी वाढविण्यासाठीं माणसानें केवढा हा प्राणिसंहार चालवलेला आहे ! ‘ अजातशत्रु तरुवरा । सर्वांगीं देववित्या शिरा ॥ ’ म्हणून औषधासाठीं झाडाचा चीक घेणाऱ्या माणसास दोष देणाऱ्या ज्ञानेश्वराचा संस्कार माझ्या मनावर असल्यामुळें माझें पौर्वात्य मन विरघळून गेलें. पण यांत पौर्वात्य पाश्चिमात्य काय आहे ? मांसाहाराचा धिक्कार करणारे अमेरिकेंत थोडे लोक आहेतहि. आणि हिंदुस्थानांत काय थोडी प्राणिहत्या होते ? आपल्याकडे काय मांसाहारी लोक नाहींत ? आणि समजा उद्यां येथील प्राणिहत्या थांबली, मांसाहार बंद झाला, तर आधींच अर्धपोटीं असणारा हा देश खाणार तरी काय ! आधुनिक अर्थकरणाशीं निगडित होणारा हा प्रश्न आहे हें शेवटीं मान्य करावेंच लागतें.

शेवटीं आणखी एक–दोन प्रश्नांचा उल्लेख करतों. तेथील लोकांच्या नीतिमत्तेबद्दल अनेक लोक विचारतात. आणि या प्रश्नाचें उत्तर देणें मोठें कठीण काम आहे. एक तर नीतीच्या कल्पना सर्व देशांत सर्व काळीं सारख्या आहेत असें नाहीं. ज्याला आपण सभ्यता म्हणूं त्याला दुसरे असभ्य म्हणतील. मांड्या आणि छातीचा भाग उघडा टाकून हिंडणाऱ्या अमेरिकेंतील मुली भारतांतील स्त्रियांना पोट उघडें ठेवून चोळी वा पोलकें घातल्याबद्दल हंसतात, नांवें ठेवतात. त्यांना साडी मनापासून आवडते. पण पोट उघडें टाकणें असभ्यतेचें वाटतें. मुलांमुलींना कमालीचें स्वातंत्र्य असतें व तेवढीच जबाबदारीची जाणीव असते. सर्वत्र स्वैराचार आहे असें नाहीं. शास्त्रशुद्ध दृष्टीनें चालणारा देश असल्यानें प्रत्येक नैतिक गुन्ह्यांची नोंद घेऊन वर्षाची आंकडेवारी तेथें घेतली जाते. किन्से रिपोर्ट या बाबतींत अतिशय प्रसिद्ध आहे. पण अशी आंकडेवारी आपल्या देशांत शक्य आहे काय ? ती तशी उपलब्ध झाल्याखेरीज तुलनात्मक बोलणें व्यर्थ आहे. त्या देशांत या प्रकाराची प्रकटपणें चर्चा करण्याची प्रथा आहे. आपण या गोष्टी प्रकट होऊं देत नाहीं. नैतिक गुन्हे व्हावयास ज्या मानानें तेथें वाव आहे त्या मानानें तशी संख्या फार कमी असावी. अमेरिकेंतील निशा संघाबद्दलहि ( Night Club ) वारंवार बोललें जातें. या प्रान्तांत असणारें गलिच्छ वातावरण कांहीं अंशीं खरें असतें. अतिरिक्त मद्यपान

आणि रस्त्यावर, चव्हाट्यावर होणारें स्त्री-सौंदर्याचें प्रदर्शन किळसवाणें असतें. आपल्याकडील वेश्या-व्यवसायाला येथें संभावितपणाचें रूप दिलेलें आढळतें. असो. याबद्दल एवढेंच पुरें.

जगाला समतेचीं तत्त्वें शिकविणारी अमेरिका अजूनहि दक्षिण भागांत निग्रोंना दूर ठेवते. न्यू ऑर्लिन्स या दक्षिणेकडील सर्वांत मोठ्या शहराचा अनुभव मोठा विलक्षण आहे. रेल्वे स्टेशन दोन विभागांत दिसलें. एक गोऱ्या लोकांसाठीं, दुसरें काळ्या लोकांसाठीं. सार्वजनिक बसमध्यें मागच्या जागा निग्रो लोकांसाठीं असतात. पुढल्या जागेवर तो बसूंच शकणार नाहीं. निग्रोंच्या शाळा वेगळ्या, चर्चेस वेगळीं, त्यांचीं हॉटेल्सहि वेगळीं. आणि हें सर्व कायद्यानें ठरलेलें. आम्ही अस्पृश्यांना कसें वागविलें हेंहि याच वेळीं ध्यानांत येतें.

प्रारंभीं सांगितलें आहेच कीं, खिस्ती मनुष्य धर्माच्या बाबतींत मोठा कडवा आहे. सर्व जगांत आपलाच धर्म प्रसारित व्हावा म्हणून शेंकडों मिशनरी अमेरिकेंतून सर्वत्र रवाना होतात. चीन, जपान, मलाया, ब्रह्मदेश इत्यादि देशांत त्यांना जेवढें यश आलें त्याच्या शतांशहि कार्य हिंदुस्थानांत झालें नाहीं याचें वैषम्य त्यांना फार वाटतें. आमच्याबरोबर असणाऱ्या ईजिप्त, जपान, मलाया, बर्मा या देशांतील स्त्रिया युरोपियन पोषाख चटकन आत्मसात् करूं शकल्या, पण भारतांतील स्त्रियांनीं साडीसच महत्त्व दिलें. या चिवट संस्कृतीचें त्यांना मोठें नवल वाटतें. प्रत्येकास आपापला धर्म प्यार आहे असें सांगणारा फक्त हिंदु धर्मच आहे, हें सांगणाऱ्या विवेकानंदांची कथा त्यांना विचार करावयास लावते. हिंदु धर्माचीं उदात्त तत्त्वें व विशाल जीवनदृष्टि त्यांना अतिशय महत्त्वाचीं वाटतात. मानवाचीं शाश्वत मूल्यें, धर्म, संस्कृति, तत्त्वज्ञान याविषयीं पाश्चिम गोलार्ध पूर्व गोलार्धांतील भारताचें साह्य मागत आहे. ' We are but babies to them in deep things ' म्हणून ते तशी कबूलीहि देतात. आपणहि या वचनाचा अर्थ नीट समजावून घेतला पाहिजे. एकारलेल्या जीवनास यापुढें जगांत किंमत नाहीं. जोंपर्यंत शेंकडों लोक अर्धपोटी आहेत, उपाशी आहेत, रोगराईचा फैलाव आहे, अज्ञानाचे डोंगर उभे आहेत, आप-आपसांतील कलह आहेत, राहावयास घरें नाहींत, अंगावर वस्त्रें नाहींत,

खावयास अन्न नसल्यानें शरीरें वाऱ्यानें उडणारीं झालीं आहेत तोंपर्यंत पूर्वेकडील अध्यात्म कोण ऐकणार ? उपनिषदांचा आणि गीतेचा उपदेश कोणास पटणार ? पूर्वेकडे टिकून राहिलेल्या या संदेशास उच्च रवानें आकार धारण करण्यास तरी शक्ति हवी ना ? ती जर आली तरच पूर्व आणि पश्चिम यांचें मीलन एकमेकांचे दोष वगळून मोठ्या आकर्षक स्वरूपांत होईल. एऱ्हवीं अंधानुकरणच व्हावयाचें असेल तर पुन्हां तेच प्रश्न सर्वांना भीति दाखविण्यास तयार आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०१९०

REFBK-0010190